म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. ७८०३
सन १९१५

REFBK-0001189

म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. १५०३

शारदाप्रसादनमण्डल

# अभिनवकाव्यमाला

## भाग तिसरा.

संपादक
नरसिंह चिंतामण केळकर.

किंमत आठ आणे.

पुस्तकें मिळण्याचें ठिकाण
चित्रशाळा, सदाशिव पेठ, पुणें-शहर.

# अभिनवकाव्यमाला.

## भाग तिसरा.

संपादक व प्रकाशक
नरसिंह चिंतामण केळकर,
बी. ए., एल. एल. बी.,
४०१ सदाशिव पेठ, पुणें-सिटी.

मुद्रक
'शंकर नरहर जोशी,'
'चित्रशाळा स्टीम प्रेस', ८१८ सदाशिव पेठ, पुणें-शहर.

शके १८३७—सन १९१५.

किंमत आठ आणे.

# प्रस्तावना.

अभिनव काव्यमालेचा हा ' तिसरा ' भाग तयार करण्याचें काम हातीं घेतल्यास बरेच दिवस झाले. तथापि, रा. नारायण वामन टिळक यांनीं हातीं घेतलेला याच मालेचा ' दुसरा ' भाग प्रसिद्ध होण्याची वाट पहावी लागल्यानें हा भाग बाहेर पडण्यास कालावधि झाला. शिवाय अन्यकार्यव्यापृतत्वामुळें स्वतः आमचा आह्मांला वेळ लागला तो वेगळाच. कसेंहि असो; ' मालेचा ' हा तिसरा भाग आज तरी हातावेगळा होण्याचा योग आला याविषयीं समाधान व्यक्त केल्यावांचून राहवत नाहीं.

हा भाग निघण्याचे कामीं एक अडचण अशी आली कीं दुसऱ्या भागांत ज्या कोणा कवींच्या कवितेचा संग्रह करण्याचें रा. टिळक यांनीं योजिलें होतें त्यांची यादी अखेरपर्यंत आह्मांस मिळाली नाहीं. पहिल्या भागांत ज्यांची कविता आलेली नव्हती अशा पुष्कळ कवींस आह्मीं विनंतिपत्रें पाठवून त्यांजकडून त्यांची कविता आणवूनहि ठेवली होती; परंतु दुसऱ्या भागाकरितांहि त्यांनीं पूर्वीं रा. टिळक यांजकडे आपली कविता पाठविली असून दुसरा भाग निघेपर्यंत थांबण्याचें आह्मीं अखेर ठरविल्यामुळें दुसऱ्या भागांत येणाऱ्या कवींची कविता आह्मांस आयत्या वेळीं गाळावी लागली व नवीन कवींची निवड करून त्यांजकडून कविता घ्यावी लागली. यामुळें हा तिसरा भाग निघण्यास उशीर लागून शिवाय ज्या कित्येक कवींच्या कवितेचा संग्रह करण्याचें आह्मीं हौसेनें योजिलें होतें त्यांची कविता आम्हांस वगळावी लागली.

कवींकडून येणाऱ्या कवितांची निवड होतांहोईतों त्यांजकडूनच करवून घेतली आहे. कवितेच्या प्रमाणासंबंधानें मात्र अगोदर हातीं पडलेल्या कवितेस कांहींशी अधिक व मागाहून हातीं पडलेल्या कवितेस कांहींशी कमी जागा मिळाली आहे. परंतु हा खंडग्रंथ कांहीं ठराविक मर्यादेबाहेर जाऊं न देण्याच्या कारणानें अशी विषमता होणें अपरिहार्य होतें.

कवींमध्यें विद्यमान व मृत अशा दोन्ही प्रकारच्या कवींचा संग्रह करण्यांत आला असून नेहमींच्या पद्धतीस अनुसरून कवींच्या वयोमानाप्रमाणेंच त्यांचा क्रम ठरविण्यांत आला आहे. तथापि रा. केशवराव फणसे यांची कविता उशीरां हातीं आल्यामुळें त्यांना तरुण कवींमध्यें घुसडून घ्यावें लागलें. पण, तारुण्य हें कोणासहि अप्रिय नसतें म्हणून रा. फणसे हे या प्रमादाबद्दल विषाद न मानतां आम्हांस क्षमा करतील अशी आशा आहे.

पुरुष कवींप्रमाणें तीन कवयित्रींनींहि आपल्या कविता या भागांत संग्रहित करण्या-करितां आम्हांकडे दिल्या याबद्दल आम्हीं त्यांचे विशेष आभारी आहों.

कांहीं कवि पाहुण्यांना आम्हीं निमंत्रण केलें असतांहि रा. टिळक यांच्या पूर्व निमंत्रणामुळें त्यांची कविता आमच्या खंडांत छापतां आली नाहीं, हें वर सांगितलेंच आहे. तथापि आमची दुःसह निराशा टळावी म्हणून त्यांच्या एकेक पद्याचा संग्रह ' कवि-संमेलन , या परिशिष्टवजा प्रकरणांत केला आहे.

या खंडांत ज्यांच्या कविता संग्रहित केल्या आहेत अशांपैकीं एक कवि ह्मणजे रा. रा. बाळकृष्ण लक्ष्मण जोशी हे नुकतेच निवर्तले, ही गोष्ट नमूद करण्यास आम्हांस फार दुःख वाटतें.

ही माला प्रसिद्ध होण्यापूर्वीं आधुनिक मराठी कवींची पुष्कळच कविता संग्राह्य झालेली होती. शिवाय गेल्या पांच वर्षांतहि बरीच कविता निर्माण झालेली आहे. यामुळें या तिसऱ्या भागा नंतर चवथाहि भाग प्रसिद्ध करण्याचें कोणी मनावर घेतल्यास त्याला भरपूर साधनसामग्री तयार आहे. व अशा रीतीनें शारदा-प्रसादन-मंडळाचें हें मंगल-कार्य खंडरहित चालू राहिल्यास मंडळाच्या मूल चालकांचा हेतु तडीस जाऊन मराठी काव्यग्रंथांत भर पडेल.

पुणें.
ता. १५ जून १९१५.
मंगळवार, ज्येष्ठ शु॥
४ शके १८३७.

नरसिंह चिंतामण केळकर.

## अभिनवकाव्यमालेसंबंधानें

# चार शब्द.

सहा वर्षांपूर्वीं पुणें येथें कांहीं महाराष्ट्र कवि एकत्र जमले व त्यांनीं शारदा-प्रसादनमण्डल या नांवाची एक संस्था स्थापन केली. मुख्यत्वेंकरून आधुनिक विद्यमान कवींचीं काव्यें, त्यांच्याच खर्चानें, लहान लहान पुस्तकांच्या द्वारें प्रसिद्ध करावीं अशा हेतूनें सदर मंडळानें 'अभिनवकाव्यमाला' या नांवाची पुस्तकमाला सुरू केली. या मालेचीं आतांपर्यंत तीन पुष्पें गुंफिलीं गेलीं आहेत. त्यांपैकीं पहिलें पुष्प माझे विद्वान् व रसिक कविमित्र वे. शा. सं. लक्ष्मणशास्त्री लेले यांनीं गुंफिलें आहे. शास्त्रीबोवांनीं संपादिलेल्या भागांत कृ. शा. चिपळूणकर, महाजनि, आगाशे, मोडकद्वय, भिडेद्वय, टिळक, नरसोपंत केळकर, कोल्हटकर, इत्यादि सुप्रसिद्ध कवींच्या रसिकमान्य कृतींतील निवडक उतारे दिले आहेत. शिवाय वाङ्मयाच्या राज्यांत सरस्वतीमंदिरांत लिंग, वर्ण, जाति, वय, इत्यादिकांचा भेद नाहीं हें उदार तत्त्व आपणांस मान्य आहे हें प्रत्यक्ष कृतीनें दाखविण्याकरितांच कीं काय, शास्त्रीबोवांनीं दोन कवयित्री व एक बालकवि यांच्या कृतींचे कांहीं नमुने आपल्या भागांत दिले आहेत ही गोष्ट अभिनंदनीय आहे. मालेच्या दुसऱ्या व तिसऱ्या भागांतही या तत्त्वाचा अवलंब केला आहे, हें पाहून संतोष वाटतो. एकंदरींत मालेचा पहिला भाग लेलेशास्त्री यांच्या लौकिकास साजेलसा आहे यांत संशय नाहीं. दुसऱ्या भागाचें संपादकत्व पूर्वोक्त मंडळानें मराठी सुप्रसिद्ध वीणाकाव्यरचनापटु रे. नारायण वामन टिळक यांस दिलें होतें. कांहीं अपरिहार्य कारणामुळें रे० टिळक यांचें पुस्तक प्रसिद्ध होण्याला फार विलंब लागला. टिळकांच्या भागांत कै. गणेशशास्त्री लेले, त्यांचे चिरंजीव लक्ष्मणशास्त्री लेले, चंद्रशेखर, रेंदाळकर, गोविंदाग्रज, वि. ज. करंदीकर, इत्यादि प्रसिद्ध कवींच्या रमणीय कृतींतील वेंचे दिले आहेत. दुसरीं पुष्कळ निकडीचीं कामें असतां व स्वीकृत कार्यांत अडचणी उपस्थित झाल्या असतांही 'प्रारब्धस्यान्तगमनम्' या वचनानुसार टिळक कवींनीं आपलें काम तडीस

नेलें हें त्यांस भूषणास्पद आहे. टिळकांचा भाग एकंदरींत चांगला झाला आहे. मालेचा प्रस्तुतचा म्हणजे तिसरा भाग, मंडलाच्या विनंतीस मान देऊन, केसरीचे सर्वविश्रुत विद्वान् संपादक रा. रा. नरसोपंत केळकर यांनीं संपादिला आहे. यांत कै. बळवंत ज. करंदीकर, वासुदेवशास्त्री खरे, कवि वसंत, मुजुमदार, सुमंत, राधारमण, इत्यादि प्रसिद्ध कवींच्या कृतींतील सुंदर व वाचनीय उतारे दिले आहेत. या भागांतील सौ. शांताबाई फणसे, कै. सौ. लक्ष्मीबाई बेहरे, सौ. मनोरमाबाई रानडे आणि सौ. लक्ष्मीबाई अभ्यंकर यांच्या कविता फार मधुर व रसाळ आहेत. या भागाच्या शेवटीं अनेक कवींच्या कृतींतून लहान लहान उतारे देऊन त्यांचें एक 'कविसंमेलन' बनविलें आहे. ही योजना अगदीं नवीन असून मनोरंजक आहे. हिचा अंगीकार पुढील भागांच्या संपादकांनीं अवश्य करावा अशी माझी त्यांस सप्रेम सूचना आहे. प्रस्तुत मालेच्या संपादकवर्गाला आपलें काम अगदीं निरपेक्ष रीतीनें करावें लागतें. म्हणून त्यांच्या परिश्रमाचा परामर्ष या ठिकाणीं आम्हीं थोडक्यांत घेतला आहे. ही माला सर्व कवींची आहे. त्यांनीं हिजवर प्रेम ठेवून हिचें संवर्धन करावें अशी माझी त्यांस मंडळातर्फे विनंति आहे. शारदाप्रसादनमंडल व प्रस्तुत माला यांच्या संबंधाची माहिती पुढील पानांवर दिली आहे तीही जिज्ञासूनीं अवश्य वाचून पहावी.

पुणें.<br>ता. १५।७।१५.

गो. वा. कानिटकर,<br>शारदाप्रसादनमंडलाचे अध्यक्ष.

# शारदाप्रसादनमण्डल.

ही संस्था पुणें येथें कांहीं महाराष्ट्र कवींनीं इ. स. १९०९ सालीं मे महिन्यांत स्थापन केली. हिच्या नांवावरून हिच्या कार्याची दिशा स्थूल मानानें लक्ष्यांत येण्यासारखी आहे. आधुनिक विद्यमान मराठी कवींचीं काव्यें लहान लहान पुस्तकांच्या द्वारें प्रसिद्ध करण्याचें काम हिनें हातीं घेतलें. काव्यरत्नावली-सारख्या मासिकांतून किंवा अन्य मासिकें व वर्तमानपत्रें यांतून आधुनिक काव्यें प्रसिद्ध होत आहेत ही गोष्ट अभिनंदनीय आहे. तथापि मासिकें व वर्तमानपत्रें यांना स्वतंत्र पुस्तकांपेक्षां चिरस्थायित्व कमी असतें. म्हणून आधुनिक काव्यें चिरस्थायी करण्याचा प्रयत्न करून पहावा या उद्देशानें पूर्वोक्त मंडळानें 'अभिनव-काव्यमाला' या नांवाची आधुनिक काव्यमाला सुरू करण्याचें ठरवून तिची सर्व व्यवस्था एका कार्यकारी मंडळाकडे सोंपविली. या कार्यकारी मंडळाची रचना अशी आहे:—

रा. सा. गोविंद वासुदेव कानिटकर, बी. ए., एल एल बी.— अध्यक्ष.
वे. शा. सं. रा. रा. लक्ष्मणशास्त्री लेले ... ... — चिटणीस.
रा. रा. विद्याधर वामन भिडे, बी. ए. }
रा. रा. बाळकृष्ण अनंत भिडे, बी. ए. } सभासद.
रे. नारायण वामन टिळक. }

काव्यमालेचें स्वरूप व व्यवस्था हीं कशीं असावीं याविषयीं कांहीं नियम मंडळानें ठरविले; तसेंच मंडळासंबंधाचेही कांहीं नियम केले ते येथें खालीं दिले आहेत. (१) मालेचा प्रत्येक भाग क्राऊन षोडशपत्री १५० पासून २०० पृष्ठांचा असावा. (२) त्याची किंमत आठ आणे असावी. (३) एका भागांत एका कवीची कविता एका फार्मापेक्षां म्हणजे सोळा पानांपेक्षा अधिक नसावी. (४) कवि कालक्रमानें घेऊन त्यांच्या उताऱ्यांच्या आरंभीं त्यांच्या संबंधाची थोडी माहिती व त्यांचे काव्यग्रंथ यांची यादी द्यावी. (५) कवीनें आपल्या काव्यांबरोबरच आपल्या काव्यांच्या छपाईची रक्कम ( ही बहुधा पानीं रुपयाप्रमाणें

पडते ) संपादकाकडे पाठवावी. ( ६ ) संपादकाची योजना कार्यकारी मंडळानें बहुमतानें करावी. ( ७ ) अशा नेमलेल्या संपादकानें कविमंडळाकडून काव्यें व त्याला लागणारा खर्च वसूल करावा. ( ८ ) संपादकानें काव्याची निवड स्वतः करावी व चवथ्या नियमांत सांगितल्याप्रमाणें त्याची जुळणी करावी. ( ९ ) पुस्तकाच्या साहित्याची व खर्चाची पूर्ण तयारी झाल्यावर संपादकानें पुस्तकाची हस्तलिखित प्रत कार्यकारी मंडळाच्या अध्यक्षांस किंवा चिटणिसांस दाखवावी व त्यांच्या संमतीनें सदर पुस्तक पूर्णपणें स्वतःच्या देखरेखीखालीं छापून तयार करावें. ( १० ) पुस्तकाच्या प्रती एक हजार काढाव्या. ( ११ ) पुस्तकाचें बिल् संपादकांनीं चुकतें करावें. ( १२ ) सोळा पानांना पन्नास प्रती या प्रमाणानें पुस्तकाच्या प्रती, ज्यांचीं काव्यें पुस्तकांत छापिलेलीं असतील त्या कवींस, संपादकांनीं नजर कराव्या. ( १३ ) कविमंडळाला विनंतिपत्र, पत्रव्यवहार, पुस्तकें रवाना करणें इत्यादि कामांकरितां संपादकांना जो खर्च येईल तो पुस्तकांच्या रूपानें त्यांनीं वसूल करावा. ( १४ ) इतकें करून शिल्लक राहिलेलीं पुस्तकें संपादकांनीं कार्यकारी मंडळाच्या चिटणिसांच्या हवालीं करावीं. ( १५ ) चिटणिसांनीं प्रसिद्ध वर्तमानपत्रें, मासिकें, मराठी ग्रंथसंग्रहालयें व इतर सत्पात्र गृहस्थ यांस पुस्तकाची एक एक प्रत नजर करावी. ( १६ ) चिटणिसांनीं बाकी राहिलेल्या पुस्तकांसंबंधीं व्यवहार एकाद्या प्रसिद्ध व प्रामाणिक पब्लिशराशीं ठेवावा. ( १७ ) विकलेल्या पुस्तकांच्या रकमेपैकीं अर्धी चिटणिसानीं मालेच्या पुढच्या भागाकरितां राखून ठेवावी व तेवढ्या खर्चांत एकाद्या आधुनिक गत कवीची किंवा विद्यमान अकिंचन कवीची कृति त्या भागांत येईल अशी व्यवस्था करावी; राहिलेली अर्धी रक्कम कार्यकारी मंडळीला लागणाऱ्या कामाकरितां राखून ठेवावी. ( १८ ) एकाद्या गृहस्थानीं अमुक एका आधुनिक कविची कविता आपण प्रकाशित करा, त्याचा खर्च मी देतों; असें म्हटल्यास ती कविता संपादकांनीं वाचून पाहून योग्य असल्यास संगृहीत करावी. मात्र अशी कविता छापल्यास तिच्या मोबदल्याचीं पुस्तकें सदर रक्कम देणारास मिळतील व एक प्रत मात्र कवीला नजर करतां येईल. ( १९ ) मालेच्या पुस्तकावर मंडळाचा हक्क आहे, कोणा एका व्यक्तीचा नाहीं. ( २० ) पुस्तकांच्या व्यवस्थेचा रिपोर्ट चिटणीस यांनीं कार्यकारी मंडळाकडे करावा. ( २१ ) माला बंद पडल्यास मंडळानें बहुमतानें

मालेच्या पुस्तकांची व्यवस्था लावावी. (२२) पैशांच्या किंवा काव्यांच्या रूपानें मदत करणारा कोणीही गृहस्थ मंडळाचा सभासद होऊं शकतो. (२३) सभासदांना कार्यकारी मंडळ नेमण्याचा व त्यांत निवडून येण्याचा हक्क आहे. (२४) कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष व चिटणीस पुण्याचे रहिवासी असावे. (२५) कार्यकारी मंडळांतील रिकामी झालेली जागा मंडळानें बहुमतानें भरावी. (२६) कार्यकारी मंडळ बदलण्याची आवश्यकता वाटल्यास तें मंडळानें बहुमतानें बदलावें. (२७) आजपर्यंत ज्यांनीं मालेस द्रव्याच्या व काव्याच्या रूपानें हातभार लाविला ते मंडळाचे सभासद होत. (२८) कोणा सभासदास कांहीं सूचना कर्तव्य असल्यास त्यानें ती कार्यकारी मंडळीच्या चिटणिसामार्फत करावी, म्हणजे तिचा योग्य विचार होईल. (२९) मंडळाच्या सभेला निदान आठ तरी सभासद असावे, व कार्यकारी मंडळाच्या सभेला निदान एक सभासद, अध्यक्ष व चिटणीस यांनीं हजर असावें. (३०) मंडळाचे कायमचे अध्यक्ष रा. सा. गोविंद वासुदेव कानिटकर हे असावे व कायमचे चिटणीस रा. लक्ष्मण-शास्त्री लेले हे असावे. (३१) सदर गृहस्थांनीं उभयतां किंवा त्यांपैकीं कोणी तरी एकानें, मंडल व माला यांच्या संबंधाची हकीकत, वर्षांतून एकदां तरी, एकाद्या सुप्रसिद्ध वर्तमानपत्रांत किंवा मासिकांत, किंवा हस्तपत्रद्वारा, प्रकाशित करावी. (३२) संपादकांनीं आपल्या अधिकाराचें उल्लंघन केल्यास त्याची जबाबदारी मंडलावर किंवा कार्यकारी मंडलावर नाहीं.

# अनुक्रमणिका.


| कवि व विषय. | पृ. सं. |
|---|---|
| **१ कै. व. ज. करंदीकर** | **१–११** |
| १ स्वसंवेद माला. | १ |
| २ कवितेचा निरोप. | ३ |
| ३ ही कोण माझी दशा ! | ६ |
| ४ हृदयसंगम हाच० | ९ |
| ५ प्रेमाभावीं सर्व पसारे० | १० |
| **२ वा. वा. शास्त्री खरे** | **१२–२२** |
| १ उज्जयिनी. | १२ |
| २ मृत्यु | १५ |
| **३ ना. न. फडणीस** | **२३–३०** |
| १ महाराष्ट्र मुक्तामाला. | २३ |
| **४ ल. ना. फडणीस.** | **३१–३२** |
| १ कारंजें. | ३१ |
| २ मोहिनीगीत. | ३१ |
| ३ विनायकास— | ३२ |
| **१ कवि वसंत** | **३३–४२** |
| १ शब्द | ३३ |
| २ मन | ३४ |
| ३ मनुष्य तितका एकच आहे. | ३४ |
| ४ ताजमहाल पाहिल्यावर— | ३६ |
| ५ संक्रांत | ३७ |
| ६ वसंतक्रीडा. | ३८ |
| ७ कै. हरि माधव पंडित | ३९ |
| **५ ल. रा. पांगारकर** | **४२–५७** |
| १ अनुभवयोगीराज काव्य सर्ग १ | ४३ |
| —सदर—सर्ग २ | ४८ |
| २ श्रीरामप्रार्थना. | ५२ |
| ३ श्रीहरिस्तव | ५३ |
| ४ जन्मसाफल्य. | ५४ |
| ५ परोपकारी धर्मोपदेशक | ५५ |
| **६ कै. श्री. ना. मुजुमदार** | **५७–६२** |
| १ मार्गांतील सरोवर. | ५८ |



| कवि व विषय | पृ. सं. |
|---|---|
| २ चंद्रावतीचें प्रोत्साहन | ५९ |
| ३ चंद्रावतीचा विलाप. | ६० |
| **७ श्री. नी. चाफेकर** | **६२–६६** |
| १ उन्नतिगीत. | ६२ |
| २ वेडी | ६३ |
| ३ अनंततनयास— | ६४ |
| ४ गुलाबदूतिका. | ६५ |
| **८ कृ. पां. लिमये.** | **६६–७२** |
| १ कवि | ६७ |
| २ प्रियेचे अश्रुबिंदु | ६७ |
| ३ दाता व देव | ६९ |
| ४ अन्योक्तिमाला. | ६९ |
| ५ खरड्याचा युद्धप्रसंग | ७० |
| ६ आनंदीबाईचें राघोबादादाशीं० | ७२ |
| **९ बा. ल. जोशी.** | **७३–८०** |
| १ सुंदर मोत्यें. | ७३ |
| २ प्रियाविनोद. | ७५ |
| ३ भूलोकचा चंद्र | ७६ |
| ४ राजनिष्ठा. | ७९ |
| ५ भीषण रणभूमी. | ८० |
| **१० के. वि. फणसे** | **८१–९०** |
| १ जीवनकलह व कविता. | ८१ |
| २ वनोन्मुख सीता. | ८२ |
| ३ झंझावात. | ८२ |
| ४ मशकान्योक्ति. | ८३ |
| ५ विरहोद्गार. | ८५ |
| **११ सौ० शांताबाई फणसे** | **९०–९६** |
| ✓ १ आईस पत्र. | ९० |
| २ खेदेद्गार. | ९२ |
| ३ मैत्रिणीस पत्र. | ९३ |

| कवि व विषय | पृ. सं. |
|---|---|
| ४ कन्येस उद्देशून. | ९४ |
| ५ मार्गप्रतीक्षा. | ९५ |
| ६ प्रवासांतील पहाट. | ९६ |
| **१२ म. कृ. गाळवलकर** | **९७-१००** |
| १ प्रीतिमीमांसा. | ९७ |
| २ ईशस्तवन. | ९८ |
| ३ ईशस्तव. | ९८ |
| ४ अर्ध्या फुललेल्या गुलाबास— | ९९ |
| **१३ अ. धु मुरतुले** | **१००-१०६** |
| १ विरहिणी. | १०१ |
| २ अनुकारी अथवा तीर आणि गरूड. | १०२ |
| ३ बुद्धिकल्पना आणि परतंत्रता. | १०३ |
| ४ पतंगास— | १०४ |
| ५ वर आणि खालीं. | १०६ |
| ६ मातृप्रेमा हेतु नसे. | १०६ |
| **१४ ग. बा. शिंदे** | **१०७-१०९** |
| १ दिवंगततारा. | १०७ |
| २ आहे मनोहर तरी० | १०८ |
| ३ मिलोदन. | १०९ |
| **१५ गो. गो. पाटणकर** | **११०-११३** |
| १ रामाचा सीतेसंबंधी शोक. | ११० |
| २ शंखध्वनि छापखाना. | १११ |
| ३ संध्याकाळची सहल. | ११२ |
| ४ तें पाऊल कोणाचें ? | ११३ |
| **१६ सौ० लक्ष्मीबाई अभ्यंकर** | **११४-११८** |
| १ शिशुपण. | ११४ |
| २ शिशुकुंतल | ११६ |
| **१७ के. म. सोनाळकर** | **११८-१२१** |
| १ रजनीवैधव्य. | ११९ |
| २ प्रेम. | ११९ |
| ३ क्षुल्लक गोष्टी. | १२० |

| कवि व विषय. | पृ. सं. |
|---|---|
| ४ प्रेमयज्ञ. | १२१ |
| **१८ श्री. म. माटे.** | **१२२-१२६** |
| १ भुंग्याची फजीती. | १२२ |
| २ कांहीं मनोहर वस्तूंच्या० | १२२ |
| ३ ऊठ अहल्ये प्रभात० | १२३ |
| **१९ प. या. निफाडकर** | **१२६-१३०** |
| १ अश्रु. | १२७ |
| २ माझें सृष्टीवरील प्रेम. | १२९ |
| ३ रडा ! रडा ! तें० | १३० |
| **२० वा. शं. फातरफेंकर** | **१३१-१३३** |
| १ अंबोली. | १३१ |
| २ विरहीसंवाद. | १३२ |
| **२१ पं. वा. घाणेकर** | **१३४-१३६** |
| १ तारा. | १३४ |
| २ गगना ! | १३४ |
| ३ एकटा फिरणारा मेघ. | १३५ |
| ४ कधिं न इतरांच्या० | १३५ |
| ५ प्रातःकालचा चंद्र. | १३६ |
| **२२ ग. स. जोशी** | **१३७-१३९** |
| १ तांब्या घासत अस० | १३७ |
| २ मनाचें तर्कशास्त्र. | १३८ |
| **२३ व ग. खापर्डे** | **१४०-१४४** |
| १ मदनविद्धाचें ज्योतिष. | १४० |
| २ द्वैतांची फुगडी. | १४१ |
| **२४ ना. के. बेहेर** | **१४५-१४९** |
| १ युगांतर. | १४५ |
| २ छाया. | १४८ |
| ३ नश्वर देह. | १४९ |
| **२४ कै. सौ. लक्ष्मीबाई बेहेरे** | **१५०-१५१** |
| १ उद्यान. | १५० |
| २ ' ना कळे. ' | १५१ |

कवि व विषय. पृ. सं.

**२५ आ. कृ. टेकाडे १५१–१५४**
१ प्रभुकृति. १५२
२ रजनीचंद्राचा मंगलविवाह. १५४

**२६ श्री. वा. रानडे १५५–१५८**
१ प्रातःकाळीं पडलेलें इंद्रधनुष्य. १५५
२ माझा मृत्यु. १५६

**२७ शं. के. कानेटकर १५९–१६२**
१ रामाचा आत्मसाक्षात्कार. १५९
२ वनदेवींचें गाणें. १६१

**२८ भा. ना. शिंदे. १६२–१६६**
१ चंडोल. १६३
२ जीवितसरिता. १६६

**२९ सौ. मनोरमाबाई रानडे १६७–१७०**
१ चांदणी. १६७
२ सागरगोटा. १६९
३ पुरे पुरे ग हसणे ! १७०

**३० कविसंमेलन १७१–२०८**
१ केशवसुत, आम्ही कोण ? १७१
२ विनायक, जोहार. १७२
३ चंद्रशेखर, कारंजें. १७३
४ दत्त, विश्वामित्रीच्या कांठीं. १७४
५ वि. द. घाटे. स्मशानांत. १७५
६ गो. पां. देवधर. प्रेमोत्कर्ष. १७५
७ वा. वि. सहस्त्रबुद्धे, उषा. १७६
८ रेंदाळकर, आलिंगन. १७६
९ धुं. ग. बापट, भगत्प्रेमनिर्झर. १७७
१० आनंदीरमण, तारें आणि कमळें. १७८

कवि व विषय. पृ. सं.

११ बालकवि, तारकांचें गाणें. १७९
१२ वि. बा. कुळकर्णी, नम्र असावें. १८०
१३ ना. वा. टिळक, प्रेमवि० १८१
१४ श्री. ना. सातघर, रमानायका० १८२
१५ भा. रा. तांबे, आतां गडी फू० १८२
१६ ए. ग. भांडारे, रत्नमाला. १८३
१७ कृ. बा. कुळकर्णी, रसालास. १८४
१८ नागेश, कोकिलास निरोप. १८४
१९ न. शं. रहाळकर, तान्हुला. १८६
२० मो. ग. लोंढे, रायगड काय० १८७
२१ गं. रा. मोगरे, विजयिनी० १८८
२२ वा. अ. भिडे, मुलाचें कौतुक १९०
२३ वि. वा. भिडे, सुख व दुःख. १९२
२४ ना. म. भिडे, प्रियेस. १९३
२५ म. गो. भिडे, देव आणि भक्त. १९३
२६ माधवानुज, स्मशानगीत. १९४
२७ इंदुकांत, वल्लभवांछित १९५
२८ ह. ना. आपटे, कोमेजलेलें फूल १९६
२९ वा. ज. कुंटे, माझें गाणें. १९७
३० गोविंदाग्रज, फुटकी तपेली. १९८
३१ गो. वा. कानिटकर, [illegible]ति. २००
३२ नीलकंठ, प्रभात. २०१
३३ अं. ब. कोल्हटकर, कवितेचा० २०२
३४ ग. ज. आगाशे, साहित्यसंमे० २०३
३५ धूर्जटि, विरह दुःख. २०५
३६ विद्यावनविहारी, नदी. २०५
३७ वनमाली, तारांगण. २०६
३८ ज. के. उपाध्ये, मानवास– २०७
३९ कु. वेणुबाई केळकर, सायंतारा. २०७
४० द. रा. गदगकर, वेड्याचें कोडें. २०८
४१ ल. पां. भोसेकर, [illegible]. २०८

# शुद्धिपत्र.

| पृष्ठ. | ओळ. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|
| २ | ६ | प्रणामीं | प्रमाणीं |
| ३ | २८ | गगनभेद | गगनभेदि |
| ७ | २४ | समज | समजे |
| २० | ३ | नये | न ये |
| २४ | १३ | क्रांतारीं | कांतारीं |
| २८ | २ | तुष्छ | तुच्छ |
| ३० | ११ | गगे | गंगे |
| ३३ | ८ | शके १८७१ | शके १७९३ |
| ,, | ,, | सन १८६१ | सन १८७१ |
| ३४ | ४ | नपुर | नूपुर |
| ४२ | १८ | मह र | महशूर |
| ४६ | ९ | महदु:ख | महद्दु:ख |
| ५० | १३ | सत | संत |
| ५३ | ७ | सकट | संकट |
| ५७ | ३ | सन्मागच्युत | सन्मार्गच्युत |
| ६२ | ८ | चित्ता | चिंता |
| ७४ | ३१ | अशा | आशा |
| ~~८४~~ | २९ | गूहकोण | गृहकोण |
| ८५ | ३० | वेडा | वेढा |
| ८७ | १० | दुर्व्यंता | दुष्यंता |
| ,, | १८ | क्रीडावबा | क्रीडावया |
| ,, | ३१ | शृंगारशेष्टा | शृंगारचेष्टा |
| ८८ | ११ | भ्रम | भ्रमें |
| ८९ | ६ | मंदाक्रांता | स्रग्धरा |
| १०५ | १९ | चांपिल | चेपिल |
| १०७ | ११ | विद्यालयांतील | विद्यालयांत |
| १२२ | २५ | थिजनि | थिजुनि |
| १३१ | ३ | गांवींच | पनवेलीस |
| १५९ | ६ | संग्रह | संग्रह |
| १८१ | २७ | ज न | जन |

# सूचना.

१ अशुद्धें राहूं न देण्याबद्दल शक्य तितकी काळजी घेतली असतांही नजरचुकीनें बरींच अशुद्धें राहिलीं आहेत व कांहीं छापतांना खिळे उडून झालीं आहेत शुद्धिपत्राप्रमाणें पुस्तक शुद्ध करून घेऊन वाचण्याचा कोणी फारसा खटाटोप करीत नाहींत असा अनुभव आहे, अतएव तें देण्यापासून तादृश उपयोग होत नाहीं. म्हणून विस्तृत शुद्धिपत्र देण्याची यातायात केली नाहीं. तथापि अर्थविपर्यास होईल अशा अशुद्धांचें शुद्धीकरण वर केलें आहे.

२ रा. रा. गो. गो. पाटणकर 'कवि साधुदास' यांच्या जीवनवृत्तांताची जी स्वल्प माहिती त्यांच्या कवितेच्या वर दिली आहे तींत, "यांनीं 'वनविहार' व 'रणविहार' अशीं दोन महाकाव्यें रामायणांतील कथाभागावर लिहिलीं आहेत, व अशाप्रकारें संबंध रामायणांत 'विहार' करण्याचा त्यांचा विचार आहे," असें लिहिलें आहे; परंतु ते आतां कळवितात कीं, उपरिनिर्दिष्ट महाकाव्यें ही त्यांची एकट्याची कृति नसून ती, ते व रा. रा. द. रा. गदगकर, बी. ए. एल्, एल्. एम्. अशा उभयतांची मिळून आहे. तात्पर्य, 'साधुदास' हें त्यांचें एकट्याचें नांव नसून तें, रा. रा. पाटणकर व रा. रा. गदगकर या उभयकवींची जोडगोळी आहे.

# अभिनवकाव्यमाला

## भाग तिसरा.

## १ कै० बळवंत जनार्दन करंदीकर.

यांचा जन्म धुळें येथें शालिवाहन शके १७७७ त (इ. स. १८५५ च्या दिसेंबरांत) झाला. खुद्द यांच्या नांवानें अशी फारच थोडी कविता प्रसिद्ध झाली आहे. गंधर्व, रमाकांत नागांवकर आणि बळवंत या नांवांनीं काव्यरत्नावलींत जीं प्रकरणें प्रसिद्ध झालीं आहेत तीं ह्यांचींच होत. त्यांनीं धुळ्यास 'आर्यावर्त' पत्र काढिलें होतें. पुढें त्यांनीं त्याचा संबंध सोडून 'खानदेश वैभव' ह्या पत्राचें संपादकत्व स्वीकारिलें. हें काम त्यांनीं अखेरपर्यंत केलें. हे सत्कवि शके १८२५ त (ता. १४ आक्टोबर स. १९०३ रोजीं) धुळें येथेंच वारले. हे प्रसिद्ध 'विनायक' कवींचे बंधु होत.

### १० स्वसंवेदमाला.

श्लोक. (भुजंगप्रयात)

तुला लाभ जो मानवा! जन्म झाला। कशाला, तुवां पाहिजे शोध केला।
तुझें या जगीं कार्य कर्तव्य आहे?। सुटेना सुटावें तसें गूढ कीं हें. ॥ १ ॥
कळूं लागतां पोट पाठीस लागे.। न कां भूक ती थोडक्यानेंच भागे?।
कशाला तरी हे खटाटोप नाना?। पुरेसें न वाटे, किती कां मिळेना. ॥ २ ॥
सुखार्थं भ्रमें जन्म वाटे मनास.। स्वयें कष्टतें, कष्टवी तें तनूस.।
असे भोगितां भोगितां कष्ट नाना,। सुखाचा अहा! लाभ कांहीं घडेना ॥ ३ ॥

खरें पाहतां जन्म हें दुःखमूळ । सुखप्राप्तिचा यत्न हें शुद्ध खूळ. ।
जगीं दुःख भोगावया प्राणि येतो । प्रयत्नें तया तो निवारीत जातो. ॥ ४ ॥
प्रयत्नीं अशा सिद्धि, तें सौख्य होय । खरें, अन्यथा सिद्ध होईल काय? ।
जगीं सौख्य ही गोष्ट अत्यंत खोटी । खरी मानितां तीच दुःखांत लोटी ॥ ५ ॥
न दुःखाविणें जाणितां सौख्य येतें. । कळेना सुखावांचुनी दुःख कां तें ।
स्वयें व्यक्त हो दुःख, तैसें न सौख्य । प्रणामीं धरावी अशी गोष्ट मुख्य ॥ ६ ॥
गळूं काय तें ! दुःख त्याचें शरीरीं । भरे; सर्वथा वाटतो जीव भारी. ।
सुखस्वास्थ्य सारेंच जातें लयाला. । मुळीं गोड लागे न कांहीं जिवाला ॥ ७ ॥
जसें चिंतिलें सर्व आलें घडून, । मनासारखें एक झालें परी न. ।
कितीही, कशीही असो क्षुद्र गोष्ट । सदा क्षोभवी चित्त, दे थोर कष्ट ॥ ८ ॥
असे काय ह्या बीज दुःखद्वयाचें? । कसें, कोठुनी उद्भवे कार्य त्याचें? ।
असे मूल दुःखास इच्छेस रोध । ठसो हा मनीं सत्य सत्य प्रबोध. ॥ ९ ॥
असे कारणीभूत दुःखास इच्छा. । अभावीं कसें उद्भवें तें तियेच्या ? ।
तिला रोधिलें, छेदिले ज्या महंतें, । कसें दुःख व्हावें, कळेना, तयातें. ॥१०॥
गमे हर्ष उल्हास, आनंद ज्यांत, । न मानी कधीं प्राज्ञ सत्सौख्य त्यांत. ।
विकारीं घडे ह्या पुढें कीं विषाद; । करावा तयें लागतो फार खेद ॥ ११ ॥
अशा नष्ट खोट्या सुखाला भुलावें ? । कधींही न सुज्ञें. वृथा कां फसावें ? ।
विकार स्वरूपें सुखाच्या, मनाला । स्वयें रंगती, मोह घालावयाला. ॥ १२ ॥
मुळीं ह्या जगीं सौख्य ही वस्तु नाहीं. । मिळावी कशी? 'तूंच शोधून पाहीं'।
असे सौख्य जाणे अभावस्वरूपी. । परी दुःख तें मात्र हो भावरूपी. ॥ १३ ॥
इथें ना तिथें, ह्यांत ना त्यांत कोठें । तरी, सौख्य लागेल, हें शुद्ध खोटें. ।
श्रमें मात्र ये दुःख टाळावयातें । चुके त्रास, पीडा. तरी सौख्य का तें ? ॥ १४
खरें सौख्य नाहीं. जगीं सावली का? । न वाटे खरी कल्पना ही विवेकी. ।
मुळावाचुनी सांवली संभवेना, । असे मूळ कोठें ? कळे गूढ कोणा? ॥ १५ ॥
नसे सांवली, भास होई सुखाचा. । फुटे भोंपळा शेवटीं हा भ्रमाचा. ।
भ्रमापासुनी दूर होशील जेव्हां, । सुखाचें खऱ्या ज्ञान होईल तेव्हां ॥ १६ ॥
सुखाचें भरे वेड चित्तांत जेव्हां, । करूं जे नये चार होतात तेव्हां. ।
असे चार होतील कां सौख्यकारी ? । शिरावें कशाला अशा नष्ट चारीं ? ॥ १७
नको दुःख दे जें फुका हर्ष मोठा. । असे शेवटीं त्यांत सर्वस्व तोटा. ।
हिरा टाकुनी गार हातीं धरावी ! । बळें दृष्टि कां अंध ऐशी करावी ? ॥ १८ ॥
अनिष्टास टाळावया सुज्ञ पाही. । सुखाशेंतची मूर्ख गुंतून राही. ।
बरा कोणता यांतला मार्ग आहे ? । टळे दुःखपीडा कशानें पहा हें ॥ १९ ॥
जगाचें दिसे पेटलें रान सारें. । भवाचें मधें चालतें घोर वारें. ।

अशा पेटल्या काननीं मानवास। कसा दाहिल्यावीण राहील वास ? ॥ २० ॥
तरी त्यांतल्या त्यांत लागेल जेणें। कमी दाह, तें सर्वथा ग्राह्य जाणें।
न लागो कधीं दाह तो लेशमात्र.। असंभाव्य तैसें नव्हे कां विचित्र? ॥ २१ ॥
नसे दुःख तेव्हां सुखाच्या मनांत। अनेकापरी कल्पना खेळतात.।
सुखाचें कसें दाविती चित्र रम्य!। पडे मोह; लीला तयांची अगम्य. ॥ २२ ॥
जया मूल नाहीं, अशा चित्रमूला। भुलूनी असे कां कधीं लाभ झाला?।
भुले कल्पनेला अशा नष्ट दुष्ट,। तयाच्या कपाळीं सदा दुःखकष्ट. ॥ २३ ॥
असे नष्ट चांडाळ ही कल्पनाच!। मनीं तान मारीं; करी काय नाच! १
कशी ओढिते ती बळें दुर्विकारीं?। नसावा तिचा संग तो घातकारी. ॥ २४ ॥
महा घातकी दुष्ट ही चेटकीण.। हिची मंत्रविद्या असे कीं कठीण.।
हिच्या मोहजालीं पडे तो सुटेना.। सुखाचा कधीं लाभ त्याला घडेना. ॥ २५ ॥
दिसे काव्यकादंबरीनाटकांत,। सुखाचें नसे रेखिलें चित्र सत्य.।
अशा वाचनानें मतिभ्रंश पावे,। सुखाचें पिसें लागतें, त्या जपावें. ॥ २६ ॥
समुद्रोदकीं क्षारता धर्म त्याचा;। तसा दुःख ह्या धर्म आहे जगाचा.।
नये माधुरी आणितां क्षारतोया;। सुखाचा तसा या जगीं यत्न वाया. ॥ २७ ॥
जशी भव्य इच्छा, तसें भव्य दुःख.। परी अल्प इच्छा, तसें थोर सौख्य.।
सुखाचें जसें, आपदेचें तसेंच। असे मूल इच्छेंत, हें जाण साच ॥ २८ ॥
म्हणूनी करावी बरी अल्प इच्छा.। खरा मार्ग सोपा असे हा सूखाचा.।
उडी उंच घेतां पडे फार लागे.। सुखी पादचारी बिचारा न भागे. ॥ २९ ॥
दिला जन्म माझा मला मी न सत्य.। बरें, मृत्यु तोही नसे मत्करांत.।
मनीं इच्छिलें कार्य तें वर्तवीन,। असें निश्चयानें जरी सांगवे न. ॥ ३० ॥
हवें तें मिळेना, नको तें टळेना,। हवें तें घडेना, नको तें चुकेना.।
पराधीनता यापरी सर्वथैव.। सुटेना तरीही अहंमन्यभाव. ॥ ३१ ॥

---

## २ कवितेचा निरोप.

श्लोक. ( वृत्त. पृथ्वी )

सचिंत फिरतां वनीं सहज रम्य एके दिनीं,।
चमत्कृति विलोकिली, क्षण दुभंगली मेदिनी.॥
प्रभा प्रकटली, गमे गगनभेदी सौदामिनी;।
धरून ललनाकृती मृदुगिरा वदे बोधिनी, ॥ १ ॥

करून थकलें उपाय, हरलें, बघेनाच तो ।
मुळीं मजकडे. निरर्थक किती तरी नाचतो! ॥
निरोप अनुजा करी विदित हा तुला सांगतें. ।
वडील म्हणुनी अनादर न हो तुझा इच्छितें. ॥ २ ॥
गळ्यांत जड घेतलें अडकवून जें लोढणें, ।
पडेल तुजला, पहा ! कठिण तें बळें सोडणें. ॥
सुजेल मृदु, कोंवळा सहज काष्टभारें गळा. ।
अपापच तुटेल तें, तुज करावया वेगळा. ॥ ३ ॥
सुखास्पद गमे तुला निगड श्रृंखला कां पदीं ? ।
स्थिरत्व चल इच्छितें स्वसम चित्त कां पारदीं ? ॥
नरास हतवीर्यता, तशिच ही पराधीनता ।
सुखास मुकवी; विचार करिं मानसीं तत्वता. ॥ ४ ॥
जसें स्वहित नाचवी, तशि सजेल नाचावया. ।
विनाश तव तो तिचें हित. तिला कशाची दया ? ॥
अमंगल न मंगलप्रद कदापि होईल तें. ।
म्हणून शिवती न त्या; स्वशिव साधिती जाणते. ॥ ५ ॥
रसाल कविता—पदें तुजपुढें मुदें नाचती. ।
अनेक रसरंग तीं तुज नवे नवे दाविती. ॥
किती ठुमकती ? किती मुरडती ? किती डोलती ? ।
वळे न तरि त्यांकडे मति तुझी पदभ्रष्ट ती ! ॥ ६ ॥
अनीतिशिखरावरी चढुनि बैसलीं जीं पदें, ।
भ्रमे मन तुझें कसें प्रकृतिशुद्ध त्यांच्या मदें ? ॥
मनोरम कशी तुला रिझविती न माझीं पदें ? ।
शिरीं धरुनि नाचती, सुकवि डोलती, जीं मुदें. ॥ ७ ॥
मनोज्ञ कविता रसज्ञकविमानसाकर्षिता ।
फिरून वळवी पदें तुजकडेस सालंकृता. ॥
रमे, रमवितें तशी, नवरसांत लीलावती,।
निराश परते; अशी अदयता धरी त्वन्मति. ॥ ८ ॥
पुन्हा परतली, पुन्हा थबकली, पुन्हा कावली. ।
पुन्हा दचकली, मनीं सवत पाहतां लाजली. ॥
न धीर धरवे अनादरभयें जरी दापिलें, ।
विलोल नयनीं करी प्रकट भाव चित्तांतले. ॥ ९ ॥

किती हळहळे ? किती कळकळे ? किती गोंधळे ? ।
किती तळतळे ? किती तळमळे ? किती बावळे ? ॥
किती जळफळे ? किती अवकळे ? किती बावरे ? ।
दया न उपजे अशी स्थिति विलोकुनी, कां बरें ? ॥ १० ॥
कसेंहि असलें तरी कठिण दुःख तें साहवे; ।
परी न अबलेस ती सवत कोणती पाहवे. ॥
सुटो, न अथवा सुटो; तुज रुचो अनाचार हा. ।
असा असुख तें मला; चिर सुखीं परी तूं रहा. ॥ ११ ॥
तरी न मज राहवे; कर पुरे, नको छंद हा, ।
न होय परिणाम कीं सुखद सद्विचारें पहा. ॥
जगांत न मिळेल मृच्छकटिकांतली नायिका. ।
गमे स्वहितसाधिका तुज वसंतसेनाच का ? ॥ १२ ॥
जरा सवड काढुनी मधुनि भेट तूं देत जा, ।
जसा जलद सिंचनें सुखद दे लता उद्भिजा. ॥
गणीन मजला सुखी तरिहि त्यांतल्या त्यांत मी. ।
परी विनवितें तुलां, न रत हो अशा कर्दमीं. ॥ १३ ॥
ठरे न पळ आळवावर कधीं जलाचा कण; ।
तशी स्थिर अशाश्वतप्रकृति होय ती कोठुन ? ॥
तथापि असतें कसें रुचिर तेज मुक्तापरी ! ।
तरी न समजे मति भ्रमुनि त्यास मुक्ता खरी. ॥ १४ ॥
स्थिरेल जल चाळणींत, बुजतील रंध्रें जलें. ।
त्यजील कटुता निजप्रकृतिधर्मही कारलें ॥
श्वपुच्छहि कशवैया सरल ये, सदा वांकडें. ।
न मूढ वळवूं शके विधिहि युक्तमार्गाकडे. ॥ १५ ॥
सरून रजनी पुन्हा उदय पावतो भास्कर. ।
पुन्हा जलद वर्षतां सजल वाहती निर्झर. ॥
अपर्ण तरुला पुन्हा मृदुल पालवीही फुटे. ।
अनीति वरिली पुन्हा जन परी न मागें हटे. ॥ १६ ॥
विचार करिती असे मज निराश भारी जरी, ।
किती कठिण सोडणें ? न सुटतेच आशा तरी ! ॥
न मानव करूं शके, सुलभ कार्य कालास तें. ।
तयास पुरावावया मम मनोरथ प्रार्थितें. ॥ १७ ॥

## ३ ही कोण माझी दशा?

श्लोक. ( वृत्त. शार्दूल विक्रीडित )

जें आवश्यक जीवनास न मिळे वस्त्रान्न तेंही पुरें. ।
मोठा निष्ठुरही द्रवेल बघुनी जे हाल होती बुरे. ॥
कष्टें ते करितों कसे सहन मी, माझें मला ठावकें ।
चित्तस्थैर्य अशी तरी अवनता–वस्था न भंगू शकें. ॥ १ ॥
माझी दीन दशा अशी बुडविते मोठ्या जरी शोचनीं; ।
अश्रूतें स्खलितों, विवेक न फुटूं बाहेर दे, लोचनीं ॥
सोसूं दुःख कसें मनांत कढतें जें आंतल्या आंत तें? ।
देती त्यास कढावरी कढ अहा! बाहेर ओसांडतें. ॥ २ ॥
कोणीही न सहाय दुःस्थितिंत ह्या, आहेंच मी एकटा ।
भेदायास विपत्तिच्या न शकतो दुर्भेद्य मोठ्या तटा ॥
लावी दुर्गम आपला मम शिरो—भागावरी बावटा.
कोण्या,—प्रश्न करी विदीर्ण हृदया,—नेईल ती शेवटा. ॥ ३ ॥
दुर्दैवा! छळिशी मला, छळ सुखें, संतोषसी तूं जरी. ।
संतोषास पडेल लेश न उणें माझ्या परी अंतरीं. ॥
यच्चित्तीं सुखदुःखभावसमता नांदे यदृच्छाबळें, ।
त्याला तूं छळितां मिळेल तुजला कांहीं न, कैसें कळें? ॥ ४ ॥
जे मोठे जन आपणा म्हणविती, ज्यांना तसे मानिती; ।
त्यांनीं द्रव्य असो किती मिळविलें; त्यांची दिसो सुस्थिती ॥
द्रव्याचा अति लोभ त्यास न सुटे; दुःखांत तो लोटितो. ।
थोडे फार मिळे तयांतच सुखी, संतुष्ट मी राहतों, ॥ ५ ॥
मारामार पडे परंतु तितकें थोडेंहि संपादितां ।
आधिव्याधि छळावयास उठती, त्यांना न ये वारितां ॥
सांगूनी इतरा कळेल न, मला कोण्यापरी गांजिती ।
पोळ्यातें मधुमक्षिका न पळही, तैशा मला सोडिती ॥ ६ ॥

---

१. या कवितेंत कवीनें आत्मचित्र काढिलें आहे. ही कविता लिहिल्यावर अगदीं थोडक्याच दिवसांनीं कवीचा अंत झाला; अर्थात हीच त्यांची शेवटची कविता असावी असा अद्याप तरी समज आहे.

आहे जीवन तोंवरी दिन बरे—वाईट जातील ते. ।
अंतीं ऐहिकसौख्यवैभव न कां सोडावया लागतें ? ॥
तें नेतां समवेत ये न मनुजा, राही स्थलींच्या स्थलीं. ।
देतीं शांति, विचार ह्याच करुनी, भंगू न चित्तांतली ॥ ७ ॥
येतें सर्व करावयास जरि हें मोठ्या मनोनिग्रहें; ।
होतां वेळ दुपारची लटपटे सारें परी ज्ञान हें- ॥
आली वेळ अशी असेल कितिदा, ही उक्ति खोटी नसे. ।
केली मीं न कधीं, करीन न पुढें, चिंता करावें कसें ? ॥ ८ ॥
गेले पुष्कळ, थोडकेच उरले, आतां मदायुर्दिन. ।
ते जातील कसे तरी; दृढमनें दुःखीं सुखीं काढिन. ॥
आली धांवत शक्तिपात करिते ग्रासावया ती जरा ।
वार्धक्यीं मज एक मात्र दिसतो, देवा! तुझा आसरा. ॥९॥
दुर्दैवें असतों अपंग अथवा निर्बुद्ध भारी जरी; ।
झालें कारण दुर्दशेस असतें तें योग्य माझ्या तरी. ॥
ज्ञानाचा महिमा असो बुधजनीं मोठा किती मानिला; ।
अज्ञानासम सौख्यदायक परी न ज्ञान वाटे मला. ॥ १० ॥
शाखापर्णविहीन शुष्क तरु जो भूभार कीं केवळ; ।
आहे पात्र दिसावयासचि जिचें मोठें, नदी निर्जल; ॥
ह्या होतील मला कमीच उपमा. संतोषणीं दुर्बळ ।
माझ्या मी. बळवंत नांव असतां हें काय त्याचें फळ? ॥ ११ ॥
ज्याचा आश्रय सर्वथैव सुटला, जो डोंगराचा कडा ।
केव्हां कोसळुनी पडेल न कळे भूमीवरी बापडा ? ॥
जें संघट्टन सुस्थितींत सगळ्या वस्तूंस आकर्षितें ।
कोठें, काय, कसें चुके न समज, तें का मला सोडितें ? ॥ १२ ।
एकाकी स्थिति चांगली मुनिजनां प्रापंचिका कां तशी ? ।
माझ्या दुःसह, शोचनीय तरि ती वांट्यास आली कशी? ॥
आहे जीव जरी स्थितीस असल्या अत्यंत कंटाळला; ।
देहीं प्राण असेल तोंवर न ती सोडील वाटे मला. ॥ १३ ॥
होता दुःखित, खिन्न आमरण जो पाहून माझी स्थिति; ।
झाली लेश कधीं जयास सुखदा ज्याला न माझी कृति; ॥
वार्धक्यें न, कुटुंबभार थकला होता शिरीं वाहतां; ।
गेला सोडुनि तो, सुतास म्हणती छत्रापरी जो पिता. ॥ १४ ।
भारी कष्टदशेंत भार उदरीं माझा जिनें वाहिला; ।

झाला ताप समग्र एक पुढच्या आशेवरी साहिला; ॥
आशा ती न तिची सुतें पुरविली दुष्टें कृतघ्नें महा; ।
गेली वत्सलताच, ती न जननी, लोकांतरातें अहा. ॥ १५ ॥
आहे श्रेष्ठ बलांत सर्व म्हटलें जें बांधवांचें बल, ।
तें नाहीं, मज चार बंधु असुनी, मी एकटा केवळ. ॥
मी कोणावर भार आजवर जो नाहीं कधीं टाकिला ।
आणी तो सहसा प्रसंग न विधे! टाकावयाचा मला. ॥ १६ ॥
जाणे मी बहुतेक सर्व अनुजीं आहे मला टाकिलें ।
ह्याला कारण दोष मी समजतों आहेत माझ्यांतले. ॥
प्रेमाला बहुधा न दोष दिसती, पाही न वा त्यांकडे. ।
प्रेमाभाव म्हणूं, तरी मजसवें त्यांचें नसे वांकडे. ॥ १७ ॥
बंधुप्रेम न ज्यावरी स्वजन कां त्या आप्त होतील ते? ।
त्यांना लेश सहानुभूति न तशी आत्मीयता वाटते. ॥
त्यांचा दोष म्हणावया मज न ये; मीही तसा वागतों. ।
भ्राते, आप्त सुखी असोत सगळे चित्तीं परी चिंतितों. ॥ १८ ॥
जे कोणी मज एक दोन असती सन्मित्र त्यांचा ऋणी. ।
त्यांचें हो सुहृदत्व कारण सुखा थोडें तरी जीवनीं. ॥
मित्रावांचुन होय जीवन वृथा; तैशीच कीं सृष्टि ही ।
आधीं वंदन साधु त्यास करिती ह्याकारणें प्रत्यहीं. ॥ १९ ॥
आकाशीं वर फेंकिला दगड तो ये शेवटीं खालती. ।
आशोत्साह मनोनभांत चढला, तो पावला ती गती. ॥
गेली सर्व भरून एक हृदयीं माझ्या उदासीनता. ।
आलें जीवन हें कळून पुरतें आहे कसें तत्वता. ॥ २० ॥
एकामागुन एक मित्र मजला सोडून हा चालला. ।
दुःखातें कमती करी न उलटें तो वाढवूं लागला. ॥
आली काय मनीं अशी विषमता? सोडून गेले कसे? ।
त्यांच्यावांचुन शून्य चित्त नयना अंधार सारा दिसे. ॥ २१ ॥

---

## ४. हृदयसंगम हाच सुसंगम.

( हा व या खालील वेंचा 'प्रेमाभावीं सर्व पसारे व्यर्थ जगीं हा नेम' असे दोन्ही वेंचे प्रेमालेख्य काव्यांतील आहेत. हें खंड काव्य नितांतमधुर आहे. हें काव्यरत्नावलीच्या १९०१ सालच्या ६व्या अंकांत समग्र प्रसिद्ध झालें आहे. )

साक्या.

प्रेमव्यवहारास पाहिजे लग्न कशाला केलें? ।
जखड बंधनीं आजवरी हित असें कोणतें झालें? ॥ १ ॥
बळें बांधिली मोट, सुखद ती व्हावी, हें विपरीत. ।
प्रेमच बंधन असल्यावरती अधिक काय लग्नांत? ॥ २ ॥
प्रेम पवनसम विमुक्त त्याला न प्रिय बंधन वाटे. ।
विवाहबंधन वचतां मागे पळत सुटे तें वाटें. ॥ ३ ॥
सामर्थ्य प्रेमाचें आहे अघटित, अद्भुत जोर. ।
विवाह केवळ थट्टा वाटे प्रेमाची, अनिवार. ॥ ४ ॥
मानधनास्तव मान मानिनी करोत कोणी खालीं. ।
सत्प्रेमाची अवगणना मज वाटे त्यांनीं केली. ॥ ५ ॥
कीर्ति, मान, धन ह्यांचा प्रेमापुढें काय बडिवार? ।
ठाव न ह्यास क्षणभर देती प्रेमोदात्त विचार. ॥ ६ ॥
प्रेमामध्यें प्रेमावांचुन वांछिति फल भलतेंच; ।
अशा विकारां सामान्यत्वें वश जन होती तेच. ॥ ७ ॥
प्रेमदेवता क्षुद्रजना ह्या होय न कधीं प्रसन्न. ।
ईप्सित त्यांचें न पुरे यास्तव असती सदैव खिन्न. ॥ ८ ॥
सार्वभौम नृप पडेल जरि मम पदीं होउनी लीन; ।
नृपवैभव, सिंहासन, राज्यहि देइन झिडकारून. ॥ ९ ॥
प्रेमाभावीं व्हाया न रुचे राणी शिकंदराची, ।
प्रेम जयावर कलत्र–अंकित–व्हावें काय तयाची? ॥१०
पत्निविगळें स्वातंत्र्याचें सन्मानप्रद नातें ।
अन्य असे जरि, राजी आहें, तें मी जोडायातें. ॥ ११ ॥
प्रेम स्वातंत्र्यास अनुसरे, नैसर्गिक धर्मानें ।
वागे, आत्मीं आत्मा मिळतो, राहे अभिन्नतेनें. ॥ १२ ॥
उरे न वांछित पुरून सारें कांहीं इच्छायास; ।

सकल वासना तृप्ति पावती, जाणे मन न त्रास. ॥ १३ ॥
प्रकट व्हावयापूर्वी समजे अन्य मनांतिल भाव. ।
ह्या हृदयीं जें तें त्या हृदयीं, प्रेम तयाचें नांव. ॥ १४ ॥
हृदयसंगमीं खरोखर अशा स्वर्गसुखाची जोड ।
आशा होती मिळवायाची, परी पावली मोड. ॥ १५ ॥

---

## ५ प्रेमाभावीं सर्व पसारे व्यर्थजगीं हा नेम.

साक्या.

जिकडे तिकडे उदासीनता भरून गेली दाट. ।
दाखवील मज कोण महात्मा अवघड पुढची वाट? ॥ १ ॥
दया करूनी या अबलेवर कोण पुण्य घेईल? ।
पंकीं रुतली धेनु वर तिला कोण बळें काढील? ॥ २ ॥
व्यर्थ अपेक्षा होय पराची सखया! ये लवलाही. ।
मदुद्धारणा तुजविण दुसरा समर्थ कोणी नाहीं. ॥ ३ ॥
भर्ता, भ्राता, पिता, सखा तूं तुझ्यांत सारें नातें. ।
दासी, भगिनी, दुहिता येई सत्वर तारायातें. ॥ ४ ॥
सत्यप्रेमीं नातीं सारीं भिन्न अभिन्न रहाती. ।
लोकोत्तरता अशीच त्याची; वर्णायास न ये ती. ॥ ५ ॥
वृक्षवाटिकेमध्यें शीतल मंद समीरण खेळे; ।
रमे कामुकासाठीं मदनें त्यांत पसरिलें जाळें. ॥ ६ ॥
उड्या मारिती कड्यांवरूनी उदक प्रवाहवेगें. ।
भोंवतालच्या दऱ्यांत त्यांचा प्रतिरव गुंगूं लागे. ॥ ७ ॥
दुरून आला पवन श्रमला तरुवल्लींत विसावे. ।
सायंकाळीं नदीतटाकीं अपूर्व शोभा धांवे. ॥ ८ ॥
बागेमध्यें कारंजाचे उडती उंच फवारे. ।
जलकण नर्तन पहावया ये मध्यें मध्यें वारें. ॥ ९ ॥
स्वच्छचन्द्रिका प्रशांत रजनी दाटे गगनीं तेज. ।
असंख्य तारागणीं विराजे शशांक तेजःपुंज. ॥ १० ॥
कासारांत प्रफुल्ल कमलें रविकिरणीं अनुरक्त. ।
मधुपानीं मधु गेले दिसती होउन अत्यासक्त. ॥ ११ ॥

वसंत भेटवायास येई वनश्रीस उत्साहें. ।
कोड तिचें तो पुरवी सारें ती आनंदीं पोहे. ॥ १२ ॥
गोष्टी साऱ्या असती, घडती, दिसती पूर्वी जैशा. ।
पूर्वींचें सुख देती नच त्या करिती उलट निराशा. ॥ १३ ।
गिरिशिखरावर तरुराजीवर धूसर संध्याराग; ।
व्यापून तयें असे टाकिला समग्र काननभाग. ॥ १४ ॥
निरुत्साह नैराश्य करी साम्राज्य वनांत अफाट ।
जनता त्यजिली दुःख तरी कां येथें पुरवी पाठ? ॥ १५ ॥
निधनाची प्रच्छाया येथें जिकडे तिकडे दाटे. ।
विचार तापद मनांत शिरती कठोर हृदयहि फाटे. ॥ १६ ॥
वृक्षवल्लिका फलसुमनांनीं गेल्या पूर्ण भरून, ।
परंतु दुःखें दिसती साऱ्या गेल्या त्या उबगून. ॥ १७ ॥
ध्वनि उठती जे कर्कश गमती ते प्रत्यक्ष यमाचे. ।
अशा भयानक वनीं सदा जो अत्यानंदे नाचे. ॥ १८ ॥
स्थलीं राहिलें अशा पाहिजे मज शेवटपर्यंत. ।
निर्दय यम तो करील केव्हां न कळे माझा अंत ! ॥ १९ ॥
पुरें अनुभवा माझ्या आलें सौख्य किती प्रणयांत. ।
प्रत्यक्ष स्थिति माझी त्याला प्रमाण हें निभ्रांत. ॥ २० ॥

# २ वासुदेव वामन शास्त्री खरे.

हे प्रसिद्ध ग्रंथकार व कवि रत्नागिरी जिल्ह्यांत गुहागर येथें आषाढ वद्य ११ शके १७७९ (इ. स. १८५८) ह्या वर्षी जन्मले. यांचें प्राथमिक शिक्षण गुहागर येथेंच झालें' पुढील शिक्षण सातारा व पुणें येथें झालें. सध्या हे मिरज हायस्कुलांत संस्कृत अध्यापकाचें काम करीत आहेत. यांनीं अनेक उपयुक्त ग्रंथ आणि 'यशवंत महाकाव्य,' 'समुद्र-व इतर स्फुट कविता लिहिल्या. तूर्त यांनीं काव्यव्यासंग सोडून इतिहाससंशोधनाचें काम हातीं घेतलें आहे. 'नानाफडणवीसांचें चरित्र,' 'ऐतिहासिक पत्रें,' व 'नानांचा अधिकारयोग' हे त्यांचे ऐतिहासिक ग्रंथ सर्वविश्रुत आहेत. नाटक लिहिण्यांतही शास्त्रीबोवा निपुण आहेत. गुणोत्कर्ष व तारामंडळ हीं त्यांचीं प्रसिद्ध नाटकें होत.

## १ उज्जयिनी.

उज्जनी शहरापासून थोड्या अंतरावर एक विस्तीर्ण मैदान आहे. त्या स्थळीं पूर्वीचें उज्जयिनी शहर वसलेलें होतें. कोणी देशाभिमानी पुरुष त्या ओसाड मैदानांत फिरत असतां पूर्वीच्या उज्जयिनी शहराचें वैभव ध्यानांत आणून म्हणतो—

### श्लोक.

जातां अस्ताद्रि तेजें दिपवि रवि जसा संकटीं थोर लोक।
क्षिप्रेच्या पृष्ठभागीं चमकति किरणें पीत त्याचीं सुरेख॥
ऐशा वेळीं तिथें मी भटकत असतां फार झालों उदास।
तेव्हां नाना विचार प्रकटुनि करिती क्षुब्ध माझ्या मनास॥१॥

शास्त्रें विद्या ललित कविता धर्मनिष्ठा प्रताप।
होतीं जेव्हां करित वसती हिंदुलोकीं अमूप॥
जेव्हां होता विलसत जगीं विक्रमादित्य राया।
तेव्हां नांदे प्रथित भुवनीं उज्जनी याच ठायां॥२॥

पुरी पूर्वी गर्वे निरुपम निजैश्वर्य मिरवी।
जिला वर्णू जातां थकति सुकृती संस्कृत कवी॥
तिच्या स्थानीं आतां पसरत असे निर्जन वन।

बघोनी हें झालें मम समयिं त्या दुःखित मन ॥ ३ ॥
कोठें ते कांचनाचे कळस चमकती उंच देवालयांचे ? ।
हर्म्यें प्रासाद कोठें असति ? पसरलें थोर ऐश्वर्य ज्यांचें ॥
कोठें त्या नाट्यशाला ? दिसति न नयना चंद्रशाला विशाला ।
रत्नांनीं पूर्ण गेले विपणि तळ जणो अब्धिचे ते लयाला ॥ ४ ॥
प्रातःकाळीं नगरवनिता कुंकुमाच्या सड्यांनीं ।
रांगोळ्यांनीं अधिकच जयां देति शोभा झटोनी ॥
नानायानीं धनिक बसुनी जात होते जयांत ।
आतां कैसे दिसति न इथें रम्य ते राजपंथ ? ॥ ५ ॥
जेथें नाचति मोर मंजुळ रवें गातात जेथें पिक ।
वापींच्या तटिं खेळती सुखभरें चक्रांगहंसादिक ॥
पुष्पांनीं लवल्या लता तरुवरां जेथें मिठी घालिती ।
उद्यानें दिसती न तीं वसति जीं क्षिप्रा नदीच्या तटीं ॥ ६ ॥
विद्याधर्मसुकर्मतत्पर असे होते इथें ब्राम्हण ।
तैसे क्षत्रिय शूर मानधन ते ज्यां जीव वाटे तृण ॥
अर्थोत्पादक वैश्य शूद्र खपले सेवावया भूमिला ।
कोठें उज्जयिनीमधील जन ते गेले कळेना मला ! ॥ ७ ॥
ज्यांस विक्रम पराक्रमी गुणीं ।
तोषवी झटुन नित्य रक्षुनी ॥
स्वामिभक्तिवश धन्य लोक ते ।
होति या नगरिं पूर्वीं राहते ॥ ८ ॥
लोकां पाळिसि तूंच विक्रम नृपा ! धन्यत्व या जन्मुनी ।
काव्याभिज्ञजनांत तूंचि पहिला दात्यांमध्यें अग्रणी ॥
वाणी कंठमणी कवीश्वर गुणी शाकुंतलाचा पिता ।
होता आश्रय पूर्ण पावत तुझा विद्वत्सभासंमता ! ॥ ९ ॥
शृंगारवीरकरुणारस—पूर्ण काव्यें ।
श्री कालिदास तुज ऐकवि नित्य नव्यें ॥
गंभीर सुस्वर रसाळ अशी सुवाणी ।
त्याची नृपा ! परिसली असशील कानीं ॥ १० ॥
सांगाया निजवल्लभेस वदला तो यक्ष जें जें घना ।
सीतेचा पतिला निरोप, रतिचा तो शोक , भेदी मना ॥
ज्यांतें ही कविच्या मुखेंच कविता ऐकावया सांपडे ।

त्यांचें भाग्य विशेष ! दुर्लभ जगीं तो लाभ त्यांतें घडे ॥ ११ ॥
ज्यांनीं गर्वभरें शिरें उचलिलीं आकाश भेदावया ।
जाती पर्वत उंच थोरहि असे ज्याच्या प्रभावें लया ॥
किंवा घोर अपार सागरजळें ज्यानें बळें शोषिलीं ।
तो हा धन्य अचिंत्य काल—महिमा स्वच्छंदचारी बळी ॥ १२ ॥
महाकाल रक्षावया सिद्ध नित्य ।
अवंतीस हें बोलती लोक सत्य ॥
कसा काल नाशावया तीस पाहे ।
अहो थोर आश्चर्य हें वाटताहे ॥ १३ ॥
कविवर चिर गाती कीर्ति ज्याची अमूप ।
त्यजुन भुवन गेला विक्रमादित्य भूप ॥
कवण रसिक भोक्ता आपणा होय आतां ।
म्हणुन सुकविता ही पावली स्वर्गपंथा ! ॥ १४ ॥
श्रीविक्रमाग्रज नृपाल उदार शुद्ध ।
राज्यें प्रजा सुखवि भर्तृहरि प्रसिद्ध ॥
तो आपुल्या प्रियपुरास विनाशकाल ।
येणार जाणुन असें वदला असेल ! ॥ १५ ॥
"ती रम्या नगरी, महानृपति तो सामंतचक्रावृत, ।
त्याची राजसभा विशाल, जवळी चंद्रानना त्या स्थित, ॥
शौर्यें गर्वित राजपुत्रगण तो, ते भाट, तीं भाषणें, ।
ज्या काळें सगळें लया दवडिलें माझें तया वंदनें ! " ॥ १६ ॥
गेली उज्जयिनी !!! तिच्या धरितसे नांवास जें लोकिं या ।
आहे सांप्रत उज्जनी नगर तें राज्यांत शिंद्याचिया ॥
आहे नांव परंतु वैभव दिसे कोठें न तें त्या परी ।
नामैक्यें समता चुन्यास अमृता येईल कैशी तरी ? ॥ १७ ॥
कोठें उज्जयिनी पुराण नगरी संपन्न राजन्वती ।
ज्ञानी शूर सुखी स्वधर्मनिरता जेथें प्रजा नांदती ॥
कोठें उज्जयिनी नवी जन जिथें दारिद्र्यचिंताकुल ।
राजे दुर्मद दुष्ट जीस लुटिती होती रणें तुंबळ ॥ १८ ॥

# २ मृत्यु.

१. मरणं प्रकृतिः शरीरीणां. २. मृत्यु हा सृष्टीस हितकारक. ३. मृत्यूचें स्वरूप. ४. मृत्यूची भीति. ५. मृत्यूच्या भयास न जुमानणारे लोक. ६. मृत्यूची इच्छा करणारे लोक. ७ आत्मघाती. ८ सुहृद्वियोग. ९ ऐहिक वस्तूंचा मोह. १० ईश्वरास प्रार्थना

## श्लोक.

१

जन्मास जो प्राणि जगांत आला ।
ग्रासीतसे दुर्जय मृत्यु त्याला ॥
गर्भी जणों फांस गळ्यास काळ ।
लावीतसे कोण तया चुकेल? ॥ १ ॥
जैसे निर्मळ शुभ्र बर्फ वितळे तों ग्रासिलें तें जळें ।
भासे भिन्न तथापि कुंभ फुटतां मातींत माती मिळे ॥
तैसे या जगिं जंतुदेह दिसती नानाकृती सुंदर ।
काळें जीवित नष्ट होय फिरुनी मृत्यूंत होती स्थिर ॥ २ ॥
सर्वात्मा जगदेककारण असा आहेस तूं ईश्वर ।
कां ही सृष्टि अशी तुवां घडविली देवा! सदा नश्वर ॥
हे विस्तीर्ण समुद्र, पर्वत नभश्चुंबी, नद्या थोर या ।
प्राणि—प्राणविहीन—सृष्टि अवघी जाणार कीं ही लया? ॥ ३ ॥
लावी सूर्यशशांक दीप पसरी आकाश हा चांदवा ।
पृथ्वी सुंदर रंगभूमि सजवी दावी निजा वैभवा ॥
बांधोनी मग जन्ममृत्यु पडदे तेथें जगन्नायक ।
प्रारंभीं प्रभु सूत्रधार जनहो! संसार हें नाटक ॥ ४ ॥
पात्रें प्राणि अनेकरूप असती या नाटकीं जेवढे ।
जन्माचा पडदा प्रवेश करिती सारून एकीकडे ॥
त्या त्यांतें निज भूमिकार्थ अवघे संपादुनी शेवटीं ।
जाणें मृत्युचिया असेच पडद्यामागें न अन्या गति ॥ ५ ॥
गेला राज्य करून रावण युगें पन्नास आणी सहा ।
गेला श्रीरघुनाथ राक्षस कपी गेले बळी ते महा ॥
गेले कौरव पांडव क्षितिपती छपन्न कोटी भट ।

गेले यादव बापुडे बलमदें होते वृथा उद्धट ॥ ६ ॥
सृष्टी अद्भुत निर्मिली सुकविनीं जी कल्पनेच्या बळें ।
देखा तीमधलेहि लोक असती कैसे गुणें आगळे ॥
स्वर्गीं ते अमृतास पीति वसती कल्पद्रुमाच्या तळीं ।
इंद्रा जिंकति शंकरा पळविती——त्यांहून मृत्यू बळी ॥ ७ ॥

२

तुझें मृत्यो ! नामस्मरण अशुभ ध्यान भयद ।
सदा प्राण्यांमागें फिरसि दिससी तूं प्रतिपद ॥
विचारांतीं वाटे तुजविषयिं हें व्यर्थचि भय ।
कराया सृष्टीचें अमित हित तूं येसि सदय ॥ ८ ॥
सव्वा लक्ष प्रतिदिनिं इथें मर्त्य जन्मास येती ।
अन्य प्राणी किति उपजुनी भूमितें व्यापिताती ॥
मासे पक्षी उदकिं गगनीं पावती वर्धनातें ।
सर्वांसाठीं परि नच नवें स्थान निर्माण होतें ॥ ९ ॥
विस्तीर्ण भूमि जरि लक्ष अनेक कोस ।
कांहीं तरी परिमितीच असेल तीस ॥
जीवांस कोठुन मिळे अवकाश येथें ।
कांहीं अदृश्य जरि होति न मृत्युपंथें ॥ १० ॥
कोठून जीवित जगीं रमणीय होय ।
आणूं झटे न जरि मृत्यु तया अपाय ॥
मृत्यूविणें कवण सौख्यसमृद्धिकारी ।
आहे जगीं इतर दुःसहदुःखहारी ॥ ११ ॥
वाणी बुद्धि शरीर लाविति करूं जे अन्यघाता खल ।
साधूंचा अपमान मत्सर करूं जे सिद्ध उच्छृंखल ॥
वाक्यें तीव्र शरासमान हृदयें हालाहलासारखीं ।
ज्यांचीं त्यांस वधून मृत्यु करितो आबालवृद्धां सुखी ॥ १२ ॥
विद्या ज्ञान परोपकारपरता औदार्य शालीनता ।
देशप्रीति महेशभक्ति वचनीं माधुर्य गंभीरता ॥
हे ज्यांचे गुण ते जिवंत असतां कोणी न त्यांतें पुसे ।
कैवारी परि मृत्युमित्र भवनीं तत्कीर्तितें नेतसे ॥ १३ ॥

प्रेमाच्या बंधनांनीं सुदृढतर जगीं गोंविले जीवमात्र ।
अन्योन्यांच्या स्थितीतें निरखुनि असती सौख्यदुःखास पात्र ॥
एकीनें वागताती व्यसनिंहि असती एकमेकां सहाय ।
मृत्यूच्या भीतिनें ही स्थिति सुखद अशी आपणा दृष्ट होय ॥ १४ ॥

३

होतां भूकंप धाकें थरथरति नगश्रेणि भूमींत जाती ।
पाण्याचे ओघ मागें सरति निजतटें फोडिती फांकताती ॥
तेणें आश्चर्य वाटे तदधिक परि हें मृत्युचें रूप घोर ।
अत्यंताश्चर्यकारी प्रतिदिनिं बघतां कां न होतो विचार ? ॥ १५ ॥

स्थित्यंतरें अद्भुत होति भूतळीं ।
ज्यांच्या विचारीं मति होय गुंतली ॥
निर्जीव जीव क्षणिं होतसे तया ।
पाहून जातें बल बुद्धिचें लया ॥ १६ ॥

कामक्रोधें उसळति बळें गर्जताती मदान ।
लोभें मोहें पळति जळती आपुडे मत्सरानें ॥
आशापाशें विकल सकल प्राणि हे मृत्यु नेतो ।
काष्ठालोष्टापरि तनु पडे कोण तीतें पहातो ! ॥ १७ ॥

स्वामी तूं राज-राजेश्वर अखिल महीमंडलाचा वरिष्ठ ।
रोषें राष्ट्रं जळावीं तव मिळत असे तत्क्षणीं जें त्वदिष्ट ॥
राजा ! हें सत्य सारें परि तुजवरि जों मृत्युचें राज्य राहे ।
कीटां वाटेल यावें जवळि न दुसरें सांगणें काय आहे ! ॥ १८ ॥
सारें गार शरीर ताठ पडलीं निश्चेष्ट तीं इंद्रियें ।
कोमेजे मुख नेत्र निष्प्रभ जणो बाहेर आलें भयें ॥
ऐसें भीतिद रूप पाहुन तुझें मृत्यो ! मनीं ज्याचिया ।
भीतीचा चरका बसेल न असा कोणी नसे लोकिं या ॥ १९ ॥

४

जन्मास येउन न जों बहुकाळ लोटे ।
जों सृष्टिरूप पुरतें नयनीं न दाटे ॥
जों बुद्धि आणि न शरीर विकास पावे ।
तों प्राणि मृत्युस भिऊं शिकतो स्वभावें ॥ २० ॥
ज्ञानें श्रेष्ठ असों बलाढ्य इतर प्राण्यांमधें सर्वही ।
गर्वें जल्पतसों चतुर्मुख करी आम्हांच साठीं मही ॥

मृत्यो ! त्वद्भय संचरे मनिं भरे अंगात तों कांपरें ।
राजापासुन रंक अंकित असों आम्ही तुझे हें खरें ॥ २१ ॥
वेडे चाळे किति करितसों मृत्युच्या थोर धाकें ।
चिंताभारें विषम विषयग्रस्त हें चित्त वांके ॥
मोक्षप्राप्तीस्तव झटतसों वाटतें धर्म केला ।
कांहीं केलें तरि गिळितसे मृत्यु भारी भुकेला ॥ २२ ॥
पापी धार्मिक होति, धार्मिक धरू दुर्मार्ग ते धांवती ।
होती शूरहि दीन, दीन करिती शूराप्रमाणें कृती ॥
होती पंडित मूर्ख वर्षति धनें कैसे कदर्यु स्वयें ।
अस्वाभाविक वर्तनें घडति हीं देहांतकाच्या भयें ॥ २३ ॥

५

भयें असति मृत्युचीं सहज सर्वसाधारणें ।
तथापि नर जिंकितो कधिं कधीं तयां मीपणें ॥
वरें म्हणुन घ्यावया बहु झटे जनाच्या मुखें ।
अमोल्य निजजीविता प्रियतमाहि कैसा मुके ! ॥ २४ ॥
मानी जनाचें मन फार कोमल ।
लोकापवादाप्रत तें न साहिल ॥
धांवूनि तें मृत्युस घालितें मिठी ।
कीं ही चुकावी इहलोकसंगति ॥ २५ ॥
कोणी बोलति ‘ एक देव ’ वदती ‘ तेतीस कोटी ’ कुणी ।
‘ नाहीं देव मुळींच ! ’ कोणि कथिती अत्याग्रहानें जनीं ॥
‘ ध्या कृष्णास ’ ‘ महंमदासच भजा ’ ‘ तारी जगा जेजस ’ ।
ऐसे भांडति मारिती मरतिही भीती न ते मृत्युस ॥ २६ ॥
धारातीर्थिं मरूं विमानिं बसवूं अंकावरी अप्सरा ।
जाऊं स्वर्गतला सुधारस पिऊं हा मार्ग वाटे बरा ॥
ऐसें ओरडुनी शरीर मरणा युद्धोत्सुकें वाहिलें ।
कोठें स्वर्ग सुरांगना ! अश्रुत तें कोणीं असें पाहिलें ? ॥ २७ ॥
आप्तांचिया पदरिं घालुन बालकांतें ।
वंदूनियां गुरुजना कुलदेवतांतें ॥
लोकें नमस्कृत सती पतिच्या शवाशीं ।
घेई चितेवरिच जाळुन आपणासी ॥ २८ ॥

६

नाहीं तुझें दर्शन जेथ इष्टीं,
जाऊन तेथें बहु देसि कष्ट ॥
कंटाळले जे निज जीविताला।
मृत्यो! न कां भेटसि सांग त्यांला? ॥ २९ ॥

" पश्चात्तापें झुरावें किति तरि? घडले घोर अन्याय हातें।
रागें दुःखें जळे ही मम तनु पळही वाटतें वर्ष मातें ॥
आशेचा लेश नाहीं असुनिहि मुकतों भूतला मी जिवंत।
झाला मृत्यूहि कैसा अकरुण!" वदती बंदि कारागृहांत ॥ ३० ॥
मात्रा चूर्णें थकति सरती लेह भस्में कशाय।
राहे क्लेशें पडुनि शयनीं वाळले हात पाय ॥
आप्तां देऊं कितिक तरि मी त्रास घेऊन सेवा।
रोगी बोले "मिटवि नयनें ने मला धांव देवा!" ॥ ३१ ॥
" चिंताक्रांतमुखी असेल गृहिणी बाळें भुकेलीं घरीं।
नाहीं घांसभरीहि अन्न मुख त्या दावूं कसें मी तरी? ॥
वेंगाडूं किति तोंड? निष्ठुर जगीं आतां नको राहणें!।
मृत्यो! दासजनां अनुग्रह करी" ऐसें दरिद्री म्हणे! ॥ ३२ ॥
" गेला कांत लया पुन्हां न परते आकांत केला तरी।
झाला व्यर्थचि जन्म! कोठुन मला संसारसौख्यें खरीं! ॥
साहूं केंवि विडंबनेस? लपवूं हें तोंड काळें कुठें?।
ने बापा! निज मंदिरास" विधवा मृत्यूस हें प्रार्थिते ॥ ३३ ॥

७

आवेश दुःख भय लाज नरा निराशा।
जेव्हां बळें उठविती निज देहनाशा ॥
तेव्हांहि त्यास निजजीवितलोभ जाची।
होत्ये भयंकर तदा स्थिति तन्मनाची ॥ ३४ ॥
उडी टाकूं डोहीं जंव उठतसे धीर धरुनी।
सुखा लावी पेला जंव कटु विषें पूर्ण भरुनी ॥
गळा कापूं पापी जंव निजकरें खड्ग उचली।
विचारांची त्याच्या तंव मनिं असे लाट उठली ॥ ३५ ॥
" जगाच्या स्वामीनें अनुपम मला देह दिधला।
हटें त्याच्या नाशास्तव मनिं असे हेतु धरिला ॥

सुखांतें हा दैवा! विविध इहलोकांतिल मुकें।
पुढें या कृत्यानें मजासिं नरकद्वार न चुके! ॥ ३६ ॥
अशी स्थिति असे तरी मज इथे नये राहतां।
म्हणून उठतों करूं तनुवरि प्रहार स्वतां ॥
जगें मजसिं दंडिलें ठकाविलें वृथा शापिलें।
असें जग मला नको म्हणुन येथुनी मी पळें ॥ ३७ ॥
जनद्वेषं धांवें जरि समजुनी मृत्युवदनों।
गमे ही मूर्खत्वें मम सुचविली व्यर्थ करणी ॥
प्रयासें मी मोठ्या जरि जनकृपेच्या शिरिं चढें।
न माझ्या आयुष्यों शिव शिव! पळाची भर पडे ॥ ३८ ॥
द्वेषानें मज जातिबंधु छळिती हें सत्य आहे जरि।
नाहीं नावडता तथापि गमतें मी ईश्वराचे घरीं ॥
वल्ली पुष्पफलाढ्य दाट तरुंची छाया बसाया शिला।
तोयें पूर्ण नद्या तळीं न अजुनी कंटाळतो तों मला ॥ ३९ ॥
देतो सूर्य मला प्रकाश दिवसां रात्रौ निशानायक।
वारा मंद सुगंधि शीतल सुटे देतो शरीरा सुख ॥
जीवित्वास हवा अवश्यक नवी मातें मिळे निर्मळ।
कां मी टाकिन देह, मित्र असतां, माझे असे पुष्कळ ॥ ४० ॥
बहुत दिन मनीं ज्या प्रीतिनें वाढवील्या।
अजुनि हि मम आशा पूर्ण नाहींच झाल्या ॥
पुरवुन निजवांछा ज्यांत आत्मा सुखावे।
दिवस कधिं तरी ते कां सुदैवें न यावे? ॥ ४१ ॥
हा संसार स्थिति बदलितो, रंग जैसे पतंगं।
जाणें आहे निरवधि असा काल त्यातें न भंग ॥
आशाबंध क्षम मम असे फार वर्षे टिकाया।
कां मी मूर्खासम उठतसें आत्महत्या कराया! ॥ ४२ ॥
आशा असे जोंवरि जीव आहे।
गेल्यावरी तो मग काय राहे? ॥
जो मृत्युच्या द्वारिं धजे शिराया।
त्या शक्ति नाहीं परतून याया ॥ ४३ ॥
वेड्या! मना! धरिसि जीवितमोह कां रे।
स्वप्नापरी तव विचार असार सारे ॥

देहा ! नसे सुख तुझ्या लिहिलें कपाळीं ।
ये पाव नाश ! तुज मृत्युविणें न वाली ॥ ४४ ॥
सरोष मुख वांकड्या भ्रुकुटि सोपहास स्वर ।
दुरूनिच नमस्कृति स्तुति वृथा वृथा आदर ॥
मला बघुन वागती स्वजन यापरी हें खरें ।
मना! सहन हें तुला घडतसे कसें सांग रे ? ॥ ४५ ॥
" अपकीर्ति दुःसह अवार्य दुःखदा ।
म्हणुनी न ठेविन शरीर मी कदा " ॥
वदुनी असें मरण ओढितो शिरीं ।
मतिमंद तो नरकसाधना करी ॥ ४६ ॥

८

होतों बाळपणांत खेळत जयांसंगें सुखें हांसत ।
कंठीं घालुन हात मी हितगुजें होतों जयां सांगत ॥
हर्षाची उकळी फुटे मम मनीं पाहून मित्रां जयां ।
मृत्यो ! तूं अधमाधमा ! पळवुनी नेलेंस कोठें तयां ॥ ४७ ॥
माझ्या प्रौढवया न पूर्ण अजुनी प्रारंभ झाला जरी ।
संसारस्थिति पूर्ण मीं बघितल्या नाहींच त्या जोंवरी ॥
सोशी आप्तवियोगदुःखदहनज्वाला तरी मन्मन ।
मृत्यो ! जाणतसें प्रताप तव मन्नाशास जो कारण ॥ ४८ ॥
प्रेमोद्दीपित दृष्टि, सुंदर समाल्हादप्रफुल्लें मुखें, ।
गाढालिंगनसुप्रसंग, सहसा रोमांचितांगें सुखें, ॥
तीं हास्यें, सुविनोद ते, सुरस तीं संभाषणें प्रेमळ ।
झालें तें स्मृतिमात्रपात्र अवघें मृत्यो ! कसा तूं खळ ! ॥ ४९ ॥

९

असे क्षणिक देह हा म्हणत पूर्व आले मुनी ।
टिकेल शतवत्सर भ्रम असा असे या जनीं ॥
जगांत सुखसंपदा मिळविण्यांत गुंते मन ।
कळे न कधिं मृत्यु तो झडप घालितो येउन ! ॥ ५० ॥
" असेल पुढल्या क्षणीं मरण यावयाचें मला ।
करीन नच पातकें " धारें विचार हा चांगला ॥
क्षणक्षण वृथा पळे कधिंहि तें न मागें फिरे ।
नरा समजुनी असें सुकृतसंचया लाग रे ! ॥ ५१ ॥

ऐहलौकिक समस्त वस्तु या ।
आपणासह न शक्त यावया ॥
प्रीति फार न कराल यांवरी ।
दुःख होइल न शेवटीं तरी ॥ ५२ ॥

मूर्ती फोडि लुटी धनाढ्य नगरें लक्षावधी दुर्बळ ।
मारी लोक जगांत कीर्ति पसरी काळी जसें कज्जल ॥
यत्नें मेळवुनी महंमद धनें ठेवी न ज्यांतें मिती ।
येतां मृत्यु समीप तीं निरखुनी मोहें रडे दुर्मति ॥ ५३ ॥

१०

कोटिब्रह्मांडसर्गस्थितिलयजनका ! हे दयाज्ञानसिंधो ! ।
इच्छामात्रें तुझ्या मी जडमति धरितों देह हा दीनबंधो ! ॥
देहाचें कर्म भोग स्थिति अनुभवितों त्वत्पदीं चित्त लीन ।
या माझ्या प्रार्थनेतें श्रवण कर असें भक्त मी नम्र दीन ॥ ५४ ॥

इच्छानुरूप तव मृत्यु सदैव वागे ।
मत्तेभयूथशत ही चिरडील रागें ॥
इच्छेविरुद्ध तव तो जरि शक्तिमंत ।
मुंगीस ही दुखविण्यास नसे समर्थ ॥ ५५ ॥

नानासंकटकंटकांकित अशा संसाररूपीं पथीं ।
आलों येथवरी पुढें न कळत्ये होणार कैशी स्थिति ॥
थांबावें मम मार्गसंचरण हें वाटेल केव्हां तुला ? ।
सान्निध्या तव सर्वमंगलमया आत्मा असे लोभला ॥ ५६ ॥

दुष्टांनीं वेष्टिलेला निजगृहिं अथवा दूरदेशीं भुकेला ।
घोरारण्यास किंवा जलनिधिसलिला लंघितां श्रांत झाला ॥
माझा हा देह कोण्या स्थितिंतहि असतां मृत्यु येवो खुशाल ।
इच्छा देवाधिदेवा ! तव धरिन शिरीं शांतिनें सर्वकाळ ॥ ५७ ॥

# ३ नारायण नरसिंह फडणीस.

यांचें जन्म ज्येष्ठ शुद्ध ५ शके १७८३ ( इ. स. १८६१ ) त झालें. यांचें मूळगांव जळगांव. यांचें सर्व शिक्षण तेथेंच झालें. हे रसिक गृहस्थ 'काव्य रत्नावली'चे संपादक म्हणून प्रसिद्ध आहेत. हे कवि आहेत, हें आजवर बहुतेकांस माहीत नव्हतें असें म्हटलें तरी चालेल. प्रख्यात कवि के. स. री. ( केशव सदाशीव रिसबूड ) हे ह्यांचे काव्यगुरु होत. काव्यरत्नावलि जर अस्तित्वांतच आली नसती तर आधुनिक कवितेला महाराष्ट्र सारस्वतांत आज जितकी वाव मिळाली आहे तितकी तरी मिळाली असती कीं नाहीं शंकाच आहे! इतकें असून बिचाऱ्या रत्नावलीच्या पालनपोषणाचा सर्व भार अद्याप रा. रा. फडणीस यांसच वहावा लागत आहे हें महाराष्ट्र सारस्वताभिमान्यांस शोभण्यासारखेंच आहे!

यांच्या वडील चिरंजिवासही ( लक्ष्मण नारायण फडणीस ) काव्यरचनेचा छंद आहे. हे फर्ग्यूसन कॉलेजमध्यें बी. ए. चे क्लासमध्यें आहेत. यांच्या कविता फर्ग्यूसन कॉलेज क्वार्टरलीमध्यें आल्या आहेत. यांच्या दोन तीन कविता मासल्या करितां म्हणून खालीं दिल्या आहेत.

## १ महाराष्ट्र मुक्तामाला.

( प्रस्तुत कविता ही मयूराच्या प्रसिद्ध संस्कृत मुक्तामालेची छाया आहे. हींत श्रीरामचरित्र गायिलें आहे. परंतु तें सारिखें न वर्णितां त्यांतील एकेक प्रसंग घेऊन त्यावर एकेक आर्या रचिली आहे; अर्थात् प्रत्येक आर्या आपापल्या परी स्वतंत्र आहे. )

आर्या. ( गीति )

पुण्यश्लोकशिखामणि, सदाश्रयी जो निवारि तापाला।
नित्य जयी, नरकपिसख; वंदीं त्या नित्य देवदेवाला. ॥ १ ॥
वरदानव्रत ज्याचें, करुणसुधायुक्त नित्य मन ज्याचें।
वैराग्यशील योगी, नमितों पद त्या दयालु रामाचें. ॥ २ ॥
पुत्राधिक्य वृथा तें, दशरथ तो श्रेष्ठ चार पुत्रांनीं,।
यज्ञार्थ पुत्र देउनि, झाला जो वंद्य दानशूरजनीं. ॥ ३ ॥
भो! गाधिज तुजपाशीं शिकले ते गालवादि शिष्य किती!।
परि त्यांत एक राघव, अंबुधिपानांत मेघ तो सुकृति! ॥ ४ ॥

पादस्पर्शी घडे जरि, होशि अहल्ये! विनम्र रामपदीं; ।
भृगुपदताडण साहुनि, विष्णु जसा भृगुऋषीस तो वंदी. ॥ ५ ॥
अबलालीला केवळ, " असा धनुर्भंग तो वृथा होय. " ।
ऐसें वदतां राघव, देई श्रीपरशुराम त्या अभय. ॥ ६ ॥
कंपायमान झाली वसुधा शिवचापभंग नादानें, ।
बाला सीता मुदिता होय, जणूं रम्य वेणुनादानें. ॥ ७ ॥
सीता गुरुस मिळावी, म्हणुनी धनु तें स्वनाश घे करुनी; ।
संजीवनी पित्यालालाभावी, म्हणुनि सिद्ध कच मरणीं. ॥ ८ ॥
" मी कार्तवीर्यजेता ! " रामा ! कां गर्व यापरी करिशी? ।
ग्रासी दुर्विधि अरियश, पर्वदिनीं राहु जेविं सूर्याशी. ॥ ९ ॥
मुनिवर्या ! रामाला, मुहूर्त दिधलास तूं असुखमूल, ।
वनगमनकाल कोठें ! कोठें ! राज्याभिषेकमहकाल ॥ १० ॥
जें अंगनानुजासह होई मार्गस्थ राम कांतारीं, ।
तन्मुख अवलेकाया, बाळें टाकूनि धांवती नारी. ॥ ११ ॥
घनभासें शिखि नाचति दूर्वापुंजभ्रमेंचि मृग पळती ।
गुंजति भृंग मुखाब्जीं अध्वग रामासि त्या असो प्रणती ॥ १२ ।
सौरकुलीं असतांही, सुधांशु वितरी; नृपास जे पूज्य– ।
गौरासित रत्नमणी पौरांनीं ! वाटले कसे त्याज्य ॥ १३ ॥
बहुपरि निषेध करुनी, कैकयिनें राम धाडिला विपिनीं ।
सत्यार्थ पिता निष्ठुर, कविंनीं तो राम गायिला स्तवनीं ॥ १४ ।
व्यर्थ विषाद निषादा ? मानिशि कां ? बघुनि दैन्य रामाचें ।
वनचर, जटिल; जरी तो वदनाब्जीं राजतेज तें नाचें ॥ १५ ॥
आहे कुमार कुशली, गे माये ! तूं करूं नको रुदन ।
मुनिजन तपोबलानें सुखें करो ! रामदर्शनीं पान ॥ १६ ॥
" जनकांकावरि लोळें, सेवीं मी मातृसौख्य नगरांत. " ।
यापरि तवसुत वदतो, माये ! मग तूं कशी अरण्यांत ? ॥ १७ ॥
" जा नंदना ! वनाला, " वदला रामास अजकुलोत्तंसा ! ।
मग त्यास शोधण्याला नंदनवनमार्ग सेविला कैसा. ?॥ १८ ॥
जरि रामनाम सेवीं तरि कां हा ताप वृद्धिला पावे ? ।
वदुनी असें, म्हणुनि का स्वर्गीं दशरथीस भेटण्या धांवे ? ॥ १९
स्त्रैणपणा बघुनि नृपा ! एकांतीं निंदिती तुला मंत्री ।
देवेंद्र मुनिजनासह, हासे स्वर्गीं बघोनि तुज नेत्रीं. ॥ २० ॥
हरिलें तुझें अयोध्ये ! अटवीनें रामरूप सौभाग्य ।

पतिलाभ व्हावयाला, अटवीचा वेष तो तुला योग्य. ॥ २१ ॥
न करीं मातृविडंबन, भरता ! झाला तुझा गुणोत्कर्ष. ।
उचित नसे जलसेचन, पदताडण योग्य तें अशोकास. ॥ २२ ॥
विषय विरक्ती चित्तीं, तैशी गुरुभक्ति; सज्जनीं महती,–।
मातृकृपेनें लाभे; भरता! तूं तत्पदा धरीं विरती. ॥ २३ ॥
जे जन परोपकारी, त्यांमाजीं श्रेष्ठ तूंच कैकेयी ! ।
जनकल्याणार्थ तुवां, दुःसह वैधव्य सेविलें आई ! ॥ २४ ॥
दशरथ नृपास मान्या, तुजविण गे ! कोण ती दुजी भ्रमरी, ।
माये ! भोळी तूं; तुज फसवी ती नीच मंथरा नारी ॥ २५ ॥
दावूनि नीति कुटिला, मोद गमे कार्यसिद्धिला बघुनी; ।
ये फळ अनयतरूला, आतां कां अश्रु मंथरे ! नयनीं. ॥ २६ ॥
शोकदवानलवेष्टित– अंतःपुरकाननांत; साश्रुजलीं—।
सुस्नात व्हा मृगींनों ! शोधुं कुठें रामभेघ वनमाली ? ॥ २७ ॥
दीप विझे निःश्वासें, न विझे शोकाग्नि; पावतो वृद्धि; ।
परि मंद मंद बाष्पीं शोकशमीं सहज लाधतें सिद्धि. ॥ २८ ॥
विषयोपभोग असती क्षणभंगुर, शेवटीं असुखमूल– ।
संपत्ति कोणती गे चिंते ! जी नित्य मोद वितरील. ॥ २९ ॥
प्रत्यक्ष भाग्यमूर्ती, दयालु तैसा, सुधासरीं सरस; ।
पातक ममत्व हरितो, सुख वितरो रामभद्र आह्मांस. ॥ ३० ॥
सिद्धि तपस्विजनांची, शिव कंठांतील सुंदरा माला— ।
ती नीलमूर्ति हाले स्वगुणें त्या शेष–शशि–पयोधीला ॥ ३१ ॥
भुवनावनकुशलीं जो पृथ्वीचा पति तसाच जामात ।
संपूज्य धातृसदनीं, यज्ञपती शोभतो अरण्यांत ॥ ३२ ॥
राक्षसदहनीं तत्पर, लक्ष्मीवक्षोज गिरिहरी राम— ।
शुभ्र यशानें मिरवी, अस्मत्सख इंद्रनील अभिराम ॥ ३३ ॥
दुष्प्राप्य तस्करांला, साधूला प्रिय, तसेंचि मदरहित— ।
अत्यंत मूल्य ज्याचें, मोदास्पद वित्त ओढितें चित्त ॥ ३४ ॥
जो निष्कलंक, तैसा अमृतमयी; शंकरास दे शांती. ।
नित्य कलावृद्धि घडे, करिं रामशशीस मी चकोर नती. ॥ ३५ ॥
जटिल भले वटतरुपरि, तेविं धनुर्धर किरात किति विपिनीं; ।
शिवमदनश्रीहरणीं एक श्रीराम हा समर्थ जनीं. ॥ ३६ ॥
रजनीयाम-प्रहरीं ध्यान करायास योग्य जी मुनिला– ।
ती घननील विभूती सामाविण लभ्य होय कवणाला ? ॥ ३७ ॥

असुनी अबला केवळ ! तेविं नभःक्षितिसमान तें शील; ।
श्रीरामपादुकांनीं ! अराजकीं रक्षिली प्रजा सकल ॥ ३८ ॥
यौवन–नय–मंडित तूं असतां भरता ! अधीर कां स्वमनीं ? ।
जड पादुकाच गमती धन्या ज्या तारिती तुझां व्यसनीं ॥ ३९ ॥
भो याज्ञवल्क्यशिष्या ! सन्निष्ठा जेविं नित्य तुजपाशीं; ।
राही भवनीं विपिनीं त्वत्कन्या रामभद्रसहवासीं. ॥ ४० ॥
सीतालाभ विराधा ! मोद न देतां, घडे तुझी हानी. ।
कपटपटू राहूला दुष्कृत्यें मरण ये सुधापानीं ॥ ४१ ॥
जंगम कल्पतरूला मृदुलारुण पादपल्लवें असती ।
त्या तरुसमेत दिसली कल्याणप्रद सुवर्ण लतिका ती. ॥ ४२ ॥
धन्वी, जटी, फलाशी तैशी ज्याला न भीति लवलेश, ।
सीतादर वंद्य जया, करि ऋष्याश्रम पवित्र जगदीश. ॥ ४३ ॥
सजल घनापरि ज्याचें भ्रमण करी तेज दंडकारण्यीं, ।
त्या तेजें अवगणिली मलिना शशिकांति तुच्छ लेखूनी. ॥ ४४ ॥
हरिणवधार्थ हरीनें त्यजुनि गुहा सांडिली तिथें मुक्ता— ।
ती नीच वंचकानें नेली नच गणुनिया बलाबलता. ॥ ४५ ॥
गे सीते ! जरि केलें, हरण तुझें नीच रावणश्वानें. ।
त्वत्कीर्ति वृद्धि पावे कीं तद्दुष्कर्म बुद्धियोगानें. ॥ ४६ ॥
फळ भोग जानकी गे ! लक्ष्मण कां ताडिला कठोर वचीं ? ।
पात्रीं क्षेत्रीं होते, विशालता गुरुदानबीजांची. ॥ ४७ ॥
होतो मृगबालक तो गरललता सेवनीं जसा तप्त, ।
कटुवचनतप्त असतां; कां सौमित्रास निंदिलें व्यर्थ ? ॥ ४८ ॥
जे धैर्यशील असती, निंदास्पद वचन त्यास साहे न. ।
रोदन करीत गेला ! लक्ष्मण तैसाच आश्रमांतून ! ॥ ४९ ॥
जाशील कुठें चोरा ? हरुनी स्त्रीरूप रत्न रामाचें ! ।
अपराध समुद्राचा केल्यावरि मीन काय तो वाचे ? ॥ ५० ॥
वत्सलता सीतेनें त्यजिली हें सत्य कोण मानील ? ।
जी मूळ सुधायुक्ता वल्ली, प्रसवेल ती कशी गरल ? ॥ ५१ ॥
गे ! आज पर्णशाले ! विश्वासें ठेविलें तुझ्यापाशीं—।
तें रत्न सांग कोठें ? मज तूं न्यासापहारिणी गमशी ॥ ५२ ॥
सांग कुठें गेली ती ? गोदावरि ! सत्यता तुझी प्रथित ।
मी दुःखतमीं विचरें, अंजन देऊनि दाखवीं सुपथ. ॥ ५३ ॥

कासार, कुंद, कदली, कारि, केसरि, कृष्णसार, पिक, केकी ।
अलिचंपकादिकांनीं, हरिलें मत्सुंदरीस गुणभागों ॥ ५४ ॥
तूं जिंकिलें गुणांनीं, शशांकमृग, केसरी, करी यांतें, ।
मी त्वत् प्रियसख म्हणुनी, त्यांनीं मद्वैर साधिलें सीते ! ॥ ५५
गेल्या किति रात्रि वनीं ! आजाचि वनवास वाटतो मजला. ।
भद्रहितोत्सव युक्ता श्रीसीतेचा वियोग मज झाला. ॥ ५६ ॥
केलें मृगा ! स्वनेत्रें विजित तुला, सांग ती कुठें सीता ? ।
झाला दाशरथी हा वनचर तुजसारखाच रे ! आतां ! ॥ ५७ ॥
कोठें लपूनि बसली ? अवगणिलें कोणतें तुझें वचन ? ।
विरहज्वर तापानें अधीर हा दुःख पावला पूर्ण ! ॥ ५८ ॥
प्रत्यक्ष काळपीडा सहन करायास पात्र मी सुदती ! ।
दुःसह्य अंचलांतर, कैशी विरहव्यथा वदावी ती ? ॥ ५९ ॥
विदित न कां तुज वत्सा ! त्यागोचित दोष पाहिला सखिनें ॥
दृष्टि तुझी अनलस ती, तैशी तूं जाणसी सदाचरणें ॥ ६० ॥
दयिते ! शीतसुखास्तव, पदरानें घाल तूं मला वारा !
त्वत्करवल्ली मजला, कमलव्यजनाहुनी प्रमोदपरा ॥ ६१ ॥
सीतासहवासों तूं नंदनवन होसि दंडकारण्या ! ।
होसी स्मशान सांप्रत, नसतां ती सुंदरी ! प्रिया ! धन्या ! ॥ ६२ ॥
संलग्न नित्य असती, गुरुत्व, काठिन्य मूळ तें ज्यांस— ।
ऐशा तुझ्या स्तनांचा, तव मृदु हृदयास होय उपदेश. ॥ ६३ ॥
दोषाकरा ! स्वभावें, स्वैरपणें निंद्यमार्ग तूं सेवों ! ।
बोलावें काय तुला ? स्वमित्रनिधनांत होशि तेजस्वी ! ॥ ६४ ॥
आलिंगिली भ्रमानें का लतिका ? मत्प्रिया नसे का ही ? ।
आहे लता जरी ही, प्रियानुकरणों गमे मला प्रिय ही ! ॥ ६५ ॥
हे प्राणांनीं ! कोठें ? त्वत्प्रियसख दूर एकटा जाई ? ।
शोभाजीवनहानी, जल-कमलांची परस्परीं विरहीं ! ॥ ६६ ॥
खेद कशास जटायो ! जरी स्नुपावन न दस्युपासून ।
मित्र तुझा हत शापें करि रावण त्यापरी तुझें हनन ! ॥ ६७ ॥
कोणी तरुण तपस्वी, विरहानें तरु-लतांस आलिंगी. ।
करुनी सांत्वन त्याचें भावें पद वंदिती मुनि विरागी. ॥ ६८ ॥
अमृतासम बदरांतें सेवियलें, मूर्तिमंत अमृतानें. ।
मत्त नका मज मानूं कथि हें वाल्मीकि गोड गीतानें ॥ ६९ ॥
साधुजनांचा झाला परम सखा, श्रुतिरहस्य जो राम. ।

यद्दर्शनार्थ धांवति, यति, पृथ्वीपति वरोनि शुचि काम. ॥ ७० ॥
आश्चर्य एक ऐका ! शक्रविभव तुच्छ लेखिलें कपिंनीं, ।
आकंठपान करुनी; अमृत दिलें खगमृगांस वांटोनी. ॥ ७१ ॥
हरिलें मला रिपूनें; तैसें नेलें न कां तुला हरुनी ? ।
मुद्रे ! मत्पति नच ये ताराया आपणांस कां अजुनी ? ॥ ७२ ॥
मत्पति दुष्टांतक तो असतां, मी दुःख भोगितें येथें ! ।
मुद्रे जलरेषेपरि दुःखाब्धींतील मोद मज वाटे. ॥ ७३ ॥
मुद्रे ! कुशल असे ना ? लक्ष्मण तो, विनय शील तें ज्याचें ।
गे ! क्षेम सांग तैसें. मृगाधिपति वीरहीर रामाचें ॥ ७४ ॥
मृगभाग सिंह घेतो, होइल का तृप्त राम रिपुघातें ? ।
गे ! मुद्रिके पतीनें धाडियलें सांत्वनार्थ कां येथें ? ॥ ७५ ॥
सूर्य जसा अरुणाला, धाडी नलिनीकडे; तसा हर्षें— ।
मी रामदूत आलों, राम तुझा वर्ततो जयोत्कर्षें ॥ ७६ ॥
उद्विग्नचित्त होतो, करि जैसा गवसतां न पुष्करिणी. ।
तंवशोधनार्थ त्यापरि, राम करी भ्रमण सर्वदा विपिनीं ॥ ७७ ॥
हा रामदूत माते ! समुद्र तरला, असूनि बलहीन. ।
जलभेकरिपूपासुनि, होइल गे ! रामबाण उत्तीर्ण. ॥ ७८ ॥
त्रिपुरास दग्ध केलें, शंभूनें विष्णुबाणयोगानें; ।
केली क्षणांत होळी, लंकेची तेविं रामदूतानें. ॥ ७९ ॥
" जेथें धर्म तिथें जय," कविवाणी सत्य ही गमे मजला. ।
कपिसाह्यें रामानें रुद्रवरोन्मत्त शत्रु तो वधिला. ॥ ८० ॥
मारुति अशोकहानी न करी, जाळी न अग्नि लंकेस, ।
नाशास एक कारण, श्रीसीतेचाच उष्णनिश्वास ॥ ८१ ॥
जमल्या सतीसभोतीं अशोकवनिकेंत राक्षसी क्रुद्धा ।
कीं कलियुगांत होत्ये श्रुति जैशी नास्तिकोक्तिनों बद्धा ॥ ८२ ॥
कर्णांची, नयनांची; देहाहुनि अधिक काळजी जीला ।
राक्षसवनितारोदन, पतिदर्शन; हाच लाभ देवीला. ॥ ८३ ॥
अस्मत्सखा कपीनों ! केवळ न समुद्र जाय लंघून ।
कपिसैन्य दैन्यनाशक–हनुमान् गेला तरून रिपुसैन्य ! ॥ ८४ ॥
अरिसुंदरीसमाजीं, कृशांग दिसली तदा मला देवी ।
जाईची वेल जशी, कांटेरी कुंपणांत लावावी ! ॥ ८५ ॥
अग्निशिखा तृण जाळी, परि बलहीना समीरणावीणें ।

कैसा दग्ध करावा? तुजविण अरिभार सांग साध्वीनें ॥ ८६ ॥
सागर हा बंधु तुझा ! होई अरिमित्र, साह्य देऊन ।
कां प्रार्थिसी तयाला ? सेतूनें त्यास टाक बांधून ॥ ८७ ॥
हा रामसखा तुजला बिभीषणा ! लाभला सुदैवानें ।
यत्स्थितिशील तुझ्यापरि, त्याजिलें यालाहि वडिल भावानें ॥ ८८ ॥
केलें नमन म्हणूनी, दिधली लंका बिभीषणाला ती; ।
काय वदों तुज रामा! पात्रत्वाचा विचार नच चित्तीं! ॥ ८९ ॥
मित्र बिभीषण रामा ! समसुखदुःखी मिळे वनीं तुजला ।
दुर्लंघ्य संकटाला अन्योन्यबलें, तुम्ही सुखें तरलां ॥ ९० ॥
स्वकरें बद्ध करूनी, केला अपमान ज्येष्ठ बंधूचा ।
केवळ भार्येसाठीं वधिला हा ! हंत ! नाथ लंकेचा ॥ ९१ ॥
देउनि विलापदीक्षा असुरांस, हरी सुरांगनाशोक ।
जो अस्त्र–सर्प–चंदन, नमिती मुनि ज्यास; वंद्य तो एक ॥ ९२ ।
एक विचित्र दवानल पतंगवंशी, महाजटिल काळा— ।
होता समुद्रभागीं, त्यानें व्योमस्थ शैल भक्षीला ॥९३॥
आश्चर्य हे पहा हो ! शरधारी मेघवीर हा असतां— ।
त्यानें शरवृष्टीनें–केल्या त्या शत्रुवाहिनी रिक्ता. ॥ ९४ ॥
तरुणाग्नि एक होता तमालवर्णी पतंगकुलशाली. ।
त्यानें न जाळितां तृण, केली भूही पवित्र रक्तजलीं ॥ ९५ ॥
केलें न जें सुरेंद्रें शंकरवरुणाग्निला न जें साध्य, ।
केलें कपिसाह्यानें, श्रीरामानें क्षणांत तें सिद्ध ॥ ९६ ॥
कां व्यर्थ गर्व रामा ! करिसी, रावणवध प्रतिज्ञेचा ।
पण पूर्ण रावणानें केला जरि नाश होय जीवाचा ॥ ९७ ॥
वीरा ! प्रवर्तला कां ? स्पर्श करायास परकलत्राला ।
पापदवानलदग्धा ! तूं सर्वस्वास सर्वथा मुकला ॥ ९८ ॥
अभिलाप परस्त्रीचा, विषवन्हीहूनि अधिक हानिकर ।
मंत्री आप्तगणांसह, झाला निःशेष हाय ! दैत्यवर ॥ ९९ ॥
असुखी पतिविण रात्रीं ती देवी कमलिनी अशोकवनीं, ।
पतिदर्शनोत्सुका ती सरोजिनी शोभली दिनीं दहनीं. ॥ १०० ॥
तापसमाधानाचें, कारण गणिलें वियोग संयोगीं. ।
रमणाभावीं क्कान्ता, समक्ष दहनांत देवि अनुरागी. ॥ १०१ ॥
विमलकनकमूर्तिपरी दहनीं त्वत्तेज शोभतें जननी ! ।
दोषविषाद कशाला ? जनता स्तविते तुला यशोगानीं ॥ १०२

लंके ! मेरुगुहेला मृगेंद्र रक्षी, तसा बिभीषण हा, ।
रक्षण तुझें करो गे ! ध्रुवापरी तो वरो सुखोत्साहा ॥ १०३ ॥
मोक्षेच्छु लोक तरती, भवसागर तो स्वपुत्रयोगानें, ।
त्वत्प्राशीस्तव देवी ! होई उत्तीर्ण राम सेतूनें. ॥ १०४ ॥
सुषमाघनजितशंपे ! मधुर गिरे ! देवि ! ही पहा पंपा ।
पाहुनि मजला, केलें नृत्य शिखींनीं; न त्यांस अनुकंपा ॥ १०५ ॥
माते पंचवटी गे! वास तुझा तो जसा अयोध्येंत ।
तूं तारिलें यशासह गंगा यमुनार्णवास करि पूत ॥ १०६ ॥
जेंवीं कौसल्यांकीं, सीतेसह रामभद्र सौमित्र ।
बहुकाळ सेविला गे ! त्यानीं तैसा तुझा तटप्रांत. ॥ १०७ ॥
गे शंभुशीर्षलक्ष्मी गंगे ! हा वंदितों तुला भावें, ।
उल्लंघनापमानीं, तरलों कैसें ? विपत्तिला दैवें ॥ १०८ ॥
बाळा चकोर भरता बा ! असशी बहुतकाळ तूं तृषित ।
हा राममेघ आला करिं दर्शनपान आज सोत्कंठ ॥ १०९ ॥
हे पौरमयूरांनों ! होतां उत्सुक पहावया ज्यास ।
घननील राम पाहा नृत्य करोनी, वरा प्रमोदास ॥ ११० ॥
सिंहासना नृपाला झाला तूं वंद्य यत्प्रभावानें— ।
त्या दशरथ भूपाचें स्मरण नसे का ? तुला स्वमननानें. ॥ १११ ॥
साकेतयश सुरांला, अमृताहुनि अधिक वाटलें गोड ।
यश ऐकुनी पिनाकी तांडवनृत्यांत जाहला मूढ ॥ ११२ ॥
जो पूज्य सज्जनांला, झाला नृप दुष्ट एक सूर्यकुलीं ।
कीं स्पर्शली अहल्या, त्यजिली भार्याहि, मारिला वाली ॥ ११३ ॥
जें मोक्ष दैवतांचें, योगिजनांचें अचिंत्य जें सार; ।
तत्त्व तसें वेदांचें, त्यानें ते आज वंदिले पौर. ॥ ११४ ॥
त्वां भोगिले अयोध्ये ! अनंत पति ते, पतिव्रता असुनी, ।
स्मरण नसे का त्यांचें, पडला कां मोह राममधुपानीं ॥ ११५ ॥

## १ कारंजें.

कारंजाचे कण उडती । उगमस्थानाप्रति मिळती ॥
भवचक्रातें अनुसरती । त्यांची नित्याची रीती ॥
अभंग चाले । सानंद खुले । मनुजा बोले ।
जननस्मृती नच कधिं सुटती । स्मृति जननाची आदिगती ॥ १ ॥
धांवा वरवरती घेई । विश्रांति मुळीं त्या नाहीं ॥
उद्यम शिकवी निज कृतिंहीं । विलीन ईशपदीं होई ॥
मनांत असतें । मुखावरीं तें । स्पष्टचि दिसतें ।
अचेतनाची करणीही । लाजवि चैतन्या पाहीं. ॥ २ ॥
तुषार फेंकी चोहिंकडे । भेद न त्या इकडे तिकडे ॥
सर्वस्वाची हानि घडे । शील न सोडी तरि निधडें ॥
प्रेमाचें तें । गाणें गातें । मन रिझवीतें ।
पुनःपुनः तें जरी पडे । हूप धरूनी वरति उडे ॥ ३ ॥
तुजसम वरवर उडण्याला । भेदुनि जाया गगनतला ॥
प्रेमागारा शुद्धाला । प्रभुपदकमला गायाला ॥
प्रीतीचा वा । स्फूर्तीचा वा । भक्तीचा वा ।
अंश तरी हृदयामधला । कारंजा रे ; देई मला. ॥ ४ ॥

---

## २ मोहिनीगीत.

( एका चित्रानें, नव्हे मूककाव्यानें, सुचविलेलें. )

आंदोलीं बसुनी बाला ।हलवी जगत्सूत्रमाला ॥ ध्रु० ॥
मोहिनी दिव्यलोकाची । नवकलिका प्रीतिलतेची ॥
पुतळी कविच्या स्फूर्तीची । उद्धारक मर्त्य जगाची ॥
सगळें मंगल हिच्यांत वसतें, अशिवा नच थारा ॥
ही मांगल्याची शाला ॥ १ ॥
कुंदकळ्यासम हास्य हिचें । उडुप्रभा नयनीं नाचे॥
रुळती झुपके केसांचे । जैसे वृंद भ्रमरांचे ॥

वाऱ्यावरतीं गाउनि गीतें रमवी आपुल्याला ॥
करि गारेगार जगाला ॥ २ ॥
पक्षी मधुकूजन करिती । तरुही मोदभरें डुलती ।
प्रणयी वारे ते गाती । रमणी गुणगानीं रमती ॥
नयनीं बसवूं, हृदयिं साठवुं ह्या प्रिय मूर्तीला ? ॥
आत्मा येथेंच निवाला. ॥ ३ ॥

---

## ३ विनायकास—

"विनायका" सारखा महाराष्ट्रभाषेचा निस्सीम भक्त आणि स्वतंत्र कवि, फारच थोडा वेळ चमकून, अल्पवयांत इहलोक सोडून गेला असें पाहून, त्याच्या भक्तांपैकीं कोणास खालील विचार सुचणार नाहीत ?

दिनमणि येतां उदयाला । आलिंगाया भूबाला, ॥
सोडिति नलिनी शय्येला, । हर्षति येतां पति अबला. ॥
तो वीरमणी । निजकिरणांनीं । भूषावि अवनी ।
हसवी साऱ्या सृष्टीला, । सृष्टी खुलली, करि लीला. ॥ १ ॥
हळुहळु मार्गाक्रमण करी, । अधिकाधिक तेजा विखरी, ॥
क्षणांत चढतो विभवगिरी, । न करी कोणी बरोबरी, ॥
जगांत जर तें । सकल वस्तुतें । चिरत्व येतें, ।
बनती दिव्य मही सारी । वसती किंवा पातालीं. ॥ २ ॥
चक्राची जी नित्य गती । तीच जगाची न दुजी ती ॥
चढला पडतो ही रीती, । बुद्बुद पाण्याचे फुटती, ॥
गात चलला, । रवि मावळला, । तिमिर पसरला. ।
दडली घोरतमीं सृष्टी, । लय पावे कविची स्फूर्ती. ॥ ३ ॥
अंधःकारें नभ भरलें, । खालींवर सगळें काळें, ॥
प्रकाशलव कोठें न मिळे, । बनले सगळे जन दुबळे; ॥
क्षणभर भास्कर । अस्तगिरीवर । निद्रा घे जर ।
काय करावें मुळिं न कळे ! । भविं जेवीं जन गुरफटले ॥ ४ ॥
विनायका ! कविगणनाथा ! । हसलों आम्ही तूं असतां, ॥
रविसम अस्ताप्रति जातां, । वज्रचि कोसळलें माथां ! ॥

स्वर्गीमधला । प्रकाश सरला, । म्हणुनी तुजला ।
न्याया धाडियलें दूतां, । होता आम्हां तूं त्राता ! ॥ ५ ॥
सुर भुलले तव गानाला, । आम्ही मुकलों आम्हांला ! ॥
स्वकरें रसतरु लावियला, त्याला आला बहर भला, ॥
सुमनीं नटला; । मधुगंधाला । सेवायाला ।
सरस्वतीप्रिय तो तुरला !। " नाहीं. येइल उदयाला ! " ॥ ६ ॥

---

# ४ कवि वसंत.

यांचें जन्म शालिवाहन शक १८७१ च्या ( इ. स. १८६१ ) वैशाखांत झालें. आपल्या बद्दल कोणास विशेष माहिती होऊं द्यावयाची नाहीं असा या कवींचा विशेष आग्रह असल्यामुळें त्यांच्या संबंधीं कांहींच जास्त माहिती देतां येत नाहीं या बद्दल वाईट वाटतें. या कवींचाही महाराष्ट्रास 'कवि' या नात्यानें फारसा परिचय नाहीं. यांनीं कविता -फारशी नाहीं तरी-बरीच लिहिली आहे; व ती सर्व नवीन पद्धतीची आहे.यांची प्रसिद्ध अशी फारच थोडी कविता आहे. यांच्या कवितेपैकीं कांहीं प्रकरणें 'सुविचार समागमांत' प्रसिद्ध झालीं असून एकादें दुसरें मासिक मनोरंजनांत आलें आहे. यांच्या काव्यावरून, 'हे रासिक गहस्थ कोण असावेत' याचा उलगडा महाराष्ट्र काव्यकोविदांस सहजीं होणार आहे.

## १ शब्द.

( अंजनिगीत. )

शब्द बापडे केवळ वारा । अर्थ वागतो मनांत सारा ।
नीट-नेटका शब्द-पसारा । अर्थाविण पंगू ॥ १ ॥
मनामनांचा संगम झाला । हृदया हृत्संदेश मिळाला ॥
शब्द बोबडा अपुरा पडला । निरुपम घे गोडी ॥ २ ॥
शुद्धाशुद्धाकडे बघावें । वैय्याकरणीं शब्द छळावे ॥

शुष्कबंधनीं कां गुंतावें । प्रेमळ हृदयांनीं ? ॥ ३ ॥
व्याकरणाचे नियम कशाला । कोण मानतो साहित्याला ? ॥
उठला जो हृदयास उमाळा । हृदयीं विरमावा ॥ ४ ॥
सुंदर वाक्यें शब्द मनोहर । सरस्वतीचें मंजुळ नपुर ॥
ऐकायातें हटून अंतर । बसो पंडितांचें ॥ ५ ॥
ममतेचे दो घांस घ्यावया । प्रेमरसाचे घुटके प्याया ॥
उत्कंठित-उत्सुक त्या हृदयां । काय होय त्यांचें ? ॥ ६ ॥
अशुद्ध वाक्यें शब्द मोडके । अवाच्य अक्षर वर्ण तोटके ॥
गोड जसे अमृताचे भुरके । होती प्रीतीनें ॥ ७ ॥

---

## २ मन.

पद ( नृपममता रामावरती. )

जाहले पांढरे केश । परि संयम नाहीं लेश । ठाउका ॥
वर्षांवर चढलें वर्ष । उद्दामें हृदय बेहोष । अजुनही ॥
शान्ताचा धरिला वेष । अंगारें भडकला रोष । अंतरीं ॥
धांवतें । स्वैर नाचतें । बंध तोडितें ।
कवळितें दोष ॥ वारें-मन करितें नाश ॥ अजुनही ॥१ ॥

---

## ३ मनुष्य तितका एकच आहे.

( अंजनिगीत. )

मनुष्य तितका एकच आहे । सत्-चित्-सरिता एकच वाहे ॥
राहो नाना देशीं राहे । मूळ कसें सुटतें ? ॥ १ ॥
हिमालयाच्या तुंग शिरांवरि । गंगोत्रीच्या हिममय पात्रीं ॥
प्रयाग-काशी- या देशान्तरिं । गंगा का बदले ? ॥ २ ॥

अमेरिकेच्या फिरे भोंवती । स्थिर ध्रुवाच्या बर्फप्रांतीं ॥
अथवा खरतर विषुवावरतीं । समुद्र का बदले ? ॥ ३ ॥
हाणी, जुळवी, विखरुन टाकी । घन मेघांना क्षणें वितळवी ॥
सळसळ पानांची आयकवी । तो का वायु नव्हे ? ॥ ४ ॥
जलराशींचे तुषार उडवी । तरंग चंचल नाचूं लावी ॥
लाटांचा कल्लोळ उसळवी । तो का वायु नव्हे ? ॥ ५ ॥
वेणूंतुन मंजुल रव उठवी । लतांमधें भ्रमरांस गुंगवी ॥
गिरिकुहरांस घुमाया लावी । तो का वायु नव्हे ? ॥ ६ ॥
नरकंठांतिल तारा नादवि । हशा-रड्यांचे शब्द वाजवी ॥
रागरागिणी गाऊं लावी । तो का वायु नव्हे ॥ ७ ॥
म्हातारीला जगभर फिरवी । पाचोळा गगनांत भिरकवी ॥
तरुवर धरणीवरती नमवी। तो का वायु नव्हे ? ॥ ८ ॥
सुसाट अथवा संतत वाहो । स्तिमित शांत वा गुंगत राहो ॥
भरो दुमदुमो गगन कटाहो । वारा तो वारा ॥ ९ ॥
जाती अथवा धर्म मिळेना । रागद्वेषीं सख्य जुळेना ॥
परि अंतरिंचा तंतु गळेना । मानवधर्माचा ॥ ११ ॥
संसारांतिल पंथ जमेना । हिताहितांचा मेळ बसेना ॥
परि हृदयींचा सूर बुजेना । मानवधर्माचा ॥ १२ ॥
वेशांचें वैचित्र्य सुटेना । वर्णांचेंही वैर मिटेना ॥
परि अंतरिंचा रव थांबेना । मानवधर्माचा ॥ १३ ॥
बळाबळाचा झगडा चाले । जयापजय ते कलहीं रमले ॥
परिं अंतरिंचे वेग न विरले । मानवधर्मांचे ॥ १४ ॥
जलराशींचे डोंगर उठले । परस्परांवरि आपटुन फुटले ॥
जलकण परि ते लेश न मुकले । आर्द्रगुणा अपल्या ॥ १५ ॥
नानादेशीं भटकत फिरले । मनुवंशाचे रोपे तुटले ॥
मूळ भाव परि नाहीं सुटले ! । मानवधर्मांचे ॥ १६ ॥

———

## ४ ताजमहाल पाहिल्यावर.

पद:— ( चाल.– गा गा गा विहगा गीतें )

मानवधर्मा विसरविती । दिव्यगुणांतें चमकविती ॥
शिल्पकलेच्या या रीती । सौंदर्याच्या या स्फूर्ती ॥
मनांत असती ।
जनांत दिसती ।
स्वर्गी वसती ।
स्वर्ग आणिती भूवरती । दिव्यपदा भू चढवीती ॥ १ ॥
इह लोकाचा बंध तुटे । पार्थिवतेचा रंग विटे ॥
व्यंगपणाचा दोष फिटे । सान्ताचा परिवेष सुटे ॥
अनन्त उमले ।
अव्यक्त खुले ।
अज्ञात कळे ।
परिचित वस्तुक्रम उलटे । नवें विश्व नव सत्य उठे ॥ २ ॥
सौंदर्याच्या या मूर्ती । प्रसन्न काव्यें जीं रचिती ॥
चित्रें रंगीं रंगविती । सत्याचीं रूपें असती ॥
मूळ स्फूर्ती ।
एक प्रकृति ।
निर्गुण वृत्ती ।
सदानंदलहरी चित्तीं । उठती त्यांची ही व्यक्ती ॥ ३ ॥
सर्व सृष्टिमधिं जें फिरतें । ब्रम्हकटाहीं जें घुमतें ॥
सर्गी जें जन्मा येतें । प्रलयीं विलया जें जातें ॥
निर्गुण हसतें ।
सगुण विलसतें ।
असतें नसतें ।
नाचें सारें तें येथें । पाहे त्यासच तें दिसतें ॥ ४ ॥
अमूर्त रूपा हें आलें । नव्हतें असतें तें झालें ॥
मनांत संकल्पीं उठलें । जनांत कृतिरूपीं वठलें ॥

हें प्रेमाचें।
हें प्रीतिचें।
परस्परांचें।
देणें.येथें हो दिधलें। कुणीं म्हणावें तें फिटलें ॥ ५ ॥

---

## ५ संक्रांत.

पद (चाल — कटावा सारखी)

वारे तेही बंध विसरती।
भेटायातें फुलांस धांवति ॥
खळबळ पानांमाजीं करिती।
फांद्या खांद्यांमधे झगडती ॥
प्रियकर त्यांचीं फुलें उमलती।
तत्स्पर्शानें कंपित होती ॥
हसती, डुलती, उड्या मारिती।
प्रिय मित्रांच्या संगे रमती ॥
स्व जनाची– हृदयाची–भेटी।
मलाच कां नाहीं? ॥ १ ॥
बर्फाचे बंधारे फुटती।
थंडीचे दृढ बंध निखळती ॥
गिन्धुदरांतुन झरे धांवती।
जलें नद्यांचीं झुळझुळ झुळती ॥
ओहळ वृक्षाताळीं खळखळती।
दृढ भेटाया उत्सुक होती ॥
घरा परतल्या हित मित्राप्रती।
करां धरुन त्यांसवें खेळती ॥
स्वजनाची– हृदयाची–भेटी।
मलाच कां नाहीं। ॥ २ ॥
संवत्सर भेटे वर्षाला।
रात्र बिलगते नव दिवसाला ॥

जुने पुसाया पळे नव्याला ।
काल निघे पळ शिवूं आजला, ॥
वैरि विसरती निज वैराला ।
स्नेह विचारित ये मैत्रीला ॥
प्रेमा दे निजकर प्रीतिला ।
हृदय वरूं ये नव स्फूर्तिला ॥
शीत सुखवितें नव ऊष्णाला ।
हिंवा- उन्हांचा संगम झाला ॥
आलिंगाया प्रियहृदयाला ।
मलाच कां बंदी ? ॥ ३ ॥
खेदानें पळ आनंदावें ।
रडण्यानें सुखभरें हसावें ॥
पडलें त्यानें पुनः उठावें ।
मागसल्यानें पुढें सरावें ॥
रुसलेल्यानें परत खुलावें ।
दुर्मुखल्यानें प्रसन्न व्हावें ॥
फुटलेल्यानें पुन्हा जुळावें ।
विभक्त भक्तीमधें मिळावें ॥
दूराचें दूरत्व पळावें ।
समीप तें एकजीव व्हावें ॥
सुनें एकटें चिर भटकावें ।
मलाच कां लागे ? ॥ ४ ॥

---

## ६ वसंत-क्रीडा.

पद

प्रसन्न फुलल्या फुलांसंगतीं मूकबोल बोलूं ।
फुलासम अंतरंग उमलूं ॥

मंदमंद वाऱ्याच्या झुळुकांसंगें आंदोळूं ।
वायुचा झोंपाळा झोलूं ॥
झुळुझुळु वाहे झरा त्यासवें ताल धरुन चालूं ।
झऱ्याचा सुस्वररव झेलूं ॥
कोमल- चंचल- लतापल्लवीं आनंदें डोलूं ।
पल्लवासंगातीं हेलूं ॥
निरभ्र निश्चल नभोवितानीं दृश्यसार तोलूं ।
भवाचें गूढ कुलुप खोलूं ॥
खळबळणाऱ्या लाटांसह या मनोवृत्ति घोळूं ।
जिवांच्या लाटा कल्लोळूं ॥
किलबिल किलबिल गाती खग त्यां सुस्वर संमेळूं ।
नभींचें गायन संभाळूं ॥
बागडतीं नाचतीं वांसरें त्यांसंगें मिसळूं ।
मानवी जडतेला चाळूं ॥
रुचिर बालकें हंसती खुलती चला त्यांत खेळूं ।
त्यांसवें चैतन्यीं लोळूं ॥
खेळाया जाऊं । वसंतीं वसंतसम पोहूं ॥ १ ॥

---

## ७ कै. हरि माधव पंडित.

पद ( चाल— भूपती खरें तें. )

गे खुश्शाल मोकल धाय ! रडे ! आक्रंदे !
दे द्वार मोकळें ! हृदय रितें होऊं दे !
जें शोकावेगें भरतें दाटुन येतें !
ये दुःखवेदना काळिज भेदायातें !
छेः ! निरर्थ ! कविते प्रयत्न दावायाचे !
हें दुःखाचें ऋण असेंच जांचायाचें !
आवेग मनाचा नेत्रांनीं वाहूं दे !
स्वच्छंद घळाघळ अश्रुपूर चालूं दे !
हें हृदय तुंबलें ! बांध फुटाया आले ! !
दे पाट काढुनी स्वैर जाउं दे धुतलें !

गे घाय मृत्युचा जोंवर सुकला नाहीं !
दे तीक्ष्ण वेदना विजेपरी चमकांहीं !
हा ! मरण नव्हे क्षणभरिची साधी गोष्ठ !
ही परस्परांची कायम ताटातूट !
हें निरंतराचें निरंतरीं प्रस्थान !
हें क्षणिक येथच्या विश्रंभा अवसान !
जे चैतन्याचे उज्वल तारे तुटले !
जे आयुष्याच्या अवसर मार्गीं फुलले !
हें मरण तयांना लोटी अज्ञातांत !
कीं नुरे पैरवी त्यांची या विश्वांत !
ये भरून म्हणुनी आप्तजनांचा कंठ !
ते नेत्र अश्रुंनीं भरती कांठोकांठ !
ही हानि नव्हे गे ! एका दो दिवसांची !
कीं दुःख आवरे कांस धरुन आशेची !
या योगें होतें आशेचेंही शून्य !
या काळावांचुन कुशल चोर ना अन्य !
या चोरापासुन रक्षण होणें नाहीं !
अधिकार न चाले यावर ब्रम्ह्याचाही !
ही अभंग हानी कविते ! रडणें भाग !
या शोकाचे कड वाहुन विझवुत आग !
या उपाय दुसरा रडण्यावांचुन नाहीं !
कां क्लेश श्रुतिला समाधान शब्दांहीं ?
बहु गेले कविते आजवरी आळविते !
बहु यमकगणांहीं छंदोबंधन करिते !
बहु शिव्याशापनीं लेखणीस झिजवीते !
बहु शास्त्राडंबरिं अकांडतांडव करिते !
बहु शब्दावरणीं दुनियेला झुलवीते !
बहु डोंगर कोरुन मूषक जगता देते !
बहु गेले असले आगंतुक दारींचे !
लव तेज तुझ्या नच ढळतां गे दृष्टीचें !

पारि ओकांसम तव आप्त मित्र नेल्यानें !
तव दृष्टि होय अंधळी भरुन अश्रूनें !
ही चोरी नाहीं ! खून तुझ्या हृदयाचा !
कीं पंडित खुडला कंदच तव कलिजाचा !
तव चैतन्याच्या उड्या थांबल्या कविते !
या पुढें शिरांतिल कोण रक्त नाचवितें ?
गे सरस्वती तव वीणा बेसुर झाला !
हा गानध्वनि तव तारा सोडुन गेला !
हा काव्यरसाचा आशय, तव कंठींचा
बहुपैलु मणी मरणानें तोडुन नेला !
हा प्रहार रुजला भेदुन तव मर्माला !
हा घाय जिव्हाळीं ! विजय खरा काळाला !
छेः ! विजय कशाचा ? घाय काय राहील ?
यापुढं मृत्युचें काय वैरं चालेल ?
तें आजवरींचें तेज काय लोपेल ?
जरि नवा किरण हा काळ दुष्ट रोधील !
जनकर्णीं आहे गुंजारव पूर्वींचा !
तो पाहिल शेवट अनंतही काळाचा !
जो विविधसुरांचा मेळ गुंगवी कविंना !
काळाच्या भेदिल पंडितरव आवरणा !
जें सरस्वतींचें बोल कंठनेत्रांहीं !
हरिसंगत खेळत, तें यापुढतीं नाहीं !
पारि आजवरींचे काळाला हरितील !
पंचवटी जाऊ ! नच पारि पंडित बोल !
जी काव्यनाटकीं टीकाशास्त्रीं नटली !
परिहासरसानें सांद्र तरंगित झाली !
ती सरस्वतीची वाणी पंडितगानीं !
हटकून मृत्युला विहरे स्वैरसुरांनीं !
जरि नेला नेवो काळें पंडित देह !
माती ती नेउन खुशाल पावो मोह !
चिद्विद्युत पारि लवलवेल काळांतींही !

संचार तियेचा स्वैर दिशांना चोहीं !
जें नश्वर तें घे !यथेच्छ काळा नाचे !
शाश्वतांत तुजला धैर्य नव्हे शिरण्याचें !
तें राज्य कवींचें— कवितेचें, यश हरिचें !
मातीवर जय तव, चिद्वैभव तें त्यांचें !
तूं जाळीं पोळीं मारीं नश्वर जगता !
शाश्वतस्वामिनी एकचि कवितामाता !
मृत्यूनें यास्तव भंग न पंडित- ओकां !
ते शाश्वत असती सुंदर कवितालोकां ! ८०

---

# लक्ष्मण रामचंद्र पांगारकर बी. ए.

यांचे जन्म शालिवाहन शके १७९४( इ.स. १८७२ ) आषाढ वद्य ११ स झालें. यांचें मूळगांव पौड. यांच्या वडिलांचें नांव कृष्णाजीपंत. हे आपल्या चुलत्यास दत्तक गेलेले आहेत. यांचा बहुतेक विद्याभ्यास पुण्यासच न्यू. इं. स्कूल व फर्ग्यूसन कालेज यांत झाला. ' कवि ' या नात्यानें महाराष्ट्रीयांस यांचा फारसा परिचय नाहीं. यांची पहिली कविता ' पुण्याची पर्वती ' ही असुन ती त्यांनीं आपल्या वयाच्या १४ व्या वर्षी इंग्रेजी तिसऱ्या इयत्तेंत असतांना केली. यांची कविता बरीच असून ती बहुतेक भक्तिपर आहे. प्राचीन महाराष्ट्र कविसांप्रदयाप्रमाणें हे आपल्या कवितेंतच आपलें नांव घालतात. मुमुक्षूचे संपादक म्हणून हे गृहस्थ महाराष्ट्रांत मश्हूर आहेत. ह्यांनीं पुष्कळ ग्रंथ लिहिले आहेत; पैकीं ' भक्तिमार्ग प्रदीप ' व,मोरोपंत चरित्र ' हे विशेष प्रसिद्ध आहेत. सध्यां हे संतचरित्रमाला लिहित आहेत. या मालेचे ' श्रीज्ञानेश्वर ' व ' श्रीएकनाथ ' हे ग्रंथ प्रसिद्ध झाले असुन तिसरा ग्रथ ' श्रीतुकारामचरित्र ' हा लवकरच प्रसिद्ध होईल.

# १. अनुभव योगिराज काव्य.

## सर्ग पहिला.

आर्या.

श्रीरामराय तारी स्वपदनता त्या असो सदा नमन ।
यत्पादकृपालव करि लवकरि भवपाशमुक्त दासमन ॥ १ ॥
एके दिवशीं प्रवरासरित्तटाकीं अतिप्रसन्नमनें ।
भव्य प्रवय तपस्वी तोषविला म्यां सुविप्र सन्नमनें ॥ २ ॥
मच्चित्तखेद जाणुनि अंतर्दृक् तो दयार्द्र विरघळला ।
दवकवळित गिर्युपरि प्रेमें अंभोद वाटते वळला ॥ ३ ॥
"चिंता न करीं, आलों कूट तुझें बिकट सोडवायाला ।
निष्ठा मद्वचनावरि ठेव पुन्हां न म्हण ' सोडवा याला ' ॥ ४ ॥
अनुभवयोगी ऐसें मजला सर्वत्र लोक वदतात ।
विश्वकुटुंबश्रेष्ठा मातें आप्तांत तात गणतात ॥ ५ ॥
नृप यश संपादी जरि लाधे सन्मंत्रि तद्धितोद्युक्त ।
तेविं प्रपंच बरवा नटतो जरि तो असेल मद्युक्त ॥ ६ ॥
सत्त्वरजस्तम यांहीं सजिली ही सृष्टि सृष्टिकर्त्यानें ।
न्यूनाधिकगुणभागें भूतांचे संघ निर्मिले त्यानें ॥ ७ ॥
पाषाणादिक तामस व्याघ्रव्याळादि जीव राजस रे ! ।
द्विगुणक्षयीं नृदेहीं भाग्यें सत्वप्रदीपभा पसरे ॥ ८ ॥
तामस अज्ञानज बा ! निद्रालस्यादियुक्त तूं जाण ।
राजस वर्तवि कर्मीं, कामद्वेषादिकांस ही खाण ॥ ९ ॥
संसृतिगर्तीं सेवी सत्त्वगुण श्रेष्ठ पुरुष तोचि तरे ।
सत्त्वाचि अलाबु, सत्वर भव तरणें हेंचि पुरुषतोचित रे !॥ १० ॥
सत्त्व ज्ञानद पुण्यद संत स्वहितार्थ सेविती यातें ।
राजस दुःखद, मूढचि गोरस सांडूनि सेवि मद्यातें ॥ ११ ॥
राजस दुःखद परि तो फिरवी संसारचक्र हें सारें ।
परमार्थापरि लोकव्यवहारीं दक्षता धरीं बा ! रे ! ॥ १२ ॥
आधीं आधिव्याधिप्रशमनपटु सत्यधर्म रक्षावा ।
धर्मीचि श्रीहरिला वळवाया कायही उपेक्षावा ॥ १३ ॥

मग सत्कीर्तिरवानें सोडावें विश्व नित्य दुमदुमनी ।
भक्त्याचारविचारें रमवावे सत्यशील थोर मुनी ॥ १४ ॥
रमुनी रमवी धर्मी सत्कर्मी रामरायपदपद्मीं ।
प्रेमें राहे त्याच्या कमला अमला उभी सदा सद्मीं ॥ १५ ॥
परमार्थ साधणें हें साध्य परी ठेव साधनीं लक्ष ।
इहपर साधाया हो तूं संसारांतही सदा दक्ष ॥ १६ ॥
जेणें कुटुंबपोषण अन्नें तेविंही यशानें हो ।
इतुकें धन संपादीं धर्मानें नीतिनें सुखानें हो ॥ १७ ॥
'पैका नामर्दांचा, यश इज्जत मर्द जो असे त्याची'।
हा साधुबोध चिंतुनि जोडावी शुद्ध कीर्ति बा ! साची ॥ १८ ॥
वपुवेषवित्तविद्यावैभव लोकांत पावती मान ।
परि धन्य तोचि यद्गुणगणगणनें विश्व डोलवी मान ॥ १९ ॥
श्रीवाल्मीकिव्यास- ज्ञानेश्वर- नाथ- रामदासांनीं
सद्धर्म लाविले ते पाळावे सतत राम- दासांनीं ॥ २० ॥
धर्माधर्मचिकित्सा अतिगहना कूट पंडितांनाही ।
अल्पज्ञ बरळती कीं त्यांस कुणी थोर दंडिता नाहीं ! ॥ २१ ॥
मन्वादिक सुज्ञ भले झटले, सर्वस्व त्यां समाजहित !।
उमजे कैसें, चढतो धनमानांनींच ज्यांस माज, हित ? ॥ २२ ॥
वर्णाश्रमधर्म तुवां पाळावे जेविं पितर सादर ते।
चित्त सदा कुलजाचें मंगल - हित- धर्मरक्षणींच रते ॥ २३ ॥
आनंद सौख्य यश दे, धर्मचि आधार होय विश्वास ।
इहपरलोकीं तारक धर्मचि, या वचनिं ठेव विश्वास ॥ २४ ॥
विश्वास नसे तिळही, कलियुग कलिंची चोज चालवितें।
पालवितें पापद्रुम, हाल वितें, धर्मदीप मालवितें ॥ २५ ॥
धर्मोपदेशकर्ते ब्राम्हण सांडूनि मान वागति ते ।
पावविते होते प्राक् कर्मा खंडूनि मानवा गतितें ॥ २६ ॥
प्रकटविले साधनपथ होउनि जे मलिन लोपले होते ।
नाथ– समर्थ–तुकोबा सदय सबळ केविं झोंपले हो ते ! ॥ २७ ॥
नास्तिकपण- मद्यातें प्राशुनि उन्मत्त बहुत बडबडती ।
अन्यायपापरत सद्धर्मच्युत खळहि समयिं गडबडती ॥ २८ ॥
कोटिसुगुणरत्नांचा उद्भव हरिभक्तिच्या असे पोटीं ।
परि पंचविषयाविषधरदष्टांच्या भक्ति वागते ओठीं ॥ २९ ॥

कुलदेशाचारांशीं शास्त्रांशीं करिति जे विरोधातें ।
विषवृक्षसे त्यज, जणों आले धर्मक्षयार्थ बहुधा ते ॥ ३० ॥
धनलोभी जन कैसे नागविती हेंचि सांगतों तुजला ।
सर्वत्र हेचि रीति प्रस्तुत दिसते जनांत नित्य मला ॥ ३१ ॥
कलि म्हणतो ' ब्राम्हण हो ! सोडुनि वेदान्त कायदे वाचा ।
वाचा कुटुंब पोसा ' झाला हा कोप काय देवाचा ! ॥ ३२ ॥
गरिबांचे काळ परी धनिकपदीं त्यक्तलज्ज बाळकसे ।
लुडबुडती, बुडत्यातें बुडविति नव्हती कराळ व्याळ कसे ? ॥ ३३
व्याळ बरे, परि संतत खळ हे खळखळ भल्यास रडवीती ।
सर्व बळांत अलंघ्यचि गमतें खळबळ, खळा सकळ भीती ॥ ३४
सत्तेचा सद्दीचा बुद्धीचा वेंच दीन दुबळ्यांना ।
ठकवाया करिती हे खळ देतो कोण रे ! दुवा त्यांना ॥ ३५ ॥
त्यांचे दांत निराळे खायाचे तेविं दाखवायाचें ।
व्रत गरिबागुरिबांना भोंदुनियां ठार मारवायाचें ॥ ३६ ॥
न्यायान्याय न गणती, न पाहती धर्म पुण्य कीं पाप ।
थापांत शूर, म्हणती बापास न बाप, घेति जनशाप ॥ ३७ ॥
अन्यापहार चित्तीं नित्य, हरुनि वित्त देति हृत्ताप ।
अन्योत्कर्षें उसळे पित्त, न पापास त्यांचिया माप ॥ ३८ ॥
पाडिति विघट कपटपटु, दोघांत स्वार्थ साधण्यासाठीं ।
लावुनि झुंज पहाती खेळ अशी कुटिललोकराहाटी ! ॥ ३९ ॥
दोघांस मूर्ख ठरवुनि वर्चस्व स्थापण्यास हे शिष्ट ।
टपती तटस्थ, राखुनि मिष्टपणा, दुष्ट केविं पापिष्ठ ॥ ४० ॥
लिडबिडलें अंतर जरि कपटमळें लोभ दावि बाहेर ।
भक्ष्याखुसह क्रीडे मांजर, खळही तसाचि बा ! हेर ! ॥ ४१ ॥
अंतर कपटी परि मुख रसाळ ज्याचें सुत्याज्य तो खळ गा ! ।
माळ बरा, परि गुल्मावृत दे हटकूनि बा ! दगा खळगा ॥ ४२ ॥
वाग्वर्तनीं जयाच्या मेळ नसे अंतरंग बहिरंग ।
भिन्न सदा ठेवुनि जो वागे त्याचा नसो तुला संग ॥ ४३ ॥
डोळस परि अंध, तसा बधिर असुनि कर्णही अती तिखट ।
न्यायी सदा म्हणवितो, ये विपरीतहि जरि प्रतीति, खट ॥ ४४ ॥
उपकृतिकर्त्याच्याही टपतो नाशास खळ, न हा सरळ ।

गोरसदात्या विषधर चावाया धाउनी वमी गरळ ॥ ४५ ॥
मधुमधुर बोल बोलुनि कपटव्यूहांत लोक हा घेरी ।
भ्रमवी, चकवी, ठकवी, ठक कविसहि नित्य आणितो घेरी ॥ ४६
अन्याय करुनि करवी हरवी परवित्त हस्तकांकरवी।
मस्तक नीचपदींही लववुनि अयशोमळें स्वमुख भरवी ॥ ४७ ॥
कार्याकारण ठेवी कार्यार्थी लोभमूल संबंध ।
कार्यांतीं सत्वरचि स्नेहाचा क्रूर तोडितो बंध ॥ ४८ ॥
तेजस्वी स्वबळानें स्वगुणानें लौकिकास जरि चढला ।
मत्सरलोभहतां तें होय महद्दुःख, जरिहि बहु पढला ॥ ४९ ॥
तेजस्वी पुरुषर्षभ वान्हि, कुमति मत्सरीच पापड तो ।
कीं रविपुढें न टिकतो चंद्र, नभीं नित्य तो फिका पडतो ॥ ५० ॥
सत्संगति सुख देते सुजना, कुजना तशी न हें पारिस ।
लोहापरि खापरिला देतो स्वर्णत्व कां कधीं परिस ? ॥ ५१ ॥
खळकृत निंदाच्छलनें सत्तेज जरि क्षणार्ध मावळलें ।
केतुग्रसनें सांगें ! रविचें तत्तेज नित्य कां मळलें ! ॥ ५२ ॥
खलकेतुग्रस्तातें साधुरवीतें बघूनि हळहळतें ।
विश्व सकळ हें, तच्छल दुःसह न गमेचि तेविं हळहळतें ॥ ५३ ॥
व्यवहारज्ञपणाचा गर्व धरुनि कुटिलनीतिनिष्णात ।
स्तविति दुरंगीपण त्या व्हावें अवलोकितांचि सुस्नात ॥ ५४ ॥
एवं बहुविध जन हे चेववितो ज्यांसि स्वार्थवेताळ ।
तन्नीतिरीति न धरीं, बा ! त्यांचे सोडिती थवे ताळ ॥ ५५ ॥
दुर्जनसंगति खोटी पंचमहापातकांसि आधार ।
पूर्वदुरितराशींचें फळ, कामाद्यखिलशत्रुंना थार ॥ ५६ ॥
नित्य खळांची संगति सन्मन शोकार्णवांत बा ! बुडवी ।
कढवुनि सच्चितातें रडवी, परमार्थबुद्धितें खुडवी ॥ ५७ ॥
पूर्व महापापानें घडतां दुःसंग तंग बांधावे ।
धैर्यनगा भंग न हो यास्तव नामींच नित्य रंगावें ॥ ५८ ॥
किंबहुना हरि सकरुण भक्तोद्धारार्थ संकटें आणी ।
अज्ञपणें सद्भक्तहि जरि रे ! डोळयांस आणितो पाणी ॥ ५९ ॥
नाविक झंझावातीं, योद्धा चतुरत्व संगरीं शिकतो ।
मलयज देह झिजवुनी परिमलविख्यात पत्तनीं विकतो ॥ ६० ॥

कंटकरुद्ध गुलाबा पन्नगसंवीत केतका स्मरुनी ।
प्रभुसंकेत असा हें वर्तावें शांतचित्त मनिं धरुनी ॥ ६१ ॥
ज्या ज्या वेळीं उठती ऊर्मी बा ! हृदय सागरावरतीं ।
तेव्हां तेव्हां त्यांतें सावध राहूनि थोर आवरती ॥ ६२ ॥
सावध राहुनि आला तरि काढावाचि राग निपटून ।
न दिसों द्यावा, ऐसें न करी जो त्यासि मानिति पटू न ॥ ६३ ।
अविवेकांकित होउनि बरळे भलतेंचि चाट वाचाट ।
सूज्ञ म्हणति कीं मद्यप्राशी वा उथळ मूर्ख हा भाट ॥ ६४ ॥
पंत म्हणति ' सुज्ञमतें आहे वादांत सर्वथा तोटा '।
तें सत्याचि म्हणुनि बुधें न पडावें त्यांत, आग्रहाचि खोटा ॥ ६५ ॥
' मी तूं ' ' तूं मी ' करितां देहाहंकार वाढतो भारी ।
शब्देंचि शब्द वाढे, चित्त तुटे हरुनि मित्रता सारी ॥ ६६ ॥
बकबक बोलुनि साधे कोणाला कोणता कसा अर्थ? ।
सार ज्ञानाचें हें सर्व मनोनिग्रहाविणें व्यर्थ ॥ ६७ ॥
मंत्र करीं एकांतीं, लोकांतीं सुप्रसन्न बाहेर ।
गंभीर चित्त ठेवुनि लोकव्यवहार फार बा ! हेर ॥ ६८ ॥
निंदाच्छलहि सहावा कृतघ्नताही सुखेंचि सोसावी ।
परि धनदेह झिजवुनी सत्पथ सच्छील सुयश पोसावी ॥ ६९ ॥
ईश्वर साक्षी ठेवुनि सुज्ञें कर्तव्यकर्म सारावें ।
वारावें दोष सकल स्वकुल भवाब्धींत सर्व तारावें ॥ ७० ॥

श्लोक ( वृत्त शा. वि. )

दे भोळा बहु बावळा बघुनि बा ! त्याच्या करीं आवळा ।
शिष्टत्वें अति मिष्ट दुष्ट वदुनी काढी पहा ! कोहळा ।
जो पोळापरि पुष्ट पुंड रडवी दीनांस, जो ओवळा ।
अंतर्बाह्य, सदा टपे परधना पिंडा जसा कावळा ॥ ७१ ॥

श्लोक (वृत्त शिखरिणी )

खळांच्या सांगातीं क्षणभरिहि वास्तव्य न करीं ।
खळांतें सोडूनि त्वरित झटकावें बहु दुरि । "
असें सांगोनी तो मुनिवर तसाची विरमला ।
मला तो सद्वंद्य प्रियतम गुरुश्रेष्ठ गमला ॥ ७२ ॥

संगमनेर, मे, १८९८

---

## सर्ग दुसरा.

श्रीरामप्रभुचरणीं करितों मी शतसहस्र हीं नमनें ।
ज्यां तत्पदयुगभजनीं रंगावें सर्व घस्र हीनमनें ॥ १ ॥
देवि सरस्वति ! मजला सकृपत्वें सर्वकाळ लक्षावें ।
आधिव्याधिभवभयापासुनि हे वायुपुत्र ! रक्षावें ॥ २ ॥
सद्गुरुनाथा माथां कर ठेवुनि मज करा कृपापात्र ।
काय अशक्य समर्था ! हो हा जन गलितदोषगण मात्र ॥ ३ ॥
श्रीवाल्मीकिमुने ! बा ! झालां गावूनि रामयश धन्य ।
रामयशःपीयूषीं उपजविता प्रीतिदार्ढ्य नच अन्य ॥ ४ ॥
त्या बुद्धिसागरातें योग्यातें सदितिहासकर्त्यातें ।
नमितों श्रीव्यासातें नारायणरूप सुकविभर्त्यातें ॥ ५ ॥
श्रीमच्छंकर शंकररूपी त्रिजगांत जाहला मान्य ।
'सत्यसनातनधर्मस्थापक' ही कीर्ति मेळवी नान्य ॥ ६ ॥
श्रीपंढरिसुक्षेत्रीं दैवें मम वास अल्पसा घडला ।
तेणें माझा प्रेमा विठ्ठलचरणीं मयूरपदिं जडला ॥ ७ ॥
वैकुंठपेठ पंढरि भूवरि संतां पसंत ही भारी ।
नारीनर इजमाजीं भजति प्रेमें सदैव कंसारी ॥ ८ ॥
पंढरिचें यश भुवनीं गाजविलें फार पुण्डलीकानें ।
यात्पितृभक्तिश्रवणें लाजावें मूढ पुण्ड लेकानें ! ॥ ९ ॥
एके सायंकाळीं पुण्डलिकाचें समीप बसलों तों ।
योगीश्वर अनुभवराट् एकाकी तेथ पातला हो ! तो ॥ १० ॥
साष्टांग नमन माझें घेउनि हर्षें मला 'भला गाजी' ।
ऐसें वदला तेणें प्रहृष्ट होईन मी न मग कां जी ! ॥ ११ ॥
"बहु अज्ञ असमि परि मदनुग्रहपात्रत्व हें तुझ्या ठायीं ।
पाहुनि आलों पुनरपि उपदेशाया स्वयें इये ठायीं ॥ १२ ॥
मौन धरुनि एकांतीं स्वपरांतरहेतु बहुत शोधावे ।
सावधपणें रहावें, स्वपरहितास्तव सुमित्र जोडावे ॥ १३ ॥
अंतर्बाह्य सुनिर्मळ, परहितरत, मत न ज्यास पाखांड ।
सात्त्विक, सत्यप्रिय, सद्वृत्त, सुहृद्भाव त्यासवें मांड ॥ १४ ॥

विषयासक्त नसे जो, लोभ अनावर न ज्या, न जो भांड ।
मत्सरभूत पछाडी ज्या न, सुहृद्भाव त्यासवें मांड ॥ १५ ॥
गौरव मार्दव करुणा चित्तीं ज्याच्या, कधीं न जो दांड, ।
निष्कपटी, अनिमित्तप्रेम, सुहृद्भाव त्यासवें मांड ॥ १६ ॥
मद्याद्यखिलव्यसनालिप्त, न जाणे सुपारिचें खांड ।
विद्येचें वेड जया, नित्य सुहृद्भाव त्यासवें मांड ॥ १७ ॥
व्यासप्रणीत अठरा सद्ग्रंथ न ज्यास गमति थोतांड ।
ईश्वरभक्तिपरायण, नित्य सुहृद्भाव त्यासवें मांड ॥ १८ ॥
भारतपर्व रिझवि ज्या, कीं श्रीरामायणांतलें कांड ।
वेदान्तोपनिषद्रति नित्य सुहृद्भाव त्यासवें मांड ॥ १९ ॥
' झाडाया पापातें तापातें देहबुद्धितें सांड ' ।
चित्ता क्षणक्षणां हें शिकवि, सुहृद्भाव त्यासवें मांड ॥ २० ॥
दृष्टांत समर्पक सत्स्नेहाचा सांगतों सख्या ! तुजला ।
दुग्ध वरिष्ठ असुनिही सहवासें साम्य देतसेचि जला ॥ २१ ॥
पूर्वोपकृतिस्मरणें विधियोगें त्यास लागतां आंच ।
मित्रार्थ जळुनि जाई जल, सोसुनि कठिण अग्निचा जाच ॥ २२ ॥
आत्मार्थ प्रियनाश प्रेक्षुनि वन्हींत घालितेंचि उडी ।
दुग्ध, पुनःसंगतिनें स्वीकारी अपुली सदैव कुडी ॥ २३ ॥
सद्गुणमंडित पंडित सन्मित्र स्नेहयुक्त जोडावे ।
जोडोनि दृढ धरावे तैसेंही आपण स्वयें व्हावें ॥ २४ ॥
निर्मत्सर निष्कपटी नीतिज्ञ श्रेष्ठ मित्र दातार ।
स्मरुनि प्रार्थी ' रामा ! शुचिवृत्ता ! यास तूं सदा तार ' ॥ २५ ॥
संकटकाळीं धांवे विसरुनियां स्वार्थ रे ! चित्यापरि जो ।
सन्मित्र वीर शंकर निःशंक स्मरुनि साश्रु नेत्र भिजो ॥ २६ ॥
निर्मळ निश्चळ नित्यप्रेमळ तव बाळ तो सिताराम ।
तारा त्वच्छिष्यगणीं देता झाला मनासि आराम ॥ २७ ॥
ऐसे सुमित्र दुर्लभ बहुमोलाचे हिरेच ते साचे ।
दाविति वरकांतीचें जायाचें प्रेम मित्र ते काचे ॥ २८ ॥

'संसार दुःखसागर' सद्धच हें अनुभवेंचि वळखावें।
सारासारविचारें सुविचारी मात्र शांतिसुख पावे॥ २९॥
'संसार सारहीन' ज्ञाते कथिती, तुला कसें न रुचें?।
दीपपतंगापरि कां मिथ्याभासाग्नि भुलसि हे कुरुचे!॥ ३०॥
विषयानंदाभासा भुलती जे कृष्णसारसे मूढ।
शोक-क्षय-भवचक्रारोह न त्यांचा चुके, न हें गूढ॥ ३१॥
सद्ग्रंथसेवनीं मति गुंगावी कीं सदैव हरिचरणीं।
भवतरणोपायातें दाववित्यांच्या तशीच परिचरणीं॥ ३२॥
ज्ञानेश्वरी भवतरी करि पडरींच्या दरींतुनी मुक्त।
कीं दासबोध शोधक चित्ताचा तुज अलाबु बहु युक्त॥ ३३॥
भक्तिसुधारस पिकवी कलिकाळांच्या मुखांस जो सुकवी।
हरिनामीं रति शिकवी सद्ग्रंथ तयास मानिती सुकवी॥ ३४॥
एकांत रमाकांत-प्राप्तिस्तव धरिति सत संतत रे!।
कीं तद्वरेंचि दुस्तर विपदर्णव घोर सर्व संत तरे॥ ३५॥
श्रीरामपादपद्मीं नाममरंदार्थ हो मिलिंद मना!।
ऐसें विनवुनि चपला सेवाया लावि त्या अरिंदमना॥ ३६॥
नामसुधा ही भवगद हरिते, करिते समस्त शोक रिते।
हरिहरसंत मम मतें हारे ते, करि तेथ मस्त सा अरि ते॥ ३७।
निंदास्तुति सम मानुनि वागावें सेवुनी उदासपण।
मुक्ताहारसम सख्या! मिरवावें रामपाददासपण॥ ३८॥
तळमळपिशाच कळिमळयुक्त खळधिलाचि रे! सदा शिवतो।
निर्मळ निश्चळ हृदयीं प्रेमें सादर वसे सदाशिव तो॥ ३९॥
सुखदुःखांचा दाता अन्य न, अन्यासि लाविती बोल।
'प्रारब्धकर्मभोगी जीव' गणुनि हें न बोलती फोल॥ ४०॥
ज्या ज्या वेळीं जें जें होइल तें स्वस्थचित्त भोगावें।
लाभालाभ जयाजय सम गणुनि प्रभुगुणांसि भो! गावें॥ ४१
चोंचेआधीं करितो चाऱ्याची सोय जाणता देव।
सर्व प्रतिपाळी जो भूतें सद्भाव त्यावरी ठेव॥ ४२॥
करुणार्णव राघव हा, सर्वांची लाज काळजी याला।
याची कास धरावी कीं जाचो कधिं न काळ जीवाला॥ ४३॥
कामक्रोधादिक बा! ग्रासाया टपति काळ जीवा हे।

वाहे तनमन हरिला, भक्तांची तोचि काळजी वाहे ॥ ४४ ॥
गुप्ताहि करितां पातक होतें विष, नरक, काळ जीवास ।
निष्पापसत्यमार्गें जातां मानिं करि न काळजी वास ॥ ४५ ॥
श्रीराम मायबाप प्रभु हा सर्वांसि सारिखा सदय ।
कर्मानुसार दुःखें येतां मूढासि वाटतो अदय ॥ ४६ ॥
आतां पुरे ! पुरासी जां ! पुरती सर्व कामना तूर्ण ।
पूर्ण मनोरथ करि हरि भक्त, तसें तदरि शीघ्रही चूर्ण ॥ ४७ ॥
जेथें धर्म तिथें यश, नीति तिथें सौख्य, नित्य हा नियम ।
धर्मन्याय त्यजितां अंतीं करि शांतिसौख्यहानि यम ॥ ४८ ॥
जें प्रतिकूळ स्वहिता कीं जें स्वीकारितां जडे शर्म ।
तें तें तसेंचि इतरां, जाणुनि हें वागतां घडे धर्म ॥ ४९ ॥
आधार धर्म जगता ! जगतां बाधा न धर्मनिष्ठास ।
अस्तास चालला रवि स्मरतां पावेन खेद हरण्यास " ॥ ५० ॥
' विश्वप्रकाश ! पोषक विश्वाचा ! सत्प्रभा प्रसवित्यातें ।
प्रेरक मतिचा तूं ! तुज ध्यातों स्वहितेच्छु विप्र सवित्यातें ' ॥ ५१ ॥
ऐसें चिंतुनि रविला, नीरविला स्यांहि नमुनि योगी तों ।
तो झाला अंतर्हित अंतर्हित करुनि सौख्यभोगी तो ॥ ५२ ॥
बहु धन्य भाग्य म्हणुनि श्रीपंढरि ! पातलों तुझ्या ठाया ।
गाया सुयश तुझें गे ! झिजविति सद्भक्त नित्य हे काया ॥ ५३ ॥
बहु चित्त हर्षतें श्रीविठ्ठलपदवासपरमलाभानें ।
त्यजिलें मयूरकाव्यामृतपानां आजवर मला भानें ॥ ५४ ॥
वाङ्माधुर्य कवींचें रसिकां थयथय सदैव नाचवितें ।
काव्यरसामृतलोभें या प्रेमें अन्य मानिना चवितें ॥ ५५ ॥
पंत मयूर कवीची कविता देते बुधा अती गोडी ।
अरसिकशिरोमणी वा दुर्भागी व्यर्थ काढिती खोडी ॥ ५६ ॥
प्राकृतगद्याचार्यां गुरुवर्या विष्णुशास्त्रिचिपळूणकरवाला ।
चटका न लाविला कां ? रचिली ज्याणें सुरम्य ती माला ॥ ५७ ॥
नमन असो हें मयुरा काव्यनदीना सुदीन दासाचें ।
वर्षत्रय बोधामृतपानें मन हें स्थिरावलें साचें ॥ ५८ ॥
पिंजारुनी पिसारा केकांचा फोडिलाचि जो टाहो ।
गोटा हो परि ऐकुनि खळखळ रडतो, द्रवे न खोटा हो ॥ ५९ ॥

सच्छील, गुणग्राही, निर्मत्सर, विनयशील पंडित हा ! ।
समजसि म्हणे, 'येथ रहा , काव्य पहा, रामपायीं चित्त वहा' ॥ ६० ॥
माझीं सहस्र नमनें भागवतोत्तंस कविमयूराला ।
यद्वागमृतरुचिपुढें न सुचे सद्गानही मयूराला ॥ ६१ ॥
यत्कृतभारतरत म्यां होऊनि सहर्ष मास चवदा ते ।
मासासम घालविले न गणुनि तादितर पदार्थ चवदा ते ॥ ६२ ॥
बहु यत्नें मेळवितों अवगणुनिहि चरितसाधना काय ।
सत्पुत्र वृद्ध पितरां बहु मानी परि तसा धना काय ? ॥ ६३ ॥
सच्चरितामृतपानें पापक्षय चित्तशुद्धिही होते ।
हरिपदलीना लीना मति म्हणुनिच येथ लाविली हो ते ! ॥ ६४ ॥
श्रीरामा ! जय रामा ! वंदुनि हा पसरितो पसा दास ।
आरोग्य, यश सुसंपत् द्या, पात्रचि हा करा प्रसादास ॥ ६५ ॥
अंगीकृतकार्यीं यश देउनि कृतकार्य मज करावेंची ।
सत्कार्यीं तन मन धन अनलस होउनि भला खरा वेंची ॥ ६६ ॥
सत्संकल्प सकलही विकलतनु न तोंचि सिद्धिला जावे ।
रामा ! वर दे ऐसा, त्वत्सुयशा कल्पनगहि लाजावे ॥ ६७ ॥
पांडवसख ! सद्भाविक सौख्यागार! प्रभो ! प्रसाद कर ।
भृगुपदलक्ष्म ! ऋणत्रय फेडाया रामचंद्र! दे सुवर ॥ ६८ ॥

पंढरपूर, जून १९०१.

---

## २ श्रीरामप्रार्थना.

### आर्या.

श्रीरामा ! जयरामा ! जयजयरामा ! विभो घनश्यामा ! ।
तुझिया पदकमलाहुनि आधार जगत्रयीं नसे आम्हां ॥ १ ॥
विषयसुखाभासाला मानस विटलें दया करा देवा ! ।
स्वोन्नत्यर्थ झगडतों परि अपुला अभयकर शिरीं ठेवा ॥ २ ॥

योगक्षेम तयांचा चालविसी येति जे तुला शरण ।
निजधन त्यांतें अर्पिसि सद्भावें करिति जे तुझें स्मरण ॥ ३ ॥
बापा ! संचित जाळी, दयाकरा ! तुंचि होसि पावकसा ।
आरोग्य, यश, सुसंपत्, दे मजला, धांव, धांव; पाव कसा ॥ ४ ॥
मायानिर्मित दुःखें दुस्सह परि तीं अपाप ओसरती ।
सरतीच यातना जरि जीव जगन्नायका ! तुला स्मरती ॥ ५ ॥
व्यंकटरमणा ! संकट वारुनि दावी अकंटक सुपंथ ।
खंत कशास करूं ? यश, सुख दे, पाहों नको नको अंत ॥ ६ ॥
विषयविषचि निरय, परि त्यांतुनि सोडील एक सत्कर्म ।
सर्व सुखाचें वर्मचि धर्म, इतरथा न पाविजे शर्म ॥ ७ ॥
त्या धर्मीं मति गुंतो, जसि कां गूळासि गुंतते माशी ।
राज्य असो, मोक्ष असो, धर्मचि जीवासि येत कामाशीं ॥ ८ ॥
दे बुद्धींत सुनिश्चय, तैसा दे सुप्रसाद वाणींत, ।
सर्वेंद्रियांत भगवत्प्रेम, शिरो मन न विषयघाणींत ॥ ९ ॥
हरिपादिं मुमुक्षु सजला स्वपरार्थ वर प्रभूत मागाया ।
लावा या स्वचरित्रें संतचरित्रें प्रभूत्तमा ! गाया ॥ १० ॥

धुळें, फेब्रुवारी १९०७.

## ३ श्रीहरिस्तव.

श्लोक ( वृत्त — रथोद्धता . )

श्रीहरिप्रभुपदांसि वंदन । प्रेमयुक्त करि रामनंदन ।
सत्सभा हरिपदांसि वानिते । व्हावया त्रिविधतापहानितें ॥ १ ॥
जीं पदें हृदयिं नित्य चिंतुनी । हा भवार्णवहि लंघिती मुनी ।
जीं महोग्रतर दुःख वारितीं । या भवार्णवभया निवारितीं ॥ २ ॥
हा भवार्णव फिरूनि भागलों । त्वत्पदीं विफलयत्न लागलों ।
बावरे बहुत चित्त, नावरे । नाव रे ! तवचि येथ नांव रे ! ॥ ३ ॥
' नाम मात्र भविं तारितें ' असें । संत बोलति, अविश्वसूं कसें ? ।
संत बाप, गुरु संत माउली । याविना दुजि नसेचि साउली ॥ ४ ॥
संत गायचि ' मुमुक्षु '–वासरा । याविना मज दुजा न आसरा ।
' संतसंग–मुखिं नाम–हो तुला ' । या वरें हरि ! पुरीव हेतुला ॥ ५ ॥

आर्या.

वळवा दयावना ! हो अमृताची दृष्टि या ' मुमुक्षु ' कडे ।
तुकडे शिळेहि चारा परि द्याहो द्रवुनि बाळकांसि कडे ॥ ६ ॥

पुणें, फेब्रुवारी १९०८.

## ४ जन्मसाफल्य.

श्लोक ( वृत्त — वसंततिलका. )

सुस्नेह जे मजवरी करितात नित्य ।
ज्यांचें असे विमल वर्तन शुद्ध सत्य ॥
आनृण्य जोडिन तया सुखवूनि जेव्हां ।
मज्जन्म हा सफल होइल जाण तेव्हां ॥ १
ज्याचें कृपासुखद छत्र जनावरीं हें ।
यत्प्रेमपूर जगतावरि सर्व वाहे ॥
त्या दीनवत्सल विभूस भजेन जेव्हां ।
मज्जन्म हा सफल होइल जाण तेव्हां ॥ २
ज्यांनीं परार्थ बहु कष्टविले स्वदेहा ।
नाहीं कधींहि गणिले सुखवित्तगेहा ॥
त्यांच्यासमान जनकार्य करीन जेव्हां ।
मज्जन्म हा सफल होइल जाण तेव्हां ॥ ३
जे शूर, वीर, कवि, साधु, विचारवंत, ।
जे राष्ट्रनायक धुरंधर, जे महंत, ॥
त्यांच्या स्मरेन कृति पुण्य उदार जेव्हां ।
मज्जन्म हा सफल होइल जाण तेव्हां ॥ ४
ज्यांनीं स्वदेशयश भूवरि गाजवीलें ।
ज्यांनीं स्वदेशइतिहासहि साजवीले ॥
त्यांचें चरित्र गुण गाइन नित्य जेव्हां ।
मज्जन्म हा सफल होइल जाण तेव्हां ॥ ५

ज्यांच्या मनीं दिसति मूर्तिहि पूर्वजांच्या ।
सद्ग्रंथ पुण्य कृति रम्य अपूर्व ज्यांच्या ॥
त्यांचा मनीं सदुपदेश ठसेल जेव्हां ।
मज्जन्म हा सफल होइल जाण तेव्हां ॥ ६ ॥
" शीलार्थ संतत झटा, न धनार्जनार्थ, ।
यज्ञार्थ अर्थ मिळवा, न सुखार्जनार्थ ॥ "
हें शास्त्रवाक्य मनिं पूण भरेल जेव्हां ।
मज्जन्म हा सफल होइल जाण तेव्हां ॥ ७ ॥
आपद्गत स्वजन पाहवती न डोळां ।
तत्क्लेश ते बघुनि होतहि जीव गोळा ॥
तद्दुःख दूर करण्यास झटेन जेव्हां ।
मज्जन्म हा सफल होइल जाण तेव्हां ॥ ८

उमरावती, १ एप्रिल १९०६.

---

## ५ परोपकारी धर्मोपदेशक.

पद ( चाल.—ज्ञाष्टेचा लाडेशाळ. )

श्रीहरिचरणीं वंदन करिता नंदनसा हा कवी ।
संतचरित हें दिव्यरसायन याची घ्यावी चवी ॥ ध्रु० ॥

१

पंचवटीक्षेत्रांत राहिला पुण्यपुरुष चांगला ।
वयोवृद्ध परि सतेज ह्मणुनी तरुण शोभला भला ॥
पुष्पवृक्षपरिवेष्टित उटजीं राहुनि विश्रामला ।
' मला मला ' हा घोष करुनि तो चित्तीं नच तापला ॥
ज्या प्रभुनें मज सदयपणें नरदेह थोर हा दिला ।
योगक्षेमहि तोचि चालविल जाणुनि संतोषला ॥
' चोंच निर्मिता चारा पुरवी '–यावरि विश्वासला ।
मायबाप विश्वाचा चालक तद्भजनीं रंगला ॥
शिकला नाहीं विद्या अथवा नानाविध त्या कला ।
परोपकारीं परी परोपरि पिंड पहा ! पोसला ॥

शुद्ध चित्त मृदु भाषण यांहीं सर्वांला मानला ।
सभोंवारचे लोक ह्मणति हो पाहुं पुरुष हा चला ॥ १ ॥

२

मोठ्यामोठ्या शहरापासुनि दूर सदा राहुनी ।
जनहितकर आयुष्य वेंचिलें निष्पापत्वें जनीं ॥
संपत्सत्ताधीश नुतिप्रिय दुबळ्यांच्या वंचनीं ।
शूर थोर जे त्यांचें द्वारहि पाहीना लोचनीं ॥
हांजी हांजी करुनि थोरपण मिरवावेंसे मनीं ।
घेईना, परि तत्पर राहे दीनांच्या रंजनीं ॥
आत्मदुःखसुख विसरे सारे परदुःखोद्धारणीं ।
मानी परधन वमनसम सदा मूक असद्भापनीं ॥
ज्या ज्या वृद्ध प्रौढा युवती तितुक्या माता गणी ।
मुग्धा सरला बाला याला दिसती कन्या मनीं ॥
भार्या आर्या सुशील तत्पर होती तद्रंजनीं ।
गृहलक्ष्मीसे तिस संमानी हाही मंजुध्वनी ॥ २ ॥

३

भवार्णवीं दगदगले थकले त्यांतें तारावया ।
झटला, शिकला यांत महोत्सव मोक्षहि मानावया ॥
जया माय ना बाप बंधु सुत उरला पोसावया ।
भोगी रोगी विषयी व्यसनी—साधु जवळ करि तया ॥
भिक्षावृत्ति स्वधर्म गणुनि प्रतिवर्षी यावया ।
पलितमुंड लिंबाजि सवकला हाही पोषी तया ॥
पूर्ववयीं दुर्वृत्त मत्त सोमाजी मागावया ।
लज्जा शंका ज्यास न उरली सांभाळी हा तया ॥
तरुणपणीच्या युद्धकथा सरसावुनि सांगावया ।
सजे सयाजीराव हाहि त्या जखमा बांधावया ॥
देशकालपात्रत्व पाहिजे जरी दान द्यावया ।
पात्रापात्रविचार सुचेना द्रववी तन्मन दया ॥ ३ ॥

४

परोपकारीं झटला झिजला कायावाचामनीं ।
कृती तयाची देखुनि वदनें लपविलिं हो चंदनीं ॥

भूतें सारीं भगवंताचीं रूपें भावीं मनीं।
तत्सेवा ही भूतात्म्याची पूजा ऐसें गणी ॥
सन्मार्गच्युत युवयुवती त्या आर्द्रचित्त होउनी।
घरीं आणुनी अथवा जाउनि सुधारि बोधबोधुनी ॥
पाप्यांच्याही मृत्युसमयीं हा देवातें प्रार्थुनी।
आश्वासी या सांगे ' लय हें लावा नारायणीं ॥
स्वसुखासक्त न रक्त सदा परसौख्याच्या चिंतनीं।
अनाथ दुबळे अंध पंगु या सर्वांचा हा धनी ॥
नवनीताहुनि मृदु कोमिळ तद्धृदय रसें ध्याउनी।
विरला विरघळला कवि लक्ष्मण काव्य संपलें ह्मणो ॥ ४ ॥

पंढरपूर, मे १९०१.

## ६ कै. श्रीपाद नारायण मुजुमदार बी. ए.

यांचें जन्म कोल्हापुरानजीक अजरें गांवीं शालिवाहन शके १७९९ ( इ. स. १८७७ ) त वैशाख शुद्ध २ स झालें. यांचें प्राथमिक शिक्षण इचलकरंजी व कोल्हापूर येथें होऊन उच्च शिक्षण मुबंईस झालें. बी. ए. झाल्यावर प्रथमतः त्यांनीं कांहीं दिवस पंढरपूर येथील व्हिक्टोरिया ज्युबिली हायस्कुलांत शिक्षकाचें काम केलें. पुढें त्यांनीं दापोली येथें मिशनस्कुलांत नोकरी धरली. दापोलीस सहा वर्षें काम केल्यावर एका सद्गृहस्थांच वशील्यानें त्यांना इंदूर संस्थानांत मुनसफीची जागा मिळाली. तिकडे गेल्यावर एक दोन वर्षांतच, हतोद येथें असतांना, हतोदनजीक खजुरिया गांवीं त्यांचा शके १८३१ ( इ. स. १९०९ ) भाद्रपद कृ० ३० स प्लेगनें अंत झाला! त्यांच्या बहुतेक कविता प्रकाशीत आहेत. विषयास सारभूत करण्यापेक्षां तो व्यापक करण्याकडेच या कवींचा विशेष ओढा दिसतो. हंसदूत, मोहना, वीरमती द्रौपदी, कपटविपाक, वसंत-चंद्रिका, प्रियोपलब्धि, व दशरथनिधन वगैरे यांच्या कविता पाहिल्या असतां वरील लिहिण्याचें प्रत्यंतर येईल. त्यांची ' श्रीशिवछत्रपति ' व ' श्रीसुभद्रा ' अशीं दोन महाकाव्यें रत्नावलींत छापून निघालीं आहेत. ' विरहिणी ' ( काव्यरत्नावली अंक ९ इ. स. १९११ ) ही यांची शेवटची कविता होय. ही कविता वाचून मृत्यूपूर्वी मृत्यूचें निशाण कवीच्या प्रतिभेस दिसलें असावें असें दिसतें. कधीं कधीं हे आपली कविता ' नारायणसुत ' या टोपणनांवानें प्रसिद्ध करीत असत.

## १ मार्गांतील सरोवर.

श्लोक ( वृत्त —वसंततिलका. )

अंभोधरें करुनि संतत वारिवृष्टि । जीवांस सर्व दिधली बहु तुष्टिपुष्टि ।
थोरांस येइ जंव भाग्यदशा अपार । दीनोपकारकरणां रत होति फार ॥ १ ॥
ओढे, तडाग, तटिनी बहु वारि-दानें । संपूर्ण हीं भरियलीं नववारिदानें ।
दावीति तीं सकलही निजवैभवातें । मार्गस्थिता परि सरा प्रिय तूंच मातें ॥ २ ॥
ओढे अशाश्वतविभूतिमदें प्रमत्त । हे दाविती अविनयाचरणा प्रभूत ।
भीतिप्रदा परम घोर रवा करूनी । दिक्प्रांत टाकिति समस्तहि हे भरूनी ॥ ३ ॥
कासार! तूं असलि शांत तसें गभीर । लोकोपकारकरणार्थ सदा तयार ।
संपत्तिगर्व तिळमात्रहि नाहिं तूतें । थोरांस ऐहिकविभूति तृणासमा ते ॥ ४ ॥
तापाकुला क्रमुनिया बहु मार्ग पाहीं । सेवीतसे तुजशीं पांथपरंपरा ही ।
प्राशूनिया तव सुधेपरि गोड वारी । कल्याण इच्छिति तुझें बहुत प्रकारीं ॥ ५ ॥
त्वन्नीर लोकहृदयां बहुतोष देई । नेत्रोत्सवा विरचि पुष्पविकासभा ही ।
घ्राणेंद्रियां सुखवि मारुत गंधयुक्त । लोकानुरंजनिं निरंतर तूं प्रसक्त ॥ ६ ॥
रात्रौ निशापतिकर प्रतिबिंबुनी हीं । स्वच्छोदकें दिसति चित्रविचित्र पाहीं ।
ताराशशिग्रहसुशोभित भूप्रदेशीं । आकाशभाग पडले गमतें मनाशीं ॥ ७ ॥
आहे अशाश्वत समस्तहि हे विभूती । हें तत्त्व ठेवुनि सदोदित आत्मचित्तीं ।
लोकोपकारिं जल वेंचिसि तूं समस्त । धिक् ! अज्ञ मंदमति वारिधि हा प्रमत्त ८
ग्रीष्मार्कचंडकरिं होइन शुष्क जेव्हां । कोठें अहा ! पथिकसंतति जाय तेव्हां ।
ऐशा विचारें तव होत कृशा तनू ही । तूं धन्यजीवित, तुझ्यासम कोणि नाहीं९
ग्रीष्मार्क वैभव समग्र तुझें हरील । शोषून वारि परिशुष्क तुला करील ।
उत्साहहीन नच होइं तदा मनांत । सोडी न थोर धृतितें विपदाभिभूत ॥ १० ॥
तूं वेंचिसी सकळ वारि परोपकारीं । चंडार्क तें निजकरीं हरि दुर्विचारी ।
दुर्वृत्त दुष्टमति उद्धतवृत्ति भूप । देई अकारण सदा सुजनांस ताप ॥ ११ ॥
जाईल टाकुनि तुला खगसंतती ही । टाकीति याचक धनी विगतार्थ पाहीं ।
पीडा तुला बहुत देतिल हे पशू रे । आपद्गता सुपुरुषा खल पीडिती रे ॥ १२ ॥
जे प्राशुनी तव जला सुख पावती ते । दुर्गंधियुक्त करतील सदैव तूतें ।
सोशी अपाकृति समस्तहि सद्विचारीं । दुष्टापकार न गणीच परोपकारी ॥ १३ ॥
जे त्वन्मना गमति जीवितनिर्विशेप । मत्स्यादि ते मरुनि होशिल पंकशेप ।
होतांच दुर्गत महाश्रयभूत राय । होती गतासु सकलाश्रित निःसहाय ॥ १४ ॥
क्षीणार्थ देउनि जनां धन जो विशेष । तो शोभतो धनिक सद्गुणमात्रशेष ।
तैसा सरा ! गमसि तूं अगिं वंदनीय । होई कलाक्षयिं निशापति दर्शनीय ॥१५॥

' संपत्तिचा भरंवसा तिळमात्र नाहीं । सत्कारणीं व्यय तिचा कारें सर्वदाही ।
प्राणव्ययेंहि करणेंच परोपकार ' । हें तत्त्व तूं शिकवितोस जनांस थोर ॥ १६ ॥
होशी जगीं परमवंद्य खरोखरी तूं । संतप्त-पांथजन-संघ-सुखैकहेतु ।
लोकार्थ तूं झिजविशी सदया! तनूतें । मी मानितों मनिं खरोखर साधु तूतें १७
मेघें सदा उदकवृष्टि करून फार । द्यावें तुला सतत वैभव हें अपार ।
सत्कारणीं व्यय करून सदा तयाचा । तूं धन्यवाद मिळवीं सकलां जनांचा १८

---

## २ चंद्रावतीचें प्रोत्साहन.

जोधपुरचा प्रख्यात राजा जसवंतसिंह याची पत्नी चंद्रावती ही सद्गुणी व शूर होती. तिजसारखी पतिव्रता व दृढनिश्चयी स्त्री त्या वेळीं सर्व भरतखंडांत दुसरी नव्हती. बापाला पदच्युत करून व भावांचा वध करून राज्यपद मिळवावें, या दुष्ट हेतूनें महत्त्वाकांक्षी औरंगजेब सैन्यासह दिल्लीकडे चाल करून येत आहे, हें ऐकून चंद्रावतीला फारच राग आला. व त्याचा नाश करण्यास तिनें जसवंतसिंहास सैन्यासह पाठवून दिलें. जसवंतसिंह लढाईला जातांना तिनें जें प्रोत्साहनपर भाषण केलें, तें पुढील उताऱ्यांत दिलें आहे.

आर्या.

सजला राज्यासाठीं माराया हाय! दुष्ट, तातातें ।
धरिजेल सुतेच्छा मनिं पाहुनि ही काय दुष्टता तातें ॥ १ ॥
इच्छी नीचाधम जो कपटानें सोदरांस माराया ।
त्यास वधुनिया पसरा धैर्यद्युति भास्करासमा राया ॥ २ ॥
केली ज्या नरपतिंनीं धवल यशें श्वेतमान वसुधा ही ।
ज्यांच्या कीर्तिसुधेला न तुळे परमोत्तमा नव सुधाही ॥ ३ ॥
गमले या लोकां जे नवसेतुपरी विपन्नदीनातें ।
अंतकसम दुष्टां जे, सुखहेतु परी विपन्न-दीनांतें ॥ ४ ॥
त्या भूपश्रेष्ठांच्या सद्वंशीं पावलां पहा जनन ।
कृति आचरा तयांसम निंदो युष्मत्प्रताप हा जन न ॥ ५ ॥
पळवावी रिपुसेना फोडुनिया हाक तापजनक रणीं ।
विस्मित होवो पाहुनि अपुली तो दुष्ट पापजन करणी ॥ ६ ॥
छिन्न करावा समरीं खड्गें औरंग-यवन-काय महा ।

भासावें त्या दुष्टा आला युद्धास जवन का यम हा ॥ ७ ॥
समरकुशलता त्याला दावावी प्रियकरा ! अगाध रणीं ।
छेदुनि मग शिर त्याचें रक्तपरम ही करा अगा ! धरणी ॥ ८ ॥
अतुल पराक्रम अपुला पाहुनि मग शत्रु समर करितिल का ।
का जिंकितलि समरीं मिळुनी जंबूक अमरकरितिलका ॥ ९ ॥
निवटावें समरीं तत्पक्षीयां भूपराज ! यवनांतें ।
पळवावें समरांतुनि करुनि तयाचा पराजय वनातें ॥ १० ॥
आदरि नयनीति सदा दुर्जन नरपाल पाहिं जे कुटिला ।
तो अधम राज्यलोभी हा ! हा ! तत्काळ पाहिजे कुटिला ॥ ११ ॥
नाथा ! कथित्यें खचितांचि गमतो नयनाभिराम समर मला ।
पाहीन आपणां मी केव्हां समरांत रामसम रमलां ॥ १२ ॥
अभय रणीं विचरावें, पदहि न मागें जनाधिप ! सरावें ।
निर्मल यश सर्व जगीं, हरुनीया निजजनाधि, पसरावें ॥ १३ ॥

---

## ३ चंद्रावतीचा विलाप.

जसवंतासिंहाचा रणांत पराभव होऊन तो परत येत आहे, असें जेव्हां चंद्रावतीनें ऐकिलें, तेव्हां तिनें आपल्या सखीजवळ जे दुःखाचे पण त्वेषपूर्ण उद्गार काढले, ते या उताऱ्यांत दिले आहेत.

आर्या.

धवलयशःकीर्तीनें केली वसुधाहि सिततरा ज्यांनीं ।
यत्पदपंकजरेणू सेवावा जपुनि सतत राजांनीं ॥ १ ॥
अतुल पराक्रम दावुनि हरिती जे सत्वरी परमदासी ।
ज्यांची अनन्यभावा विजयश्री ती खरी परम दासी ॥ २ ॥
असती आनंदानें सिद्ध सदा जे सदास मरणातें ।
गणिती नित्य मनीं जे सुखदायक नृपपदासम रणातें ॥ ३ ॥
लढतां लढतां यावा मृत्यु रणीं ज्यांस कामना हीच ।
निर्मल यश राखावें याविण ज्यां अन्य काम नाहींच ॥ ४ ॥
त्यांचा वंशज नृप हा लावि कुला सज्जनांत डागातें ।

सत्कीर्तिनदी टाकुनि गेला गे ! मज्जना तडागातें ॥ ५ ॥
भूपवरांहिं भरावी सर्व धरा ही यशःपरिमलांहीं ।
कृति पाहुनि ही गमते लज्जा मी निर्बला परि मलाही ॥ ६ ॥
देई पाठ रणांतें सोडुनि नृपतीस उचित वर शील ।
रणभीरुता बघुनि ही खेद सखे ! तूंहि खचित वरशील ॥ ७ ॥
आतां यास न उरला सखि ! मानधनांत मानलव, वायां ।
झालें जीवित, आम्हां लागेल जनांत मान लववाया ॥ ८ ॥
जरि हा समरीं मारुनि बंधुघ्ना त्या अपत्रपा मरता ।
तरि नच वरिता सत्यचि सखये ! मग इहपरत्र पामरता ॥ ९ ॥
झाली या वंशाची स्मृतिशेषा हाय ! हाय ! शोभा ते ।
निजपूर्वजसंपादित घालवि नृपराय हा यशोभा ते ॥ १० ॥
समरास पाठ देई नच कधिंही वीरमंडन भयानें ।
हा ! हा ! सखये ! भरलें दुष्कीर्तीनें अखंड नभ यानें ॥ ११ ॥
दिधलें वडिलांनीं हें सिंहासन रत्नखचित जें त्यातें ।
हा ! हा ! आतां सखि ! तें लाभेल अयत्न खचित जेत्यातें ॥ १२ ॥
स्मरुनी परापकृति ही मन त्याचें स्वल्पही न का काचे ।
हंसकुलीं जन्मुनिया कर्म करी अल्प हीन काकाचें ॥ १३ ॥
आतां जयशालि यवन निजचरणीं तुडवितील वामांतें ।
वधितील अदयतेनें, अघपंकीं बुडवितील वा मातें ॥ १४ ॥
हरितील राज्यलक्ष्मी कोण करिल सांग सुमति ! अवन तिचें ।
हा ! हा ! आले आतां सखये ! मज दिवस गमति अवनतिचे ॥ १५ ॥
समरांतून पळावें जरि सोडुनि सर्व दम नरमणीनें ।
तरि काय करावें गे ! उद्धतरिपुगर्वदमन रमणीनें ॥ १६ ॥
जो नृप भीति वरुनिया शत्रुजनाचा करील न वध रणीं ।
हा ! हा ! काय तयाला भटप्रणयिनी वरील नव धरणी ॥ १७ ॥
भीरुत्व बघुनि त्याचें, दोष तयाला न देउ परिजन का ।
म्हणतील काय आतां दुर्यश कळतांच हें उपरि जनका ॥ १८ ॥
आतां ऊठ झडकरीं सखि ! दुर्गद्वार लावि, लपवाया- ।
कृष्णवदन येतिल ते; हा ! हा ! नच कोमला विलप वायां ॥ १९ ॥
भीरुत्व धरुनि मनिं जो रक्षी समरांगणांत न रमेला ।
धिक् ! धिक् ! बाई ! त्याला, तो समजें मीं मनांत नर मेला ॥ २० ॥

केला दृढ निश्चय हा, आतां न बघेन रायवदनातें ।
उरलें आतां त्यांशीं बाई ! मम हाय ! काय वद नातें ॥ २१ ॥
कृष्णवदन झालेलें पुनरपि बघतील वदन ज्या यांचें ।
धिक्कार असो त्यांना, मजला त्या नाम वद न जायांचें ॥ २२ ॥
जेव्हां ग्रासि रिपु तया, ज्यापरि असुर प्रभावहा रविला ।
तेव्हांच होय विधवा, जेव्हां त्यानें प्रभाव हारविला ॥ २३ ॥
घाला गे ! मत्कंठीं माला ज्या सुखभरांत या रचितां ।
अर्पिन तनु अग्नीतें, आतां सत्वर करा तयार चिता ॥ २४ ॥

---

## ७ श्रीकृष्ण नीलकंठ चाफेकर, एम्. ए. एल्. एल्. बी.

यांचें जन्म शालिवाहन शके १७९९ ( इ. स. १८७७ ) आषाढ कृष्ण ९ स खानदेशांत अंमळनेर येथें झालें. सातारा जिल्ह्यांतील ‘ देवराष्ट्र ’ हें यांचें मूळ गांव. यांचें सर्व शिक्षण पुण्यासच झालें. हे पुष्कळ वर्षें मुंबईच्या ‘ गोकुळदास तेजपाळ ’ हायस्कुलांत संस्कृत शिक्षक होते. सध्यां हे वऱ्हाडांत एलिचपूर येथें वकीली करीत आहेत. यांच्या बहुतेक स्फुट कविता ‘ करमणूक ’ पत्रांत प्रसिद्ध झाल्या आहेत. यांनीं एक ‘ सुगुणसुंदरी ’ नामक कादंबरी लिहिली असून ती प्रसिद्ध आहे. पद्यापेक्षां गद्य लिहिण्याकडेच यांचा कल फार दिसतो. यांचे गद्य लेख ‘ इंदुप्रकाश ’ व ‘ विविधज्ञानविस्तार ’ यांतून प्रसिद्ध होतात. हे उत्तम वक्तेही आहेत.

### १ उन्नतिगीत.

फटका.

वैभवगिरिवरि अधिकाधिक वरि सतत चढाया यत्न करूं ।
विमल यशानें निज-भू-वृत्तीं अमर रहाया हांव धरूं ॥ ध्रु० ॥
देशहिताच्या कामगिरीतें आनंदानें सदा वरूं ।
येवो सिद्धी, पडो देह वा, अजरामर तें नांव करूं ॥
ज्ञान-खनीच्या अगाध उदरीं खोल खोल कीं नित्य शिरूं ।

बहुश्रमानें अमूल्य अगणित निसर्गदेवी-कोश हरूं ॥
नृप-मुकुटांतिल रत्नांहुनिही महार्ह सुधि-रत्नें लेऊं ।
दिव्य तयांच्या अतुल्य तेजें कीर्ति जगांतरि निज नेऊं ॥ वैभव० ॥ १ ॥
अभंग गतिनें, अढळमनानें, कर्तव्य-पथीं पुढें–पुढें–।
–चला पुढें–मग, पहा सिद्धि ती धांवत येइल तुम्हांकडे ॥
सद्वर्तन हें खरें सौख्य जगिं तेंच शांतिचें स्वधाम कीं ।
मनोन्नतीसम श्रेष्ठ न दुसरें सौंदर्य असे या लोकीं ॥ वैभव० ॥ २ ॥
चला! चला रे! बंधुप्रमें परस्परांशीं सकल भिडूं ।
बहु नेटानें, बहु उत्साहें पार निराशेला दवडूं ॥
हात देउनी एकामेकां; हृदयांतिलही भाव खरा ।
कशाहि समयीं अखंड सेवूं गृह-सौख्याचा गोड झरा ॥ वैभव० ॥ ३ ॥
गृह-सौख्यांतचि इतर सुखें वा समाधान शांती असती ।
मूढ बिचारे! हतभागी! जे, दूर–दूर–त्यास्तव फिरती ॥
'निजकरणीनें नर तो होई नारायण' या वचा स्मरा ।
परमात्म्याचे वंशज आपण स्वर्गतुल्य ही करूं धरा ॥ वैभव० ॥ ४ ॥

---

## २ वेडी.

पद ( चाल—' उद्यां वघ जाते० )

असे ही वेडी । परि जनां सुचवि बहु कोडीं ॥ असेही ध्रु० ॥
क्षणैक, मुनिसम निश्चल बसते । अविदित कारण क्षणीं हांसते ।
क्षणीं अकारण रुदना करिते । कृती ही हीची ॥
मुग्धशी विकट परि साची । असे० ॥ १ ॥
भेद रुची वा अशनीं नाहीं । वस्त्राच्छादनिं अलक्ष राही ।
उष्ण शीत वा, जीस न कांहीं । स्थिती ही हीची ॥
भासते सिद्ध योग्याची । असे० ॥ २ ॥
प्रेम दावितां, भुलुनि न जाते । पीडा देतां, क्षणैक रडते ।
चेष्टा करितां, स्वतां हांसते । सम-दृष्टीची ॥
दाविते वाट सौख्याची ॥ । असे० ॥ ३ ॥

जगांत असुनी, जगांत नाहीं । दुजीच निर्मी स्वयें सृष्टि ही ।
सुखें तयांतिल हास्य करी ही । दुःख तयांतिल रुदना देई ।
तन्द्रि ही हीची । हारवी कल्पना कविची । असे० ॥ ४ ॥
हाय ! हाय ! परि एक कल्पना । येतां हृदयीं देति वेदना ।
असह्य ज्या वचिं कथूं येतिना । ' वृत्ति ही हीची॥
दाविते वाण बुद्धीची ' । असे० ॥ ५ ॥
कज्जलसंकुल दिव्य दीपिका । तडिद्लता वा कोमल लतिका ।
गत-धी अवशा तेंवि बालिका । फिरे ही स्वैर ॥
पाहुनी फाटतो ऊर । असे० ॥ ६ ॥
' ज्ञानाऽवधिची, तमोऽवधीची । वृत्ति तत्त्वतां एकचि साची ।
कटु प्रतीती या उक्तीची । इथें ही येई ॥
विस्मया किती तरि देई ! । असे० ॥ ७ ॥
दिसणें, त्यासम परि नच असणें । ज्ञान-साम्य, परि ज्ञान न होणें ।
घोर क्लेशद किति हें जगणें । याहुनि बरवें वाटे मरणें ।
स्थिती ही हीची ॥ पर-वशा, रडवि मज साची । असे० ॥ ८ ॥
' अनेक दुःखें येउत मजवरि । इतर यातना पडोत शतवारि ।
न हो, न हो कधिं मति-विभ्रम परि काकुळतीची ॥
प्रभुपदीं प्रार्थना कविची । असे० ॥ ९ ॥

---

## ३ ' अनंत—तनयास '—

( सन १९१० च्या नाताळांत पुण्यास असतांना त्यांच्या झालेल्या नूतन परिच-यास उद्देशून. )

पद ( चाल — चंद्रकांत राजाची कन्या. )

सुदीर्घ कष्टद पथ कंठुनि दिनिं, पांथ निशासमयीं ।
घोर काननीं प्रशांत कुहरीं विश्रम जैं घेई ॥
किती होय तैं सौख्य तयांत ! स्वस्थ तिथें पडतां ।
चिर-श्रांत वपु, मानस, दोघां औषध निष्क्रियता ॥

योगिजनासम स्थितींत ऐशा, तत्संनिध यावा ।
अवचित कोणी दिव्य सुहृज्जन करि घेउनि पांवा ॥
सवेंचि काढुनि रिझवावें त्यां, विविध नाद लहरी ।
मृदु मंजुल मधु काव्य-युक्त ज्या, भरती हृत्कुहरीं ॥
कमनिय - कवना ! कवे ! तसें हो मज विषयीं घडलें ।
सुखद अकल्पित भवन्मैत्रिच्या मोदें मन भरलें ॥
प्रचंड अविरत कोलाहलमय मुंबापुरि -यंत्रीं ।
दैव - नियत मी निगडित, कंठीं कष्टद दिन - जंत्री ॥
उत्सुक असतों सदा किती मी विश्रम - दिन याया ।
दिनिं दिनिं गणितों अवधि असे जी पुण्यपुरीं जाया ॥ १ ॥
विधियजमानें सागरतीर्थीं जीवनयज्ञाचें ।
चालविलें जणुं सत्राचि, मोहक मुंबापुरिं साचें ॥
अनेक त्यास्तव धरुनि आणिले नारी, नर रूपी ।
हीन दीन पशु, निगडित जे दृढ उदरपूर्तियूपीं ॥
स्व-त्राणास्तव आर्त करुणरव नित्य निघति जे, ते ।
परिसुनि त्यांचे गर्मे क्षितीही निशिंदिनि थरथरते ॥
बुडविण्यास तो आर्त तयांचा रव वाटे, साचा ।
अखंड कर्कश कोलाहल तो चाले यंत्रांचा ॥ २ ॥
उसंत जेथें मिळे न पळभारें, शांति न वा लवही ।
नवल न, तेथें सदा राहिं मी मग्न खेद - निवहीं ॥
गभीर सलिलीं चपल अश्व तो जाड्या ऽऽ कुल होई ।
निघतां बाहिर परि तो त्यांतुनि, निज जवता घेई ॥
तसेंच वाटे मला होतसे मुंबापुरिं असतां ।
खरा ' मी ' च मी मला लाधतों पुण्यपुरीं येतां ॥ ३ ॥

---

## ४ गुलाबदूतिका.

पद ( चालः—काय पुरुष चळले. )

हे गुलाबकलिके बाई ! विनति अल्प ऐकें मम ही ! ।
मानिनीजवळि तूं जाई, । बोधिं तीस ऐसें । ध्रु० ॥ हे गुलाब० ॥

" धाडिलें तुझ्या दयितानें, । मजसि कीं याच भावानें ॥
गमसि तूं रुचिर मम मानें, । सुर्चिविण्यास ऐसें ॥ हे० ॥ १ ॥
परि असे क्षणिक मम जेंवी । लालि ही टवटवी, तेंवी ॥
रूप यावनांची भावी । गतिहि जाण तूझ्या ॥ हे० ॥ २ ॥
निर्जनीं वनीं जरि घेतें । जन्म मी, कोण मज पुसतें ? ॥
कौतुकें कोण करिं धरितें । ? हुंगतेंहि कोण ? ॥ हे० ॥ ३ ॥
लावण्य, सद्गुण स्त्रीचे । तोंवरी सफल नच साचे ॥
जोंवरी रसिक भोक्त्याचें । भाग्य त्यां मिळेना ॥ हे० ॥ ४ ॥
म्हणुनि, कां वृथा हा धरिसी । हट्ट गे ! काल दवडीसी ॥
प्रणयदग्ध कां त्या करिसी । झुरसि तूंहि कां गे ? ॥ हे०॥ ५ ॥
चल झणीं सखे गे ! आतां । मज सर्वे भेट निजदयिता ॥
उभयतां तुम्ही सुखि होतां । गणिन धन्य मातें " ॥ हे० ॥ ६ ॥
यापरी आळवुनि जरिही, । द्रव तिच्या लव न मनिं येई ॥
तत्क्षणीं सुकुनि तरि जाई । तूं तिच्या समोर ॥हे० ॥ ७ ॥
कीं दशा बघुनि तव तैशी । बहु करील अनुतापाशीं ॥
मनिं प्रतीति येइल तिजशीं । उग्र संसृतीची ॥ हे० ॥ ८ ॥

---

# ८ कृष्णाजी पांडुरंग लिमये.

यांचें जन्म शालिवाहन शके १७९९ ( इ. स. १८७७ ) श्रावण कृष्ण १३ स झालें. यांचें मूळगांव रत्नागिरि जिल्ह्यांत दापोली तालुक्यांतील पाडलें हें होय. यांचें प्राथमिक शिक्षण रत्नागिरि येथें होऊन इंटरमिडिएट् पर्यंतचें उच्च शिक्षण पुण्यास झालें. हे बरेच दिवस पुणें येथील न्यू इंग्लिश स्कूलमध्यें संस्कृत शिक्षक होते. सध्यां ते दापोली येथील मिशन हायस्कुलांत तेंच काम करीत आहेत. यांनीं ' मोरोपंताचा प्रभुद्रोह, ' ' आर्यभूमातादु:खोद्धार ' व ' कालचक्र ' हीं खंडकाव्यें, व ' गजासुरवध ' व ' नानाफडनवीस ' हीं दोन महाकाव्यें लिहिलीं आहेत, पैकीं गजासुरवधाशिवाय बाकीचीं सर्व प्रकाशित आहेत. सध्यां हे किराताचें भाषांतर करीत असून ते ' विहारी ' मासिकांत क्रमश: प्रसिद्ध होत आहे. यांची पहिली कविता ' भस्मासुर ' ही असून ती त्यांनीं इ. स. १८९२ त इंग्रेजी पांचव्या इयत्तेंत असतांना केली. हे आपली कविता ' राधारमण ' या काव्यमय नांवानें प्रसिद्ध करितात.

## १ कवि.

श्लोक ( वृत्त – शार्दूल विक्रीडित. )

सांभाळी स्पृहणीयवर्णरचना पाळी सुवृत्तक्रमा ।
योजी जो उचितस्थळीं लघु गुरू मोजी न दीर्घश्रमा ॥
ठेवी लीन सदर्थसिद्धिस पदीं सेवी परार्ध्या पदा ।
पावो तो कविराज नित्य विजया होवो यशस्वी सदा ॥ १ ॥

श्लोक ( वृत्त – मंदाक्रांता. )

वाग्वल्लीचें रुचिर विलसे ज्यावरी पर्णजाल ।
चाले वृष्टी नवरसमयी ज्यामधीं सर्वकाल ॥
मर्मज्ञांचें सुखगृह अशा काव्यधारागृहातें ।
निर्मी कोणी कविवर कृती मान्य होई जगातें ॥ २ ॥

श्लोक ( भुजंगप्रयात. )

सुवर्णें गुणें जी हरी अंतरंग ।
कधींही रसाचा करी जी न भंग ॥
सदा सेवितां शुद्ध जी भाव दावी ।
कवीची कृती ती सतीशी वदावी ॥ ३ ॥

## २ प्रियेचे अश्रुबिंदु.

दिंडी

अश्रुवृष्टीनें गाल तुझे न्हाले ।
प्रिये पाहुनि जे भाव मनीं आले ॥
ग्रथित केले ते सर्व सुवर्णांनीं ।
तुझ्या, रसिकांच्या ते पडोत कानीं ॥ १ ॥
नयनगंगेच्या जळीं वास योजी ।
अश्रुमाळेचे स्फटिक मणी मोजी ॥

दृष्टि घेई तव मार्ग तापसीचा ।
स्वर्ग लाभो कीं दुःखविस्मृतीचा ॥ २ ॥
फुलें सुंदर जीं दोन गुलाबाचीं ।
निशाणें कीं तारुण्यराजयाचीं ॥
तुझ्या गालांवरि फुलति सर्वकाळ ।
शोकवन्हीचा कवळि त्यांस जाळ ॥ ३ ॥
तुझ्या दृष्टीची म्हणुनि कृपादृष्टी ।
तयां रक्षी का ? करुनि अश्रुवृष्टी ॥
गुलाबांचें कां तेज मंद झालें ? ।
" ऊष्ण दुःखाश्रू " प्रत्ययास आलें ॥ ४ ॥
निधी करुणेचा लाधला तुला गे ! ।
हृदयकोशीं जो नित्य तुझ्या वागे ॥
हिरे त्यांतिल हे अश्रुरूप थोर ।
काय लांबवितो हाय ! शोकचोर ॥ ५ ॥
मृदू नवनीताचि हृदय तुझें, त्या गे ! ।
शोकवन्हीचा तीव्र ताप लागे ॥
द्रवुनि गेलें तें साक्ष कीं तयाची ।
गळुनि देती हे अश्रुबिंदु साची ॥ ६ ॥
रुचिरतारामय दिव्यकांतिसार ।
तुझें नेत्रद्वय गगनतलाकार ॥
अहा ! तेथुनि हीं अश्रुबिंदुरूप ।
गळति नक्षत्रें तरल रम्यरूप ॥ ७ ॥
त्यजुनि जातां गे ! दिव्य तुझे डोळे ।
अश्रुबिंदूही अश्रुरसीं लोळे ॥
मूळ बिंदू तो अश्रुसंततीतें ।
स्वपदिं योजी का ! पावतां गतीतें ॥ ८ ॥
लिही अश्रूंनीं दृष्टि तुझी दीन ।
दोन ओळींचें काव्य वर्णहीन ॥
त्यांत उमटे जो मूर्तिमंत शोक ।
बघति काव्यांतरिं तो न रसिक लोक ॥ ९ ॥

---

## ३ दाता व देव.

श्लोक ( वृत्त – शार्दूलविक्रीडित. )

दाता एक कुलीन निर्धन भला कर्जें बहू गांजला ।
स्त्रीच्या दुर्वचनीं तशांत खचला प्राणांस कंटाळला ॥
" सारें शून्य मला, अनन्य गति मी " दैन्यस्वरें तो वदे ।
" ये ये सत्वर धाव पाव मरणा ! दीनासि या ठाव दे " ॥ १ ॥
मायापाश निराशवृत्तिवश तो छेदी, न त्यां गुंतला ।
जाण्या शून्य पदासि शून्यहृदयें शून्य स्थळा पातला ॥
तेथें एक विशाल वृक्ष पसरी शाखा नभीं आडवी ।
त्या भासे निजहस्त मित्र यम कीं स्नेहें अहा ! लांबवी ॥ २ ॥
बांधी पाश हताश कालवश तो त्या वृक्षशाखेप्रती ।
लावोनी गळफांस दुर्गतिपथीं घेणार जों सद्गती ॥
तो अव्यक्त अतर्क्य अद्भुत अशी शक्ति स्वशक्तिक्रमें ।
तोडी बंधन मृत्युसाधन, बुडे तो विस्मयीं संभ्रमें ॥ ३ ॥
खालीं पाश गळे, वरी उसळले मिश्रप्रकाशांकुर ।
लक्ष्मीचेच कृपाकटाक्ष वळले तद्रक्षणा आतुर ॥
द्रव्याचा निधि दानपुण्यफळ कीं पायांतळीं उद्भवे ।
त्याचा हर्ष तसेंच मूल्य निधिचें कोणा कसें वर्णवे ॥ ४ ॥
आनंदें उचलावयासि निधितें सारी पुढें जों कर ।
तों शून्यांतुनि शब्द हे उमटले "हां ! हात तूं आवर ॥
" पात्रापात्रनिरूपण स्वहितही दानीं न तूं लक्षिलें ।
या दोषा त्यजिशील? " " होय " मग घे द्रव्यायु देवें दिलें ॥ ५ ॥

---

## ४ अन्योक्तिमाला.

सर्पान्योक्ति( वृत्त—मंदाक्रांता. )

काया शोभे कनकसदृशी रम्य गोजीरवाणी ।
वाणी मोही त्रिभुवन, नको सेवण्या अन्नपाणी ॥

पाणीदार स्वशिरें धरिशी रत्न, सर्पा विषातें ।
संरक्षीं तूं अपरवशता अन्यथा दूर तूतें ॥ १ ॥

गजान्योक्ति ( वृत्त.–वसंततिलका. )

देह प्रचंड तव पर्वततुल्य भासे ।
लोकोत्तर प्रबलता भुवनीं विकासे ॥
मारी परी गजवरा ! तुज सिंहबाल ।
येथें सदोष तव मान्यहि सत्वशील ॥ २ ॥

वृक्षान्योक्ति ( वृत्त.–हरिणी. )

अयि तरुवरा ! देशी थारा खगावलितें वनीं ।
तुजसि कवळी प्रेमें वल्ली स्वपल्लवबाहुंनीं ॥
ज्वलनिं जळतां जाती तूतें विहंगम सोडुनी ।
तुजसह जळे साध्वीशी बा ! लता यश जोडुनी ॥ ३ ॥

आम्रान्योक्ति ( वृत्त.–इंद्रवज्रा. )

जे शेवटीं प्राण तुझा हराया ।
सर्पांपरी तत्पर आम्रराया ! ॥
कां तूं असे दत्तक वृक्ष घेशी ।
कोण्या स्थळा बुद्धि विवेक नेशी ॥ ४ ॥

चंद्रान्योक्ति ( वृत्त.–द्रुतविलंबित. )

तव करास्थित औषधि केवळ ।
अमृतपूर्ण तुझें तनुमंडळ ॥
तरि तुला न चुके क्षय सर्वथा ।
कुविधिची निरुपाय अहो ! व्यथा ॥५ ॥

---

## ५ खरड्याचा युद्धप्रसंग.

[ मराठे व निजाम यांमध्यें हा घनघोर युद्धप्रसंग झाला. दोन्ही पक्षांकडील सेना " खरडा " मुक्कामीं एकत्र मिळाल्या व लढाईस तोंड लागलें. ]

श्लोक( वृत्त.—उपजाति. )

करी पदातीवरि चाल पत्ती । वरी गजाशीं रणयोग हत्ती ॥
अश्वावरी अश्व रणीं निघाला । गांठी तिरंदाज तिरंदजाला ॥ १ ॥
तोफेस हो तोफ विवादशाली । बंदूकिला बंदुक साद घाली ॥
भाल्यास भाला भिडण्यास येई । खड्गास खड्ग प्रतिघात देई ॥ २ ॥
व्यापी रजःपूर नभस्तलातें । स्वर्गप्रयाणोन्मुख वीर त्यांतें ॥
सोपान कीं मृण्मय भूमिदेवी । उभारुनी उंच रणांत ठेवी ॥ ३ ॥
असंख्य नानाविध शस्त्रभार । करी झरारा बहु येरझार ॥
रणापणीं कीं करण्या उदीम । वाटे यमाचे फिरती मुनिम ॥ ४ ॥
रणांगणीं रक्तनदी खळाळे । रक्तप्रभा वीरगुणीं झळाळे ॥
संग्राम देवी गमतें मनास । कीं खेळती रंगरसीं विलास ॥ ५ ॥
भरे निनादें, बहु धूर सोडी । निजोदरीं लोक असंख्य जोडी ॥
प्रेतें गमे कीं घडवावयाची । युद्धस्थळीं ती गिरणी यमाची ॥ ६ ॥
गेंडी मराठे रणशूर मर्द । अनन्यचित्तें करिती विमर्द ॥
त्यांचा न साहे रिपुला प्रताप । झाला बहू जर्जर तो सताप ॥ ७ ॥
म्यानांतुनीं खड्ग लता कराळ । काढूनि ते कापिति कंठनाळ ॥
जिव्हा यमाच्या जणुं जातशोष । आस्वादिती रक्तरसा सतोष ॥ ८ ॥
भाले मराठे-भट-हस्तवासी । विदारिती शत्रभुजांतरासी ॥
कीं भक्षिती देहसमीर नाग । रत्नप्रभा-भासुर-तुंडभाग ॥ ९ ॥
मुखीं फलश्रीयुत शालिमाला । पडे जशी खंडित भूतलाला ॥
वीरावली श्मश्रुमुखी पराची । तशी पडे विद्ध रणांत साची ॥ १० ॥
चौफेर लागे वणवा वनाला ! पक्षी पशूंच्या मिति ना भयाला ॥
होई तसें त्या परसैनिकांस । पळूनि जाती दशदिङ्मुखांस ॥ ११ ॥
रणांगणा सोडुनि तो निजाम । पळे भयें व्याकुळ मोघकाम ॥
स्वरक्षणाला खरड्यांत आला । वेढी तिथें माधवसैन्य त्याला ॥ १२ ॥
तेथें मिळेना लव अन्न पाणी । झाली निजामस्थिति दीनवाणी ॥
वाटे तयां हा टळण्या अपाय । तहाविणें अन्य नसें उपाय ॥ १३ ॥
तो मागणी दूतमुखें तहाची । सुदुर्दशापन्न निजाम याची ॥
नाना तदा सांगति बाब जी जी । तीतें करी तो गतगर्व 'जी" जी ' १४

## ६ आनंदीबाईचें राघोबादादांशीं क्रोधपूर्ण भाषण.

श्लोक ( वृत्त—शालिनी. )

बोले " घेतां पक्ष त्या कारंढ्याचा। अव्हेरीतां बोध माझा हिताचा ॥
माझ्या पेक्षां मान्य तो आपणाला। त्या घ्यां, देतें जीव राहूं कशाला ॥ १ ॥
गेली कोठें आपुली लाज गाजा। दासांचे कां दास झालांत आजी ॥
त्या दावाना मृत्युची नीट वाट। घ्या या पेक्षां लाटणें पोळपाट ॥ २ ॥
शत्रू युद्धीं मारिले थोर थोर। ऐसा तोरा, कां न हा एक पोर ॥
तुम्हांहातें मृत्युपंथासि जाई। घाला हातीं बांगड्या भागुबाई ॥ ३ ॥
आहें पठ्ठा वीर भारी जगास। ऐशा गर्वें पीळ घालां मिशांस॥
गेला कोठें ? पीळ तो सर्व राव। बोला कां हो ! सेवितां मूकभाव ॥ ४ ॥
हा ! हा ! देवा काय मद्दोष झाला। माझ्या वांट्या नाथ नामर्द आला ॥
सौभाग्याची कायशी चाड मातें। हो ना हेतू आपुल्या पूर्ण हातें ॥ ५ ॥
देतां आतां माझिया मान बोला। किंवा नाहीं याक्षणीं येथ बोला ॥
नाहीं पेक्षां देउनी जीव खास। स्त्रीहत्येचें पाप देतें तुम्हांस ॥ ६ ॥
दुर्नीतीच्या राष्ट्रींची पट्टराणी। बोले ऐशी कर्कश क्रूर वाणी ॥
दादांचें तें घाबरे चित्त फार। गेलें पाणी तोंडचें सर्व पार ॥ ७ ॥
दादा होती सर्वथा दीनरूप। देती तीतें पत्र इच्छानुरूप ॥
स्त्रैणत्वाचें मान्यतापत्र कीं तें। दादानीं त्या अर्पिलें भामिनीतें ॥ ८ ॥
हस्ताघातें ताडुनी जो निजांका। युद्धीं ठाके झुंझण्या वीर बांका" ॥
राघोबा तो स्त्रीकरें होय चीत। गेली सद्दी पेशव्यांची खचीत ॥ ९ ॥

# ९ बाळकृष्ण लक्ष्मण जोशी.

यांचें जन्म कुलाबा जिल्ह्यापैकीं पनवेल तालुक्यांत ‘ कराडें ’ या गांवीं शालिवाहन शके १८०१ ( इ. स. १८७९ ) श्रावण शुद्ध १३ स झालें. हे लहानपणापासूनच कविता करीत आहेत. ‘ श्रीशिवरायप्रशस्ति, ’ ही यांची पहिली कविता. ती त्यांनीं शाळेंत वृत्तदर्पण घोकीत असतांनाच लिहिली. ती ‘ जगद्धितेच्छु ’ पत्रांत प्रसिद्ध झाली आहे. यांनीं स्फुट कविता बरीच लिहिली असून ती बहुतेक, मासिक मनोरंजन, करमणूक, वि. ज्ञा. विस्तार व काव्यरत्नावली या मासिकांतून वेळोवेळीं प्रकाशित झाली आहे. ‘ शब्दशूर ’ हें स्वतंत्र व लहानसें काव्य यांनीं नुकतेंच प्रसिद्ध केलें असुन त्याला बक्षिसही मिळालें आहे, दुसरें यांचें मोठें काव्य ‘ कै. आप्पासाहेब वारद, सोलापूरकर यांचें पद्यात्मक चारित्र ’ असुन तें ही लौकरच प्रसिद्ध होईल. हे कवि सध्यां ठाणें येथें डिस्ट्रिक्ट जज्ज कोर्टांत कारकून आहेत.

## १ सुंदर मोत्यें.

साक्या.

मधुप-मनोहर नव-कमलासम वदन जिचें सकुमार, ।
केश पाश जणुं मदनाचे ते स्कंधीं करिति विहार. ॥ १ ॥
रत्नमालिका गळीं काजळी शालु करी परिधान, ।
विदसे त्यांतुनि गौर तनू ती शशिमंडलासमान ! ॥ २ ॥
ऐसी सुरुचिर लावण्याची सुंदर पुतळी कोणी ।
द्वारीं राहुनि उभी विलोकी चंचलशा नयनांनीं ॥ ३ ॥
अत्युत्कंठित होउनि इतकी पहातसे तरि काय ! ।
चुके तियेची मैना किंवा हरिणी रानीं जाय ? ॥ ४ ॥
छे छे ! मैना हरिणी कसली ? मानसपंजरवासी— ।
मयूर तीचा न ये म्हणोनी पहात होती त्यासी ! ॥ ५ ॥
आशा सांगे ‘ आला आला ! ’ म्हणे निराशा ‘ नाहीं ! ’ ।
ऐशा तरलस्थितींत गेला काल तियेचा कांहीं ॥ ६ ॥
लागे पथिं एकदां दिसाया तो प्राणाचा प्राण ! ।
आतुर झाली तयास द्याया गाढालिंगनदान. ॥ ७ ॥

आला अगदीं समीप आतां होतिल एकचि दोघें ! ।
तोंच अहा ! तो अरसिक सरला एकाएकीं मागें ! ॥ ८ ॥
'अरसिक' वदलों तया, परी हा प्रमाद केवळ माझा ! ।
गमेल पुढच्या प्रेमचरित्रें तो रसिकांचा राजा ! ॥ ९ ॥
दूर सरोनी परम विस्मयें बोले प्रियकरिणीला ।
'आवरुनी हा पदर उरासीं कां सखये ! त्वां धरिला ? ॥ १० ॥
उडेल जणुं पाखरूं म्हणुनि तें धारिलें कर-संपुटीं ! ।
बोल खरें तें काय असे गे ! कारें मन्मानसतुष्टी. ॥ ११ ॥
नुकतीं मीं येतांच पाहिलीं येथें मोत्यें चार ! ।
काय जहालीं सांग ! गडे ! तीं सुंदर पाणीदार ! ॥ १२ ॥
ज्यांना हातीं उचलुनि घ्याया मन्मति वेडी झाली, ।
तींच तींच गे ! निःसंशय तूं लपविसि पदराखालीं. ॥ १३ ॥
'दे तीं दे तीं' म्हणोनि तिचिया पदरा झोंबूं लागे— ।
'कसलीं कसलीं' म्हणोनि तीही सरली मागें मागें. ॥ १४ ॥
मोत्यें मागत जाय पुढें हा, तशी तशी ती मागें, ।
या रीतीनें अंतःसदनीं शिरतीं झालीं दोघें. ॥ १५ ॥
अंतःपुरिंच्या सुखोपभोगीं त्यास न लागे गोडी, ।
मोत्यांसाठीं होउनि वेडा पदर सखीचा ओढी. ॥ १६ ॥
ओढुनि ओढुनि त्या शालूचा अर्धा जीव जहाला, ।
परंतु तीं संप्राप्त न झालीं लुप्त मौक्तिकें त्याला. ॥ १७ ॥
श्रमित होउनी सुखशय्येवरि पडला नेत्र मिटोनी, ।
तोंच तयाच्या सन्मुख आली दिव्य विभूती कोणी. ॥ १८ ॥
दुःखनिधींतुनि ही अवतरली ऐसें कवि म्हणताती, ।
निरसुनि औदास्यास, हांसवी खेळवि जीवांनां ती. ॥ १९ ॥
म्हणे "अहा रे ! ओढुनि ताडुनि, कीं दावुनि भय राग, ।
मोत्यें तुजला कधीं तरी तीं मिळतिल का रे ! सांग ? ॥ २० ॥
भ्रमरालागीं चुरडुनि सारस मिळेल का रसपान ! ।
किंवा ओढुनि पंख करिल कां मैना मंजुल गान ! ॥ २१ ॥
उमज उमज यावरून बापा ! कर माझा धर ऊठ, ।
ममसामर्थ्यें काय उणें तुज कर मोत्यांची लूट !" ॥ २२ ॥
अशादर्शक गोड बोल हे वदली कोण कुठून ।

पहावयातें परमोत्साहें बसला त्वरित उठून. ॥ २३ ॥
व्यक्त दृष्टिला न दिसे परि ती अंतर्दृष्टिस दिसली; ।
दिसलीच न, एकाकिं तयाच्या अंतःकरणीं घुसली! ॥ २४ ॥
नाम तियेचें प्रीती, म्हणती कोणी अमरलताही; ।
कारण जी निज उपासकांचें इच्छित पुरवी कांहीं! ॥२५॥
असो; तिचा सुप्रसाद घडतां तो मोत्यांच्या शोकी ।
प्रेमदृष्टिचें अस्त्र आपुल्या रमणीवरती फेंकी. ॥ २६ ॥
'बोल गडे! जिवलगे!' म्हणोनी तिचिया सन्निध गेला, ।
भिडला अगदीं गळ्यांत पडला जेंवि फुलांचा झेला! ॥ २७ ॥
मुरके जरि ती प्रणयरसीं हा फाराचि लोलुप झाला, ।
हळूच केला करांगुलीनें स्पर्श तिच्या मृदु गाला. ॥ २८ ॥
फुलली तत्क्षणिं कळी, पातली हास्यरसाला भरती! ।
गळती टपटप अश्रु सखीच्या नेत्रांतुनि भूवरती! ॥ २९ ॥
"हींच! हींच रे! सांपडलीं रे! मोत्यें माझीं माझीं! ।"
ऐसें बोलत नाचत शिरला स्त्रीभुजलतिकाकुंजीं. ॥ ३० ॥

---

## २ प्रियविनोद.

श्लोक ( वृत्त—द्रुतविलंबित. )

दिनभरी नभ आक्रमिल्यावरी । उतरला सविता क्षितिजावरीं; ॥
रमण-मूर्ति समीपचि पातली । म्हणुनि पश्चिम दिग्वधु हर्षली. ॥ १ ॥
समय शीतल तो अहहा! किती. । सकल घालवि ताप लयाप्रती ॥
मममनीं शिवदर्शन-कामना ! । उपजली अनिवार ढळेचिना. ॥ २॥
वसन वेष्टियलें मग नूतन । दिसत मोहक मत्तनु ज्यांतुन ॥
नटुनि सुंदर सुंदर भुषणीं । निरखिलें मुख-पंकज दर्पणीं ॥ ३ ॥
परम मंगल बिल्वदलें फुलें । स्वकरिं घेउनियां मग चाललें ॥
जरि असे बहु दूर शिवालय । न मजला गमलें, किमपी भय ॥ ४ ॥
चरण कोमल चालुनि शीणती; । क्षणभरी बसलें तरुखालतीं. ॥
अधम पामर एक तया स्थलीं । मज विलोकुनि धांवत पातला! ॥ ५ ॥

बघुनि पूर्णविकासित सारसा । भ्रमर त्या भवतीं फिरतो, तसा— ॥
भुलुनि मत्स्वरुपावर तो अती । फिरतसे मज भोंवतिं भोंवतीं ! ॥ ६ ॥
उडवुनी नयनीं पथधूलिका । करितसे मम दृष्टिस अंधुका; ॥
जणुं कुचागत मौक्तिकहार हा । प्रहरणीं झटतो शठ तो महा ! ॥ ७ ॥
धवल शेवति मोगारिचीं फुलें, । शिरसिं खोवुनि कुंतल गुंफिले. ॥
विखुरले परि ते खलनायकें; । कितिक सांवरिले तरि नायके. ॥ ८ ॥
असह्य तो मज होय तयाक्षणीं । म्हणुनि चालत जाय पुढें झणीं; ॥
तरिहि येउनि आडवि तो मला । कुमति मत्पदराप्रति झोंबला ! ॥ ९ ॥
उडवुनी वसनांचल त्या खलें । हृदयमण्डल निर्भय देखिलें ! ॥
वरि वरी जरि झांकितसे तरी । फिरुनि ओढि करी मज घाबरी. ॥ १० ॥
किति कथूं बहु दुःख तयें दिलें, । मजसि शेवट भूवरि पाडिलें. ॥
छळि अनेक परी न करी कमी; । प्रियकरा ! करुं एकटि काय मी ! ॥ ११ ॥
मग तिथूनचि दर्शन घेतलें । परत आपुलिया गृहिं पातलें ॥
परम घोर चरित्र पथांतलें । श्रवणिं सर्व सख्या ! तव घातलें ! ॥ १२ ॥
" परम नीच निशाचर कोण हा, । छळियलें मम लाडकिला अहा ! ॥
चिरुनि टाकिन तस्कर या क्षणीं । चल सखे ! खल दाखव तो झणीं ॥ १३ ॥
पति जिवंत तुझा असतां गडे ! । कवण नीच बघेल तुझ्याकडे ! ॥
नरकिं हांकुनि त्याप्रति लावितों । चल सखे ! खल सत्वर दावि तो." ॥१४॥

श्लोक ( वृत्त—रथोद्धता. )

कोपुनी बहुत बोलसि ऐसें । प्रेम निस्तुल सख्या ! तव भासे ॥
याहुनी अधिक कोपुनि आतां, । शीणवी न निजमानस नाथा ! ॥ १५ ॥
बोललें सकल गोष्ट विनोदें । क्षम्य ती तव मनास गमों दे ॥
वेगयुक्त सुटला बहु वारा । तोच मार्गिं मजला छळणारा ! ॥ १६ ॥

---

## ३ भूलोकचा चंद्र.

साक्या.

पूर्णशशीचें पडतां सुंदर शुभ्र चांदणें रात्रीं, ।
वाटे अभिनव शालु रुपेरी नेसुनि नटली धात्री ॥ १ ॥

फुललीं पुष्पें जाइजुईचीं मोगरिचीं उद्यानीं ।
भरुनि सुवासें सर्व टाकिलें वातावरण तयांनीं ॥ २ ॥
दिवसां सोसुनि ताप रवीचा कोमजलेली सृष्टि ।
सुटली हांसत सुधारसाची तिजवर होतां वृष्टि ॥ ३ ॥
गगनिं हांसती सर्व चांदण्या दिशाहि हंसती चारी ।
तशाच भूवरि खिदळत होत्या यौवनमत्ता नारी ॥ ४ ॥
एक तयांतिल परम मनोहर मदन-सारिका कोणी ।
पडली होती निजदयिताच्या अंकीं शिर ठेवोनी ॥ ५ ॥
काय कथावी तिच्या मुखींची गौर मनोहर कांती ।
गगनीं चंद्रज्योत लागतां खुलली अधिक पहा ती ॥ ६ ॥
टाकुनि उघड्या हृदयावरती दोन्ही गोंडस हात ।
प्रिय-सहवासीं जीव आपुला खेळवि एकान्तांत ॥ ७ ॥
स्तनपरिवेष्टित एकचि मौक्तिकमाळ तियेच्या कंठीं ।
त्या कंठांतुनि कांहीं कोमल सुस्वर काढित होती ॥ ८ ॥
मधेंच थांबुनि हरिणिसम ते फिरवुनि चंचल डोळे ।
चंद्रमंडळाकडे विलोकित काय सख्याला बोले:- ॥ ९ ॥
" प्रिया ! पहा हा पूर्ण चंद्रमा उगवे आकाशांत ।
परम शुभ्र तत्प्रभा पसरली जिकडे तिकडे शांत ॥ १० ॥
ज्योतिर्विदजन नक्षत्रांचा राजा ह्मणती यासी ।
सेवेस्तव नाचती सभोतीं असंख्य तारा दासी ॥ ११ ॥
किरणामृत शिंपुनि नवजीवन वनौषधिनीं देई ।
प्रीतिलतेचीं फुलें फुलवि हा कामिजनांच्या देहीं ॥ १२ ॥
बहु दिवशीं पतिदर्शन होतां जशी स्त्रियांचीं हृदयें ।
तसे उचंबळतात थोरले सागर याच्या उदयें ॥ १३ ॥
अंतर्मुख-संतापतप्त तरुणींचीं कोमल अंगें ।
परम शांतता पावति याच्या शीतल किरणासंगें ॥ १४ ॥
तापनिवारक ह्मणुनि शिवानें धरिलें याला माथीं ।
अशी जयाची वर्णन करिती पुण्यपुराणें ख्याती ॥ १५ ॥
श्रेष्ठ येवढा असुनि ढगांच्या काळ्या पडद्यामाजी ।
चोरासम हा लपून बसतो कां हो ! सखया ! आजी ? ॥ १६ ॥
पुढें न येतां आंतुनि आंतुनि बघतो डोकावून ।
जैशा तरुणी यवनयोषिता पाहति बुरख्यांतून ॥ १७ ॥

कीं नव नवरी द्वाराआडुनि लाजत लाजत पाहे ।
तसेंच वर्तन सांप्रत गगनीं शशि हा करितो आहे ! ॥ १८ ॥
भीती किंवा लाज कुणाची वाटे याला आज ? ।
सांगा सांगा मम जिज्ञासा पूर्ण करा पतिराज ! " ॥ १९ ॥
" यांत कशाचें तुला सुवदने ! पडलें इतुकें गूढ ।
समजत होतों भली शहाणी परि तूं अगदीं मूढ ॥ २० ॥
श्रेष्ठांपुढतीं मिरवत जाया लाज कनिष्ठां वाटे ।
तीच अवस्था प्राप्त जहाली सांप्रत या चंद्रातें ! ॥ २१ ॥
म्हणशिल याला लाजविणारा ऐसा आहे कोण ।
विलसे भूवर अन्य चंद्रमा सुंदर बहु त्याहून ॥ २२ ॥
तो स्वर्गींचा हा भूवरचा दोघे एकाकार ।
परंतु मज हा भूलोकींचा दिसतो मोहक फार ! ॥ २३ ॥
त्यावर काळे डाग अमंगल, हा निर्मल अत्यंत ।
त्यास उपाधी असे क्षयाची ह्यास न ती स्वप्नांत ! ॥ २४ ॥
निजवदनींचें अमृत करी तो अर्पण ज्याला त्याला ।
परि ह्यांतिल रस भाग्यें मिळतो मजसम एकाद्याला ! ॥ २५ ॥
त्याच्या उदयें सिंधु उसळती नवल न हें मोठें गे ! ।
जल न तिथें ही भरती येते ह्याच्या दर्शनयोगें ॥ २६ ॥
दिवसा तेजोहीन होय तो कोणि न त्यास विचारी ।
नित्य रहावें बघत अशी या भूचंद्राची थोरी ! ॥ २७ ॥
तो आकाशीं दूर अंतरीं त्या पासुनि सुख कैचें ।
हा अगदीं हातांत आमुच्या किति सांगू गुण याचे " ॥ २८ ॥
रुचिर विषयवर्णनीं रसिक तो यापरि रंगुनि गेला ।
परंतु त्याचा भाव न कळला अंकस्थित सुभगेला ! ॥ २९ ॥
' असा अलौकिक चंद्र कुठें तो ' म्हणुनि पुसे जेव्हां ती ।
' हा बघ ' म्हणुनी तद्धनु त्यानें प्रेमें धरिली हातीं ॥ ३० ॥
आले तत्क्षणिं त्या चंद्रावर पदराचें ढग आले ।
लोपुनि गेला विषय कवीचा हात न पुढतीं चाले ॥ ३१ ॥

## ४ राजनिष्ठा.

आर्या ( गीति. )

[ हा व या खालील एक असे दोन्हीं वेंचे या कवीच्या नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या ‘ शब्दशूर ’ नांवाच्या अत्यंत सुंदर काव्यांतील आहेत. पहिल्या उताऱ्यांत काव्यनायिका ‘ मुक्ता ’ ही आपल्या पतीस समरंगणावर जाण्यास उत्तेजीत करीत आहे व दुसऱ्यांत युद्धक्षेत्राचें भीषण वर्णन आहे. ]

परि परम नम्रतेनें भार्याधर्म स्मरोनि ती वदली ।
“ पतिराज ! आज इतकी युद्धाची भीति कां तुम्हां पडली ॥ १ ॥
नौका घेउनि माथां नाथा ! तरलांत भुजबलें सहजीं ।
अनुचित अशा तुम्हांला रणवार्ता वाटते भयावह जी ॥ २ ॥
वीरें पाय न घ्यावा मागें केव्हांहि युद्धकाजातें ।
जावें नाचत हांसत माहेरा जेंवि कन्यका जाते ॥ ३ ॥
अक्षयिं निजगुण गाणें समजा पुरुषार्थ यांत कांहीं न ।
व्हा रणसिद्ध करा पण ‘ नृप काजीं आजि देह वाहीन ’ ॥ ४ ॥
नृप अंश ईश्वराचा सेवावें त्याजला मनोभावें ।
त्या सुखवाया काया कष्टवुनी सुप्रजेंत शोभावें ॥ ५ ॥
अथवा नृपाल म्हणजे समजा आत्माच देश हा देह ।
इंद्रियगणसम आपण आहों सर्व प्रजा न संदेह ॥ ६ ॥
आत्मा दुःखित होतां तळमळ करितात इंद्रियें दाही ।
तैसा नृपदुःखाचा लागावा वेध आपणालाही ॥ ७ ॥
स्वापत्यभावनेनें जो नेहमिं कष्टतो प्रजेकरितां ।
स्मरल्याविण त्या प्रभुला दवडुं नये दिन कधींहि एक रिता ॥ ८ ॥
जो राजनिष्ठ भावें ठेविल नृपतीस नित्य संतोषी ।
अनुकूल सर्व त्याला हें सांगाया नको कुणी जोशी ॥ ९ ॥
कोट्यवधीजनसेवन-पुण्य असे एक राजसेवेंत ।
इच्छिति भले प्रजाजन वरिवरि ऐसे प्रसंग यावेत ॥ १० ॥
तो पुण्ययोग साधा घ्या धांव रणांगणाकडे त्वरित ।
होउनि हताश बसलां प्राणाची कां विवंचना करित ॥ ११ ॥
जागा जा गांठा ती रागानें वीर ज्या स्थळीं लढती ।

समशेर शीघ्र उपसा आहे करिंहून काय हो जड ती ॥ १२ ॥
येतां समरक्षेत्रीं श्रेयस्कर मरण मानिती शूर ।
आपण 'नरपंचानन' कां पळतां मृत्युच्या भयें दूर', ॥ १३ ॥

---

## ५ भीषण रणभूमी.

आर्या (गीति.)

भीषण ती रणभूमी घडला नुकताच घोर संग्राम ।
नाम न निर्मलतेचें अमंगलाचेंच केवल धाम ॥ १ ॥
नरमांसशोणिताचें प्रोक्षण जैसें तया स्थलीं केलें ।
त्यांताचि जागोजागीं आढळती प्रेतपुंज पडलेले ॥ २ ॥
पद एकाचि कोणाचें कोणाचे हस्त दोनही तुटले ।
अरिकृत शस्त्राघातें कितिकांचें शिरकमण्डलू फुटले ॥ ३ ॥
आसन्नमरण कोणी तळमळती पडुनि त्याच ठायासी ।
आठवती गृह कान्ता परि नाहीं बल तयां उठायासी ? ॥ ४ ॥
आले क्रूर पशू खग धांवुनि भक्षावया शवां नीच ।
दिधली समानशीलां कालानें थोर मेजवानीच ? ॥ ५ ॥
कोणाच्या शिरीं बैसुनि फोडिति खल काक चंचुनें डोळे ।
फाडिति हृदय कुणाचें मांसाशनलुब्ध लांडगे कोल्हे ॥ ६ ॥
आरक्त आंतड्यांच्या माळा ज्यांच्या गळीं अशीं श्वानें ।
भांडत नाचत सुटतीं, याचक देखुनि जशीं महादानें. ॥ ७ ॥
वनिं जेंवि शुष्क काष्ठें तैसा अस्थिप्रसार सर्वत्र ।
पद एकहि ठेवाया स्थल निर्मल आढळेचिना तत्र ॥ ८ ॥
झाले रुधिरतुषारें सारे पाषाण आणि तरु लाल ।
त्यायोगें बहु भासे समरक्षेत्रस्वरूप विक्राल ॥ ९ ॥

# १० केशव विश्वास फणसे.

यांचा जन्म शालिवाहन शके १७९३ चैत्र कृष्ण ४ स (इ० स० १८७१ एप्रिल ९) झाला. कोंकणांतील 'फणसगांव' हें यांचें मूळ गांव होय. तरी पण आज तीन चार पिढ्यांपासून यांचें घराणें मध्यप्रांतांत जबलपुराजवळ 'शिमरिया' येथें राहत आहे. यांचें प्राथमिक व उच्च शिक्षण तिकडेच (मध्यप्रांतांत) जबलपूर व नागपूर येथें झालें. सध्यां हे वडिलोपार्जित गांवीं शेती संभाळून असतात. यांची प्रथम कविता 'अरसिक व कविता' ही असून ती त्यांनीं इ० स० १८९० त लिहिली. यांना काव्याची गोडी कै० हरि माधव पंडित यांनीं लाविली. शिवाजी, कर्झन, स्वागतोद्गार, रविवर्मा, वगैरे स्फूट कविता यांनीं बरीच लिहिली असून 'प्रेमोद्गार' म्हणून विविध पद्यांचें एक काव्यही लिहिलें आहे. यांच्या कविता काव्यसंग्रह, सुविचारसमागम, सुधारक, केरळकोकिळ (जुना) यांत प्रसिद्ध झाल्या आहेत. हे आपल्या कवितेखालीं सवंध नांव देत असतात. यांच्या पत्नी 'शांताबाई फणसे' या आज नांवाजलेल्या कवयित्री आहेत. त्यांच्याहि कविता पुढें दिल्या आहेत.

## १ जीवनकलह व कविता.

(आर्या)

मित्रा! क्षमस्व झाल्या अजुनि न कविता लिहूनि मम सकला।
जीवनकलहगता मज दुर्लभ आजि होय सरस कवनकला ॥ १ ॥
संस्कार तयां द्याया जातों, येतो तयास जो रंग।
तों जीवनकलहकळी येति करिति मम समाधिचा भंग ॥ २ ॥
प्रतिभाप्रियाहि रुसली, करितों बहु जरि तदीय मनधरणी।
कीं दुर्लक्ष करीं मी कविता—तनयांचिया सुसंस्करणीं ॥ ३ ॥
तारा, उषा, तशाच प्रतिभाजन्या मदीय ह्या कन्या।
सर्वांची सम चिंता वाटे. निपजोत ह्या जगीं धन्या ॥ ४ ॥
टोंचिति मज या विषयीं प्रेमें अन्यहि सुमित्र मम सारे।
कांहीं परिस्थितीचा दोष असे कांहिं आळसाचा रे ॥ ५ ॥
प्रतिभे! देवि! जवं ये कवितांच्या आजि संस्करण कार्या।
तारा उषा–सुतांच्या संस्कारीं मम झटे जशी भार्या ॥ ६ ॥

संस्कारहीन जरीं ह्या राहोत न लेश आपुल्या दोषें ।
मातरि गुण दोषांचे ज्ञाते देतील दूषणें रोषें ॥ ७ ॥
म्हणुनि दिवसभर होतों जीवनकलहांतुनी जरा मुक्त ।
स्मरतों तुज तें येशी कधीं न येशी, न हें तुला युक्त ॥ ८ ॥
कविता-सुता दिल्या ह्या तूंच विभो ! ही कृपा असामान्या ।
तूंच अतां मम हस्तें उजवुनि यांतें करीं रसिकमान्या ॥ ९ ॥

## २ वनोन्मुख सीता.

पद (चाल-सुंदर राधे आव वनीं.)

सुंदरि सीते ! जा भवनीं । लाभ वनीं न तवागमनीं ॥ ध्रु० ॥
सखि गजगामिनि ! जितसौदामिनि ! मम हृत्स्वामिनि !
भामिनि ! गे ! ॥ जा गृहिं परतुनि, तळमळशिल उनिं,
भीशिल काननिं येउनि गे ! ॥ १ ॥
पथिं कण लागुनि, मृदु पदिं चालुनि, जाशिल भागुनि,
मागुनि गे ! ॥ कधिं कधिं कदशनिं, कधिं कधिं अनशनिं,
कृश होशिल वनिं राहुनि गे ! ॥ २ ॥
वृष्टी वर्षुनि, वीज कडाडुनि, घन दे गर्जुनि भय
वनिं गे ! ॥ परत परत क्षणिं, पतिपदलोभिनि !
नतकेशवक्रांतिशोभिनि ! गे ! ॥ ३ ॥

## ३ झंझावात.

(पद्-चाल-(अंकित पदांबुजाची.)

वायु सुटे किति गार । वेगें । सुखवी तनुला फार ॥ ध्रु० ॥
जलकण लांबुनि वाहुनि आणी, करि तनु गारीगार ॥ १ ॥
वृक्षां तुडवुनि, धूळी उडवुनि, बुडवुनि टाकि संसार ॥ २ ॥
तुंबळ युद्धा करि बहु वेगें घनराजांवरि वार ॥ ३ ॥
गगनमंडळा निर्मळ करि हा उडवुनि घनतति पार ॥ ४ ॥

द्विजराजातें बंधमुक्त करि हर्षें कुवलयभार ॥ ५ ॥
चंद्रबिंब वरि विलसे सुंदर, रमवि मनातें फार ॥ ६ ॥
तारे सारे नभिं मिचकाविति डोळे वारंवार ॥ ७ ॥
भारतवर्षावरि ही आली घनतति अति दुर्वार ॥ ८ ॥
धाडुनियां प्रभु कृपासमीरण करी तिचा संहार ॥ ९ ॥
हरिपदसेवक केशव गातो देवाचे आभार ॥ १० ॥

---

## ४ मशकान्योक्ति.

( साक्या )

या मशका ! तूं काय ह्मणुनिया माझ्या पडशी पाया ।
कर्णी हितगुज सांगायाचें मिष करिशी कां वाया ॥ १ ॥
ओरडशी कां कानिं कपाळीं काय लागलें वेड ।
जा निघ मूर्खा ! तवरव लवही लागेना मज गोड ॥ २ ॥
मधुर कंठ तव नसुनि उगिचकां गीत लागशी गाया ।
बेसुर गाउनि भेसुर वदुनी काना करिशि अपाया ॥ ३ ॥
रे ! निर्लज्जा ! लघु तव काया परी उपद्रव मोठा ।
क्षुद्रबुद्धि तूं निवास शोभे तुजसि गुरांचा गोठा ॥ ४ ॥
अथवा जेथें चहाड असती तेथें जा कर वसती ।
कर्णी लागुनि त्यांला शिकवी उठाठेव जी नसती ॥ ५ ॥
कानीं नाकीं व्यर्थ शिरोनी कां त्रासा देतोसी ।
पाठीचें रे रक्त पिऊनी अजुनि तूं न संतोषी ? ॥ ६ ॥
वरुनी तूं रे ! खालुनि मत्कुण, मध्यें सांपडलों मी ।
करुनि उभयतां संगनमत कीं वार करितसां मर्मी ॥ ७ ॥
स्नेह नसे मग कां तूं मजशी बळेंचि गोष्टी करिशी ।
स्नेही सहृदय काय नसति मज म्हणुनी तत्पद वरिशी ॥ ८ ॥
तुजला मारूं जातां वेगें मलाच होते शिक्षा ।
अथवा मजला त्रास देउनी घेशी घोर परीक्षा ॥ ९ ॥
क्षुद्राला तुज मारुनि रक्तें कर हे काय विटाळूं ? ।
बस, डस, करिं तूं तसनस, तरि तुज इच्छित नसें पिटाळूं ॥ १० ॥

उषःकाल रे! मूर्त काळ तव जैं पातेल द्रवुनी।
आपोआपचि हिमवाताहत होशिल, जाशिल पळुनी॥ ११॥
कुजनांपरि तूं छिद्रान्वेशी, पिशुनापरि परितापी।
नको नको सहवास तुझा रे! तूं होशी बहु पापी॥ १२॥
काय वदशि? कीं नको स्मरूं मी शांतपणं दयितेला!।
तद्ध्यानीं मी असतां मूर्खा! इथुनि भंग मम केला॥ १३॥
तिजवर करितों कवनं क्षणभर खिन्न मना रमवाया।
अल्प स्वल्प सुखांतहि मम कां विघ्न आणिसी वाया॥ १४॥
किंचित डोळे मिटुन तिला मी बघे न जों अनुरागें।
तों तूं त्रासावह शब्दानें दशनें केलें जागें॥ १५॥
डिवचुं नको मज हलवुं नको रे थांब जरा या कालीं।
वाटे निद्रा मम पक्ष्मांवर मृदु पद टाकित आली॥ १६॥
जागृत असतों तोंवरि डसशी झोंप न घेऊं देशी।
निद्रानिरतनराचें न रुचे रक्त तुला बहुतांशीं॥ १७॥
मुरदाडा! मुरकुटा! करिशि जरि मुरारिची सरि नामें।
परि करिशी निशिदिनिं हलकट तूं कर्णजपाचीं कामें॥ १८॥
घुंगुरट्या! तूं 'घुंगु' असा रव रटुनि रटुनि कां वाया।
वद्य दवडिशि रे! वर तनु याया झिजविं सदा निज काया॥ १९॥
निवारितों तरि पुनः पुनः कां येशि कर्ण शिणवाया।
क्षुद्रा! जाण प्राण्याची तनु परोपकृतिविण वाया॥ २०॥
व्यजनाला तूं दाद न देशी, हस्तांला शिणवीशी।
आच्छादन वस्त्रां ही मजला सूच्यग्रापरि डसशी॥ २१॥
लोकांचे गुण किंवा अवगुण गुणगुणशी न कळे तें।
परी अवगुणावांचुनि किमपि न कळणें तुज नीचातें॥ २२॥
मम कर्णपुटीं पुटपुट तवही पुरे करी रे! आतां।
तुजला वारुनि वारुनि आला शीण माझिया हातां॥ २३॥
कर्णशूल उठाविशि तूं भारी, गुणगुण करुनी कां ही।
घेऊं दे मज शांति मिळाया सुखकर निद्रा कांहीं॥ २४॥
ओल्या जागा, मोऱ्या, किंवा गृहकोण तुला रुचती।
ऐसें असुनी कां तुज चेष्टा आम्हांपाशीं सुचती?॥ २५॥

मराठी

## ५ विरहोद्गार.

श्लोक ( वृत्त मंदाक्रांता )

कांते ! होते स्मृति बहु तुझी, जाहलों क्षीणकाय, ।
नाहीं ऐसा क्षणहि तुझिया चिंतनीं जो न जाय ॥
प्रेमें चेतोरथिं बसवुनी कल्पना-दूतिकेला ।
धाडीं मी त्वन्निकट सखये ! ये झणीं भेटण्याला ॥ १
हा मी डोळे मिटुनि पडलों येथ आहें प्रिये ! गे ! ।
उत्कंठेनें तव बघतसें वाट मी शीघ्र ये गे ! ॥
येवोनीयां करिं मजवरी चुंबनांची सुवृष्टी ।
गाढाश्लेषें निवविं हृदया, दर्शनें खिन्न दृष्टी ॥ २ ॥
ये ये माझे सुरनदि ! सखे ! सौख्यदे ! येइं वेगें ।
पुण्यस्नानें घडुनि सुरसीं शंतनू होउं दे गे ॥
घाली वेढा मम तनुस तूं शांतवीं मेघमाले !
दुःखाग्नीनें विरहविपिनीं प्राण संतप्त झाले ॥ ३ ॥
माझें आतां हृदय विरहा सोसण्या शक्त नाहीं ।
गात्रें झालीं प्रशिथिल नसे त्यांत गे त्राण कांहीं ॥
गात्रें गात्रां हृदय हृदया लावुनी शांतिशीले !
मत्प्राणांतें निववि जिववीं त्वद्विना ते न धाले ॥ ४
जेव्हां जेव्हां शयनिं पडतों ध्यान लावूनि तूझें ।
तीं तीं सौख्यें हृदिं उमटतीं दाविलीं जीं मनोजें ॥
तेव्हां तेव्हां क्षणभरि तुझ्या बाहुपाशींच वाटे ।
अंतीं भ्रांती परि कळुनियां मानसीं दुःख दाटे ॥ ५
त्वत्संगें जी लघुतम परी वाटली गोड भारी ।
शय्याप्रांतीं तळमळत ती काढितों रात्र सारी ॥
होतीं गात्रें मम निशिदिनीं तप्त हीं जागरानें ।
त्वद्विश्लेषें गमति मजला सर्व भूभाग रानें ॥ ६ ॥

( वृत्त—शिखरिणी )

अबोला रागानें प्रणयकलहामाजि धरुनी ।
क्षणाचाही तेव्हां विरह अपुल्याला न सहुनी ॥

गळां आलिंगावें त्यजुनि सगळा राग सहसा ।
अधीरात्मा तो मी तव विरह साहूं अजि कसा ॥ ७ ॥

( वृत्त—वियोगिनी )

असशी सखये ! वियोगिनी । सुवियोगी परि मी तुझ्याहुनी ॥
तुज केवळ एक मी दुरी । कविता आस दुरी मला परी ॥ ८ ॥
तनया कविता सखी अजी । शमवीती विरहव्यथा तुझी ॥
वससी स्वजनींहि. यांतुन-। वद मत्संनिध कोणते जन ॥ ९ ॥
गमली तव संगिं गोड जी । रुतते शेज तुझ्याविणें अजी ॥
स्मर पंचशरीं सुदुःसहीं । हरितो प्राण मदीय पांच ही ॥ १० ॥
तव तीव्र वियोग वज्रपातें । पडले जे व्रण फार काळजातें ॥
लवणासम झोंबुनी तयातें । करितो विव्हळ शीतवायु मातें ॥ ११ ॥
सुखदा तव संगमांत होती । अजि तापप्रद चंद्रिका गमे ती ॥
रविचे प्रखरांशु सोम घे कीं । न करी सौम्य गमे तसेच फेंकीं ॥ १२ ॥
विधु हा अजि रोहिणीप्रसंगें । मजला पूर्ण कलामिषें हंसे गे ! ॥
गुरुहि हरिखे नभीं स्वकीया । अजि कन्येस समोद भेटुनीयां ॥ १३ ॥
विधु शीतकरें गवाक्षमार्गे । उठवी निद्रित मी असें जरी गे ! ॥
हिणवी दुखवी कठोर मातें । बहु दावोनि समस्त वैभवातें ॥ १४ ॥
वद कीं तव हेतु अत्रिजा ! । छळसी कां मज अत्रिगोत्रजा ॥
कर आटप रे ! नता पहा । मज बंधो ! सहवे न ताप हा ॥ १५ ॥

( वृत्त मंदाक्रांता )

वायू चंद्र स्मर बहु मला घेरिती या प्रकारें ।
एकाकीला श्रमविति मला आपुल्या तीक्ष्ण मारें ॥
कांते ! शांते ! तुजविण मला याक्षणीं कोण तारी ।
धांवे होई प्रकट सदये ! शत्रुसंघा निवारीं ॥ १६ ॥

( वृत्त शार्दूलविक्रीडित )

झालों मी अगधीं अधीर, न कुठें हें चित्त माझें रमे ।
अभ्यासीं बहु तें चळे, दिवसही वर्षप्रमाणें गमे ॥
धन्या ती रजनी, प्रिये ! सुदिन तो, तोची सुपुण्य क्षण, ।
ज्यामाजी घडुनी समागम गडे ! होऊं सुखी आपण ॥ १७ ॥
त्वत्तुल्या रसिका शुभा गुणवती रम्याकृती निर्मला ।
आहे ती कविताप्रिया सुखविते जी त्वद्वियोगीं मला ॥

तीचा ही दिधला वियोग विधिनें कोपूनि माझ्यावरी।
नाहीं तूंहि न तीहि काय सखये! आतां करूं मी तरी ॥ १८ ॥
माझ्या सांनिध राहते सुकविताकांता जरी नित्यशा।
आली आड असे अजी अमुचियामध्यें परीक्षा-निशा ॥
जें पाहीन यशोरवी उगवतां दैवोदयाद्रीवरी।
तैं भेटेल मला अखंड कविता ही चक्रवाकी खरी ॥ १९ ॥
विश्वाचे कवि मित्र, त्यांस कविताशक्ती सुदिव्या वरी।
तत्कन्या द्विजपालिता वरियली म्यां पंडितांचे घरीं ॥
तीतें तेविं तुला न मी विसरलों, तूंतेंहि ती संमता।
दुष्यंताहुनि मी बरा वद कसा नोहे? पहा तत्त्वतां ॥ २० ॥
साहेना प्रतिभावियोग कविला केव्हांहि कोठें जसा।
किंवा सत्कवितावियोग रसिकां साहे न कांते! जसा ॥
तैसा त्वद्विरह क्षणार्ध न कधीं साहे मला निर्वला।
तूं माझी प्रतिभा प्रियाहि कविता तूं सर्व कांहीं मला ॥ २१ ॥
यावज्जीव मदीय जी सहचरी, दुःखांत दासी खरी,।
चित्तींची अधिदेवता प्रियकरा प्रेमामृताची झरी ॥
जी आहे अमरी खरोखरि तशी जी होय गे! निर्जरी।
दिव्या स्त्री मज लाभली तुजसवें क्रीडावया भूवरी ॥ २२ ॥
गाऊनी हरि नित्य खेद ममही, गंधर्वकन्या खरी।
विद्येची रुचि लाविते सहज कीं विद्याधरी ही तरी ॥
स्कंधीं बैसवुनी समस्त भुवनें ही अप्सरा दाविते।
भोक्तयां सद्रस, दे सुरा अरसिकां, ही मोहिनी वाटते ॥ २३ ॥
होशी रुष्ट तदा तुझे चरण मी गे! वंदितों सेवितों।
हीचे नित्यचि वंद्य सेव्य चरण प्रेमें शिरीं ठेवितों ॥
मत्सेवा अणु माल तूं करिशि गे!, रात्रंदिनीं ही करी।
देशी तूं विरहव्यथा कधिं कधीं ही नित्ययुक्ता परी ॥ २४ ॥
जोंपर्यंत लहान तों करि सुता विघ्नें स्वसौख्यामधीं।
हीच्यापासुनि जाहली जरि सुता विघ्नें न आणी कधीं ॥
हीतें बाळगतों उराशिं, धरितों कंठीं, कधीं मस्तकीं, ।
केव्हां वर्णपदस्वरूप बघतों घेवोनियां हस्तकीं ॥ २५ ॥
रात्री तूं मृदु भाषणीं जशि रसीं शृंगारशेष्टादिकीं।
सौख्यें दे दिवसां मला सुकविता कांताहि तैशीं निकीं ॥

तीनें आणि तुवां अमत्सरपणें राहोनियां जो दिला।
स्वर्गानन्द मिळेल तो कधिं पुन्हा हा ध्यास लागे मला ॥ २६ ।
पर्यंकों तव वाट पाहत पदें ऐकन केव्हां गडे !।
कर्णीं कोमल कंकणध्वनि कधीं सोपानमार्गीं पडे ॥
तांबूलद्वय, तोयपात्र, सुमनें घेऊनि माझ्याकडे ।
येतानां कधिं पाहिन स्मितमुखी तूतें प्रिये ? सांगडे ! ॥ २७ ॥
अंकीं घेउनियां तुला. भुज तुझ्या कंठावरी टाकुन ।
केव्हां गे ! उचलोनियां मुख बळें ओष्ठामृता प्राशिन ॥
गालां सुंदर घर्मबिंदु तुझिया आणोनि दंतव्रणें ।
तच्छोभा बहुवार पाहिन कधीं कांते ! अतृप्तें मनें ॥ २८ ॥
व्हावा जैं अपराध दाटुनि तुझा किंवा भ्रम मत्करें ।
व्हावें तैं सखि ! तूं विवर्तितमुखी रोषाचिया निर्भरें ॥
" कांते । देवि ! करीं क्षमा, शरण ये हा सेवक त्वत्पदा "।
वाक्यें ह्या गतकोप होउनि पुन्हा आलिंगिशी तूं कदा ? ॥ २९ ॥
गाढालिंगन सौख्यमग्न असतां आस्यामृतातें पितां ।
त्वन्नेत्रांजन भालकुंकुम मुखा लागे, न गे ! जाणतां ॥
तें त्वां पाहुनियां प्रभातसमयीं प्रेमें हंसावें जधीं ।
ओशाळोनि क्षणीं तुझ्याच पदरें तें मी पुसावें तधीं ॥ ३० ॥
मत्केशां कधिं विंचरोनि अलक्त हस्तें सुखस्पर्शनें ।
रोमांचीं बुडवोनि देह करिशी मुन्मीलितें लोचनें ॥
झाली ज्यांस तुझ्यामुळें सुघनता सुस्निग्धता दीर्घता ।
ते मत्केश वपूसवेंचि वरिती गे ! क्षीणता शुष्कता ॥ ३१ ॥

( वृत्त—मंदाक्रांता. )

सौख्याधारें ! प्रियसखि ! मनःशांति दे ! हृन्निवासे ।
चिंताक्रांते ! मदनमथिते ! निष्प्रभे ! त्यक्तहासे ॥
आधिक्षीणे ! विरहविकले ! दीनदीने ! सुबाळे ।
स्वप्नीं शोच्या स्थिति तव अशी पाहुनी चित्त पोळे ॥ ३२ ॥
राहो स्वप्न प्रियसखि ! कळे स्वाधिन अन्य खेद ।
दोघें चित्तीं सुसदृश असूं केवलाकारभेद ॥
त्वद्दुःखें तीं सकल ममही मत्सुखें तीं त्वदीय ।
वामांगाचें असुख न कळे दक्षिणांगास काय? ॥ ३३ ॥

(वृत्त—पृथ्वी.)

जरी वससि तूं सुखप्रद सुशील आप्तांमधीं ।
जरी समय जाय तो तव अपत्यलीलांमधीं ॥
हरी सुकविता जरी मधुमधूनि दुःखाप्रती ।
'अलंकृतिमती सती मनिं झुरे न जों संगती' ॥ ३४ ॥

(वृत्त—मंदाक्रांता.)

ज्या वातें उत्तरीया उडवुनि तव ती दाविली अंगयष्टि ।
जेणें प्रेरूनि नेत्रीं कुसुमरज तुला केलि गे! अल्पकष्टी ॥
जेणें स्पर्शूनि तुझ्या सकल अवयवा शांतवीलें तुला गे!
तो माझ्याशीं तुझ्याशीं अनिल अनल कीं होउनी आजि वागे ॥ ३५ ॥

(वृत्त शार्दूलविक्रीडित)

ज्या गालीं अधरीं रदक्षततती प्रेमें तुझ्या अर्पिली ।
ज्या वक्षःस्थल मंडलावरि नखें सानंद तीं रोविलीं ॥
आतां देत असेल तेथ असुख क्षाराश्रुधारा अती ।
दुःखाग्नीस असेल पेटवित कीं तो वायुही संप्रती ॥ ३६ ॥
पेटे नित्य वियोगवह्नि हृदयीं, बाहेर वक्षोंगणीं— ।
उष्णाश्रुव्रज आदळे, करि तया जो आर्द्र-रूक्ष क्षणीं ॥
उष्णश्वास हि कां अशा अवजरीं मागापतील स्त्रयें ।
दुःखें येति समस्त एकवटुनी वाटे कटानें प्रिये! ॥ ३७ ॥

(वृत्त—मंदाक्रांता)

कामें धामें करुनि दमुनी जें स्वशय्या वरीशी ।
स्तन्या कन्यामुखिं वितरुनी, तीस पोटाशि घेशी ॥
मत्संगाचें स्मरण घडुनी शीघ्र एकाग्र भावें ।
नेत्रांवाटे तव खचित तें येत अश्रू अन्नावे ॥ ३८ ॥
स्वदुःखातें लघु नच गणीं, जाणतों तें अशेष ।
दूरासत्वें क्षण मज तसें वाटलें, क्षम्य दोष ॥
अस्वाधीनां विरह उभयीं सारखा आजि आला ।
साहूं दीर्घंजण अजि तया गे! न सोडी धिराला ॥ ३९ ॥

(वृत्त—शार्दूलविक्रीडित)

होवो मन्मथ सार्थनाम मथुनी मातें सुखानें जनीं ।
जन्मस्थान विरोधही करु कृतघ्नत्वें मना पीडुनी ॥

देई हा विरहीं विषासम जरी दुःखें प्रिये ! प्रत्यहीं ।
निःसीमें अमृतें समागमसुखीं देतो तरी निश्चही ॥ ४० ॥

( वृत्त—वसंततिलका. )

नेत्रें मिटूनि करुनी दृढ मानसास ।
कादूं कसे तरि सखे ! अजि चार मास ॥
भेटूं वसंतसमयीं मृदुवायु सेवूं ।
इच्छा यथेच्छ मनिंच्या पुरवून घेवूं ॥ ४१ ॥
वेणी घना मृदुल कृष्ण सुदीर्घ कांते ! ।
सोडीन विंचरिन मी बहुवार हातें ॥
घालीन तीस विविधें कुसुमें ग्रथून ।
होऊं सुखी बहु विहार असे करून ॥ ४२ ॥

# ११ सौ० शांताबाई फणसे.

या रा. रा. केशव विश्वास फणसे कवि यांच्या पत्नी होत. यांचा जन्म शालिवाहन शके १८०१ माघ कृष्ण १२ स (इ० स० १८८० मार्च ८) झाला. यांचें माहेर पुण्यास आहे. यांचें माहेरचें उपनांव घारपुरे. यांचें मराठी शिक्षण पुणें येथें फीमेल हायस्कुलांत झालें. इंग्रजीचा व संस्कृताचा थोडासा अभ्यास यांनीं घरींच केला. यांची पहिली कविता ‘ विरहपत्रिका ’ ही आहे. यांनीं चैत्रोत्सव, आईस पत्र, मैत्रिणीस पत्र, पुत्रस्मरण, धांवा, शिवाजी वगैरे स्फूट कविता बरीच लिहिली असून ती बहुतेक विविधज्ञानविस्तारांत छापून निघाली आहे.

## १ आईस पत्र.

श्लोक—( वृत्त शार्दूल विक्रीडित )

झाले गे ! दिन फार पत्र अजुनी नाहीं तुला धाडिलें ।
धाडावें मग सावकाश पुढती पत्रा, असें वाटलें ॥
झाला आळसची ह्मणूनि तुजला सारें खरें सांगुनी—।
आशा मी धरितें, विनंति करितें, क्रोधा न आणीं मनीं ॥ १ ॥

अंकीं घेउनियां मुलीस बसलें होतें पहा अंगणीं ।
एकाकीं स्मृति जाहली तव, तई आनंद वाटे मनीं ॥
त्या योगें लहरी मनीं उसळुनी अश्रू किती वाहती ।
आला दाटुनि कंठ, बोल न सुचे, रोमांचही थाटती ॥ २ ॥
केव्हां मी तुजला बघोनि नयनीं, आलिंगुनी एकदां ।
या कर्णीं पडतील गोड वचनें माते ! तुझीं तीं कदा ? ॥
सेवा ती तव अल्पशी ममकरें होईल केव्हां बरें ? ।
कासावीसचि होय जीव मम हा भेटावयाला त्वरें ॥ ३ ॥

( वृत्त—मालिनी )

शयनिं पडलें होतें आई ! स्मृती मज जाहली ।
क्वचित नयनीं मूर्ती स्वप्नीं तई तव पाहिली ॥
हितकर असा बोध प्रेमें करूं बघसी मला ।
तंव विधिवशें जागी झालें कुठें न बघे तुला ॥ ४ ॥

( वृत्त—शालिनी )

केव्हां आतां भेट होईल माते ! । येवोनी हें मानसीं दुःख होतें ॥
होते जेव्हां भेट सर्वांजणांची । भाग्याची ती वाटते वेळ साची ॥ ५ ॥
रात्रीं सारे एकजागीं बसोनी । गप्पा सौख्यें एकमेकां कथोनी ॥
निद्रा घ्याया होतसे रात्र फार । वाटे आहे चित्र डोळयासमोर ॥ ६ ॥

( वृत्त—भुजंगप्रयात )

पहाटे उषा खेळते फार आई । तिला पाहतां मानसीं हर्ष होई ॥
मुठी घालुनी गोडशा त्या मुखांत । जणों गुंतली दूध गे ती पिण्यांत ॥७॥
पदा जोर दे पालथी होइ वेगें । तिला हस्त तो काढितां येइ ना गे ॥
करी ती प्रयत्ना परी तो न साधे । तिचा श्वास माते ! तदा फार कोंदे ॥८॥
तिच्या बांधिलें खेळणें पाळण्यातें । तया पाहुनी होइ आनंद तीतें ॥
तया घ्यावया साजिरा हात वेगें । करी उंच ती येइ ना हातिं तो गे ! ॥९॥

( वृत्त—मालिनी )

विफल सकल जाती आपुले यत्न जेव्हां ।
बघुनि मनि असें गे ! होतसे खेद तेव्हां ॥
थकुनि मग सभोंती लागते ती पहाया ।
कर.वर करुनी कीं सांगते काय घ्याया ॥ १० ॥

उचलुनि हृदयीं कीं घट्ट तीतें धरीतें ।
अति मधुर अशा त्या चुंबना शीघ्र घेतें ॥
तनु बहु जडता गे ! पावे सौख्ययोगें ।
खाचेत सुचत नाहीं काम तेव्हां मला गे ! ॥ ११ ॥

( वृत्त—भुजंगप्रयात )

जसा पूर्णिमेचा शशी तो पहातां । मना हर्षवी, तोषवी व्यग्र चित्ता ॥
हिला ही तसा पाहुनी हर्ष होतो । कसा वर्णु या अल्प पत्रांत मी तो ॥ १२ ॥

---

## २ खेदोद्गार.

[ प्रेमळ पण आजारानें त्रासिक झालेल्या वडील माणसांची सेवा करतांना तीं उगाच बोलल्यामुळें आधींच अस्वस्थ असलेल्या मनाला अतिशय वाईट वाटून निघालेले उद्गार खालील कवितेंत ग्रथित केले आहेत. ]

( वृत्त—भुजंगप्रयात )

जगोनी जिवा ! काय रे ! चीज झालें । वृथा आपुल्या आइला शीणवीलें ॥
ह्मणेना भली या जगीं कोणि मातें । जगोनी अशी व्यर्थ भूभार होतें ॥ १ ॥
'स्मृती' शब्द हा ठाउका नाहिं मातें । म्हणोनी पुरें होइना काम हातें ॥
न लाभे कुणा सौख्य वा ! अल्पही तें । जगोनी अशी व्यर्थ भूभार होतें ॥२॥
असें कीं स्वभावें मतीमंद आधीं । तिला वाढवी ही शरीरस्थ व्याधी ॥
शिकें जेवढें तें स्मृतींतून जातें । जगोनी अशी व्यर्थ भूभार होतें ॥३॥
नको जन्म हा वाटतो दुःखदायी । न तें हस्तकीं एक ही काज होई ॥
न होई लिहीणें मुळीं वाचणें तें । जगोनी अशी व्यर्थ भूभार होतें ॥ ४ ॥
स्वकार्यीं नसे दक्षता अल्पही ती । बघोनी असें सर्व ही निंदिताती ॥
नसे सेवकीं अल्पही धाक बाई । जगोनी अशी व्यर्थ भूभार होई ॥ ५ ॥
पतीची करें अल्प सेवा घडेना । जपावी कशी वस्तु हेंही कळेना ॥
पसारा घरीं दावि 'गावाळ बाई'। जगोनी अशी व्यर्थ भूभार होई ॥ ६ ॥
मनाजोगतें आपुल्या कन्यकातें । जुळेना कसें द्यावया शिक्षणातें ॥
बघोनी असें दुःख होतें मनातें । जगोनी अशी व्यर्थ भूभार होतें ॥७॥
न लोकोपकारीं झिजे देह कांहीं । न होती पुरे हेतु ते कोणतेही ॥
अशी ही स्थिती मानसा कष्टवीते । जगोनी अशी व्यर्थ भूभार होतें ॥ ८ ॥

म्हणोनी तुला आळवीं देवराया ! । विलंबूं नको किंकरी उद्धराया ॥
तुला जो अहा ! भक्तिनें नम्र होई । भला वा बुरा दिव्य देहास जाई ॥९॥

---

## ३ मैत्रिणीस पत्र.

साक्या

माहेरा मी जातांना गे ! आलें तुज भेटाया ।
मोठ्या कष्टें सिद्धचि होसी मातें निरोप द्याया ॥ १ ॥
भेटीच्या तव पहिल्या समयीं प्रेमांकुर मनिं फुटला ।
सहवासानें पुढें तुझ्या तो वृद्धिंगत गे ! झाला ॥ २ ॥
भगिनीप्रेमहि ठाउक नव्हतें आजवरी मज झालें ।
तव सानिध्यें पूर्णपणें तें आजि सखे ! अनुभविलें ॥ ३ ॥
एकांतामधिं सुखदुःखाच्या गोष्टी सांगुनि, अपुलें –।
त्या योगानें क्षणभरि तरि तें हृदय मोकळें झालें ॥ ४ ॥
दुःखी मातें पाहुनि तूंही मत्सम तैसें व्हावें ।
सुखांत माझ्या सुख तुजलाही भगिनी गे ! वाटावें ॥ ५ ॥
जेव्हां जेव्हां व्याधिमुळें मम दुःखित मानस व्हावें ।
तेव्हां प्रेमें एकचि तूं तें अंतरिचें जाणावें ॥ ६ ॥
एकांतीं मज नेउनि सदये ! पुशिलें कारण मातें ।
होतें जें जें मनिं माझ्या तें कथिलें सर्वहि तूतें ॥ ७ ॥
कथितां मजला दुःख दाटुनी नयनीं अश्रू आले ।
सदय होउनी सांत्वुनि मज, तें पदरें अपुल्या पुशिलें ॥ ८ ॥
केव्हां केव्हां थोर कवींच्या वाचुनिया काव्यातें ।
दुःखें जें मन विकल जाहलें शांति आणिली त्यातें ॥ ९ ॥
रसिक गुणज्ञहि विद्याप्रिय तूं सुविचारीही ह्मणुनी ।
प्रेमें तुजसह वाचिलिं काव्यें गृहकृत्यें आटपुनी ॥ १० ॥
माहेराशीं जातां मज गे ! ऐसें वाटत होतें ।
व्याधींतुनि या मुक्त होउनी केव्हां पाहिन तूतें ॥ ११ ॥
सर्व संकटें शुभ देवानें आजि निवारलिं अतां ।
बहु दिवसांनां भेटीचा तव योगहि जमुनी येतां ॥ १२ ॥

'येतें थोड्या दिवसीं' ऐशी ऐकुनि मम तूं वार्ता ।
भेटीला तव उत्सुक जशि मी तैशी तूं ही असतां ॥ १३ ॥
भगिनीच्या घरिं जावें ऐसा विचार तूं कां केला ? ।
अणखी इकडे पुन्हां न यावें ही इच्छा कां तुजला ? ॥ १४ ॥
सर्वांहि माझ्यावरचें किंवा प्रेम कमी तव झालें ।
उघडपणें नच कथितां माझें वर्तन ऐसें केलें ॥ १५ ॥
अपराधी तव नकळत झालें शंका मजला येते ।
ऐसे सदये ! खचितचि असतां क्षमा मागतें तूंतें ॥ १६ ॥
आजि तुझें तें पत्र पाहुनी झाली स्मृति गे ! मजला ।
अश्रू नयनीं कंठ सगद्गद् तो क्षण ऐसा गेला ॥ १७ ॥
साध्वि ! सुशीले ! सदये ! रसिके ! ताई ! येते आतां ।
निरोप तव हा घेतांना मज वाटे खेदचि चित्ता ॥ १८ ॥
तव भगिनीवरि ज्या तूं सुंदर सुबोध कविता केल्या ।
पाठविं तूं मजसाठीं त्या मी उत्सुक बहु बघण्याला ॥ १९ ॥
पूर्वीं होतें प्रेम मजवरीं तैसें सतत रहावें ।
पत्र धाडुनी कुशल वृत्त मज नियमानें कळवावें ॥ २० ॥

---

## ४ कन्येस उद्देशून.

साक्या

आतेच्या तूं गृहासि जासी त्यजुनी मजजरि येथें ।
कुशलहि तव मज वरिवरि कळतें परि मन माझें तेथें ॥ १ ॥
मधुर वचांहीं अपुल्या जरि तूं रिझविशि सकलां तेथें ।
परि तव शब्दध्वनि मम कर्णीं घुमतो जणु गे ! येथें ॥ २ ॥
क्रीडा तव त्या अनेक परिच्या स्मरती मजला बाळे ! ।
तुझ्याविणें तव भगिनी आतां आनंदें नच खेळे ॥ ३ ॥
संसारामधिं त्या त्या कृति मी करितां, मातें बघसी ।
न कळत अपुल्या खेळामधिं तूं कित्ता जणुं गिरवीसी ॥ ४ ॥
कोमल कर ते पसरुनि अपुले घे, घे, मज म्हणतांना ।
दंतपंक्ति तव पाहिन केव्हां मधुर हास्य करितांना ॥ ५ ॥

क्षणभरि लटके मजवरि रुसुनी मजशि अबोला धरितां ।
पाहिन केव्हां तुज बाळे ! मी भ्रूभंगातें करितां ॥ ६ ॥
' सत्वर येते ' वदुनी ऐसें टाकुनि जातां तूंतें ।
धांउनि वेगें, मृदुल करांहीं धरिलें तूं तैं मातें ॥ ७ ॥
बंधन तव तें मृदुल करांचें अपुरें ही मज झालें ।
प्रेमरज्जु अति कठिण तयांनीं जखडुनि मी गे ! गेलें ॥ ८ ॥
गात्रें सर्वहि शिथिल होउनी नयनीं अश्रू येती ।
दिसे न कांहीं कोठें आहे, मी झालें मूढ—मती ॥ ९ ॥
क्षणभर तुजला सोडुनि जातां माझी स्थिति ही ऐशी ।
श्वशुर—गृहा जातां तव साहिन दीर्घ वियोगा कैशी ? ॥ १० ॥

---

## ५ मार्गप्रतीक्षा.

[ **प्रसंग**—पुणें ससून इस्पितळ. प्रसूतीनंतर. सायंकाळ. ]

श्लोक ( वृत्त—हरिणी. )

शयनिं पडुनी मार्गी पाहीं परी न पती दिसे ।
समय भरला भेटीचाही पुढें अवधी नसे ॥
हळु हळु रवी अस्ता जाई करूं पुढती कसें ।
रजनि पसरी अंधारातें जणों भिववीतसे ॥ १ ॥

( वृत्त—शिखरिणी. )

मला भेटायातें प्रियपति ! कसे आज चुकलां ? ।
गमे किंवा कोठें सुकवि-सदनीं काय रमलां ? ॥
उन्हीं जातां येतां श्रमुनि अजि गेहींच बसलां ? ।
असा मित्रांसंगें सहल करण्या काय सजलां ? ॥ २ ॥

( दिंड्या. )

दुष्ट चिंता दुखविती मना बाई । निराशेनें मानसीं दुःख होई ॥
शक्ति गात्रीं मम लेशाही न राहे । नयनिं माझ्या अश्रुचा पूर वाहे ॥३॥
मनीं वाटे भेटेल सखा जेव्हां । दुःख सारे सांगेन त्यास तेव्हां ॥
विवेकाच्या सांगेल गोष्टि चार । कमी त्यानें होईल दुःखभार ॥ ४ ॥

---

## ६ प्रवासांतील पहाट.

( वृत्त—मालिनी )

गमन तिथुनि * केलें सोमवारीं पहाटे ।
सकल ससुख आलों नाशिकीं हर्ष वाटे ॥
अनलरथिं निघालों तेथुनी आह्मि जेव्हां ।
उदयगिरिदिशा ती जाहली लाल तेव्हां ॥ १ ॥
सुचवि ' समय ' ती ' हा होय सूर्योदयाचा ।
झुळझुळ किति वारा वाहतो मंद साचा ॥
किलबिल किति पक्षी लागले ते कराया ।
मम मनिं बहु आल्या तेधवां कल्पना या ॥ २ ॥
बहुत दिवस होतें स्वच्छ आकाश सारें ।
पुसकट किति होते चंद्रमा आणि तारे ॥
बघुनि मनिं तयांना वाटले हे हताश ।
रवि पुढति न त्यांच्या मानलों धैर्य लेश ॥ ३ ॥
बघुनि उलट पक्षीं शत्रुच्या त्या जयाला ।
किति तरि जणु झालें दुःख त्यांचे मनाला ॥
सहन नच जहाली शत्रुची कीर्ति त्यांना ।
ह्मणुनि पळत गेले घालुनी खालिं माना ॥ ४ ॥
अतिशय मग मोदें ये वरी सूर्य जेव्हां ।
खचित मजलि ऐसा होतसे भास तेव्हां ॥
" मजलि बहुत देती मान ह्या लोकिं सर्व " ।
सकल अरिस केलें नष्ट हा मानि गर्व ॥ ५ ॥
बसुन अपण गेलों आपुल्या गांविं जेव्हां ।
करित बहुत गोष्टी सारिला मार्ग तेव्हां ॥
मथुन मथुन थट्टा चोरुनी फार केली ।
अशि मम अवघी ती वाट हर्षांत गेली ॥ ६ ॥
अठवण मज झाली आपुली फार जेव्हां ।
खचित मजलि झालें दुःख भारीच तेव्हां ॥
विसरुनि लघु व्हावें दुःख माझें ह्मणोनी ।
करुनि बहुत गोष्टी वाट मी संपवीली ॥ ७ ॥

---

* माळगांवाहून

# १२ मनोहर कृष्ण गोळवलकर,
## बी. ए. एल्. एल्. बी.

यांचा जन्म शालिवाहन शके १८०१ वैशाख कृ० ३०स (इ० स० १८७९ मे २१) झाला. यांचें मूळगांव कोंकणांत 'गुळवेली' हें होय. आज दोन तीन पिढ्यांपासून त्यांचें घराणें फणशांप्रमाणें, मध्य प्रांतांतच जबलपूर येथ रहात आहे. यांचें प्राथमिक व उच्च शिक्षण तिकडेच झालें.सध्यां हे जबलपुरीं वकिली करितात.प्रीतिमीमांसा, आईचा अर्ज, पौर्णिमेचा चंद्र, ईशस्तव, उषःकालचे विचार, आरोग्यदेवतेनें समाराधन, सुखकर भाऊबीज, विधुरोद्धार, शिशुविलाप, अनाथेचा धावा, विरहांत भेट, कवि आणि त्याचें गाणें वगैरे स्फुट कविता यांनीं बऱ्याच लिहिल्या असून त्या 'मनोहर' या नांवानें विविधज्ञानविस्तार व मासिक मनोरंजन यांत प्रसिद्ध झाल्या आहेत. 'अर्ध विकसित गुलाबास' ही यांची प्रथम कविता असून ती त्यांनीं इ०स० १८९८ त लिहिली.

### १ प्रीतिमीमांसा.

" The fountains mingle with the river."

SHELLEY.

श्लोक (वसंततिलका)

वाहोनि निर्झर पहा मिळती नदींत।
तेवीं नद्या मिळति जाउनि सागरांत ॥
गे! सानुराग गगनांत परस्परांतें।
आलिंगुनी पवन घेति सदा सुखातें ॥ १ ॥
एकाकि एकहि असा जगतांत नोहे।
केला असे नियम कीं विधिनें गमे हें ॥
सर्वत्र गाढ अनुराग दिसे जगांत।
प्रेमा न तो वसतसे मग कां तुझ्यांत? ॥ २ ॥
व्योमासि चुंबिति पहा शिखरें नगांचीं।
आलिंगिती बघ परस्पर सिंधुवीची ॥
हीं जीं प्रफुल्ल कुसुमें दिसताति कांते!।
अक्षम्य तीं जरि विमानिति बांधवांतें ॥ ३ ॥

भेटे रवी निजकरांहिं वसुंधरेला ।
चुंबी शशांकसुषमा सखि ! सागराला ॥
तूं चुंबिसी न मजला, तरि चुंबनाचे —।
हे गे ! मनोहर विधी विफलार्थ ह्यांचे ॥ ४ ॥

---

## २ ईशस्तवन

पद—( चाल–पंचतुंड नररुंड० )

देवा ! सविनय वंदुनि चरणा, प्रार्थितसूं तुज अशरणशरणा ! ।
तव पूजनिं ही सृष्टि सदा रत, सूर्य चंद्र जणुं करिती भजना ॥
लतानिकुंजीं गुंजन करुनी मधुकर करिती ईशस्तवना ।
वृंतश्लथ मृदु पुष्प अर्पुनी तरु हे करिती पूजन नमना ॥
अंबरचुंबित तुंग नगांचीं शिखरें दाविति मुमुक्षुसदना ।
प्रशांत निर्मल जलिं सागर जणु दाविति विभुची प्रतिमा सुजना ॥
मंद अमंदहि सर्व समीरण कीर्तिगंध तव नेति दिगंता ।
अखिल चराचर लीन असोनी वंदन करिती तुजसि अनंता ॥

---

## ३ ईशस्तव

पद—( चाल–मजवरि तरु कुसुम० )

प्रभुकीर्तिगान मधुर सकल सृष्टि गातसे ।
महिमा जगांत धवल भरुनि रम्य किति दिसे ॥ १ ॥
उत्फुल्ल नील कमल विमल शोभते सरीं ।
तव चरणिं गमे कुसुमवृष्टि सृष्टि ही करी ॥ २ ॥
रचनेस तुझ्या सतत विभो दावितो रवी ।
गगनांत चंद्र तेविं तुझी प्रकटि थोरवी ॥ ३ ॥
अति मंद वात सुटुनि कुसुम गंध दरवळे ।
हा गंध नसुनि यशचि तुझें पसरलें कळे ॥ ४ ॥

---

## ४ अर्ध्या फुललेल्या गुलाबास

( चाल—चंद्रकांत राजाची० )

नको ! नको ! तूं कोमल पुष्पा ! विकसूं उपवनिं या ।
रम्य कांति ती, मार्दव तेंवी जाइल कीं विलया ॥
कलिकेमाजी सुखें करावा वास, तुवां त्यजुनी- ।
भीती सगळी, संकट येइल नच तुज तें कुठुनी ॥
कोठुनि, कैसें, संकट येतें काय असे ठावें ? ।
'उपवनिं आहें' ऐसें समजुनिं विश्रब्ध न व्हावें ॥
प्रफुल्ल होशी तेव्हां उपवनिं रम्य कसा दिससी ।
निरभ्र गगनीं तारागणयुत शुक्र, तसा गमसी ॥
विकास होतां, तुझ्या भोंवती भृंगतती जमते ।
त्वद्रसपाना करितां, कोमल तव तनुही सुकते ॥
तुझा न साहे महिमा येथिल दुसऱ्या कुसुमांना ।
ह्मणोनि गमतें पिडा देती धाडुनि मधुपांना ॥
परिमलवाही मंद वायु हा बंधु तुझा गमतो ।
परिणामीं पण कोमल पुष्पा ! दुःखहेतु होतो ॥
टळेल संकट तुझ्या सुदैवें एकवार येथें ।
नृपसदनीं तूं असतां मित्रा ! टळेल नच तेथें ॥
संध्याकाळीं वायु वाहतां, परिमल तो सुटतो ।
जिकडे तिकडे पसरुनि कैसा नृपमंदिरिं शिरतो ॥
ऐशा समयीं गवाक्षमार्गीं नृपकन्या असतां ।
आलें संकट पुष्पा ! तुजला जाण न तें चुकतां ॥
मधुर सुगंधें चित्त तियेचें लुब्ध तदा होतें ।
दूताकरवीं तोडवुनी तुज निजमंदिरिं नेते ॥
कुसुमस्तबकीं अथवा मस्तकिं नृपजा दे स्थान ।
लाभ असे हा उच्च पदाचा क्षणिकचि तूं जाण ॥
क्षणोक्षणीं ती लया जाय मग कोमलता सुकुनी ।
गळूं लागती मृदुल पांकळ्या प्रशिथिल होवोनी ॥
कोमेजुनि तूं जातां पुष्पा ! फेंकुनि तुज देती ।
पूर्वीं होती सुस्थिति कैशी, आतां काय गती ! ॥

उषःकालिं तें केवळ असतें सूर्यबिंबलाल ।
परंतु राहे वर्ण गुलाबी तुझाच चिरकाल ॥
उदयकालिचें मार्दव रविचें विलयातें जातें ।
तुझें परी तें रम्य गुलाबा ! चिरकालचि टिकतें ।
श्रेष्ठपणा-हा तुझा न साहे पुष्पा ! त्या रविला ।
म्हणोनि वाटे किरणशरांनीं भेदी तव तनुला ॥
शरप्रहारें विभग्न झालें नच कोमल दल हें
बघुनि वाटतें भानु प्रेषी मेघां, नभिं बघ हे ॥
करकापातें विदीर्ण होईल कोमल तनु आतां ।
क्षणिक तुझा रे ! वास जगीं ह्या, कोण असे त्राता ॥
म्हणोनि पुष्पा ! उपवनिं जरि तव विकास नच होई ।
विषाद नाहीं त्याचा कांहीं; सुखी परी राहीं ॥
खेद मनाला होतो बघुनी विनष्ट सौंदर्या ।
नको ! नको ! तूं म्हणुनि गुलाबा ! विकसूं उपवनिं या ॥

# १३ अप्पाराव धुंडीराज मुरतुले.

हे लिंगाइत कवि कोल्हापुराजवळ कागल येथें शालिवाहन शके १८०३ (इ० स० १८८१) कार्तिक शु० १० स जन्मले. यांचें मराठी व इंग्रजी प्राथमिक शिक्षण तेथेंच झालें. हे इ० स० १९०५ पासून कोल्हापूरसरकारचे पदरीं खासगीकडे कारकून आहेत. ‘ वियोगिनीचे उद्गार ’ ही यांची प्रथम कविता असून ती त्यांनीं इ० स० १८९७ त लिहिली. हे आपली कविता ‘ सुमंत ’ या नांवानें प्रसिद्ध करितात. माझे दुर्दिन, कन्यादानफल, व शोकतरंगिणी (हें काव्य त्यांनीं आपली कन्या, ‘ चित्रलेखा ’ इच्या मृत्युवर लिहिलें आहे ) ही त्यांचीं खंड काव्यें प्रसिद्ध आहेत. यांनीं स्फुट कविता पुष्कळ लिहिली असून ती वि. ज्ञा. विस्तार, मराठामित्र, उद्यान, लोकमित्र, के० कोकिल (जुना), आनंद, खेळगडी, काव्यरत्नावली व नवयुग या मासिकांतून प्रकाशित झाली आहे. यांनीं आपल्या निवडक स्फुट कवितांचा एकत्र संग्रह करून तो ‘ मौक्तिकमाला ’ या नांवानें प्रसिद्ध केला आहे. यांनीं नाटकेंही बरींच लिहिलीं आहेत; पैकीं ‘ सीता-

पुनर्वियोग ' हें छापून प्रसिद्ध आहे. यांनीं कोल्हापुरच्या श्रीछत्रपति महाराजांपासू ' कविमौक्तिक ' व श्रीमच्छंकराचार्य मठ करवीर यांजकडून ' कविकुंजर ' अशा दो पदव्या मिळविल्या आहेत.

## १ विरहिणी !

पद—( चाल—फटक्याची. )

ज्यासाठीं मज येथ आणिलें, गांठ पडेना क्षण त्याची ।
धीर धरावा किती अंतरीं ? घडी तुटेना विरहाची ॥
खालीं वरतीं मी बघतें, ।
क्षणोक्षणीं त्या संस्मरतें, ।
गीतें गाउनि मनिं झुरतें, ।
जगांत ठरतें वेडी, हरतें शुद्धि सर्वही देहाची । ज्यासाठीं० ॥ १ ॥
मधुमासाचे दिवस फुलांचे ! नव्हतें कांहीं ज्ञान तदा ।
खेळ खेळुनी वेळ काढिला, रुचे मुलींचा मेळ सदा ॥
ओळख त्याची मग कसली ? ।
लाज भीतिही दुर बसली, ।
आतां चिंता दृढ डसली, ।
सूर्य उगवला, तारा लपला ! अशी होय गत दिवसाची । ज्यासाठीं० ॥ २
त्यासाठीं मी, मजसाठीं तो ! संसृति आह्मां उभयांची ? ।
माझियाच कां गळां घातली ? रीत काय नयवंताची ? ॥
कसें रहावें एकटिनें ? ।
शून्य विश्व हें त्याजविणें ! ।
नको वाटतें व्यर्थ जिणें ! ।
परी सुटेना आस, खास जी कास असे विरहार्तांची । ज्यासाठीं० ॥ ३ ॥
माळ फुलांची ज्वाळ लाविते, कंटक होती मऊ मला ! ।
प्रकाश करितो अंध ! नको तो, तिमिर त्याहुनी बहू भला ! ॥
उलटी रीती मम झाली; ।
तद्विरहाच्या या कालीं; ।
कुणीतरी मज व्हा वाली ! ।
अनुभवितें सुखसंग, मागतें क्षमा त्यास अपराधांची । ज्यासाठीं० ॥ ४ ॥

११८

## २ अनुकारी अथवा तीर आणि गरुड !

पद—( चाल–अर्धतनु वारुळीं० )

पुरे पुरे, हा वेग आवरीं; जा खालीं जा शरा ! ।
वृथा तव यत्न गर्वनिर्भरा ! ॥ ध्रु० ॥
पक्ष्यांचा मी राजा मजला गरुड बोलती पहा, ।
असे कीं शक्ती मम दुःसहा ! ॥
स्वैर विहरतों स्वबळें व्योमीं, दिशा मोकळ्या दहा, ।
मजा ती माझी मजला अहा ! ॥
या प्रवातपृष्ठीं स्वार होउनी सुखें ।
त्या प्रभुरायाचे गुण गातों निज मुखें, ।
गंधर्वहि येउनि ऐकतात कौतुकें, ।
स्पर्धा करिसी मजसंगें तूं पावुनि उसनी त्वरा ! ।
वृथा तव यत्न गर्वनिर्भरा ! ॥ १ ॥
लोहाचें मुख तुझें विषारी प्रखर धार त्या जरी, ।
चेतनेवीण फुका ती तरी ; ॥
सगुण धनूचें सहाय्य मिळतां उडसी गगनोदरीं, ।
गान ही कटुतर गासी स्वरीं; ॥
हो मंद मंद तव गति क्षणोक्षण वरी, ।
खग हीन असावध वधिसी मार्गांतरीं, ।
ती क्लीबोचितशी तुझी शूरता खरी; ।
प्रबलावरती झेंप घालितां यश न निर्बला जरा ! ।
वृथा तव यत्न गर्वनिर्भरा ! ॥ २ ॥
अंगींचे ज्या पक्ष राहती, कीटहि उडतो स्वतां, ।
त्याहुनी फार तुझी नीचता; ॥
पिसें पराची, परशक्तीची उडी न दे प्रबलता, ।
दाविते गर्व हरुनि मूर्खता ! ॥
बुध लीन होउनी हीन जना चढवितो, ।
तन्मूर्खपणा त्या क्षणीं अंध घडवितो ! ।
व्यापार नको तो पार ठार बुडवितो ! ।

वर झालें शिर खालीं करुनी पडसी तूं पामरा, ।
वृथा तव यत्न गर्वनिर्भरा! ॥ ३ ॥

---

## ३ बुद्धि, कल्पना आणि परतंत्रता!

श्लोक. ( वृत्त–शार्दूलविक्रीडित. )

जीचें चित्त न लोल, खोल निधिंचें सद्रत्न राही जसें, ।
जीचें रूप अमूप सुंदर जगीं साम्या न कांहीं असें, ॥
वाटे जी वयमान दीर्घ नसुनी वृद्धा, पहातां कृती, ।
सृष्टीचा क्रम लोपवील न मुळीं कल्पान्त जीची स्मृती! ॥ १ ॥
ऐशी एक मनोज्ञ सुज्ञ अबला गेली फिराया वनीं, ।
पाहोनी रमणीय तें स्थल, तिच्या आनंद झाला मनीं, ॥
देहाचें विसरुनि भान बसली वेडीपरी उन्मुखी, ।
शोभेनें नच त्या, परंतु विमल प्रीतीमुळें ती सुखी! ॥ २ ॥
आली तों चपलेसमान वरुनी तीची सखी भूतला, ।
रानीं त्या पडला प्रकाश मुखिंचा सद्गंधही सूटला, ॥
झाल्या भेटुनि एकदेह, यमुना गंगा जशा संगमीं, ।
कोणाला दिसली दिसो, म्हणतसें मैत्री न भिन्नांग मी! ॥ ३ ॥
दोघींचा सहवास अल्प घडला, संवाद झाला जरा, ।
ठेली शोधित येउनी पहिलिची सासू करोनी त्वरा,॥
भीतीनें क्षणिं त्या मनीं विरमल्या, गेल्या क्षणीं स्वस्थला, ।
प्रेमाचा रस पूर्ण तेथ गळुनी नाहीं कुणा लाभला! ॥ ४ ॥

\+ \+ \+

जाते बुद्धि गभीर रम्य विषयीं गुंगून भारी यदा, ।
वेगें दिव्य सुकल्पना प्रकटते मैत्रीण तीची तदा; ॥
हा हा! ही परतंत्रता परि किती हानी जगाची करी! ।
स्वर्गीचा दृढ सौख्यलाभ घडता पृथ्वीवरी नातरी! ॥ ५ ॥

---

## ४ पतंगास !

पद—[ चाल–अर्धतनू वाळली० ]

सख्या पतंगा ! ये खालीं ये, आहे भू ही बरी, ।
नको रे, नको चढूं अंबरीं ! ॥ ध्रु० ॥
जाण ' कोण मी असें ? काय हें करितों ? मद्बल किती ? ।
शेवटीं होइल कैशी स्थिती ?' ॥
नाहीं नाहीं कुणा लागली जी अंबर-परिमिती, ।
मोजिसी ती घालुनि कां विती ? ॥
तव विचार तर तो काय ? कळूं दे मला, ।
मग उपाय तुजला निवेदीन मी भला, ।
परि नको असा तूं श्रमूं वृथा कोमला ! ।
पाहुनि तनु ही तुझी येतसे करुणा बहु अंतरीं, ।
नको रे नको चढूं अंबरीं ! ॥ १ ॥

भूवरिच्या या मळा निर्मळा ! टाळाया सत्वरी, ।
चालसी कीं त्या स्वर्गांतरीं ! ॥
स्वर्ग कुठें तो ? किती तुझा गुण ! पुरेल तुज कुठवरी ? ।
सरे वा उरे अजुनि बघ तरी ! ॥
तूं नको मिटूं ते नयन आपुले असे, ।
चालतां झांकुनी नेल तुझही फसे, ।
कां लोकीं अपुलें घेसी करुनी हंसें ? ।
ठसो गोष्ट दृढ वसो मनीं, ही गति आतां आंवरीं ! ।
नको रे ! नको चढूं अंबरीं ! ॥ २ ॥

सहाय्यकारी वात न हा, हें भूत भयंकर महा ! ।
यावरी विश्वासुनि नच रहा ! ॥
सौम्य असुनिही देतें गोते क्षणिं सांप्रत जर दहा, ।
खवळतां किति देइल तें पहा ! ॥
तें भूवरिच्याही वस्तु नेत उडवुनी !– ।
त्या गर गर गर गर चोहिंकडे फिरवुनी, ।
अति वेगें देतें कुठें तरी फेकुनी ! ।

दशा काय तव होइल ? पुढतीं मित्र तुझा तो अरी ! ।
नको रे नको चढूं अंबरीं ! ॥ ३ ॥

या भूताचा बंधु मेघ जो तोही मोठा बली ! ।
तयाची स्त्रीहि न चपला भली ! ॥
तीच पाहुनी तुजला आधीं लोळवील भूतळीं ! ।
धुळीला मिळाशिल एका पळीं ! ॥
चुकलास तियेच्या नजरेंतुन तूं जरी, ।
सोडील तुजवरी मेघ शरांच्या सरी ! ।
वातही तयाला साह्य करिल बहुपरी ! ।
असती सारे अरीच म्हणुनी भीति तयांची धरीं ! ।
नको रे ! नको चढूं अंबरीं ! ॥ ४ ॥

धार शिरावर तुझ्या घालिते घिरव्या जी सारखी ।
खपेल न तिजहि तुझी लखलखी ! ॥
जाशिल तिजला भेटायाला मानुनि अपुली सखी ।
तुला ती फाडिल खरतर नखीं ! ॥
ध्वनि ' काव काव ' जो करीत ये कावळा, ।
त्या वरूनि तैशा अंतहि काळ्या खळा ।
जर लावायाला झटशिल अपुला लळा, ।
गळा तुझा तो चापिल निर्दय, ह्मणशिल अवचित ' हरी ! ' ।
नका रे ! नको चढू अंबार ! ॥ ५ ॥

' तारिल माझा सूत्रधार ' ही असेल आशा मनीं ; ।
परी ती हाइल विफला क्षणीं ! ॥
खेळवुनी तुज निजरंजन जो करून घेतो धनी, ।
निधनही तव, खेळचि ता गणीं ! ॥
या कारण वागें लीन होउनी सदा, ।
मग तुला कुणाचें भयही नाहीं कदा, ।
त्या पावशील तूं विमल सुरेश्वर पदा ? ।
कुणीं सुतानें स्वर्ग साधिला ? दाव असा मज नरीं, ।
नको रे ! नको चढूं अंबरीं ! ॥ ६ ॥

## ५ वर आणि खालीं

पद—( चाल —कोणीकडून कोणीकडे० )

पडलों बंदीच्या मीं घरीं, भुयार खालीं माडी वरी, ।
वाटा दोनाचि जर यापरी, काय करूं त्या ठायीं तरी ? ॥
वर जाऊं अथवा खालीं उतरूं, संशय हा अंतरीं ! जिवलगे ! ॥ १ ॥
विचित्र मंदिर माडीवरी, वास तिथें परनारी करी, ।
हांसत पाहुनि वरचेवरी, दावी चेष्टा नानापरी, ॥
मन माझें तिकडे जाया तेणें बहु चंचलता वरी ! जिवलगे ! ॥ २ ॥
असती द्वारीं रक्षक सहा, करिती मजला आग्रह महा, ।
ह्मणती ' येउनि मंदिर पहा' रुचतां रमुनि विलासीं रहा. ॥
सुख होइल वाटे प्रसंग पुनरपि येइल केव्हां न हा ! जिवलगे ! ॥ ३ ॥
' हां हां, जाउं नको बा ! वरी, असती जाण सर्वही अरी ! ।
करितिल कुदशा तव सत्वरी, मंदिर नोहे कंटक दरी ! ' ॥
कुणि ह्मणे ' मित्र मी खालीं, ये तूं सुटशिल येथुनि तरी !' जिवलगे ॥ ४ ॥
वळलों उलट भुयाराकडे, धरिती मजला रक्षक गडे, ।
ध्वनि तो पुनरपि कानीं पडे, रक्षकसवें कलह मम घडे, ॥
बहु आग्रह तेथें घात ! म्हणुनि तें मंदिर मज नावडे ! जिवलगे ! ॥ ५ ॥
शिरलों बळें भुयारीं तया, दिसतां शून्य पावलों भया, ।
परि त्या मित्रें केली दया, दिधला धीर, हरुनि संशया, ॥
हा तुला भेटलों तरी येउनी अपुल्या स्थानास या ! जिवलगे ! ॥ ६ ॥

* * * * *

मायामय जग मोही जनां, करिती षडरी स्वांकित मना, ।
पावे आत्मा दृढ बंधना, विवेक दावि सुपथ तद्वना ! ॥
वर पतन, मुक्तता खालीं राहे चिरसुखसंमेलना ! जिवलगे ! ॥ ७ ॥

---

## ६ मातृप्रेमा हेतु नसे !

( चाल—खळखळ वाहत० )

प्रेमें कमला भ्रमर डसे । कारण त्या प्रेमास असे ॥
मधुर सुगंध मिळे त्याला । मधुरसही सेवायाला ॥

ह्मणुनी घेतो । उडी तिथें तो । न सुके तें तों ।
नातरि चंपककुसुम कसें । सोडवेल त्या सुंदरसें ? ॥ १ ॥
कोमलबालकमुखकमलीं । मातृचुंबनें होति भलीं. ॥
कारण याचें काय ? गडे ! । शुद्ध तियेचें प्रेम जडे ।
त्या प्रेमाचें । चुंबन साचें । चिन्ह. तयाचें ॥
गालीं उमटुनि राहतसे । मातृप्रेमा हेतु नसे ! ॥ २ ॥

# १४ गणपतराव बापुराव शिंदे.

यांचा जन्म शालिवाहन शके १८०५ मार्गशीर्ष शु० ४ स ( इ० स० १८८३ डिसेंबर ३ ) झाला. करवीर इलाख्यांतील नेसरी हें यांचें मूळ गांव होय. यांचें मराठी शिक्षण खेडेगांवीं होऊन इंग्रेजी प्राथमिक शिक्षण कांहीं कोल्हापुरीं व कांहीं पुण्यास नूतन मराठी विद्यालयांतील झालें. यांची बहुतेक कविता 'सरस्वतिकंठाभरण' या काव्यमय नांवानें प्रसिद्ध असून ती सुधारक, महाराष्ट्र वाग्विलास, केसरी, मासिक मनोरंजन, काव्यरत्नावली विविधज्ञानविस्तार व मराठामित्र यांतून छापून निघाली आहे. अमुद्रित काव्यसंग्रह बराच आहे.

## १ दिवंगता—तारा.

श्लोक ( वृत्त—मंदाक्रांता. )

पावित्र्याची परम पदवी चारुमूर्ती उदारा, ।
सौंदर्याची शुचितम खनी त्वत्प्रिया दिव्यतारा; ॥
गेली तूंतें त्यजुनि सुहृदा ! स्वर्गि एकाकि हाय ! ।
शोकाग्नीनें हृदय कढतें ! कोसळें विश्व काय ! ॥ १॥
प्रेमानें त्वां समजुनि तिला देवता पूजिलें कीं– ।
साध्वीनें तैं तुजसि भजिलें देव मानून लोकीं. ॥

जोडा होता अनुपम जगीं सद्गुणी धन्य झाला ? ।
दुर्दैवाला नच बघवला ! काय केलेंस काळा ? ॥ २ ॥
माझ्या भाग्यें परिचय घडे आपुला लोभनीय; ।
सर्वांठायीं दृढतर जडे प्रेम तें युष्मदीय ॥
दुर्वार्ताही अजि परिसुनी दुःख होतें मनातें ! ।
मन्माताही बहु हळहळे ! आठवोनी गुणांतें ! ॥ ३ ॥
शोभा जी कीं सकल गृहिंचीं, सद्गुणाचें निधान, ।
वात्सल्याचें परमपद-वा प्रेममूर्ती सुजाण ! ॥
सच्चारित्रा ललितललना ध्येय जी कां सतीचें ।
गेली स्वर्गा ! हृदय करुनी शून्य शोकें पतीचें ॥ ४ ॥
पुण्यक्षेत्रा विमलसलिला निम्नगौघा-प्रमाणें ।
आयुष्याच्या खडतरपथा आक्रमीलें जियेनें ! ॥
संसाराची निजपतिसवें धूर धैर्यें वहातां ।
ईशेच्छेनें अहह सरली ! जीवयात्रा पहातां ! ॥ ५ ॥
वाटे मातें अवनिवरि या स्वर्गिची दिव्यरामा ! ।
होती कोणी अवतरलि ती सर्व सौख्यैकधामा ! ॥
आला तीतें परि लवकरी वीट या नश्वराचा ! ।
झाली तारा अमर गगनीं, खेळ सर्वेश्वराचा ! ॥ ६ ॥
तेथोनी ती कुशलपतिचें तेंवि छोट्या मुलांचें, ।
तैसें पूज्या जनकजननी-आप्तबंध्वादिकांचें, ॥
पाहूनी, त्यावरि नित करो मंगलाऽशी-सु-वृष्टी ।
जेणें मित्रा ! असुखमय ही सह्य होईल सृष्टी ! ॥ ७ ॥
ठावें मातें-निजअनुभवें--दुःख तूतें अपार ! ।
स्नेहें शब्दां-परि वदविलें हो कमी शोकभार ॥
इच्छा त्याची शिरिं धरुनिया साहणें दुःखभोग ! ।
कर्तव्याला करित असणें हाच कीं श्रेष्ठयोग ॥ ८ ॥

---

## २ आहे मनोहर तरी गमतें उदास !

श्लोक ( वृत्त—वसंततिलका. )

सर्वांगसुंदर, सुभूषणवस्त्रयुक्त । चैतन्य, वाणि मन, बुद्धिहि ज्या प्रशस्त ॥
ऐसें शरीर, परि शील नसें तयास । आहे मनोहर तरी गमतें उदास ॥ १ ॥

वैडूर्य-आदिकरुनी बहुदिव्यरत्नीं । शृंगारिलें भवन कीं विविधप्रयत्नीं ॥
नाहीं तयांत गृहिणी जरि, तें मनास । आहे मनोहर तरी गमतें उदास!॥२॥
सौंदर्यखाणि,सुनया,विमला,सुशीला । विद्याविभूषित गुणी अशि मुग्ध बाला ॥
दैवेंचि हो गतधवा जरि,ती जनास । आहे मनोहर तरी गमतें उदास ! ॥ ३ ॥
आम्रादिकीं गगन चुंबित थोर वृक्षीं । उद्यान एक भरलें लतिका विशेषीं ॥
तेथें परंतु न वसंत करी विलास । आहे मनोहर तरी गमतें उदास ! ॥ ४ ॥
पुष्पें, फलें, खग, मुलें, सुविचारमाला। नक्षत्रपंक्ति गगनीं तशिही विशाला ॥
ऐशा मनोहर चमत्कृति पूर्ण खास। प्रेमाशिवाय गमते जगती उदास ! ॥५॥
निद्रेंत मी नृपति होउनि सौख्य भोगी। कीं चिसदीं मिळुनि जाइ बनोनि जोगी
जेव्हां कळे सकल हा परि स्वप्नभास । आहे मनोहर तरी गमतें उदास ॥६॥
विद्या, कला, कुशलता बहु जेथ होत्या।जें सृष्टिसुंदरि विलासनिवास होत्या॥
उत्साहहीन बघतां अजि भारतास । आहे मनोहर तरी गमतें उदास ! ॥७॥
विद्वान् सुशिक्षित समाज धुरीणलोक । मोठ्या उदार मतिनें लिहितात लेख॥
तैशा कृती न करिती; स्थितिही मनास।आहे मनोहर तरीं करिते उदास ॥८॥

---

## ३ मित्रोदय.

पद ( चाल---भला जन्म हा तुला लाधला० )

प्रभातकालीं उदय गिरीवरि अरुण-राग-रक्तिमा ।
फांकली, प्रेमपत्रिकेसमा ॥
लाहुनि सुषमा सृष्टि जहाली मित्रागमनोत्सुका- ।
सारुनी रात्रीची जवनिका ॥
करावया तों जनप्रबोधन दिनकर विश्वांगणीं- ।
प्रकटला अखिल जगाचा धनी ॥
वनीं उपवनीं फुलें फुलतिं तशिं कमलें निर्मलसरीं ।
विकसली हृत्कलिका अंतरीं ॥
अज्ञानतमीं जो भावभृंग कोंडला- ।
सन्मित्रोदयिं तो बंधमुक्त जाहला ! ।
तच्चरणीं जडुनी गुंगाया लागला: ।
प्रसन्न चित्तें प्रेमें हर्षे हंजि घालितो सदा- ।
तयाच्या गातो स्तवितो पदा ॥ १ ॥

प्रेमाचा संचरे सुशीतल मंदानिल गौरवें- ।
घेउनी सद्गुण-सौरभ सर्व ॥
वृत्तिवल्लरी डोलति वर्षति परोपकृतिचीं फुलें: ।
धरुनि संकल्प-तरू-मधु-फळें ॥
विचाररूपीं विहंग उडती आशाऽकाशीं वर ।
देउनी सत्पक्षावर भर ॥
अंतरीं वाहतो भक्तीचा निर्झर- ।
प्रतिबिंब त्यामधें ईशाचें सुंदर ।
बघताक्षणिं आत्मा होय हर्ष-निर्भर ! ।
मांगल्याचें-पावित्र्याचें--दिव्य तेज चहुंकडे- ।
पसरलें-अंतर्दृष्टीपुढें ॥ २ ॥

# १५ गोपाळ गोविंद पाटणकर.

हे कवि 'साधुदास' या नांवानें प्रख्यात असून यांची कविता याच नांवानें प्रसिद्ध आहे. यांचा जन्म शालिवाहन शके १८०५ माघ कृष्ण ६ स (इ० स० १८८४ फेब्रुवारी १७) झाला. यांचें मूळ गांव सांगली असून तेथें यांस 'मुजुमदार' या आडनांवानें ओळखतात. यांचें मराठी व इंग्रेजी शिक्षण सांगलीसच झालें. यांना काव्यरचनेचा नाद लहानपणापासून आहे: यांनीं स्फुट कविता फारशी लिहिलेली नाहीं; 'वनविहार' व 'रणविहार' अशीं दोन महाकाव्यें रामायणांतील कथाभागावर लिहिलीं आहेत, पैकीं वनविहार छापून निघालें आहे. अशा प्रकारें संपूर्ण रामायणांत 'विहार' करण्याचा त्यांचा विचार आहे.

## १ रामाचा सीतेसंबंधी शोक.

श्लोक ( वृत्त-वियोगिनी )

करभोरु ! मदालसे ! प्रिये वद गेलीस कुठें शुभानने ।
त्यजुनी मज घोर काननीं विरहाग्निप्रलयीं मदंगने ॥ १ ॥
वनवास--निषेवण श्रमें रुसलीस क्षणमात्र भामिनि ! ।
मम यास्तव दृक्पथापुढें नच येसी तरि मंदगामिनि ! ॥ २ ॥

लपलीस कुठें लतांतरीं ? परिहासा नचि मार्ग हा बरा ।
क्षणही तव पावतां प्रिये ! विरहा मी बघ होय घाबरा ॥ ३ ॥
अवलोकुनि एकटी तुला हरिली काय निशाचरीं वनीं ।
तरि अर्थ न राहिला मला तव-मंद-स्मित-शून्य जीवनीं ॥ ४ ॥
बहुधा तव कष्ट पाहुनी क्षितिनें सांठविली निजोदरीं ।
जरि वत्सलता दिसून ये अभिधा नष्ट तिची क्षमा तरी ॥ ५ ॥
अथवा स्व-विमान-वाहिता तुज नेली गगनास खेचरीं ।
मुख-सौरभ-मोहिता भ्रमे अलिमाला न कशी नभीं तरी ॥ ६ ॥
दगडांतुनि जन्मली वधू चरणाची मम धूळ लागतां ।
मुकलों ललनेस आज मी विधिची ही विपरीतता अतां ॥ ७ ॥
अथवा तुज काय भक्षिलें पशुनीं हिंस्र वनांत जानकि ! ।
मम काय तरी नसे प्रिये प्रथम-ग्रास--पदास मान कीं ? ॥ ८ ॥
कलहंस-मृगेंद्र-कोकिला--हरिणींनीं विपिनांत गांठुनी ।
अथवा तव काय घेतली गुणलुब्धीं प्रिय मूर्ति वांटुनी ॥ ९ ॥
बहु मी भवदीय संगमीं सुखदायी वनवास मानिला ।
सुखतंतु हरोनि दुष्ट हा विधि देतो मम कैंवि हानिला ॥ १० ॥
बहुधा पडलीस संकटीं करिसी गे मम नामचिंतना ।
सुटण्या असमर्थ होउनी सखये सोशिसि बंधयातना ॥ ११ ॥
तव शोध करूं कुठें ?-जनीं-गगनीं-या अथवा महावनीं ।
अथवा तव मूर्ति सांपडे मजला केवळ शून्य-धावनीं ॥ १२ ॥

## २ शंखध्वनि छापखाना.

( वृत्त—शार्दूलविक्रीडित )

“ आला जो नर एकदां, नच पुन्हा कार्यार्थ तो पातला ।”
ऐसा दूर यदीय लौकिक महा फैलावुनी राहिला ॥
ज्याचें नाव महा भयंकर जनां अत्यंत देतें दर ।
तें शंखध्वनि मुद्रणालय अतां वर्णीन, व्हा सादर ॥ १ ॥
त्याच्या छिन्न इमारतींत चिलटें ढेंकूणही राहती ।
त्यांचें मर्दन सावधान पिसवा लांबूनियां पाहती ॥
तेथें जीर्ण पटीं करी खटपटी ती मूषकांची घटी ।
कोनाड्यांत कुठें कुठें चमकती तेलाचिही बेलटीं ॥ २ ॥

मोठा केर पडे, सदोदित उडे, सर्वत्र तो वावडे ।
खातांना चिवडे तसेच उघडे ते कागदांचे पुडे ॥
काड्यांचे तुकडे तिथें चहुंकडे कीं थुंकलेले विडे ।
केसींतूनि दडे विशाल विडिचा तो छाटही सांपडे ॥ ३ ॥
केरावांचुनि अन्य जेथ न सडा, नाहींच संमार्जन ।
शाईवांचुनि अन्य: सारवणही नाहीं खिळ्यावांचुन ॥
जेथें बैठक कागदांविण नसे कोठेंच ती फाटक्या ।
खुर्ची, टेबल, बांक, वस्तु असल्या त्या वाटती काटक्या ॥ ४ ॥
तेथें मुद्रणरूळ तोच बहुधा घेतात आंखावया ।
शाईचा पट जो मुलां परळसा ये भाकरी खावया ॥
तेथें फिस्किट हेंच होय खिडकी खेळावयाला हवा ।
तेथें टंपिन दाबकाम करुनी पंखाहि होतें नवा ॥ ५ ॥
तेथें मालक-नोकरांतिल, तसा सद्ग्रंथ-रद्दींतला, ।
नाहीं भेद कळूनी येत, नच वा सामान-केरांतला ॥
तेथें छापिल आणि हस्तलिखितें हीं भासती सारखीं ।
वाची मुद्रित तेथलें पुरुष जो मोठाच तो पारखी ॥ ६ ॥
अस्ताव्यस्त खिळे अनेक पडले, खाली दिसे पालथी, ।
केसी छिद्रमयी समस्त दिसती, येती खिळे खालती ॥
झाला सर्वचि वस्तुसंकर, करूं कोणा विशेष स्तव ? ।
सारें तेथ पदार्थजात रचलें वाटे लिलांवास्तव ॥ ७ ॥

---

## ३ संध्याकाळची सहल.

पद [ चाल—औट हताचा मळा रे,]

पोकळ पाण्यावरती रे । काळ्या नावा तरती रे ॥
जाऊं त्याच्यावरती बावा । पाहूं नाना गमती रे ॥ ध्रु० ॥
शून्याच्या मैदानीं रे । अद्वैतांचीं गाणीं रे ॥
नटली संध्याराणी बाबा । ल्याली सुंदर लेणीं रे ॥ १ ॥
अधांतरींचा गिरी रे । त्यावरि चढली नारी रे ॥
सृष्टी कवळुनि सारी उधळी । गुलाल नानापरी रे ॥ २ ॥

ग्रंथ संग्रहालय ग्रं. क्र. शाखा स्थळ

आरपारशा छतीं रे । जळती अनंत वाती रे ॥
वातींच्या त्या ज्योती चाळूं । ओतूं द्युतिच्या पोतां रे ॥ ३ ॥
उभ्या नदीच्या थडीं रे । रत्नांच्या उतरंडी रे ॥
रत्नें घेउनि थोडीं करुं या । तिजवरुनी कुरवंडी रे ॥ ४ ॥
शुभ्र विधूचा चेंडू रे । मुठीमधें तो कोंडूं रे ॥
प्रतिभेचा या दांडू करुनी । कळिकाळांना दंडूं रे ॥ ५ ॥
स्वर्गंगेचा पूल रे । त्याच्यावरती झूल रे ॥
जाऊं नेदी तोल बाबा । सहलाचें हें खूळ रे ॥ ६ ॥

---

## ४ तें पाउल कुणाचें ?

पद—( चाल–सृष्टीचा लडिवाळ बाळ. )

गगनाच्या अंगणीं । उमटतें पाउल शुभलक्षणी ॥
नाजुक गोंडस असे कुणाचें सांगा मजला कुणी ॥ ध्रु० ॥
संध्यारागांतुनी । तयाचा तळ दिसतो साजणी ॥
स्वर्गंगेसम रेषा दिसती कधीं कधीं ज्यांतुनी ॥ १ ॥
पाउल पडतां क्षणीं । जाहली तुटातूट पैंजणीं ॥
कांहीं अस्ताव्यस्त विखुरले नक्षत्रांचे मणी ॥ २ ॥
कांहीं उरले गुणीं । तयांतुनि रुणझुण उठतो ध्वनी ॥
कानीं येतो अव्यक्ताच्या तो अवकाशांतुनी ॥ ३ ॥
गगनीं एके क्षणीं । दुजा तें उठतें क्षितिजांतुनी ॥
पाउल दिसतें परी तयाचा कोण असावा धनी ? ॥ ४ ॥

# १६ सौ० लक्ष्मीबाई अभ्यंकर.

या कवयित्री 'लक्ष्मीतनया' या नांवानें प्रसिद्ध आहेत. मुंबई इलाख्यांतील पहिले महाराष्ट्रीय कलेक्टर रा. ब. लक्ष्मण गोपाळ देशमुख यांच्या या कन्या व सांगलीचे वकील रा. रा. गणेश रघुनाथ अभ्यंकर बी. ए. एल्. एल्. बी. यांच्या पत्नी होत. देशमुखांचें घराणें महाराष्ट्रांत नांवाजलेलें आहे. रावबहादूर हे, कै० गोपाळ हरी देशमुख यांचे कनिष्ठ चिरंजीव. या नात्यानें प्रसिद्ध लेखक 'लोकहितवादी' यांची 'लक्ष्मी-तनया' या नात आहेत. यांचा जन्म शालिवाहन शके १८०७ वैशाख कृष्ण एकादशीस (इ० स० १८८५ मे १०) त्यांच्या आजोळीं सातान्याजवळ लिंब गांवीं झाला. यांचें शिक्षण मराठी चार व इंग्रेजी तीन इयत्तांपर्यंत झालें आहे. यांचे वडील हे त्यांचे काव्यगुरु असून तेही कवि आहेत. या आपल्या वयाच्या बाराव्या वर्षापासून कविता करीत असून त्यांची पहिली कविता सृष्टिवर्णनपर-नागव्या पावसाबद्दलची-आहे. यांनीं दोन नाटकें लिहिलीं आहेत पण तीं अप्रकाशीत आहेत. सीताविलाप, प्लेग, धनुष्यकोटी, महा-लक्ष्मी वगैरे स्फुट कविता यांनीं बऱ्याच लिहिल्या असून त्या मा. मनोरंजन व विविध-ज्ञानविस्तार यांतून प्रसिद्ध झाल्या आहेत. या मधून मधून करमणूक पत्रांत गोष्टीही लिहितात.

---

## १ शिशुपण.

श्लोक (वृत्त मंदाक्रांता)

होतें ग्रामाजवळ अमुच्या एक उद्यान नामी, ।
गेलें शोभा सहज बघण्या तेथली एकदां मी; ॥
पाहोनीयां ऋतु सुखद तो पातलेला वसंत ।
झाडें सारीं नव किसलयीं जाहलीं शोभिवंत ॥ १ ॥
नाना वल्ली फलभरनता नाचती स्वागतार्थ, ।
गाती हर्षें मृदुकलरवें कोकिला मंजु गीत; ॥
कारंजाच्या उदककणिका वाहती वातसंगें, ।
संतप्तांची सुखविति तनू वारुनी ताप वेगें ॥ २ ॥
जातां जातां मधुर कलिका देखिली मोगरीची, ।
जन्मोनी जी सुखवित बसे मातृ-अंकास साची; ॥

नेसे शालू हरित लतिकाबालिका शुभ्र देहीं ।
सायंकाळीं ललिताचि दिसे फुल्ल वा सुप्त नाहीं ॥ ३ ॥
गंधास्वादा मधुर तिचिया चुंबुनी घ्यावयास; ।
लोभी भृंगे कितिक भुलुनी हिंडती आसपास; ॥
तत्सौंदर्यें चकित तिचिया जात मी सन्निधानीं, ।
तोडायाला तिज, परि वदे वेल ती गोड वाणी– ॥ ४ ॥
" शोभा मातें कुसुम शिशुनें पातली या जगांत ।
घ्यावें ना तूं; मग मुदभरें कोण गे येथ येत ? " ॥
मागें घेई निजपद तिचे ऐकतां हे सुबोल, ।
त्या योगानें सुखकर मला आठवे बाल्यकाल ॥ ५ ॥
जैसी मुग्धा ललित कलिका वल्लरी शोभवीते, ।
माता ताता सुखवित तदा भूषवीं बालही तें; ॥
चित्ता चिंता किमपि न शिवे, सौख्य आनंद सारा, ।
दुःखाचा ये पुढति न कधीं तेधवां हा पसारा ! ॥ ६ ॥
मातेला न क्षणहि गमलें दूर नेतांच कोणीं ।
जातां कोठें शिशु सदन ती शून्यसें पूर्ण मानी; ॥
गोडी खेळाविण न कसली बालका, अन्य काय– ।
आशा द्रव्यादिक मुळिं नसे, ब्रह्म तें एक माय ! ॥ ७ ॥
भासे सारें जग उपवनासारखें रम्य गोड, ।
इच्छा होतां पुरवि जननी दक्ष ती सर्व कोड; ॥
हास्य क्रीडेविण न दुसरी मानसीं कल्पनाही; ।
बाल्या ऐसें सुखकर जगीं अन्य कांहींच नाहीं ! ॥ ८ ॥
तेव्हांचें तें सकलहि मनोराज्य गेलें लयाला, ।
चिंता व्याधी जडत वपुतें खिन्नता ये मनाला; ॥
उल्हासाचा विसर पडला संकटानें प्रपंचीं ।
द्रव्यासाठीं कलह जगतीं दुःखनैराश्य जाची ॥ ९ ॥
कोठें कांहीं उणिव, न समाधान–शांती जनांस, ।
संसारानें असुखमय या चित्त होई उदास; ॥
सौख्याचा तो पुनरपि न ये काल गेला निघून, ।
देई देवा ! शिशुपण पुन्हां ! मागणें हें नमून ! ॥ १० ॥

## २ शिशु–कुंतल.

श्लोक (वृत्त—पृथ्वी.)

सुहास्य विलसे मुखीं, मधुर बोलुनी तोषवी, ।
निजोद्यम परिश्रमां परततां गृहीं हारवी; ॥
क्षणें खुलत, रागही नच विलंब तो यावया ! ।
विनोद रुचतो कधीं, कधिं गभीर होई प्रिया. ॥ १ ॥
स्वभाव जरि ठाउका, घडति दोष ते नेणुनी ।
असंख्य, करिती क्षमा मज परी गृहस्वामिनी; ॥
अपूर्व बहु एकदां नवल मस्करीं जाहलें, ।
पडे न कधिं विस्मृती ! हृदयिं चित्र तें कोरिलें ! ॥ २ ॥
असे मम लहानगा बहुत बोलका बाळ तो, ।
कुणीहि उचलूनि घे, त्रिविध खेळही खेळतो; ॥
शिरीं बघुनि कुंतला गमत षट्पदांची तती ।
किरीट बहु मस्तका रुचिर शोभवी तो किती ! ॥ ३ ॥
मना सुखवितो किती वदत बोल जे बोबडे ! ।
अकारणचि हांसतो, फिरुनि अंगणीं बागडे; ॥
मुलें जमवुनी बहू करि विहार बागेंतुनी, ।
घडी घडि करूनियां कलह सांगतो येउनी. ॥ ४ ॥
बघूनि जन घातली म्हणति केशटोपी खरी, ।
कशास नव पाहिजे रुचिर रेशमी दूसरी ? ॥
कुबुद्धि सुचली मला, सकल क्लेश काढावया, ।
म्हणूनि बहु बावरे, स्वमनिं रुष्ट होई प्रिया. ॥ ५ ॥
सकंप तनु, रक्त हे नयन, तैं स्फुरे नासिका, ।
मनोज्ञ शिशुकुंतला मिळत काढुनी श्रेय का ? ॥
सुरम्यवदनीं दिसे अरुणदीप्ति ही सोज्वला, ।
गमे अजुनि मूर्ति ती उभि समोर आहे मला ! ॥ ६ ॥
" दिसे वदन गोजिरें, अलकभार शोभे शिरीं, ।
खुले धवल कांति ही पडति केश भालावरी; ॥
विशोभित कसें बरें करविलें तुम्हीं नंदना ? ।
वदूनि वचना अशा गहिंवरें बहू अंगना. ॥ ७ ॥

सुरक्त दिसती अजी स्मित कपोल ते सुंदर,।
चढोनी भृकुटी वरी हृदय होत खालींवर; ॥
अनावरचि होउनी निघत कोप नेत्रोदकें,।
तुटोनि पडती जणूं युवतिकंठिचीं मौक्तिकें ! ॥ ८ ॥
सुटे अनिल, चंचला चमकती कशा अंबरीं,।
पहा भयद गर्जना मधुनि मेघ कोपें करीं; ॥
सवेग मग भूवरी पडति पावसाच्या सरी,।
तशीच गति जाहली बघुनि वाटलें सुंदरी. ॥ ९ ॥
सुपीक जलवृष्टिनें सकल भूमि ही होतसे, ।
समोद करि गौरवा मनुजवृंद सन्मानसें; ॥
जनीं उपजते तदा सुखद आस भावी मनीं,।
मिळेल धनधान्य तें विपुल आपणां, मानुनी ! ॥ १० ॥
परंतु नयनोदकीं घनजलीं किती अंतर ?।
उदास पहिलें, दुजें मन करी मुदें निर्भर ! ॥
प्रियानयनबाष्प तें कधिं न तोषवीतें मला,।
निवास मग येउनी स्मित मुखें गृहीं कोठला ? ॥ ११ ॥
करील अभिनंदना प्रणयिबाष्प कोणाप्रती ?।
विरामसुखहर्षही बघुनियां लया पावती; ॥
स्वराज्य करि खिन्नता, पसरते निराशा सदा,।
प्रिया कुपित हो, कशी मग न ये गृहीं आपदा ! ॥ १२ ॥
सखे ! गळति आंसवें बघुनि नेत्रिं बालाकडे,।
दिनक्रमणिं चांगला खचित दृष्टिला तो पडे; ॥
हळूच वदलों असें 'अवरिं शोक गे हा प्रिये;।
विषण्णहृदया परी, तिज मुळींच शांती न ये ! ॥ १३।
पहा नसति केश ते म्हणुनि बालकाचे शिरीं।
बघूनि गमतो मना खचित बाल बुद्धापरी ! ॥
कुमार सुकुमार तो बहु विरूप म्यां पाहुन।
सखेद अनुतप्त हें बहुत जाहलें मन्मन. ॥ १४ ॥
जसे दिवस जाति ते तनयमस्तकाच्यावरी।
अहा उगवले नवे अलक ! मोद कांता वरी; ॥
स्वरूप नव कुंतलें वदनिं पातलें मागुती,।
पहा रदन शुभ्र ते चमकती सुहास्यें किती ! ॥ १५ ॥

कुणा न अति अल्पही किमपि चालतें न्यून तें, ।
जरी क्षणिक आपदा, हृदय आमुचें कष्टतें; ॥
बुडें असुखसागरीं जरिहि अल्प हानी घडे, ।
कसें कठिण ईश्वरा ! वदति घातलें सांकडें ? ॥ १६ ॥

क्षणैक सुखदुःख हे खडक थोर मार्गांवरी, ।
मनुष्य अदळे तशा लहरि ऊठती हृत्सरीं, ॥
कधीं गळति आंसवें, हृदय शोकभारा वरी, ।
चढे पुनरपि त्वरें मनुज सौख्यशैलावरी ॥ १७ ॥

# १७ केशव महादेव सोनाळकर.

या कायस्थप्रभुकवीचा जन्म शालिवाहन शके १८०८ पौषांत (इ० स० १८८६ जानेवारींत) झाला. कोंकणांतील 'मुरवाड' हें यांचे मूळ गांव असून त्यांचें मराठी प्राथमिक शिक्षण तेथेंच झालें; व इंग्रेजी पेण व धुळें येथें झालें. सध्यां हे जळगांवीं (खानदेशांत) वकीली करीत आहेत. हे अपली कविता अपल्या सबंध नांवानें प्रसिद्ध करितात. कविता करण्याचा नाद यांना फार लहानपणापासून असून त्याकामीं त्यांना, गणपतराव बोकड रिटायर्ड पोलीस इन्स्पेक्टर व प्रख्यात कवि 'बालकवि' यांनीं चांगलें उत्तेजन दिलें. दुर्दैवास, स्मृतिपिशाच, प्रेमजीवन, प्रेमसंशोधन, तुजसाठीं—शांति, प्रेममीलन, प्रेम कीं मृत्यु, प्रेमपुनर्दर्शन, स्वर्गावतरण, प्रेमरहस्य वगैरे यांच्या स्फुट कविता असून त्या जगत्समाचार, काव्यरत्नावलि, मा. मनोरंजन व वि. ज्ञा. विस्तार यांत प्रकाशित झाल्या आहेत. यांनी टेनिसनूच्या प्रिंसेसूच्या आधारें 'कमला' नामक एक महाकाव्य लिहिण्याचा प्रयत्न चालविला आहे. यांनी एक दोन नाटकेंही लिहिलीं आहेत.

---

## १ रजनीवैधव्य.

पद ( चालः—नका करूं अविचार. )

रजनी विगतधवा भासे ।
कृष्णवदन तें लपवायाला मेघपदर—
मुखिं सारितसे ॥ रजनी० ॥ ध्रु० ॥
हिमांशु कुंकुमतिलक भालिंचा, ।
हस्तिं पुसोनी टाकी साचा; ।
देइ झुगारुनि उडुगणांचा, ।
गजरा कुंतलिं जो विलसे. ॥ रजनी० ॥ १ ॥

---

## २ प्रेम.

जीवलतेवर कळी उमलली, गुलाब तीचा हा फुलला ॥
प्रेम जगीं म्हणती याला ॥
चिद्ब्रम्हाचा अंश भूवरी, जो ईशें ओतोनि दिला ॥
प्रेम जगीं म्हणती त्याला ॥
हास्य-विधूचें सुरांगनांचें गान स्वर्गी म्हणती ज्याला ॥
प्रेम जगीं म्हणती त्याला ॥
हसती फुलती नभीं गुंगती तारागण बघुनी ज्याला ॥
प्रेम जगीं म्हणती त्याला ॥
भू-प्रारंभापासुनि मारुत, धुंडितसे त्रिभुवनिं ज्याला ॥
प्रेम जगीं म्हणती त्याला ॥
सृष्टीच्या नैसर्गिक सौंदर्याचा, जो भरला प्याला ॥
प्रेम जगीं म्हणती त्याला ॥
ज्या स्फूर्तीनें तन्मयतेनें, कवि करितो नव काव्याला ॥
प्रेम जगीं म्हणती त्याला ॥

## ३ क्षुल्लक गोष्टी.

( परिमलयुक्त वायूची क्षणिक झुळुक, निमिषमात्र कर्णरंध्रांत शिरलेली गाण्याची लकेर, अगर एकाद्या लतिकेचें गलित जीर्णपर्ण,यांना जगाच्या इतिहासांत कांहींच महत्त्व नाहीं असें ह्मणण्याचें धाडस कोण करील? )

पद (चालः—भूपती खरें तें— )

या मंद सुगंधित शीत वातलहरीनें ।
हलविलें कुणाचें हृदय कोण हें जाणे ! ॥
दिलि असेल कोणा स्मृतिसखि उच्छ्वासाची।
दाविली विफलता किंवा स्वसौख्याची ! ॥
स्मृतिचित्र कुणाला दाउनि गत-सौख्याचें ।
झुलविलें हृदयही असेल अथवा त्याचें ! ॥
हतभागि कुणी जन पिशाच्च मृत आशेचे ।
नैराश्य पाहुनी स्वैर संप्रती नाचे ! ॥

*    *    *

हृदय हें करुनियां नंदनवन, नव केली।
किति दिव्य-प्रेमें केली एके कालीं ॥
तें बालपणीचें प्रेम त्याच उद्यानीं ।
मृत झालें, गेलें, लुप्त हाय ! होवोनी ॥
परि पिशाचरूपें या मधुरालापांनीं।
उकलोनि हृदय तें येतांना देखोनी, ॥
आवाहन भेसुर गमे कुणा मृत्यूचें ।
सर्वांग थरारुनि रोमरंध्रिं भय नाचे ! ॥

*    *    *

प्रीतिचीं मुग्ध तीं गाउनियां नव गाणीं ।
मृदु करें सिंचुनी जल ही लतिका-राणी ॥
पोषिली कुणी या असेल कीं उद्यानीं, ।
तत्कुसुमें भूषित असेल झाली अवनी !॥
हें गलित पर्ण त्या यौवन-गत लतिकेचें ।

नैराश्यि स्मृतीच्या झंझावातें नाचे ॥
हें पर्ण, गान तें, गंधयुक्त लहरी ती, ।
इतिहासिं सृष्टिच्या कवि न कधीं अवगणिती !॥

---

## ४ प्रेम–यज्ञ.

( स्वार्थत्याग व प्रसंगविशेषीं प्राणत्याग हीं सत्य-प्रेमाचीं भयंकर दिव्यें होत. )

भूषित करिसी वसुंधरा । सख्या पांखरा रसिकवरा ॥
प्रणय-गूढ उकलोनि जनीं । प्रणय-रूप जासी बनुनी ॥
म्हणोत कोणी । जन अज्ञानी ।
" अविचारें दीपावरती । त्वां अपुली दिधली आहुति. "॥ १ ॥

ममत्व अन्तरिं ठेवोनी । प्रणयीं वाञ्छिति सौख्य कुणी ॥
विकार-वश जीं अशीं मनें । तींच निंदितिल तुला मुने !॥
प्रीति-हेतुला । सर्वस्वाला ।
अर्पुनि तूं तन्मय होसी । पूज्य म्हणुनि गणितों तुजसी ॥ २ ॥

प्रणयरूपिणी मधुर सुधा । प्राशुनियां विधिनें बहुधा ॥
मूर्ति तुझी गोजिरवाणी । निर्मियलीसे सत्य जनीं ॥
कारण त्याविण । प्रेमाकर्षण ।
जें अद्भुत त्वद्हृदीं वसे । संभवेल हें सख्या कसें ? ॥ ३ ॥

प्रेम तुझा जीवन-हेतू । तूं प्रेमाचा बिस-तंतू ॥
अमूर्त प्रेमाची मूर्ती । दिव्य दीपिकेची ज्योती ॥
मोक्ष-कालसा । वाटुनि सहसा ।
तन्मय तूं सखया होसी । वेडें परि मजला करिसी ॥ ४ ॥

# १८ श्रीपाद महादेव माटे, एम्. ए.

या कवीचा जन्म शालिवाहन शके १८०८ भाद्रपद शु० ४ स (इ० स० १८८६ सप्टेंबर ७) झाला. यांचें मूळ गांव सातारा हें होय. यांचें मराठी व इंग्रेजी प्राथमिक शिक्षण गांवींच होऊन उच्च शिक्षण पुण्यास व फर्ग्यूसन कॉलेजांत झालें. यांची पहिली कविता 'भृंग' ही असून ती त्यांनीं इ० स० १९०८ मध्यें लिहिली. सध्यां हे पुणें येथें न्यू इंग्लिशस्कूलमध्यें शिक्षक आहेत. भुंग्याची फजीती, शंकराचें तांडव, शकुंतलेचें यौवन, अहल्येची भूपाळी, नाटाचा खेळ, विचित्रवस्त्र वगैरे यांच्या स्फुट कविता बऱ्याच असून त्यापैकीं कांहीं उषा, व के० कोकिळ (नवा) यांत प्रसिद्ध झाल्या आहेत.

## १ भुंग्याची फजीति !

पद (चाल:— उरला भेद न ज्यां कांहीं)

मधुकर वदला कमलिनिला। आली भ्रमरी शोधाला ॥
नभिं शशि उदयाला आला। जागा काम तिचा झाला ॥
विधि करि भृंगीपति मजला। प्रेमा तुजवरि परि जडला ॥
सुंदरि! अपुल्या पीत पटांनीं झाकुनि घेईं मला।
नातरि सवत छळिल तुजला' ॥ १ ॥
परिसुनि वल्लभ-मधुवाणी। कमलिनि धरि त्या कवळोनी ॥
विलसत युग्म सकल रजनी। बाहिर मधुपाची राणी ! ॥
प्रभातीं जात मधुप उडुनी। भ्रमरी बसलि मार्ग धरुनी ॥
पाहुनि तिजला, मनीं वरमला, लाजेनें थिजला ! ।
म्हणुनिच श्यामल-तनु झाला ! ॥ २ ॥

---

## २ कांहीं मनोहर वस्तूंच्या जन्मकथा !

दिंडी.

हरित-तृण-शिरिं जल-बिंदु बसे रम्य। किरण रविचे सांचती त्यांत काम्य ॥
थिजनि घनपण बिंदूस यदा आलें। तदा त्याचें मग रत्न नांव झालें ! ॥ १ ॥

कमल-संभव मा वरी विष्णुलाती । नयनिं आनंदें अश्रु-बिंदु जमती ॥
कमल-दलिं ते सांडूनि तळीं गेलें । पुढें मोतीं हें नांव तयां आलें ! ॥ २ ॥
प्रलयिं कैलासीं अट्टहास झाला । पूर्ण धवलित नगराज तयें केला ॥
विष्णु-कृपया घनरूप तया आलें । नांव त्याला हिम पुढें प्राप्त झालें ! ॥ ३ ॥
कुपित शंकरें आसूडि जटा-केश । शशी भंगुनियां वरी नभोदेश ॥
शकल-गण ते अस्मानिं उंच गेले । पुढें तारा हें नांव तयां आले ! ॥ ४ ॥
धवल-दर्पण-तल गिरि स्कांधिं वाहे । बसुनि वैकुंठीं त्यांत रमा पाहे ॥
धरुनि गिरिनें प्रतिबिंब घरीं नेलें । पुढें गिरिजा हें नांव तया आलें ! ॥ ५ ॥
' जलधि मंथुनि हा चंद्र काढियेला ' । वदति; मानी परि सत्य मी न बोला॥
उदधि मथितां नवनीत वरी आलें । नांव त्याला विधु पुढें प्राप्त झालें ! ॥ ६ ॥
रुचिर वस्तूंच्या जन्मकथा ऐशा । सहज कथिल्या या असति विदित तैशा ॥
कुसुम कैसें जन्मास परी आलें ? । मला सांगा जरि तुम्हां विदित झालें ! ॥७॥

---

## ३ ऊठ अहल्ये ! प्रभात झाली, राम वनीं आला ।

[ गौतमानें शापिलेल्या अहल्येच्या शिळेशेजारीं बसून राहिलेला मुनिशिष्य, राम-जन्माचा काळ आलासें पाहून, शिलेस उद्देशून बोलतो. ]

### भूपाळी

प्रभा पसरली, दिशा उजळली, लोपवि तिमिराला । अहल्ये । लोप०।
ऊठ अहल्ये ! प्रभात झाली, राम वनीं आला ॥
खल-जन-बाधा झाली ज्यांना त्यांच्या अवनाला । अहल्ये । त्यांच्या०।
वचन-पाळिता ईश पातला ! ऊठ उशिर झाला ॥
युगांतरीं तुज सुर-नाथानें वंचियलें देवी । अहल्ये । वंचि०।
मुनि जाणिक परि कोपुनि तुजला शाप-वचन देई ॥
उश्शापाचें मुक्त रिपूला तात्कालिक केलें । अहल्ये । तात्कालिक०।
नत पत्नीच्या मुक्तीला बघ ! कालांतर आलें ॥
पत्नी ह्मणुनी त्वां नम्रत्वें वरिलें शापाला । अहल्ये । वरिलें०।
शिला होवुनी निजलिस येथें धरिलें विपिनाला ॥
गुरुची भार्या, आई शिष्या, त्यजिलें आम्हांला । अहल्ये । त्यजिलें०।

झाले त्याला दिवस किती तें ठाउक सूर्याला ! ॥
शांतपणानें विरह साहिला; काल कठिण गेला । अहल्ये । काल०।
ऊठ अहल्ये ! प्रभात झाली,राम वनीं आला ! ॥ १ ॥
पश्चात्तापें पोळुनि मुनि मग हिमालयीं गेला । अहल्ये । हिमाल०।
अपुल्यासंगें मला बोलवी करूं तपस्येला ॥
परी गुरूला जाऊं दिधलें संगें नच गेलों । अहल्ये । संगें नच०।
कधीं तरी पण होशिल जागी आस धरुनि बसलों ॥
एका रानीं ठेवुनि जीवा स्वयें दुजा गेला । अहल्ये । स्वयें दु० ।
तप कैचें त्या सुचतें जो कां दुःखानें मेला ॥
गिरि-कुहरामधिं नयनांपुढतीं धरूनियां तुजला । अहल्ये । धरु०।
शोक-तपस्या अपार केली अश्रु-पूर आला ! ॥
संसारांतुनि तुला ओढिलें चढुनी रोषाला । अहल्ये । चढुनी०।
अविचाराच्या करणी मागुनि सहज खेद आला ! ॥
होवुनि जागी शांत करी गे ! खिन्नमना पतिला । अहल्ये । खिन्न०।
ऊठ अहल्ये ! प्रभात झाली, राम वनीं आला ! ॥ २ ॥
गेले मुनि, मी तेव्हां पासुनि बसलों शेजारीं । अहल्ये । बसलों शे०।
गुरू-कृपेचें छत्र जयावरि कोण तया मारी ॥
प्रारंभहि ना शेवट ज्याला काल किती गेला । अहल्ये । काल किती०।
वर्तुल-गति हा भ्रमला कितिदां ठावें तें त्याला ॥
झाले प्रेमळ मित्र कितीतरि वनांमधें येथें । अहल्ये । वनांमधें०।
झाले तितके सारे गेले मृत्यूच्या पंथें ॥
वन-लक्ष्मी ही वनांत आली कितिदां टवटवुनी । अहल्ये । किति०।
विपरित येतां काल कितीदां दग्ध गात्र झाली ! ॥
गर्भ-भरालस-तटिनी-उदरें गगनाला शिवलीं । अहल्ये । गगनाला०।
हृदयें त्यांचीं शुष्क कितीदां दृष्टीला पडलीं ! ॥
आज जन्मल्या, उद्यां निमाल्या कितिदां तरि वेली । अहल्ये । किति०।
आयुष्यांची जणूं सृष्टिला वाहुनि लाखोली ॥
वट-वृक्षांच्या जटांमधुनियां वट दुसरे निघती । अहल्ये । वट दुस०।
पहिले गेले किती तयांची करवेना गणती ! ॥
विधुला आली शोभा कितिदां धूसरता आली । अहल्ये । धूसरता०।
माझी भक्ती तुझ्या ठायिंची सदाच फुललेली ॥
तेजःसंपद् निधिंतुनि घेउनि आकाशीं आला । अहल्ये । आका०।

उधळुनि सारी भानु कितीदां रागावुनि गेला ! ॥
रजनी पडतां सुंदर तारा लाजतशा आल्या । अहल्ये । ला०।
पर नर येतां पडद्यामागें कितिदां तरि लपल्या ! ॥
कितीक आले, कितीक गेले, धृति परि अपुल्याला । अहल्ये । धृति०।
शापानें तुज शिला बनविलें प्रेमानें मजला ! ॥
ऊठ परी तूं आई आतां बळावली आशा । अहल्ये । बळावली०।
शिला-वसन हें दूर करूनी पहा धराधीशा ॥
संतजनांच्या छल-रात्रीचा काल खचित सरला । अहल्ये । काल०।
ऊठ अहल्ये ! प्रभात झाली, राम वनीं आला ! ॥ ३ ॥
सविता जातां निजावयाला अखिल सृष्टि निजते । अहल्ये । अखिल०।
नश्वर तनुची यष्टी माझी निद्रेला वरिते ॥
वल्कल-वसनें झांकुनि तुजला झोपीं मी जातों । अहल्ये । झोपीं०।
परि मी कसला ! मी तर जागा ! देह मात्र निजतो ॥
सृष्टि सोडुनी अंधुक भासामधिं जरि मी शिरतों । अहल्ये । भासा०।
मनःकीर मम हृदय-पंजरीं तुजसि मात्र बघतो ॥
प्रातःकालीं निर्झरिं जाउनि पुनीत मी होतों । अहल्ये । पुनीत०।
अंजुलिनीं जल भरुनि आणुनी स्नान तुझें करितों ॥
कितीकदां तरि अंजुलि-जल तें सिंधु-जलचि होतें । अहल्ये । सिं०।
शिष्य तुझा मी प्रियकर तुजला सिंधु-स्नान होतें ॥
पूजाया तुज फुलें खुडाया वेलींना शिवतां । अहल्ये । वेलींना० ।
अश्रु-पात परि बघुनि तयांचा परतुनि मी येतों ! ॥
नमन-फुलांचीं शतें वाहुनी चिंतन मग करतों । अहल्ये । चिंतन०।
'शिला हीच मम असे अहल्या' असें मनीं म्हणतों ॥
अशापरी बघ ! भिन्न सकल या वृत्ति लया गेल्या । अहल्ये । वृत्ति०।
शिला अहल्ये, शिला अहल्ये, एकरूप झाल्या ॥
ध्यानीं रमतां तुझ्या माउली तूंच दिससि भवतीं । अहल्ये । तूं०।
क्वचित् प्रसंगीं मला वाटतें मीच अहल्या ती ! ॥
गिरिच्या स्कंधीं गिरिच्या शिखरीं, गिरिच्या उदरीं या । अहल्ये । गि०।
जिकडे तिकडे दिसत अहल्या कुणीं शापिल्या या ! ॥
त्यजुनि स्थाना, भवतीं पद मी शिले ! कसें टाकूं । अहल्ये । पदा०।
सुप्त-अहल्या-शिरावरी मी पाय कसा देऊं ! ॥
मन मम धरिलें तुवां अहल्ये ! आकळुनी येथें । अहल्ये । आ०।

पाय अहल्ये ! तुझ्या भीतिनें चालेना कोठें ! ॥
तूंहि शिला जरि ! मीहि शिला तरि ! अचल देह झाला । अहल्ये । अ०।
राम यदा तुज उठविल, तेव्हां तूंच उठिव मजला ॥
खल-कृति-तिमिरा पळवाया मुनि आजवरी झटले । अहल्ये । आज०।
मुनि-भगणांनीं किती तपावें अंतीं ते शिणले ! ॥
रघु-वंशाच्या क्षितिजावरती प्राची कौसल्या । अहल्ये । प्राची०।
गर्भीं भरला राम-भानु बघ ! दिशा उजळ झाल्या ! ॥
ऊठ अहल्ये ! जन्मा आला राम-प्रभु आला । अहल्ये । राम-प्रभु०।
मर्दुनि दैत्या, तुला उद्धरूं राम वनीं आला ॥
जनक-नंदिनी जिंकायाला राम पहा ! जाई । अहल्ये । राम प०।
जाणिक विश्वामित्र तयासह याच पथें येई ॥
प्रथम तुला वंदुनी निकट हा राम पहा ठेला । अहल्ये । राम प०।
ऊठ अहल्ये ! प्रभात झाली, राम वनीं आला ॥ ४ ॥

श्लोक ( वृत्त—शिखरिणी )

सती उद्धाराया तिज निकट जाई रघुपती ॥
करानें स्पर्शीं तों प्रकट झणिं झाली शुभमती ।
नमूनी श्रीरामा सजल-नयना ती वदतसे ॥
जगाचा हा, स्वामी, विपिनिं मजसाठीं फिरतसे ! ॥ १ ॥

पुसोनी रामानें नयन, शिरसीं हात धरिला ।
वदे " होसी आतां विमलतनु तूं जा सति ! घरा ॥
सतींना, संतांना जरि कधिं जनीं दुष्ट छळती ।
तयांना रक्षाया अवनिवरि ये मी रघुपती "॥ २ ॥

## १९ एकनाथ यादव निफाडकर.

यांचा जन्म शालिवाहन शके १८०९ पौष शु० ९ स ( इ० स० १८८८ जून २३ ) झाला. यांचें मूळ गांव धुळें. यांचें मराठी व इंग्रेजी प्राथमिक शिक्षण तेथेंच झालें. यांचे वडील धुळ्यास वकील असून ते आपल्या धंद्यांत नामांकित आहेत. वडिलांच्या इच्छेप्रमाणें यांनीं वकीलीचा अभ्यास केला. परंतु मनःप्रवृत्तीच्या अभावीं यांस त्यांत अद्याप

यश मिळालें नाहीं. सध्यां ते मुंबईस निघणाऱ्या संदेश दैनिकाचे सहाय्यक संपादक आहेत. नर्मदेचा 'भेडा घाट' ( Marble rocks ) पाहून यांना काव्यस्फूर्ति झाली, व त्यावरच यांनीं आपली पहिली कविता इ० स० १९११ त लिहिली. यांची स्फुट कविता बरीच असून ती बहुतेक उषा, केरळ कोकीळ ( नवा ). विविधज्ञानविस्तार व चित्रमय जगत् यांत प्रसिद्ध झाली आहे मधुमालती, तारागड, व विद्याधर अशीं तीन खंडकाव्यें यांनीं लिहिलीं आहेत; पैकीं पहिलें प्रसिद्ध झालें आहे. यांचा पद्यापेक्षां गद्याकडे विशेष ओढा आहे. यांची 'आर्यतेज' नांवाची कादंबरी सध्यां चित्रमय जगतूमध्यें क्रमशः प्रसिद्ध होत आहे.

## १ अश्रु !

पद-( चाल-प्रीति असे ना मजवरतीं० )

मैत्रीप्रीतीनीं जेव्हां । मन भुलतें अपुलें तेव्हां ; ॥
अथवा सत्याची प्रतिभा । खुलते तेव्हां दिसे प्रभा ॥
वदनावरती । हास्यानें ती । फुलते कांती ।
परि स्वहृदयींची प्रीति । अश्रु काढिते एकांतीं ॥ १ ॥
दांभिकहास्यें अनेकदां । झांकियले तद्भीतिमदां; ॥
सहज उसासा जेथ निघे, । अश्रुपूर्ण वा दृष्टि बघे, ॥
तोच उसासा त्या मजला; । शांतविलि तो हृदयाला ! ॥
त्या दृष्टीनें । त्या नयनानें । कटाक्षबाणें, ।
भेदा भेदा क्षण मजला । तो व्रण वाटे सुखद भला ! ॥ २ ॥
अपणां मर्त्यांना दान । होतें इहलोकीं छान, ॥
साधन आत्मज्ञानाचें । जेथें भय नच मायेचें; ॥
तो सद्गुण या हृदिं शिरतां । पावे करुणाकोमलता; ॥
करुणेनें तें । हृद् विरघळतें । नंतर येतें ॥
सहजचि नेत्रद्वारानें । अश्रु मौक्तिकरूपानें ! ॥ ३ ॥
कीर्तिपथाला ईर्षेनें । लागे योद्धा वीर्यानें; ॥
अंतरिं त्या नच शिवे कधीं । मृत्युभीति मुळिं रणांमधीं; ॥
रक्तमांसिं तो आनंदें । धरि रिपुमस्तक स्वच्छंदें; ॥
हस्तिशिरावरी । चढुनी झडकरि । रिपुप्राण हरि; ।
परि संग्रामानंतर तो । रिपुशव अश्रूंनीं बघ तो; ॥ ४ ॥
कीर्तिहार तो घालूनी । खड्गा कोशीं ठेवोनी, ॥

जातां योद्धा निजसदनीं। येई सुंदर तद्रमणी, ॥
करण्यां गौरव हास्यमुखें। सदन भरे तें तदा सुखें; ॥
मग आलिंगन। देतां चुंबन। हृदयांदोलन।
होई; तेव्हां सहज दिसे। अश्रु तिथें रणशौर्य वसे; ॥ ५ ॥
प्रेमल, कोमल, सुशील ती। भार्या, जी सदना शांती, ॥
तप्त मना जी स्वप्रेमें। शांतवि अपुल्या समागमें; ॥
मोल न जीच्या प्रीतीला। प्रीतिस्तव करि ममतेला; ॥
ती जाया जर। झाली जर्जर। क्षयरोगें तर।
हरहर! येती यमदूत। दिसती पतिच्या अश्रूंत ॥ ६ ॥
गेली माझी अरुंधती!। करूं कुणाशीं गुजगोष्टी ? ॥
कर्णीं कोणाच्या सांगूं। प्रेमकथा ? मी कुणा बघूं ? ॥
'प्रिये! लाकडे! करीन गे। प्रीति अखंडित तुजवरि गे! ॥'
ऐसें वदतां। कोणि न आतां। परिसे; होतां,।
शून्य, होतसे हृदयांत। खळबळ; अश्रू नेत्रांत ॥ ७ ॥
वद सखये गे! कोणाची। कांता असशी आतांची! ॥
क्षमा करीं या शंकेची; । भीति न मानीं बंधाची; ॥
ज्ञान न मजला जन्मींचें। पुढल्या, कांहीं गोष्टींचें; ॥
परि मत्प्रीती। मागत पुढती। नच काया ती;।
करितों प्रीतिस्तव प्रीति!। तिचीच गे, ही अश्रुतति!! ॥ ८ ॥
जिवलग मित्रा, हृदयींची। आस असे ही शेवटची; ॥
जर मार्गीं त्या अज्ञात। स्वर्गीं भेटुं कीं नरकांत, ॥
आतांच्या परि तेव्हांही। गाळूं अश्रू दोघेही! ॥
परिस्थितीचें। मग तेव्हांचें। भूत न साचें।
मानूं; सखया, करूं करूं। अश्रुवृष्टि; ती सदा धरूं! ॥ ९ ॥
हा! मंदिर आनंदाचें!। सौख्यांचेंही प्रीतीचें! ॥
बाल्यीं नच जरि मानियलें। तारुण्यीं तरि शोभविलें! ॥
नच अवमानियलें त्वांही; । चुकली सेवा नच कांहीं; ॥
हा! हा! देहा। वृद्धपणीं हा। जीवात्मा-हा!।
सोडुनि तुजला जाइल रे,। परि अश्रूंनीं न्हाणिल रे! ॥ १० ॥
दिन माझा हा मावळतां। सहजच येइल भीषणता! ॥
काष्ठासम हें कलेवर। पडेल तेव्हां चितेवर! ॥

धग धग, धग धग, चिता गळ्या, । चेतेलच; मग वन्हि उड्या ॥
मारीलच रे । रक्षामय रे । कलेवरहि हें ।
होइल; तेव्हां रक्षेंत । अश्रु गाळिं दिनरात्रींत ॥ ११ ॥
कथन करूं रे, नको कधीं । आनंदाच्या भरांमधीं ॥
मज्जीवित; तें रुक्ष असे ! । दुःखांचें ते रान वसे ! ॥
अथवा रण नैराश्याचें । अटविल जल तव हृदयाचें ! ॥
नसते सद्गुण । अंगीं लावुन । करितां वर्णन ।
करिशिल पातक दंभाचें ! । दान करीं रे अश्रूंचें ! ॥ १२ ॥

---

## २ माझें सृष्टीवरील प्रेम.

And out of spent and aged things,
I formed the world anew.

*Emerson.*

पद—( चाल मोरी लागी लटक गुरुचरणकी० )

किति तरि जुनाट सृष्टि ही ॥ ध्रु ॥
नययुवतीसम सुखवि परि मना; दिनिं दिनिं नूतन रूपां घेई ! ॥ १ ॥
परमेशाची प्रथम प्रसवा; प्रसवे परि ती प्रथमचि दिवसीं ॥ २ ॥
वज्राहुनि ही कठिणतराही; करुणा परि या उपजवि हृदयीं ! ॥ ३ ॥
ठावे वृद्धा चेटकी परी, प्रेमानें तिज करिन नोवरी ॥ ४ ॥
अमुच्या वेली नष्ट करिल ही; परि काव्यामृत सिंचिन त्यांवरि ! ॥ ५ ॥
मारिल ही मम पुष्पसुतानां, गायनमंत्रें उठविन अंबरीं ! ॥ ६ ॥
हिमनगगंगा होउनि सोडिल; प्रेमानें तरि चुंबिन सागरीं ! ॥ ७ ॥
बाष्परूप ती होतां तरुणी, मेघमंडलीं धरिन तिला मी ! ॥ ८ ॥
मग चपलाघाते ती भेदिल- हृदय, दिसेलच सहज प्रीति ! ॥ ९ ॥
दिसतां शुद्ध प्रेम, कळेलच कोण असे ती ! कुठिल सखा मी ? ॥ १० ॥
वृद्ध वधू ती बहु दिवसांची; परि आहे मम कृति मायेची ! ॥ ११ ॥
तरुणी ती जर तरुणतरहि मी, वृद्धा जर ती वृद्धतरहि मी ! ॥ १२ ॥
भेसुरवदना- ती मम रचना ! सुंदरांगना-कारण त्या मी ! ॥ १३ ॥ ॥
पतिपत्नीचें नातें ऐसें असतें प्रेमां एका रूपीं ! ॥ १४ ॥

---

## ३ रडा ! रडा ! तें रडें चालुं द्या !

( Thomas Moore या आयरिश कवीच्या Weep on ! Weep on ! या कवितेच्या आधारें- )

पादाकुलक वृत्त.

रडा ! रडा ! तो कालचि गेला । श्रेष्ठपणाचा गर्व निमाला; ॥
सर्वत्रहि अंधार दाटला । पूर्वयशातें आजचि मुकलां; ॥
सर्व पुण्य तें व्यर्थ सांडलें । संतवचनही वायां गेलें; ॥
सद्वृत्ती ! तव विझली ज्योती । कधिं नच आतां प्रकाशेल ती ! ॥
रडें चालुं द्या ! पुढें कदाचित । उठविल तें कीर्तीचें भूत; ॥
आज जागचीं जागीं जिरती । सत्कृत्यें, तीं येतिल वरती; ॥
तमोगुणाचे गुलाम जेथें । अखेर निजतिल शोकीं, तेथें ॥
त्या या भीषण जंबुद्वीपीं । येतां पुढतीं मुलें कदापी, ॥
आश्चर्यें वदतील " कशा या ! दुष्ट नीच वृत्तींनीं धरिल्या ॥
सुनिश्चयी दिलदार नरांच्या । मानगुटी ? कृति आश्चर्याच्या ! "
" अथवा " वदतिल " दैवजाल तें । गुंफियलें भेदें निजहस्तें; ॥
मत्सरादि रिपु एक जाहले । पूर्वज तेव्हां प्रेम विसरले; ॥
एकवटावीं जीं हृदयें तीं । तुटलिं; फिरलिं निजहिताभोंवतीं; ॥
निंदियलें परमेशदानही । नीच मना सीमाची नाहीं ! ॥
हरहर ! त्या मंदिरीं प्रार्थना । तेथें उठली शापगर्जना ? "
ह्मणुनि रडा ! तें रडें चालुं द्या ! करिल तुम्हांवरि रडेंची दया ! ! ॥

# २० वामन शंकर फातरफेकर, बी. ए.

हे मराठे कवि शालिवाहन शके १८०९ त ( इ० स० १८८७ ) बेळगांवीं जन्मले. यांचें मराठी व इंग्रेजी प्राथमिक शिक्षण गांवींच होऊन उच्च शिक्षण मुंबईस झालें. यांनीं थोडा गायनाचाही अभ्यास केला आहे. सध्यां हे एल्. एल्. बी. ची टर्म भरीत आहेत. यांच्या कविता मुख्यत्वें करून उद्यानांत व कधीं कधीं 'मराठामित्र' व 'इंदु प्रकाश' यांत येत असतात. 'मंगळागौर' ही यांची पहिली कविता होय.

## १ अंबोली.

पद—( चाल—फटक्याची. )

पूर्वीं कोणी महामुनीनें, पाहुनि येथुनि अंबोधि ।
नाम ठेविलें तेंच स्थलाचें, असे ' अंबोली ' अंबोधि ॥ १ ॥
सायंकाळीं अयोगोल हा, ताप देउनी बुडत असे ।
रत्नाकरही तप्त जाहला, रस मोत्यांचा भासतसे ॥ २ ॥
इकडे पसरे हरित वनश्री, मरकत सागर दुसरा हा ।
त्या दोघानां वरुनि भेटतो, अंबर सागर नील पहा ॥ ३ ॥
रसिकवरांना भरतें येण्या ' दिनान्त संध्या तोषवितें ' ।
उलट कसा रे न्याय ईश्वरा ! आयुःसंध्या तापवितें ॥ ४ ॥
धन्य सागरा तुझ्या तटावरि वनदेवीची पुरी वसे ।
नाना गिरण्या जिथें पेटती ' मुंबा ' लंका ऐशि नसे ॥ ५ ॥
हा इकडे हा मयूर नाचे केका परि हा कां करितो ? ।
कविरायाची करुणा भाके वकील भांडण मिटवीतो ॥ ६ ॥
पत्नी त्याची दरींत रुसली, ' शाल ' पिसारा ती मागे ।
विनय-शाल खरि शोभे बाई स्त्री जातीचें वैभव गे ॥ ७ ॥
चंडोल, कीर, बुलबुल जमले, भाट सृष्टिच्या स्तवनासी ।
सुतार पक्षी वाजवि तबला, कोकिल धरितो साथ तशी ॥ ८ ॥
चपला पाङ्गा हरिणी कुडते शावकवृंदा खेळवितें ।
व्याधकरांतुनि बंदुक गळते कारुण्यनदीला ये भरतें ॥ ९ ॥
हा इकडे हा घटप्रभेचा प्रवाह कैसा बागडतो ।
पुत्र गिरीचा खरा शोभतो दरी कड्यांतुनि जो पळतो ॥ १० ॥

गर्द झाडिची छत्री पसरे खुशाल सूर्या तापावे ।
साधुसंगती आश्रय असतां काय दुष्टजन कोपावे ? ॥ ११ ॥
हा इकडे हा शिरीष फुलला रुपेरि गोंडे लटकावितो ।
सुहृद तयाला कदंब भेटे, पुष्पित पुलकित जणुं होतो ॥ १२ ॥
दुःशासनसम वराह ओढुनि विमुक्त वसना करि कदली ।
लज्जित होउनि उभी राहिली, भ्रांत द्रौपदी जणुं ठेली ॥ १३ ॥
पुनरपि वाटे " क्षामाङ्गी " जी कदलीगर्भा वर्णियली ।
भवभूतीची हीच ' मालती ' माधव शैलांकीं बसली ॥ १४ ॥
प्रफुल्ल कुसरी करवंदीच्या वेली शाल्वरि घेते ।
ऐशा दरिच्या उदरीं गेलों शान्तिसागरीं मन बुडतें ॥ १५ ॥
दरिच्या उदरीं नाहीं गेलों, गेलों उदरीं मातेच्या ।
स्थितिद्वयांतिल भेद न भासे ज्ञानावाचुनि दुसऱ्याच्या ॥ १६ ॥
नयनांतुनि जलबिन्दु गळाले माता धन्या आठवितां ।
कवित्व शान्ति प्रेम बोधिलें जवळी नाहीं ती आतां ॥ १७ ॥
धन्य अंबोली ! धन्य दरी गे सेवा तरि ही मानुनि घ्या ।
नयनांतिल जलबिंदु सिंचितो तरुवल्लींनो प्राशुनी घ्या ॥ १८ ॥
हे वृक्षांनो ! मद्बन्धूंनो ! प्रेमळवल्लीभगिनींनो ।
मम मित्रांनो पशुपक्षांनो सानुस्रोतःसुहृदांनो ॥ १९ ॥
रसज्ञ कविवर अतिथी येतिल पुष्प फलें मधु त्यांना द्या ॥
पुन्हा कधीं ये योग असा हा अठवण माझी राहूं द्या ॥ २० ॥

---

## २ विरही संवाद.

तो, गाणें प्रेमाचें होतों
कंठीं तुझिया तरि रमतों
अधरामृत संतत पीतों
विरहा ऐसें फसवीतों ? ॥ १ ॥

ती, गाणें प्रेमाचें गातें
कंठीं परि तें अडखळतें
अधरस्पर्शें थरथरतें
कोण कुणाला फसवीतें ? ॥ १ ॥

तो, वीणा सुस्वर वा होतों
अंकीं तुझिया तरि रमतों
प्रेमस्पर्शामृत पीतों
विरहा ऐसें फसवीतों ॥ २ ॥

ती, वीणा सुस्वर मी घेतें
हातांमधुनी ती गळते
पादस्पर्शीं मन झुरतें
कोण कुणाला फसवीतें ? ॥ २ ॥

तो, वेणी पुष्पाची होतों
केशीं तुझिया तरि रमतों
सहवासी संतत होतों
विरहा ऐसें फसवीतों ॥ ३ ॥
तो, सायंतारा वा होतों
नेत्रीं तुझिया बिंबत तों
दृष्टिसुखा संतत वीतों
विरहा ऐसें फसवीतों ॥ ४ ॥
तो, लहरी वायूची होतों
वसनपल्लवीं तरि रमतों
आलिंगन संतत घेतों
विरहा ऐसें फसवीतों ॥ ५ ॥
तो, शक्य नव्हे हें परि होणें
विरहा ऐसें फसवीणें.
एक उपाई मात्र गडे !
नित्यहि त्वत्सहवास घडे॥६॥
तो, प्रेमाच्या हृदयींच जशी
नित्यहि तूं सहवाशीं कशी
याचमुळें हृत्ताप जळे
विरहींही सहवास मिळे ॥७॥
'भालचंद्र'

ती, वेणी पुष्पाची लेतें
केशीं परि ती घमघमते.
रसिकांसाठीं तळमळतें
कोण कुणाला फसवीतें ? ॥ ३ ।
ती, सायंतारा मी बघतें.
टकमक नयनां लावीतें
दृष्टी निष्फळ ती ठरते
कोण कुणाला फसवीतें ? ॥ ४ ।
ती, लहरी वायूची घेतें
भेट तशानें नच होते
विरहाग्नीला भडकविते
कोण कुणाला फसवीतें ॥ ५ ॥
ती, नव्हतें शक्यहि जरि होणें
कशास झालें फसवीणें
उपाय पुरुषा सुचे तरी
अबले न सुचे तोहि परी ॥६॥
ती, माझें माझ्या जवळि नसे
नाथा ठेऊं कुठें कसें
सदेह भेटा भूल पडे
विरहीं थट्टा पुरे गडे ॥ ७ ॥
वामन शंकर फातरफेकर.

# २१ पंढरिनाथ वामन घाणेकर.

या कवीचा जन्म शालिवाहन शके १८१० श्रावण शुद्ध ११ (इ.स.१८८८ सप्टेंबर २)स झाला. पुणें जिल्ह्यापैकीं जुन्नर तालुक्यांतील 'राजुरी' हें यांचें मूळ गांव होय. सध्यां हे कवि सातारा येथील न्यू इंग्लिश स्कुलमध्यें शिक्षक आहेत, यांची स्फुट कविता पुष्कळ असून ती बहुतेक सर्वच अप्रसिद्ध आहे. 'बिपिन बाबूबद्दल धन्योद्गार' ही यांची पहिली कविता असून ती त्यांनीं इ० स० १९०८ त लिहिली.

## १ तारा !

( दिंडी )

नभा व्यापियलें अखिल पयोदानें। कसें ताऱ्यां ! तुज ठेवियलें त्यानें ?।
रीति दुष्टांची अल्प ठेवण्याची। स्मृती होवो कीं, नष्ट वैभवाची ! ॥१॥
निबिड अंधारीं काजवा दिसावा। अग्नि रक्षेच्या पोटिं वा असावा।
ततुं आशेचा पूर्ण निराशेंत। तसा दिससि तूं असित या घनांत ! ॥२॥
भोंवतालीं हा कोट जलधरांचा। बघुनि बघसी कां मार्ग सुटायाचा ?।
छिद्र बघुनी आलास इथें कां रे !। तेंहि मेघानें पहा बंद केलें ! ॥३॥

---

## २ गगना !

पद ( चाल—भला जन्म हा तुला लाधला० )
महाभाग हे गगना ! असली भाग्यशालि तूं खरा।
कधिं न तुज मित्रविरह जाहला ॥
दिन समयीं भास्कर, रात्रींची नक्षत्रें, मृदुकर।
लोळती निर्भय तव तनुवर ! ॥
धारण करुनी इन्द्रधनुष्या, चपला सह घेउनी।
मेघ ये तव भेटीलागुनी ! ॥
भानु चंद्र नक्षत्र घनादी नसतां, तुज दीसती—।
गिरी हे येतां तव सन्निधीं ! ॥
तुज भेटाया प्रतिदिनिं वाढतिं, तरु हे बघ निरखुनी।
धूर्ततर गिरिशृंगीं उगवुनी ! ॥
दुर्बल जरि हें बघ कारंजें, वेगानें उडतसें।
भेटण्यां तुज लागीं श्रमतसें ! ॥
आनंदानें गात गातही खगपंक्ती तुजकडे—।
येइ जरि विरह गृहाचा घडे ! ।
आपत्ती ही सोसुनि चढुनी ईर्षेला मानव—।
विमानीं येति मित्र तव नव ! ॥
सहवासीं तव कुणी राहती, येतां कुणि दीसती।
पुरा तुज मित्रविरह नच कधीं ! ।

---

## ३ एकटा फिरणारा मेघ !

( दिंडी )

अरे मेघा ! नभिं फिरसि एकटा कां ! । बांधवांनीं तुज सकल सोडिलें कां ! ।
सकल दिशीं हा कां जातसे. बिचारा ! । कोण आहे या द्यावयास थारा ! ॥१॥
पती जातां सोडोनि बिचारीला ! । तसें विधवेला कोण पुसायाला ! ।
करी वणवण जरि सकल दिवस साध्वी!। तिची अल्प तरी कींव कुणा यावी!॥२॥
अस्तगिरिचे हा जवळिं भानु जातो ! । तया सान्निध जाण्यासि ढग पहातो ! ।
सूर्यरश्मीनें रुचिर दिसूं लागे ! । परी मधुता जाईल लया वेगें ! ॥३॥
कांति त्याची सर्वही लया गेली ! । फिरुनि पहिली या कष्ट दशा झाली ! ।
अरे उसना बघ थाट असा आहे ! । मित्र नित्याचा कुणी तरी पाहे ! ॥४॥
कुणी भानूसम भेटतां उदार ! । गमे विधवेसी जरा बरा काल ! ।
तोंच जातो तो मरुनि अनाथाही ! । कुठें जाते ती फिरुनि दिसत नाहीं ! ॥५॥

---

## ४ कधिं न इतरांच्या धरिन मी पदातें !

( दिंडी )

विरहि जनहो ! त्वद् दुःख दूर झालें । पहा सौख्याचें मूळ करीं आलें ।
मित्र तुमचा हा अमृतकर उदेला । पुसा प्रियजन वृत्तांत सर्व याला ! ॥१॥
कठिण आहे हें गगन चढायातें । असें शरदेनें बघुनि मृदुल चित्तें ।
श्वेत मेघाच्या मिषें पायऱ्या यीं । पहा केल्या सर्वत्र चंद्रराया ! ॥२॥
गगन चढतां हें विधू ! मधुरशील । मित्र माझा जेथून तुज दिसेल ।
स्थलीं त्या तूं थांबून जरा वेळ । ' काय करतो ' हें काय सांगशील ? ॥३॥
असें अवचित हें गगनिं काय झालें ! । काय ईशा मी महत्पाप केलें ? ।
पहा कोसळल्या किती पायऱ्या या । शीर्ण त्यांनीं जाहली चंद्रकाया ! ॥४॥
काय चंद्रा ! मी काय करूं आतां ? । पुरा दुर्बल मी नाहिं येत येतां ! ।
शाप देउनि मज भस्म करी तूं रे । वचन माझें त्वन्नाशहेतु झालें ? ॥५॥
' स्वार्थसाधू मी नीच, विघ्न आणि । स्वगृहवासी शशिवरी हें बघोनी ।
लाल होउनि हा क्रुद्ध अन्यतारा । मजसि झाला उद्युक्त जाळण्याला ! ॥६॥

विरह मित्राचा मजसि सोसवेना । ह्मणुनि धरिलें मीं इन्दुचें पदांना ।
दुष्टबुद्धि न मी सदय तारका हे । तुझा दीनावरी कोप योग्य नोहे ! ॥७॥
पहा इन्दू हा विघ्नमुक्त झाला । भेट ताऱ्या ! तव भेट बांधवाला ! ।
मित्रविरहा सोशीन शांत चित्तें । कधिं न इतरांच्या धरिन मी पदांतें ! ॥८॥

---

## ५ प्रातःकालचा चंद्र !

( दिंडी )

निशानाथा निस्तेज कां असा तूं ? । खिन्नतेला तव काय असे हेतू ? ।
अरे कळले ! तव हीच दशा होणें ! । मानहानी खरि अशी पत्नि जाणें! ॥१॥
पळापूर्वीहुनि अधिक खिन्न होसी ! । शद्ध माझे कां लागले मनासी ? ।
' निशानाथा ' मी तुजसि बोधियेलें । निशा गेली मी ह्मणुनि हें न केलें! ॥२॥
निशा गेली, जाणार ती, तयानें । असे दोषी ती हें न सिद्ध होणें ! ।
तुझी पत्नी, तशि इतर तारकांची ! । नसे कांहीं ती गोष्ट व्हावयाची ! ॥३॥
मघा चंद्रा तूं कसें तारकांतें । आत्मतेजानें झांकियलें होतें ! ।
एकट्यानें तूं-इतर तिचें कांत । जवळ असतां-तिस भोगिलें मजेंत ! ॥४॥
तिला बळकाविसि एकटाच तूं हें । तारकांच्या ध्यानांत कां न राहे ! ।
अतां संधी त्यां सांपडे म्हणोनी । तिला नेती ते तुझ्या करांतोनी ! ॥५॥
निशेवरती स्वामित्व तुझें त्यांचें । असें; लाभावें संग सौख्य तीचें ! ।
असें प्रत्येका वाटतेंच; संधी । सांपडे कीं प्रत्येक स्वार्थ साधी ! ॥६॥
मघा साधियलें स्वहित तूं, अतां तें । निशा नेती, हें दूषणार्ह मातें- ।
गमत नाहीं; स्वार्थास जपति सारे; दोष आहे, तत्वांत तो असे रे ! ॥७॥
एक कांता, बहु कांत, तत्व हेंच । निंद्य आहे; त्वत्स्थिती तयाचेंच ।
दृश्य आहे फल; दूषणार्ह तत्व; नसे तितुकें हें गमे मज ममत्व ! ॥८॥
फार घेइं न हें लावुनी मनाला ! । निंद्य तत्वें आमुच्या समाजाला ।
किती ग्रासुनि टाकिती तूं पहा तें, । मनुज संज्ञा ही उचित ना अम्हांतें ! ॥९॥
रूढि अमुच्या ऐकतां तव शहरा- । अंगीं येइल; हें ऐक बा स्त्रियांला- ।
पती मरतां संन्यास ठेविलेला ! थांब, थांब, नको निघुनि जाउं चंद्रा ! ॥१०॥
थांबशीना, गेलासि दृष्टिच्याही । पूर्ण बाहिर; तुज ऐकवतहि नाहीं ! ।
दुष्ट, दुष्ट अशा रूढि ज्या समाजीं । त्यांत नित्याची वसति असे माझी ॥११॥
तुझ्या सम मी होणार नाहिं खिन्न । रूढि निर्मूलनिं सर्वदा श्रमून ।
समाजाचे जरि जाति ना कलंक । करित नाहीं बसणार कधीं शोक ! ॥१२॥

---

# २२ गजानन सदाशिव जोशी, बी. ई.

या कवीचा जन्म शालिवाहन शके १८१२ श्रावण शु० ८ स (इ० स० १८९० जुलै २५) झाला. सातारा जिल्ह्यापैकीं पाटण तालुक्यांतील गारोडों हें यांचें मूळ गांव होय. यांचें इंग्रेजी प्राथमिक व उच्च शिक्षण पुण्यास नूतन मराठी विद्यालय व कॉलेज ऑफ इंजिनियरींग यांत झालें. हे सध्यां नीरा राइट बक कॅनलवर अप्रेंटिस इंजिनियर आहेत. 'शाळेंत घालविलेले दिवस' ही यांची पहिली कविता असून ती त्यांनीं इ० स० १९०५ मध्यें लिहिली. यांच्या कांहीं स्फुट कविता केसरी व काव्यरत्नावलींत प्रसिद्ध झाल्या आहेत.

## १ तांब्या घांसत असलेल्या मुलीस उद्देशून.

(वृत्त—शार्दूलविक्रीडित)

'कां बाळे! शिणसी? तुझे सकळ ही गे कष्ट होती वृथा'।
'झाला चक्क, तदंतरीं मुख दिसे, कां हो असें बोलतां?'॥
'झाला उज्ज्वल शुभ्र हा वरि दिसे त्वां काढिला काळिमा'।
'होते कीट किती, किती उजळिला ठाऊक नाहीं तुम्हा'॥ १॥

'कष्टें हा इतुका कशास धुतला?' 'कीं साठवावें जल.'।
'त्याचें काय?' 'असा भरोनि जननी बाहेर तो ठेविल.'॥
'तेणें काय?' 'घरास येति परके जे कोण ते त्यांप्रति।
पाहातील,' 'बरें, पुढें,' 'कुणि असा हा घांसला पूसती'॥ २॥

'हें ही होइल,' 'साभिमान कळवी मन्नाम त्यांतें पिता'।
'ऐसें काय? खरंच' 'होइल सुखी मातें जनीं वानिता'॥
'मोठें धोरण बांधिलें चतुरता तूं दाविली गे भली'।
'चातुर्या नव दाविलें न, करिती ऐसेंच साऱ्या मुली'॥ ३॥

'बाहेरून बघून तोष बहुधा होईल वाटे खरें'।
'कां हो संशय?' 'जो कुणी परि मुली वाटून पाणी बरें॥
ये त्याच्या जवळी तयास तितुका तो स्वच्छ गर्भी दिसे'?।
'राहावें जल चांगलें म्हणुनि ना घासावयाचें असें?' ॥ ४॥

श्लोक ( वृत्त–मालिनी )

सजविशि बहिरंगा पाहुनी लोकरीती ।
सुजन परि सुशोभा अंतरंगास देती ॥
फसतिल बहिरंगें लोक सामान्य बाळ ।
स्तवतिल तुज तेही फार गे अल्पकाळ ॥ ५ ॥
सहजचि उघड्या त्या अंतरंगींच दृष्टी ।
सुखवित खरि शोभा तेथची ज्यास पोटीं ॥
सुजन रसिक ऐसा तूं किती यत्न केल्या ।
बघिल न बहिरंगा सुश्रमें शोभवील्या ॥ ६ ॥
नटविशि बहिरंगा ज्या प्रयत्नीं तशांनीं ।
विमल शिक कराया अंतरंगा झटोनी ॥
रिझविशि बहिरंगें अप्रबुद्धास जैसी ।
सुखवि मनिं गुणज्ञा अंतरंगेंहि तैशी ॥ ७ ॥

---

## २ मनाचें तर्कशास्त्र.

आर्या

" मन हें ओढाळ गुरूं, परधन परकामिनीकडे धावें " ।
सुखलोलुप, परतें जरि सत्कार्यी ओढुनी बळें न्यावें ॥ १ ॥
सत्कार्यी धीटपणा, शौर्य, तसें थोरपण, दया भूतीं ।
इंद्रियनिग्रहशक्ती, व्यवहारीं आणणें सदा नीति ॥ २ ॥
वीट असत्कार्यांचा, सद्गुण इत्यादि हे जरि नसावें ।
त्यातें–कपट तरि असें–वसतीसें भासवावया हावें ॥ ३ ॥
एक उणेपण तरि कीं ये कांहीं क्षणिं तयासि सरलत्व ।
तरलत्व जाय तेव्हां सोडाया हो तयार निजतत्त्व ॥ ४ ॥
तेव्हां उच्च विचारें उच्च अशा कल्पनातरंगांत ।
वावरुनी चतुर असें निश्चयही थोर थोर रचण्यांत ॥ ५ ॥
परि उच्च–भावनाबळ राहेना फार वेळ भुलतें हें ।
मोहें चुकतें तरि तें चुकलों नाहीं ह्मणावया पाहे ॥ ६ ॥
पाहोनी स्पष्ट पुढें सबळ असा दुष्ट दुर्जना दंडी ।
साहाय्यास न धांवे भयेंच, कार्यप्रसंग तें सांडी ॥ ७ ॥

परि भ्यालों हें न तया पडत, ह्मणें व्यर्थ तेल आगींत।
ह्या उद्धटासि भांडुनि, कारण ऐसें वृथाच काढीत ॥ ८ ॥
करि निश्चय पाळूं कीं पाळावें ब्रह्मचर्य ऐकोनी।
चुकतां त्यांतुनि, चळलों हें न म्हणें येतसें अशी वाणी ॥ ९ ॥
नैसर्गिक नियमातें चुकवाया हो समर्थ तो न मुनी।
होइल लाभ न तेणें निष्फळ होणार शीण संयमुनी ॥ १० ॥
व्यसनार्णवांत बुडती बंधू अपुले समस्त पाहोनी।
तळमळ चित्तीं, न तरी स्वार्थें घडतो उपाय हातोनी ॥ ११ ॥
परि हें ह्मणेल, 'नाहीं फलदायक एकही उपाय; जरी।
असतां केल्याविन नच शांत असें राहतों पडोन घरीं ॥ १२ ॥
कधिं मानस होय महत्–कार्यांचा घ्यावया शिरीं भार।
परि तें घडे न हातुनि नसतां आंगीं अवश्य निर्धार ॥ १३ ॥
'निर्धार न' हें न म्हणें, म्हणतें, 'नाहींच वेळ अनुकूल'।
म्हणुनी स्वस्थ बसाया चित्ता हें पाडितें अशी भूल ॥ १४ ॥
यत्न न सुधारण्याची आंगीं असतां उणेपणा स्पष्ट।
सर्वत्र तेंच म्हणुनी दावी दुसऱ्या जनाकडे बोट ॥ १५ ॥
कांहिं अलौकिक कार्या करण्या जरि हें कदापि धरि हांव।
जन सर्व उगे ह्मणुनी थांबवि हें आपुली तरी धाव ॥ १६ ॥
ज्यांत नको धैर्य असें दाखविलें कोणि ह्या जरी कार्य।
आवड नसावयाची तेथें अथवा अपात्र हें होय ॥ १७ ॥
सोपें असें जरी कुणि सुचवीलें कार्य तें करूं पाही।
परि दे सोडुनि ह्मणतें अंतीं ह्याच्यांत लाभ ना कांहीं ॥ १८ ॥
कोठें अशक्य, कोठें वेळ न कोठें अपात्र, तर कोठें।
कार्यच फलदायक ना, होतिल करतां दुजे बहू तोटे ॥ १९ ॥
एवं समस्त कार्यें टाकुनि दे आळसें भयानें हें।
परि चित्तास निमित्ता दाखवुनी अन्य भुलविण्या पाहे ॥ २०
भ्रामक असें मनाचें आहे हें तर्कशास्त्र, वेळ जशी।
फिरतें जैसें; जन हो विश्वसितां त्यावरी पडाल फशी ॥ २१ ॥
जन हो सावध व्हावें मन हें फसवावया तुह्मां बघतें।
जरि तुह्मि भुलाल, चुकला फसला जोडाल या गुणें अघ तें ॥ २२
यास्तव नित्य जपावें वर्तावें नित्य जागरूकपणें।
जें काय सद्विचारें होय सुनिश्चित सदा तसें करणें ॥ २३ ॥

# २३ बळवंत गणेश खापर्डे.

सुप्रसिद्ध वक्ते गणेश श्रीकृष्ण ऊर्फ दादासाहेब खापर्डे,यांचे हे कवि चिरंजीव होत.यांचा जन्म शालिवाहन शके १८१२ अश्विन कृष्ण ८ स (इ० स० १८९० नोव्हेंबर ५) झाला. वऱ्हाडांतील प्रसिद्ध शहर 'अमरावती' हे यांचें मूळ गांव होय. यांचें मराठी व इंग्रेजी प्राथमिक शिक्षण अमरावतीस होऊन उच्च शिक्षण कलकत्ता येथें नॅशनल मेडिकल कॉलेजमध्यें झालें. प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें व आयुर्विद्येची अभिरुचि नसल्यामुळें त्यांना तो शिक्षणक्रम सोडावा लागला. 'कवनारंभीं नमन' ही यांची अगदीं पहिली कविता;अर्थात् ती ईश्वरपर आहे.यांच्या बऱ्याच स्फुट कविता धर्मजागृतींत प्रसिद्ध झाल्या आहेत. 'काव्यविपिनविहार' नांवाचें एक महाकाव्य हल्लीं ते लिहीत आहेत.

दंतकथेप्रमाणें कालिदासाच्या समकालिन असलेला 'घटखर्पर' कवि हा यांचा पूर्वज, अशी एक जुनी आख्यायिका यांच्या घरांत चालत आलेली आहे व त्यामुळेंच यांचें उपनांव 'खापर्डे' असें पडलें.

## १ मदनविद्धाचें ज्योतिष

(लग्न घाटत असतां, व वराला स्वतःला रूपवती वधू अतिशय आवडली असतां उभय पक्षांच्या ज्ञात्याऱ्या ज्योतिष्यांना उद्देशून वर स्वगतः–)

श्लोक(वृत्त—शिखरिणी.)

शुभांगी शोभे जी गगनसम नीलांबरवती।
जरीचे बिंदू हे गगनिं शुभ तारे चमकती॥
स्वयें चंद्राची कीं वदनिं वसते हो सरसता।
अशीचे, अंधानों ग्रह तरि तुह्मी काय बघतां॥ १॥
जिचा उंचीचा कीं मदनशशि हा स्वीय सदनीं।
कृशांगीच्या जीच्या विलसति गुरूशुक्र नयनीं॥
ललाटी कुंकू तो विकसित वसे मंगल स्वतां।
अहो जन्मांधांनो,ग्रह तरि तिचे केवि बघतां॥ २॥
सुकेशीच्या केशीं सुकिरण परावृत्त दिसतो।
जणूं वेणीमाजीं शनि रमणिच्या नित्य डुलतो॥

सदा येथें राहूं, जवळि कवळूं चित्त म्हणतां ।
कसे रे मंदांनों ग्रह बघत हे स्वस्थ बसता ॥ ३ ॥
उडे जाई मागें पदर पवनें कंपित दिसे ।
तदा केतू चेतोहर मदनसैन्यांत विलसे ॥
अशी तन्वी डोळे भरुनि बघुनी तृप्ति नसतां ।
रिकामें, अंधानों ग्रह घुसळुनी काय करितां ॥ ४ ॥
* गुणातें एकेका रदन करुनी ठेवि वदनीं ।
गुणी ऐसी रामा मम गुणवती कुंदरदनी ॥
शुभांगीसर्वांगा त्यजुनि निज पंचांग रडता ।
अतां कैसे वानूं जरठ मजला सत्य दिसता ॥ ५ ॥
जिला लावण्याची सकल जन हे रास ह्मणती ।
तनुस्थानीं जीच्या जननयनतारा विहरती ॥
धनस्थानीं हीच्या बुधजन चिदानंद असतां ।
अहो निर्बुद्धानों ! ग्रह छळुनिया काय रडता ! ॥ ६ ॥
स्वयें तारा किंवा ग्रह सकलधार्मिक रमणी ।
हिला सोडोनीया दिसत दुसरी काय तरुणी ? " ॥
अशी ही टाकोनी ग्रह ! ग्रह ! उगें कां बकतसां ! ।
मला रे क्रूरानों ! उगिच बसुनी कां छळितसां ! ॥ ७ ॥

---

## द्वैतांची फुगडी.

पद-( चाल-प्रीति असे ना मजवरतीं० )

फुगडी रंगलि चोहिंकडे । फुगडीविण ना कांहिं घडे ॥
फुगडीचें मज वेड जडे । चल, आपणही खेळुं गडे ॥ ध्रु० ॥
एकामेकांतें धरितीं । द्वैतें जगतीं बागडतीं ॥
ग्रंथि करांची दृढ देती । परस्परां ओढुनि धरिती ॥
चक्राकारें मग फिरतीं । भ्रमतीं, दुसऱ्या भ्रमवीतीं ॥
रमति, गड्याला रमवीती । मनुजमनाही भ्रमवीती ॥
जन्म-मृत्युची । जडाऽजडांची । सुख-दुःखांची ॥
फुगडी हो खुलली फुगडी । मनुजमनाला करि वेडी ॥
परी ज्ञान ही मधें कडी । फुगडीला ' तूं-मी-च ' गडी ॥ १ ॥

* सुलक्षणी स्त्रियेचे गुण बत्तीस आहेत.

कुणा कल्पना ही सुचली। कुणी सुरूं फुगडी केली ॥
कशी सुरूं फुगडी झाली। काशास्तव ही सुरूं झाली ॥
उगीच सुरूं तरि कां झाली। तुला मला कां आवडली ॥
केंवि गुंतलों खेळांत। सांपडलों ह्या फुगडींत ॥
जरि सांपडलों। तरि कां रमलों। रमतां भ्रमलों ॥
आतां यत्नें थांबेना। कशी थांबवूं उमजेना ॥
तुला मला भ्रमवी फुगडी। फुगडीला 'तूं-मी-च' गडी ॥ २ ॥
तुला मला भ्रमवी फुगडी। किती शोभते ही जोडी! ॥
"तूं" म्हणतां मी अज्ञ ठरे। मलाहि तूं "तूं" म्हणशी रे!।
आणिक ह्याहुनि सरस अशी। मिळेल जोडी विधि कशी! ॥
परस्परां धरुं आपण या। विश्वभरीं मग खेळूं या ॥
धरि मी तुजला। तूं धरिं मजला। जोड साधला! ॥
आतां थकलों तरि खेळूं। रडतां हंसतां फेर धरूं ॥
विश्वभरीं जरि ही फुगडी। फुगडीला 'तूं-मी-च' गडी ॥ ३ ॥
दोरी एकचि ती असते। टोंकीं दोन परी सरते ॥
(तशी 'भावना'-एकचि ती। "बाह्यस्पर्श" जगीं वसती ॥
दोन परी नांवें वरिते। एकचि दों टोंकीं असते) ॥
नारी बांधी रविला* ती§। टोंकं दोन करीं धरि ती ॥
मग फिरवीते। रवि ती फिरते। टोंकं बघते ॥
दोन रवी बघते टोंकं। म्हणे "मला देती झोंके†" ॥
तैसी द्वैतांची जोडी। फुगडीला 'तूं-मीच' गडी ॥ ४ ॥
'मी-तूं' टोंकं हीं साचीं। कोणा एका दोरीचीं ॥
इतरहि सारीं हीं द्वैतें। टोंकं एका दोरीतें ॥
जीवा बांधुनि ही दोरी§। फिरवी दिव्या कुणि नारी ॥
महाकारणाची चरवी। जीव त्रिलोकीं फिरे रवी‡ ॥
'अनुभव' मग तें। लोणी निघतें। चरवी भरतें ॥
खाय सांवळा चोरुनि जें। गोपी जीव तदा साजे! ॥
नारी-दोरींची फुगडी। फुगडीला 'तूं-मीच' गडी! ॥ ५ ॥
फुगडी खेळति दिन-रजनी। चक्राकारें नित फिरुनी ॥
संक्रांतीची मधें कडी। वर्षं अयनांची फुगडी ॥

---

* ताक घुसळण्याची रवी. § दोरी. † यांचा कर्ता रवि. § द्वैतांची. ‡ ताक घुसळण्याची रवी.

रविकर धरुनी ग्रहमाला । खेळति गगनीं फुगडीला ॥
फुगडी न्हासोत्क्रांतींची । घडण तीच इतिहासाची ॥
ऐशा जोड्या । भासती गड्या । परि, रे वेड्या ॥
जरी गोड बा ह्या जोड्या । परी खऱ्या नाहींत गड्या ॥
गोड, खरी रे ती फुगडी । जींत गडे 'तूं-मीच' गडी ॥ ६ ॥

रवि-शशि फुगडीचेच गडी । भासति बघतां ही जोडी ॥
तारा-नभही खेळगडी । विश्व खेळतें ही फुगडी ॥
विकल्प वा संकल्पांची । फुगडि, मनाची जननी ती ॥
जेथ बघावं तेथ गडे । जोडी फुगडी दृष्टि पडे ॥
मौज बघोनी । ऐसी नयनीं । स्वस्थ बसोनी ॥
चैन पडावी कशी गडे । मज फुगडीचा छंद जडे ॥
सुंदर आपण किति जोडी– । फुगडीला, 'तूं-मीच गडी' ! ॥ ७ ॥

भूत-भविष्यांची फुगडी । वर्तमान ही मधें कडी ॥
कारण-कार्यांची फुगडी । मनुजमनाची मधें कडी ॥
सन्निध-दूरांची फुगडी । स्थलाऽभास ही खोटि कडी ॥
खेळ रंगला चोहिंकडे । रंगानें ही भूल पडे ॥
"हवें–" "नकों" ची । भल्या-बुऱ्यांची । गुणाऽगुणांची ॥
जोडी खेळे चोहिंकडे । चल, आपणही खेळुं गडे ॥
ये ये खेळुं गडे फुगडी । फुगडीला 'तूं-मीच' गडी ॥ ८ ॥

किती काळ खेळत आलों । खेळों तें विसरुनि गेलों ॥
जिवासि वाटे फुगडि हवी । घडी न फुगडीविण जावी ॥
किती काळ खेळेन पुढें । हें तरि सांगिल कोण गडे ! ॥
आज परी फुगडीच हवी । नित्य गमे जी गोड नवी ॥
ऐसी फुगडी । 'तूं-मीच' गडी । चाखुनि गोडी ॥
खेळुं घराच्या माघारीं । अज्ञानाच्या अंधारीं ॥
अष्टौप्रहरीं सर्व घडीं । फुगडीला 'तूं-मीच' गडी ॥ ९ ॥

त्रास मधें मज किति झाला ! । जीव कितीदां तळमळला ! ॥
कांटे टोचति पायांला । तमीं दिसेना नयनांला ! ॥
येइ कळवळा जीवाला । अश्रुहि येती नयनांला ! ॥
पाय न त्यजि परि फुगडीला । काय म्हणूं ह्या छंदाला ! ॥
कळे मज जरी । वळेचि ना परि । हाय रे हरी ॥

काय अशी ही गत झाली ! । कशी मला फुगडी जडली ! ॥
" तूं–" हि अभागी मज जोडी ! – । फुगडीला ' तूं-मीच ' गडी ॥१०॥
उत्क्रांतीच्या गिरिशिखरीं । कूटस्थाच्या सानुवरीं ॥
अद्वैताच्या चिदंबरीं । माझ्या मंगल माहेरीं ! ॥
अशी कधीं नव्हती फुगडी– । छळी सुखें परि करि वेडी ॥
माझें लग्न जुळें तुजशीं । खूळ जडे मग हें मजसीं ॥
कारण झाला । कोण जाहला । कळे न मजला ॥
समर्थ, जाणुनि, मीं नोहे । तूं तरि थांबवि फुगडी हे ! ॥
तूंच मला आधार गडी– । फुगडीला ' तूं-मीच ' गडी ॥ ११ ॥
अणुरेणूपरमाणूही । फुगडी खेळति मोदें ही ॥
त्यांतहि हरि नरनारि† करी । त्यातेंही फुगडी घेरी ॥
दृश्य जगातें तीच घडी । अणु-परमाणूंची फुगडी ॥
फुगडी कैची ? – । रासचि तो । आजचि जो लपुनी घुमतो ॥
घुमतें दशदिक्जठरांत । अनंत ह्या आकाशांत ॥
तुजविण परि त्या नच गोडी । रासाला ' तूं-मीच ' गडी ॥ १२ ॥
मुकुंदजी " लालनवाला । " " सब दुनिया पालनवाला " ॥
रास रंगुनी खेळियला । स्वर्ग जयें नीरस केला ! ॥
आपण नव्हतों रासाला ! । मौज मिळाली गोपींला ॥
आतां " मी " तितुकेंहि हरी । " तूं " तितुक्या त्या ब्रिजनारी ॥
त्या श्रीहरिपरि । एकचि " मी " तरि । रूपें बहु धरि ॥
ये ये रास पुन्हां खेळूं । पुनरपि रंग नवा उधळूं ॥
तुजविण नाहीं मज जोडी । रासाला ' तूं-मीच ' गडी ! ॥ १३ ॥
माझा ' मी ' तो तुझाहि ' मी ' । तुझाचि ' मी ' तो माझा ' मी ' ॥
एकचि असुनी दोनहि तो । दोनाचि असुनी असंख्य तो ॥
असंख्य, दोनहि एकहि जो । तोचि अशी लीला करितो ! ॥
साक्षी एकपणें डोले । दोनपणीं फुगडी खेळे॥
तोचि खेळतां । असंख्य गमतां । रास तोचि हा ! ॥
रासहि फुगडी, साक्षी तो । एकचि नानापरिं रमतो ॥
परी मौज ही शक्य करी । तिथें मूळ ' तूं-मीच ' गडी ॥ १४ ॥
रासाचें मज वेड जडे । रासाविण ना चैन पडे ॥
चल ये आपण खेळुं गडे । आपणही खेळूंच गडे ! ॥

---

† स्त्री-पुरुष.

रडलों हंसलों तरि खेळूं । विश्वीं रंग नवा उधळूं ! ॥
रंग उडाला चोंहिकडे । चंड रास हा घुमत चढे ॥
रंग मातला । विश्वीं भरला । असह्य झाला ॥
माया-ईशांची फुगडी । ती फुगडी हें विश्व घडी ॥
अशी जरी झाली फुगडी । फुगडीला ' तूं-मीच गडी ! ॥ १५ ॥

# २४ नारायण केशव बेहेरे, बी. एस्. सी.

या कवीचा जन्म शालिवाहन शके १८१२ त ( इ० स० १८९० आगस्ट ) झाला. यांचें घराणें बरेंच दिवसांपासून मध्यप्रांतांतच नांदत आहे. हे नागपूर येथील ' मॉरिस मेमोरियल ' नांवाच्या खाजगी मिशनरी कॉलेजमध्यें ' सायन्स ' विषयाचे अध्यापक ' प्रोफेसर ' होते; हल्लीं भंडारा हायस्कूलमध्यें शिक्षक आहेत. यांची स्फुट कविता पुष्कळ असून ती वेळोवेळीं वि. ज्ञान विस्तार, मा. मनोरंजन, लोकमित्र व चित्रमय जगत् यांतून प्रसिद्ध झाली आहे व होत आहे. राधागीत, दुःखकहाणी, मी वगैरे खंड-काव्येंही यांनीं लिहिलीं आहेत.

यांच्या प्रेमळ पत्नी कै० वा० लक्ष्मीबाई बेहेरे यानांही काव्यरचनाचा मोठा नाद होता. मासल्याकरितां ह्मणून त्यांच्या एक दोन कविता दिल्या आहेत. रा० रा० बेहेरे यांनीं आपल्या प्रिय पत्नीच्या स्मरणार्थ ' स्मरणी ' नामक एक सुंदर काव्य लिहून तें नुकतेंच प्रसिद्ध केलें आहे. लक्ष्मीबाईच्या कविताही मा. मनोरंजन, आनंद, वगैरे मासिकांतून प्रसिद्ध झाल्या आहेत.

## १ युगांतर.

पद—[ चाल—अर्धतनू वारुळीं० ]

उठा मराठे ! उठा त्वरेनें झडवा हो नौबती ! ।
येउं द्या, राष्ट्राला जागृती ! ॥ ध्रु० ॥
अज्ञानाचा तिमिर लोपला ! विद्येला जागवा ! ।
आंधळ्या रूढींना घालवा ! ॥

बंधुत्वाचें प्रेमळ गाणें शिकवा साऱ्या जनां ! ।
होउं द्या, प्रीतीची गर्जना ! ॥
ऐकुनी गर्जना पळेल बेकी झणी ! ।
मग कर्णीं पडतिल आनंदाचे ध्वनी ! ।
नव विचार येतिल प्रत्येकाच्या मनीं ।
' देश आमुचा महाराष्ट्र हा ! अह्मीं मराठे खरे ! ।
स्मरणें प्रतिभा अमुची स्फुरे ! ॥ १ ॥

इतिहासाचीं रात्रंदिन जीं केलीं पारायणें ।
शिकविती तीं कां असलें जिणें ? ॥
आलस्याची घेउन दिवटी स्वतांस ओवाळणें ।
हेंच कां संतांचें सांगणें ? ॥
सुधारणेच्या नांवाखालीं परंपरा विसरणें ।
हेंच कां ज्ञानाचें शिकविणें ? ॥
हे डोळे उघडा निदान आतां तरी ।
तीं दिसतिल चित्रें पूर्वींचीं अंतरीं ! ।
मग होइल हृदयीं दृश्यें खळबळ खरी ! ।
उद्धरला हा देश जयांनीं, पूर्वज होते कसे ! ।
तयांचे वंशज रडके असे ! ॥ २ ॥

दिव्य काल जो गेला त्याची हृदयीं स्मृति हो धरा ! ।
मग भावि कालाला वश करा ! ॥
हिंदुत्वाचे डंके ज्यांनीं दुमदुमुनी झडविले, ।
ह्या महाराष्ट्राला उठविलें ! ॥
त्या शिवराया स्मरुनि, आपुल्या कर्तव्यातें करा, ।
कास हो यत्नांची परि धरा ! ॥
अर्पिले स्वदेशासाठीं ज्यांनीं गळे ।
ते पूर्वज अपुले शूर वीर मावळे ! ।
इतिहास-वाचनें सत्य आपणां कळे ! ।
त्या सत्याची जाणिव होतां वाटे, एकी करूं ।
स्वदेशा यत्नांनीं उद्धरूं ! ॥ ३ ॥

ते शिवबाचे दिन गेले; हें ' नवयुग ' आलें पुढें ।
प्रतीची-प्राची संगम घडे ! ॥

पूर्व-संस्कृती तत्वज्ञानी. मैत्रिण तिज लाधली ।
पश्चिमा व्यवहारी चांगली ! ॥
परस्परांची ओळख झाली, परस्परां वर्णिती ! ।
बोलती ' सुंदर ही संस्कृती ' !
कालिदास वेडी सारी प्रतीची करी ! ।
शेक्स्पीअर येथें ज्याच्या त्याच्या करीं ! ।
वाचुनी होतसे मोद किती अंतरीं ।
या भगिनींना बघुनी सृष्टी प्रेमानें डोलते ! ।
' पातलें नव युग ' हें बोलते ! ॥ ४ ॥
त्या तलवारी, भाले, बर्च्या, नकोत आजें आपणां ।
हालवूं ज्ञानाचा पाळणा ! ॥
श्रीकृष्णांनीं पुरा, थोरवी ज्ञानाची गाइली ! ।
कसा ती आज पुरी लागली ! ॥
भगवंताच्या वचामृताचें प्रेमें पानहि करा ! ।
अंतरीं स्फुरेल प्रीती-झरा ! ॥
त्या गीता-किरणीं न्हाली सारी धरा ! ।
वर्षाव सुधेचा झाला ह्मणती खरा ।
तो ग्रंथ महोत्तम आला अनुभव पुरा ! ।
सुधा सेवुनी प्रेमभरानें, अह्मी स्वधर्मीं मरूं, ।
ह्या महाराष्ट्रातें उद्धरूं ॥ ५ ॥
जॉर्ज नृपाच्या छत्राखालीं मूर्त शांति नांदते ! ।
आयुधां काम तरी कोणतें ? ॥
ज्ञान-करांनीं निद्रित अमुच्या राष्ट्राला जागवूं ।
मराठा प्रीतीनें मेळवूं ॥
सुधारणाही करूं आमुची परंपरा राखुनी, ।
स्वधर्मीं भाव पुरा ठेवुनी ! ॥
फडकवूं निशाण प्रीतिचें मग सोंवळें ! ।
मग चिरूं चरचरां अंध रुढींचे गळे ! ।
ऐकवूं जगा धर्मांचे डंके बळें ! ।
उठूं त्वरेनें, प्रेमें झडवूं ज्ञानाच्या नौबती ! ।
आणुं या, राष्ट्राला जागृती ! ॥ ६ ॥

## २ छाया.

पद—( चाल —कोणीकडून कोणीकडे० )

प्रभात समयीं मज दिसल्या । विशाल छाया पडलेल्या ! ॥
भीषणरूपा त्या बघुनी । मानस गेलें विदारुनी ! ॥
मला वाटलें त्यांना बघुनी ।
अंधारानें भरली अवनी ।
प्रश्न उद्भवे तदा मन्मनीं—
छाया कधिं ही सरेल कां । ? प्रकाश मजला दिसेल कां ? ॥ १ ॥

तेज रवीचें जों वाढे । छाया तों तों जगीं कुठें ! ॥
येतां भानू मध्यांत । प्रकाश पडला जगतांत ! ॥
दीप जगाचा बघतां सगळीं ।
विशाल रूपें लुप्त जाहलीं ! ।
अणुरेणूपरि सारीं बनलीं ! ।
छाया मजला त्यावेळीं । दिसली माझ्या पदां-तलीं ! ॥ २. ॥

छाया वाढे तसू तसू । येती नयनीं तदा असूं ! ॥
बघतां वरती मज कळलें । कारण त्याचें तें सगळें ! ॥
अंबरमध्यापासुनि ढळला ! ।
दिव्यवैभवा भास्कर मुकला ! ।
पश्चिमभागीं येउं लागला ! ।
संध्यासमयीं पुन्हां मला । विशाल छाया त्या दिसल्या ! ॥ ३ ॥

ज्ञानदीप तो मावळला । प्रकाश भूवरचा सरला ! ॥
स्वैर विहरती मग छाया । पसरविती अपुली माया ! ॥
राज्य रवीचें जगतीं सरलें ! ।
सर्वांवरचें दडपण गेलें ! ।
दिशा दाविण्या कोणी नुरलें ! ।
वेडा मी त्या अंधारीं । स्वैर हिंडलों दिशा चारी ! ॥ ४ ॥

## ३ नश्वर देह !

" How frail is human life ! "

पद—( चाल–भूपति खरे त० )

हा देह आपुला क्षणभंगुर टिकणारा ।
आयुष्य संपतां धुळीस हा मिळणारा ! ॥ १ ॥

नव पुष्प उगवलें, क्षणांत परि कोमजलें !।
तें बहार सरतां सुकुनी, गळुनी गेलें !! ॥ २ ॥

वा तारा पडतां प्रकाश क्षणभर पडला, ।
क्षण एक संपतां अंधकारही झाला ! ॥ ३ ॥

वा पृथ्वी अपुली सुंदर वसना ल्याली, ।
हा वसंत सरतां रुक्ष पुन्हां ही बनली ! ॥ ४ ॥

वा आहे दंव हें सुप्रभात समयाचें।
रविकिरण चमकतां तेज लोपलें याचें ! ॥ ५ ।

बुडबुडा जलचा क्षणभर टिकला, दिसला !
जल कंप पावतां लहरींनीं हा फुटला ! ॥ ६ ॥

आकृती नभीं वा मेघांचीही बनली, ।
परि वायु वाहतां क्षणांत लुप्तचि झाली ! ॥ ७ ॥

परि वात संपला, तसा बुडबुडा फुटला, ।
दंव बिंदु आटले, वसंत ग्रीष्मीं डुबला, ॥ ८ ॥

तारका निमाली, गंध जाय कुसुमाचा, ।
आयुष्य संपतां विसर पडे मनुजाचा ! ॥ ९ ।

# कै. वा. सौ. लक्ष्मीबाई बेहेरे.

जन्म १८९७. मृत्यु १९१४.

## १ उद्यान.

-०-०-

पद (चालः--भूपती खरें तें-)

दिवस तो स्मरे मज पूर्णपणें गे ताई।
उद्यानिं फिराया एके दिवशीं जाई ॥ ध्रु० ॥
तुज शोभा सांगू तेथिल कवण्या बोलें।
आनंदें वाटे बाग सर्व कीं डोले ॥
शोभती वृक्ष चहुं बाजू, साजिरे।
कारंजें खुललें तेथें, गोजिरें।
चुंबिती लता कुंजांना, मोगरे।
साम्राज्य प्रीतिचें चाले वाटे ताई।
उद्यानिं फिराया एके दिवशीं जाई ॥ १ ॥
हीं सुंदर कुसुमें हास्यमुखानें बघती।
ह्या लता तरूंना आलिंगुनियां धरिती ॥
वृक्षावरि पक्षिकुलें तीं, येउनी।
आनंदित करिति जनांला, गाउनी।
तीं त्यांचीं मंजुळ गीतें, ऐकुनी।
साम्राज्य प्रीतिचें चाले वाटे ताई।
उद्यानिं फिराया एके दिवशीं जाई ॥ २ ॥
हा गुलाब फुलला सुंदरता बागेंत।
बहु मोद अम्हांला मधुर सुगंधें देत ॥
हे मधुकर काळे तेथें, येउनी।
पुष्पांतिल मधुर रसातें, प्राशुनी।
बागडती स्वैरपणें ते, पाहुनी।
साम्राज्य प्रीतिचें चाले वाटे ताई।
उद्यानिं फिराया एके दिवशीं जाई ॥ ३ ॥

## २ ‘ ना कळे ’

पद—( चाल—नृपममता रामा० )

ह्या जलांत लपल्या कमला।
मधु गंध कुणी गे दिधला ? ॥ ना कळे ॥
नाभींत मृगाच्या राही।
कस्तुरी कशी ती बाई ! ॥ ना कळे ॥
वेडावी कोकिल-गान-।
मधुर कंठ देई कोण ? ॥ ना कळे ॥
दावुनी कृष्ण मेघांना।
नाचवी कोण मयुरांना ? ॥ ना कळे ॥
रवि-चंद्र, अखिल हे तारे।
निर्मिलें कुणीं जग सारें ? ॥ ना कळे ॥
हा देह-मी कशी झालें ?।
कोठुनी भूवरी आलें ? ॥ ना कळे ॥
‘ चालक तो देव जगाचा ’।
परि अर्थ मला ‘ देवाचा ’ ॥ ना कळे ॥
अज्ञान पुरी मी वेडी !।
सुटतील कशीं हीं कोडीं ! ॥ ना कळे ॥

# २५ आनंदराव कृष्णाजी टेकाडे.

• यांचा जन्म शालिवाहन शके १८१३ (इ० स० १८९१) त झाला. नागपूर जिल्ह्यांतील मोहोपा हें यांचें मूळ गांव होय. यांचें मराठी प्राथमिक शिक्षण आपल्या मातुलगृहीं बापेवाडा येथें झालें व इंग्रजी नागपूर येथें झालें. यांची स्फुट कविता फार असून ती महाराष्ट्रांतील ठळक ठळक मासिकांतून प्रसिद्ध झाली आहे व होत आहे.

## १ प्रभु-कृति.

पद—( चाल–ईश्वर पंकज० )

मधु सौरभयुत चंपक अभिमत अलिस न होय परी।
प्रभु-कृती रुचिर सारी। नवल भारी! ॥ ध्रु० ॥
हंसे रुसे शिशु जननिसवें।
भुले डुले अहि गान-रवें।
प्रतिदिनिं विधु घे रूप नवें।
निसर्ग सुंदर गुलाब तरुवर कंटक अंगिं धरी।
प्रभु-कृती रुचिर सारी। नवल भारी! ॥ १ ॥
वीज घनांतुनि घे जनन।
सलिलापासुनि कृष्ण घन।
उदया ये सरिं कमलवन।
मौक्तिक सागरिं शिंपे भीतरिं कैसा वास करी?।
प्रभु- कृती रुचिर सारी। नवल भारी! ॥ २ ॥
घनांबु पी खग चातक तो।
हंस जलांतुनि पय घेतो।
कोकिल पंचम गुणगुणतो।
नभिं कादंबिनि केकि विलोकुनि हर्षें नृत्य करी।
प्रभु-कृती रुचिर सारी। नवल भारी ॥ ३ ॥
रत्न फणीच्या शिरिं विलसे।
सागरजठरीं अनल वसे।
मृग-नाभीं मधु गंध असे।
शुष्क होय जरि बकुल पुष्प तरि परिमल तो विखरी।
प्रभु-कृती रुचिर सारी ॥ ४ ॥
रवि बघतां कमलिनी हंसते।
चंद्रागमनें ती रुसते।
दुजि तितक्यांतचि स्मित करिते।
क्षितिंच्या अंबरिं नभिंच्या भूवरि फेरी मेघ करी।
प्रभु-कृती रुचिर सारी। नवल भारी ॥ ५ ॥

कुठुनि भुवनिं ये जीवतति ? ।
जाइ कुठें मग परतुनि ती ? ।
मिळे कोणती स्थिति पुढतीं ? ।
मीन जलांतरिं झोंप खरोखरि घेई कैंवि तरी ? ।
प्रभु-कृती रुचिर सारी । नवल भारी ! ॥ ६ ॥

गिरि-शिखरावरि हिम चमके ।
तृणांकुरांवरि दंव झळके ।
रंग रूप त्यां साम्य निकें ।
एक अमर जनिं मरण दुज्या क्षणिं, अंतर उभयिं परी ।
प्रभु-कृती रुचिर सारी । नवल भारी ! ॥ ७ ॥

हांसे ताराकुल तिमिरीं ।
दिव्य फुलें जणुं नील सरीं ।
शांत सृष्टिला मुदित करी ।
उषेस बघतां सर्व रुचिरता विलया जाइ परी ।
प्रभु-कृती रुचिर सारी । नवल भारी ! ॥ ८ ॥

रवि शशि उगवति गगनिं, तरी ।
क्रीडति ते ह्या धरेवरी ।
लघु वंशी जग मुदित करी ।
रवि सकलांतर तोषवितो परि भीती घूक धरी ।
प्रभु-कृती रुचिर सारी । नवल भारी ! ॥ ९ ॥

मुग्ध बहर ये तरुवरती ।
सुंदर पुष्पें मग फुलतीं ।
फल तयांचीं मधु बनती ।
बाला, तरुणा, वृद्धा भुवना स्थिति ये नित्य खरी ।
प्रभु-कृती रुचिर सारी । नवल भारी ! ॥ १० ॥

दीप लाजवी तिमिराला ।
चंद्र लाजवी दीपाला ।
दिनकर लाजवि ह्या सकलां ।
मत्कुणसंगें हीरक भंगे, न चले तर्क तरी ।
प्रभु-कृती रुचिर सारी । नवल भारी ! ॥ ११ ॥

रंगभूमि धरणी-पट हा ।
अगणित पात्रें नटुनि अहा ! ।
क्षणभर हंसती रडति पहा ! ॥
लयास जाती जगास दाविति नश्वरता सारी ।
प्रभु-कृती रुचिर सारी । नवल भारी ! ॥ १२ ॥
काल जातसे पुढें पुढें ।
सत्कृति दुष्कृति त्यांत दडे ।
प्रकटवि जगिं तो जें अवडे ।
जें भक्षियलें जें देखियलें सकल तया जठरीं ।
प्रभु-कृती रुचिर सारी । नवल भारी ! ॥ १३ ॥

---

## २ रजनी-चंद्राचा मंगल विवाह.

पद—( चाल–पुष्पें वेंचूनी० )

प्रेमें पाहूनी । हिमकर नयनों । सजली रजनी नटुनिथटूनी ॥ ध्रु० ।
शुभ्र रुपेरी । वस्त्रधारिणी । शोभे गौरी । जगुं ही तरुणी ॥
चर्चि विभूती । धवल तनू ती । चंद्र धूर्जटी । विलसे सुगुणी ॥
वायूचा हा सुबक मनोहर शोभे अंतर-पाट ।
प्रेम-ग्रंथि दृढ करि उभयांची चकोर गाउनि पाठ ॥
सुस्वर गायन । सुंदर नर्तन । करिति विलोकुन । सुररमणी ॥
मोद पसरला । भूवरि खुलला । नभों रंगला । बहुपरिंनीं ॥ १ ॥
विवाहकालीं । मस्तकिं आली । अक्षदावली । चोंहीकडुनी ॥
भूवरि पडल्या । सुमनें बनल्या । तारा झाल्या । वरती गगनीं ॥
अष्ट दिशा ह्या करवल्या पहा विनोद करिती फार ।
वऱ्हाड मंडळ विश्व लीन हें आनंदांत अपार ॥
त्या मोदाला । मोहुनि गेला कवि हा बनला । भाट जनीं ॥
मंगल गायनिं । वधुवर गुंफुनि रसिकां अर्पुनि । धन्य गणीं ॥ २ ॥

# २६ श्रीधर बाळकृष्ण रानडे.

हे कवि आपली कविता 'श्रीधर' या नांवानें प्रसिद्ध करितात. यांचा जन्म शालिवाहन शके १८१४ ज्येष्ठ शु. ९ स (इ० स० १८९२ जून ४) झाला. सातारा जिल्ह्यांतील इस्लामपूर हें यांचे मूळ गांव होय. यांचे वडिल तेथें वकील आहेत. श्रीधरांचें प्राथमिक शिक्षण कांहीं मध्यप्रांतांत आजोळीं व कांहीं गांवींच झालें. इंग्रेजी उच्च शिक्षण पुणें येथें फर्ग्यूसन कॉलेजांत होत आहे. यांची विद्यार्थी दशा अद्यापि संपली नाहीं. यांच्या पत्नी सौ० मनोरमाबाई रानडे या आज महाराष्ट्रांत चांगल्या कवयित्री असून त्या महाराष्ट्रास 'गोपिकातनया' या नांवानें सुपरिचित आहेत. त्यांच्या कविताही पुढें दिल्या आहेत. श्रीधरांच्या स्फुट कविता बऱ्याच असून त्यांपैकीं कांहीं मासिक मनोरंजन व लोकमित्र यांत प्रसिद्ध झाल्या आहेत. 'कालाच्या दाढेंतून' या नांवाचें एक खंडकाव्य यांनीं नुकतेंच प्रसिद्ध केलें आहे. 'मनी' ही यांची पहिली कविता असून ती त्यांनीं इ० स० १९११ त लिहिली.

## १ प्रातःकाळीं पडलेलें इंद्रधनुष्य.

(चाल—चंद्रकांत राजाची०)

गगनश्रीच्या हस्तांतिल कां कंकण हें चमके।
रत्नखचित जें सप्तजातिच्या किरणांनीं झळके ॥
सागरदर्पणिं पाहुनि कुंतल पश्चिमदिग्देवी।
विंचरतांना रविला पाहुनि वरि गजरा खोवी ! ॥
गजऱ्यांतिल तीं फुलें-तारका-इतस्ततां पडलीं।
रंगी लोंकर मात्र त्यांतली ही कां उरलेली ! ॥
भानुचिंतनीं निमग्न झाली पश्चिमदिग्बाला।
भान न राहुनि उलट लावि कां कोर कपाळाला ! ॥
सौदामिनिशीं बोलत बसला रवि तें बघण्याला।
वक्रा भ्रूकुटी करुनि दुजी कां डोकावी बाला ? ॥
रविकर वरवर बघतां भासे धवल खरा योगी।
मेघांचे उपनेत्र चढवितां पुरा खुले रंगीं ? ॥

सलिलबिंदुशीं विवाह झाला रविकर-देवाचा ।
अंतः पट तइं धरला होता सुवर्णमेघाचा ॥
पापि जनांची या भूवरल्या दृष्ट न लागावी ।
म्हणुनी गालीं कृष्ण ढगाची तीट कुणी लावी ! ॥
वनदेवींनीं तेव्हां सादर नाना रंगांचा ।
अर्पण केला शालु जरीचा अहेर प्रेमाचा ! ॥
आकाशाच्या दांडीवरती कोणी वाळविला ।
तो शालू हा, इंद्रधनू नच; भास तुम्हां झाला ! ॥
पूर्व दिशेशीं क्रीडा करुनी अस्ताचालिं आला ।
मागें वळुनी इंदु पाहतो; नवल दिसे त्याला ! ॥
पूर्व दिशेशीं कुजबुजणाऱ्या रविला पाहोनी ।
कोप वाढुनी रक्तपणा ये चंद्राच्या वदनीं ! ॥
म्लान वदन मग भानु आपुलें मेघपटालिं लपवी ।
इंद्रधनू नच, भिन्नरंगयुत कोर चंद्र दावी ! ॥
नंदनवनिंची ही कां देवी ओणवली खालीं ।
या भूवरचीं मोहक कुसुमें वेंचाया आली ! ॥
इतर सुवासिक मोहक कुसुमें देतिल वृक्षलता ।
नाना कविवर अर्पण करतिल मनमोहक कविता ! ॥
रूपहीन हीं गंधहीन परि प्रेमानें दिधलीं ।
ह्मणुनि देवते घेउनि यांना ठेव तुझ्या जवळी ! ॥

---

## २ माझा मृत्यु.

पद—( चाल—दो दिवसाची० )

भूमीवरती मरण नको मज मृत्यु येउं दे जलडोहीं ।
मध्य सागरीं, नीच मानवा थारा जेथें मुळिं नाहीं ! ॥
भीषण नर्तन लाटासंगें करिल कलेवर मोदानें ।
देइल धडक्या तें खडकाला धडाधडा मग हौसेनें ! ॥
डोळे फाडुनि बघतिल मासे ‘ येइ काय हें आज नवें ।
धीर धरोनी चढुनि खेंकडा तुकडे तोडिल नवे नवे ! ॥

जलचर हंसवित, मीहि हंसत मग जाऊं अगदीं खोलतळीं
सागरवेली स्वागत अमुचें करतिल घालुनि हार गळीं ! ॥
वाट दाविती अनेक जलचर दिवट्या हातीं घेवोनी ।
वेतन घेती परी अगोदर लचका सुंदर तोडोनी ! ॥
नानारत्नें जिथें विखुरलीं मिळे बिछाना निजण्याला ।
नावेचा तो फुटका नांगर उशी मिळतसे डोक्याला ॥
अंगावरती वेली डुलई सृष्टि ह्मणतसे अंगाई ।
निद्रा लागे अनंतरात्रीं झोंपमोडही मुळिं नाहीं ! ॥
असा मजेचा मृत्यु हवा मज कोण भितो त्या मरणाला ? ।
आनंदानें जाइन तेथें भिऊं कशाला सौख्याला ॥ १ ॥

* * *

नसे नशीबीं मरण सागरीं ? असो ! येउं दे वनीं तरी ।
निबिड तरूंच्या राजीमध्यें निर्झरकांठीं कुठें तरी ! ॥
गळुनि पडलीं पिंवळीं पानें मिळे तयांचें अंथरुण ।
कोळी जाळें विणील वरती होइल खासें पांघरुण ! ॥
सळसळ करुनी नाग येउनी छत्र फणेचे वरी धरी ।
घों ! घों ! करुनी भोंवति माशा गोष्टी करतिल परोपरी ! ॥
माना घालुनि लता खालती टेंकुनि वृक्षावर गाल ।
कींव येउनी अश्रू ढाळित उभ्या राहतिल चिरकाल ! ॥
फांद्या कडकड करुनी तरुवर दावि मनोगत यावेळीं ।
पाया जवळीं स्तब्ध बसोनी मूक रुदन करि कुणि वेली ॥
मंजुरवानें गाणीं गातिल अखेर मजला पक्षिगण ।
धरील निर्झर ताल हळुं जणुं स्वर्गीं गाई देवगण ! ॥
मयूर तांडव करील तेथें, गातिल मैनाही कांहीं ।
गातिल वेली गातिल तरुवर, गातिल कोल्हीं घुबडेंही ॥
गिरिवर त्यांना प्रतिध्वनी दे, गाना उत्तेजन देतो; ।
गाइल सगळें रान मला मग अशा मृत्युला कोण भितो ! ॥ २ ॥

* * *

नसेल हेंही सुख देवीं तरि मृत्यु येउं दे घरीं मला ।
मांडीवरती शिर मातेच्या ठेउनि सोडिन प्राणाला ! ॥
कुरवाळिल मम केंस पुन्हां ती मुख प्रीतिनें चुंबोनी ।
अंग लागतें कढत तरी कां पाहिल आशा धरुनि मनीं !

माया वेडी, आशा थोडी, प्रेमपाश करि मन वेडें ।
डोकें अपटुनि ताडदिशी, ती रडेल फोडिल हंबरडे ! ॥
फुटेल पाझर दगडालाही काय कथा मग मनुजाची ।
प्राणिमात्रही रडेल सगळें किंमत कळुनी प्रीतिची ! ॥
पिता बिचारा विषण्ण होउनि राहिल स्तब्धचि बैसोनी ।
कुणा दिसे जो प्रचंड वणवा धडधड पेटे क्षुब्ध मनीं ! ॥
अंतःकरणा पीळ पडे तो दिसेल कैसा बाहेरी ।
विरहाग्नी परि आंत धुमसतो जाळित जातो खोलवरी ! ॥
हातातोंडा मुलगा येउनि ऐनसमयिं तो कसा गळे ।
गेली विलयां सुख स्वप्नें तीं उमेद मनिंची खाक जळे ! ॥
छे ! छे ! त्याचें वर्णन करणें शक्य तरी कां पंगु मना ।
वाणी थकते, मती गुंगते, रक्त गोठतें, क्लेश मना ! ॥
' टळला शत्रु, प्रतिस्पर्धि हा ' हंसतिल कोणी मोदानें ।
' गेला अपला मित्र विचारा ' रडतिल कोणीं दुःखानें ! ॥
आनंदानें मरेन मी पण, विरहदुःख मम लोकांला ।
करील वेडे असें वाटुनी, कांचरतो मी मरणाला ! ॥ ३ ॥
भगिनी तेव्हां गरिब बापुड्या बसतिल दोन्हीबाजूंला ।
अश्रु ढाळित बंधूसंगें पुनीत करातिल कायेला ! ॥
प्रेमाश्रूंचें स्नान लाधण्या पुण्य लागतें जन्मींचें ।
त्या प्रेमाची फेड कराया प्रेम लागतें स्वर्गांचें ! ॥
मम विरहानें बारिक झाला मिणमिण करितो एक दिवा ।
भयाण शांती, सर्व स्तब्धता, भेसुर होइल देखावा ! ॥
त्या समयीं मम काव्यसहचरी म्हणेल कवनें शोकानें ।
दुःखभरानें हृदय विदारुनि उडेल प्रीती जोरानें ॥
येइल गानीं खरें काव्य तें, नसे तयाला गणमाला ।
हृदय बोलतां, होइल कविता; जी पिळवटते जनाचित्ता ! ॥
मम विरहानें वेडी होइल किंचित्कालापर्यंत ।
दुसरा प्रेमळ आत्मा मिळतां होइल मग्ना मोदांत ! ॥
परंतु मोहक त्या गानाचें वेड लागलें जीवाला ।
गान ऐकण्याविना सुचेना दुसरें कांहीं चित्ताला ! ॥
मरेन मग मज मिळेल कोठुनि ! मुकेन मी त्या कवितेला ।
असें वाटुनी अस्थिर होतों, कांचरतों मी मरणाला !!! ॥ ४ ॥

# २७ शंकर केशव कानेटकर.

या कवीचा जन्म शालिवाहन शके १८१५ अश्विन कृष्ण ४ स (इ० स० १८९३ आक्टोबर २८) झाला. सातारा जिल्ह्यापैकीं रहिमतपूर हें यांचें मूळ गांव होय. यांचें मराठी प्राथमिक शिक्षण गांवींच होऊन इंग्रेजी सातारा व पुणें येथील न्यू इंग्लिश स्कूलमध्यें झालें. उच्च शिक्षण, अद्यापि, ते संपादित आहेत. यांच्या स्फुट कवितांचा संग्रह बराच असून त्या 'गिरीश' या काव्यमय नांवानें रत्नावली, करमणूक, विहार, उद्यान व चित्रमयजगत् यांतून प्रसिद्ध झाल्या आहेत. 'उर्वशी' नांवाचें एक महाकाव्य सध्यां ते लिहीत आहेत. श्रीशिवाजीवंदन ही यांची पहिली कविता असून ती त्यांनीं इ० स० १९०८ मध्यें लिहिली.

## १ *रामाचा आत्मसाक्षात्कार.

श्लोक. (वृत्त—शार्दूलविक्रीडित)

" चाले भागिरथी पवित्रसलिला आकाशगंगेपरी ।
फूं फूं फूं करुनी तुडुंब भरुनी ती नृत्य येथें करी ॥
ओती तारक बिंदु ते खळखळा फेसांतुनि सुंदर ।
गाई मंजुळ गान ! गोड किति ती गौलाइ चेतोहर ॥ १ ॥
सारी ही वनराइ दाट बसली तीरावरी भोंवतीं ।
पुष्पांची मधिं दंतपंक्ति विलसे हासे यदा मंजु ती ॥
वेदांचा जयघोष निःस्वनिंच कीं संलापिती पक्षि ते ।
' एकत्वांत ' विरे जगत् सकल ' ॐतत्सत् ' तरी नादतें ॥ २ ॥
वेदांनों ! अजि कार्य होय तुमचें आनंद, आनंद मी ! ।
ब्रह्मानंदसमीर हा विखुरला ' एकैक विश्वाश्रमीं ' ॥
मायेचीं पटलें कुठेंच नुरलीं दिव्यप्रभा सर्व ती ।
वर्णाया रसने ! खरीच अबला तूं ही प्रमोद स्थिती ॥ ३ ॥

* श्रीमत् स्वामी रामतीर्थ हे 'एकमेवाद्वितीयम्' या स्थितींतून परत आल्यावर त्यांनीं आपल्या आत्मसाक्षात्काराचें वर्णन काव्यमय लेखांत केलें आहे. त्याचा सारांश या कवितेंत आहे.

माझें या जगतीतलांवर अतां साम्राज्य सारें वसे ।
होई मी कृतकृत्य! धन्य! सगळें ऐश्वर्य माझें असे ॥
अज्ञानावरणेंच दर्शन तुझें अस्पष्ट हो माधवा! ।
झाला योगचि आज पूर्ण तुजशीं विश्वेश्वरा केशवा! ॥ ४ ॥
निवृत्ति स्वयमेव होउनि तुला डोळाभरें पाहिलें ।
गाढालिंगन पूर्ण आज तुजला अश्रुप्रवाहीं दिलें ॥
चर्माचें हृद तें विलोपुनि, विरे 'एकान्तरीं' निर्मल ।
झालें 'एकचि' तेंवि जीवशिव ते! आनंद! 'ॐ!!' उज्वल ॥५॥
आनंदाश्रु कितीक लोचनिं तरी हे सारखे वाहती ।
माये दूर!! जगीं अतां स्थिरचरीं 'कृष्णध्वनी' नादती ॥
झालें जीवन गोड, राममय हें! नांदे खरी शांतता ।
होतां 'एकचि अद्वितीय' मग ही सर्वैक–तादात्म्यता ॥ ६ ॥
कीं ही मंगलता विवाहविधिची? हा शोक मन्मृत्युचा ।
संस्कारांवरि काय अंत्य परि हा संस्कार हो स्वर्गिचा ॥
मेल्या सर्वचि कामना! सकल तें दारिद्र्य ही लोपलें ।
किंवा 'ध्वांत नुरे प्रकाशकिरणीं' तैसें अतां जाहलें ॥ ७ ॥
गेलें पापचि! पुण्य सर्व सरलें! त्यांचा नुरे थांगही ।
होतां चित्त विलीन जाय विलया चांचल्य वा स्तोमही ॥
वृत्ती उन्मन हो कृपाचि सगळी ही होय रामावरी ।
रामीं राम रमे, मनोरम गमे 'ॐकार' रामान्तरीं ॥ ८ ॥
माझा मी जरि मित्र पाठवुं तरी कोणां अतां पत्र तें ।
ब्रह्मानंदनिमग्न मीच फिरवीं सूत्रीं स्वयें विश्व तें ॥
द्वैताचा करुनी विनाश पुरता 'अद्वैत' हो मूर्त मी ।
व्योमीं पक्षि विलीन होय, उडतां जैसा सुरम्याश्रमीं ॥ ९ ॥
श्रीकृष्णा जरि वेगळा समजलों, मी तोच आतां परी ।
विश्वाचा अधिकारि मी; सकल तें माझेच रूपान्तरीं ॥
कीं वर्षाऋतु, अश्रुपात नयनीं हा, भावनेचा हृदीं? ।
कीं शून्यत्व जगांत सर्व पसरे! मी शून्य शून्यामधीं ॥ १० ॥
राहो निर्गुणरूप एक सगळें विश्वास या व्यापुनी ।
दिक्कालांतुनि दिव्य एकचि निघे 'श्रीकृष्णकृष्ण' ध्वनि ॥
झाला आज कृतार्थ, धन्य सगळे! हे इंद्रियांनो! अतां ।
होई धन्यचि मोद! 'धन्य' वच हो धन्य स्वयें तत्वतां ॥११॥

## २ वनदेवीचें गाणें !

पद—( चाल—आनंदीआनंद० )

“ चला चला ग पाण्याला । गात गात मधु गानाला ॥
जलकुंभ करीं घेवोनी । चला गडे झणिं कुंजवनीं ॥
प्रभात गोपींनों ! झाली । अरुणाची लाली फुलली ॥
विहंगरव नच हा झाला । मुरलीचा मधु रव आला ॥
वसंत अपुला खेळगडी । सृष्टीवर चित्रें काढी ॥
फुलांमधें तो लपलेला । करी सदा मोहन-लीला ॥
चोंहिकडे तो पसरि फुलें । नाजुक पुष्पांचें जाळें ॥
बैसुनिया वृक्षावरती । मृदुल फुलें मारील किती ॥
तेच फुलांचे मृदुबाण । हरतिल हृदयाचें भान ॥
करुनि तुह्मां वेडें वेडें । हिसकाविल जलकुंभ गडे ॥
पाहुं नका इकडे तिकडे । ना तरि हृदया भूल पडे ॥
हिरव्या गालीच्यावरुनी । निर्झरकुंजीं चला झणीं ॥
नका भुलूं त्या लीलेला । चला सयानों ! चला चला ” ॥ १ ॥
“ फुलवेली ! तूं हंसत गडे । काय राहसी उभी पुढें ॥
पुष्पांचें पातळ नेस । लाग गडे चालायास ॥
लतिके ! बाई डोलुनिया । काय पाहसी तरुवरि या ॥
हिरवा शालू नेसोनी । कुंभ फुलांचे घेवोनी ॥
झांकुनिया पदराखालीं । हळूच उतरुन ये खालीं ॥
कलिकांचे पैंजण पायीं । नादवीत चल गे बाई ॥
कलिके ! काय वदूं तुजसी । झोके आनंदें घेसी ॥
मंदानिलसंगें लीला । पुरे जाहली कीं न तुला ॥
सोड तया ग ये खालीं । सख्या उभ्या तव भंवतालीं ॥
दंव-बिंदूंचा मणिहार । गळां घालुनी, ये, उतर ॥
मुग्ध आपुल्या मधुस्मितें । हंसवि गडे तूं जगतातें ॥
अर्थ तुझ्या मधु हंसण्याचा । उकलिल कोणी प्रेमाचा ॥
निर्झरिणी ! अपुलीं गाणीं । प्रेमाचीं वनिं गावोनी ॥
चाल गडे सखिच्या संगें । रहस्य त्यांतिल गे सांगे ॥
खळ खळ खळ खडकांमधुनी । गाणें गाउनिया रानीं ॥

घेउनि बुद्बुद् कुंभ करीं । गाण्याच्या ओतुनि लहरी ॥
सर्व जगाचें मनोमन । एक करीं तूं रिझवून ॥
दिव्य प्रेमाचें रान । तुजपुढतीं आहे छान ॥
प्रेमाचे घुटके जगता । पाजुनि जा जातां जातां ॥
निर्झरास चल भेटाया । आनंदानें जाऊं या ॥
उषे! रक्त कां तूं बाई? । कुणा लाजशी इतुकी ही? ॥
सविता येइल म्हणुनी कीं-। प्रेमाची लाली इतकी? ॥
चंद्रकोर ही मावळती,- । कळशी घेउनिया हातीं ॥
उतरुनि ये खालीं खालीं । प्रेमाच्या क्षितिजा जवळीं ॥
जाऊं या ' निर्झर-कुंजी ' । ऐकाया निर्झर-गुंजी ॥
चला सयानों! पाण्याला । चला चला ग चला चला "॥ २ ॥
वळणें वळणें घेऊनी । निर्झर खेळें रानिंवनीं ॥
तरंग लहरीवरि फेस । मोत्यांचे सारे घोस ॥
त्या मोत्यांच्या करूं माला । ' निर्झर-कृष्णा ' अर्पुं चला ॥
मोतिं तयाचीं घेउनि तीं । तयास अर्पूं निजहस्तीं ॥
प्रेमध्वनि येई ऐका! । टिपरीचा चाले ठेका ॥
रासक्रीडा प्रभातची । चाले त्याची प्रेमाची ॥
मंजुळ मुरलीचा नाद । उठवी हृदयीं पडसाद ॥
प्रेमाच्या एकत्वांत । विलीन हृदयें मिळतात ॥
मिळवूं या हृदयें अपुलीं । जाउनिया एकामेळीं ॥
प्रेमसख्यानों! तरी चला । भेटूं ' निर्झर-कृष्णाला ' ॥
चला सयानों! पाण्याला । चला चला ग चला चला " ॥ ३ ॥

# २८ भास्कर नानाजी शिंदे.

सुप्रसिद्ध कवि कै. वा. दिनकर नानाजी शिंदे ( इंदुकांत ) यांचे हे कवि बंधु होत. यांचा जन्म सातारा येथें शालिवाहन शके १८१७ भाद्रपद कृष्ण ८ स (इ. स. १८९५ सप्टेंबर १० ) झाला. यांचें मराठी व इंग्रेजी प्राथमिक शिक्षण गांवींच झालें; उच्च शिक्षण अद्यापि संपादित आहेत. स्फुट कविता पुष्कळच लिहिली असून ती वेळोवेळीं उषा, चित्रमयजगत, मनोरंजन, काव्यरत्नावली, वगैरे नामांकित मासिकां-

तून प्रकाशित होत आहे. हे आपली कविता ‘ अरविंद ’ या नांवानें प्रसिद्ध करितात. त्यांच्या कांहीं कविता ‘ प्रद्युम्न ’ या नावानेंही छापून निघाल्या आहेत. ‘ उषःकाल ’ ही यांची प्रथम कविता असून ती त्यांनीं इ. स. १९१२ त लिहिली. यांनीं ‘ विहंग-संगीत नांवाचें एक खंडकाव्य लिहिलें आहे. खालील वेंचा त्याच काव्यांतील आहे.

## १ चंडोल.

चाल—(वायुपरी मी पूर्वीं होतों०)

गा चंडोला मंजुळ बोला वेळ आज तूं कां केला? ।
निशा उडाली उषा उदेली फुटें तांबडें पूर्वेला! ॥ १ ॥
शुक्रतारका मनोहारिका तळपे गगनीं बघ अजुनी ।
विचार तीचा मावळण्याचा दिसतो तुजला उठवोनी ॥ २ ॥
कांतिकरानें देहमनानें, ‘ ऊठ, असा ये इकडोनि !! ’ ।
खुणवी तुजला पहा प्रेमळा, गगनाच्या चौकामधुनी! ॥ ३ ॥
वारा वाहुनि दे उधळोनी सुगंध विश्वीं फुलांतला, ।
मरंद ओतुनि खालीं त्यांतुनि अभिषिंची तो वसुधेला! ॥ ४ ॥
फुलें दंवाचीं कोमल तनुचीं जाणुनि मृदु तव देहाला ।
मारी वरुनी गगनामधुनी—तरि न आंवरे झोंप तुला? ॥ ५ ॥
विहंगराया सोडुनि शय्या ऊठ, ऊठ तूं हो जागा! ।
सोड नीड तें पहा जगातें, आनंदी करिं त्या सुभगा!! ॥ ६ ॥
गुच्छ फुलांचे प्रसन्नतेचे मूर्तिमंत अवतार जसे ।
गंधस्फूर्ती तुजला देती,“दिव्यचारणा, गाइं कसे! ॥ ७ ॥
बघसि? भुकेल अंबर झालें मुका न त्या किंति वेळ दिला!— ।
जा—जा लवकर वेइं मनभर मुके तयाचे, चंडोला! ॥ ८ ॥
झाड पिसारा अपुला सारा मार भरारी गगनातें ।
त्यासह नेइं माझें चित्तहि गुंगवीत गानें तेथें! ॥ ९ ॥
गा! विहगा गा! हेंच सूर गा !!—गातचि गगनोदरीं उडे ।
त्या गानांनीं येइल तरणी मोहुनिया त्रा तुझ्याकडे! ॥ १० ॥
स्वर मित्राचा ऐकुनि ज्याचा हृदयसिंधु नच खळबळला ।
मित्र कशाचा ढोंगी साचा दिसावयाला तो बगळा! ॥ ११ ॥

आवड राही सूर्याठायीं मित्र असे तो तव चतुरा।
तूं आलेला पाहुनि त्याला परममोद होईल खरा! ॥ १२ ॥
आवड जेथें मोहहि तेथें आवड मोहाच्याचि सवें।
मोहचि नाहीं जेथें कांहीं आवड कैची मग बळवे? ॥ १३ ॥
मोह-आवडी-अभेद्यजोडी-स्नेहाचें फळ ठेवि करीं।
ज्याच्या अशनें हृदयबंधनें होतीं बळकट सर्वपरीं ॥ १४ ॥
मित्र म्हणावा ज्यांत दिसावा मूर्तिमंत आत्मा अपुला।
भिन्न शरीरीं एक मनिं परी, मूर्तामूर्तत्त्व न त्याला !!– ॥ १५ ॥
कर वायूचें मंडल, त्याचे फिरकत फिरकत जा वरुनी।
मार भराऱ्या मार लकेऱ्या, गा-गाउनि उठवी तरणी; ॥ १६ ॥
पूर्वेकडच्या कुंजवनींच्या उदयोदधिंच्या मृदुशयनीं।
उषासखीला घेउनि निजला, जा-जा उठवी त्यास झणीं! ॥ १७ ॥
कर्तव्याचा तो घटनेचा आहे अधिपति विश्वाचा।
उठवी त्याला! पाहि सृष्टिला विलंब झाला केव्हांचा! ॥ १८ ॥
निजशीर्षींचा तुरा पिसांचा हलवित हलवित जा पुढतीं।
जातां तेथें हळूंच त्यानें उठवी तो रवि जगत्पती! ॥ १९ ॥
परि जातांना जडाजडांना अंगाई जा गावोनी।
बाळें तान्हीं असती अझुनी बसतिल नातरि रडत मनीं! ॥ २० ॥
गानलयाच्या आंदोलाच्या वरी बसवुनी त्या सकलां।
दे तानांचे दूरदूरचे तूं झोंक्यावर झोंक्यांला! ॥ २१ ॥
आलापांचे–मऊ सुताचे-धागे विणुनी करिं दुलई।
पांघरूण त्या घालीं सखया त्यांतें तूं नच अवहेलीं ॥ २२ ॥
गमे न मजला विहंग साचा अससिल चंडोला तूं रे।
सरस्वतीच्या वीणा करिंचा वाटे मजला हेंचि खरें! ॥ २३ ॥
हा तानांचा-तत् झंकृतिचा-सूर, उलगडा हा पडतो।
ध्वनिमय होते भू, नभ वरतें, ब्रह्मगोल गानीं विरतो. ॥ २४ ॥
भानभान तव जाइ गायनीं तसेंच मरणाचें मरणें।
मोदाला दे मोद ‘ मोद ’ जग आनंदी आनंद बने! ॥ २५ ॥
गानाचा हा अतर्क्य महिमा वर्णावा कुणि वाणीनें।
हृदयातें तो ठावा, निघतो मनोवृत्तिच्या नव कृतिनें ॥ २६ ॥
तूं थोरांची प्रतिमा साची-उडे- भ्रमे नच ' जीव तुझा।
शून्यचि पुरता होशिल करतां कृतींतुनी तव देह वजा! ॥ २७ ॥

महाकवींची प्रतिभा दिव्यचि तुझ्यांत अवतरली गमतें !— ।
तूं स्वर्गींचा दूत कधींचा–प्रिय तूं साऱ्या विश्वातें !! ॥ २८ ॥
अस्फुट गानीं-नच तव कवनीं—प्रणवरवापरि गूढ वसे !
जीवित तूझें मनोज्ञ साजे, हृदयांदोलक काव्य जसें ! ॥ २९ ॥
धन्य तुझी ती ईश्वरभक्ती ! धन्य तिच्यांतिल ऐक्य तसें !! ।
'कृष्णदेव' या नामोच्चरणीं स्वप्नीं देखिल खळ न वसे !!! ॥ ३० ॥
ईश्वरमय तूं होसि अहेतुः त्यासह गुजगोष्टी करिसी ।
जगीं मानवा धडा तूं नवा सत्यभक्तिचा वितरीसी ! ॥ ३१ ॥
ऐक्यामध्यें भक्ति नांदते; चिदैक्यता ही भक्ति खरी ।
भक्ति स्वोन्नति, भक्ति परासी, भक्तिच शाश्वतिला वितरी ! ॥ ३२ ॥
गान ऐकुनी जाय गुंगुनी मजीवाचा चंडोल ।
उडूं लागतो हृदयांबरिं तो बोल बोलतो बिनमोल ! ॥ ३३ ॥
द्विजवर माझा तो बघ तूझा आहे अनुगामीच खरा ।
हलशिल जिकडे हलेल तिकडे, जेवों तूं हा तेविं पुरा !! ॥ ३४ ॥
तन्मयतेच्या ध्वनियंत्राच्या–वरी बांगडी हृदयाची ।
गिरकत आहे तिजवरती हे पुरी बिंबु दे ध्वनिवीची ! ॥ ३५ ॥
थांबुं नको मुळिं भीती वगळी ! असाच लव गाईं पुढतीं ।
पहा नातरी खटपट सारी होइल मम निष्फळ अगदीं ! ॥ ३६ ॥
तीं गाणीं मी जगता नामी शिकविन कवनीं गावोनी ।
दिव्यसुखाचा अनुभव साचा देइन त्यांना त्यांमधुनी !! ॥ ३७ ॥
आत्मबोधरवि तेजोमय वरि ये मद्विकारगिरिमधुनी ।
सद्भावाच्या विमलनभाच्या क्षितिजावरि आनंदोनी, ! ॥ ३८ ॥
अविवेकाचा तिमिर सदाचा पाहुनि त्याला विलोपला ।
सत्कृतिसुमनें फुललीं सुमनें कीर्तीचा दंहिवर पडला. ॥ ३९ ॥
सुविचाराचीं रानें फुललीं झाउड दंभाचें जळलें ।
स्वानंदाचे निर्मलतेचे वाहुं लागले झरे भले; ॥ ४० ॥
स्फूर्तित झाला गात उडाला मजीवाचा चंडोल ।
हृच्चलनाचा तुरा शिराचा तुकवित अपुला तो उजळ ! ॥ ४१ ॥
दिव्याभासा ! थांब जरासा, जासी स्वर्गीं कां ? सुवचा ! ।
भालपत्र हें घेउनि जाईं असे लखोटा मी विधिचा ! ॥ ४२ ॥
भाव न कळला त्यांतिल मजला जा घेउनि वा मला वरी ! ।
अथवा वद तूं त्यांतिल हेतू, तूं स्वर्गाचा दूत जरी ! ॥ ४३ ॥

मार भरारी उंच नभोदरीं आण उठवुनी कृष्णाला ।
दाउनि येईं त्या मत्पत्रहि; जा-जा दवडुं नको वेळा ! ॥ ४४ ॥
गेला ! गेला !!-अंबरिं भिडला; दृष्टिआडही तो झाला ।
हृद्-चंडोलहि माझा जाई त्यासह, परि नच भान मला । ॥ ४५ ॥
मी धरूं गेलों पळत चाललों त्यामागें त्या धरण्याला ।
हातिं न पडला,—अदृश्य झाला हात लागतांची त्याला ! ॥ ४६ ॥
निराश झालों परत पातलों घेउनि शून्यत्वा आलों ।
परंतु बघतों मी मजला, तों मीही शून्याकृति दिसलों !! ॥ ४७ ॥

---

## २ जीवितसरिता.

पद—( चाल—जरी कुणा श्रीमंताची० )

पूर्वकर्मगिरिचें उदरीं जन्म घेउनी ही ।
जलद जलद आयुष्याची नदी स्रवत राही ॥ ध्रु० ॥
बाल्यवीचि उठती, अंतीं विश्रमास द्याया ।
सौख्यपूर्ण तारुण्याच्या तरंगीं रमाया ॥
खिन्न पुरुषतेच्या लहरीं तोहि लीन व्हाया ।
जराग्रजें भेटायाला जाइ तूर्ण तीही ॥ १ ॥
जरा धवलकांती, धरुनी आस भेटण्याची ।
मृत्यु-सिंधु-पतिला, स्रवते त्वरित त्याकडेची ॥
अशा निघुनि जाती मनुजा! सकल काल-वीची ।
युक्त विकारांनीं होई नित्य नदी रे! ही ! ॥ २ ॥
गुप्तपणें त्वरितचि वाहे अशी भेटण्याला ।
नदी पुढें आयुष्याची, पूर्वींच्या स्थितीला ॥
ज्ञानवीचि जाउनि तीच्या, जाइ शुष्कतेला ।
द्वैतताहि विसरुनि जाई—शाश्वतींत राही ! ॥ ३ ॥

# २९ सौ० मनोरमाबाई रानडे.

या सुप्रसिद्ध कवयित्रीचा जन्म शालिवाहन शके १८१७ पौष कृ. ३० ( इ० स०१८९६ जानेवारी १४ ) स झाला. यांच्या वडिलांचें नांव बळवंत रामचंद्र हिवरगांवकर. यांचें मराठी व इंग्रेजी प्राथमिक शिक्षण पुणें येथेंच झालें. उच्च शिक्षण अद्याप त्या संपादित आहेत. या यंदाच ह्मणजे इ. स. १९१५ मार्चमधें इंटरमिडिएटची परीक्षा पास झाल्या. यांचा विवाह इ. स. १९१४ मधें कवि रा. रा. श्रीधर बाळकृष्ण रानडे यांच्याशीं झाला त्यांच्या कविता याच पुस्तकांत दिल्या आहेत. यांच्या बहुतेक कविता मनोरंजन, लोकमित्र, आनंद व मधुकर वगैरे मासिकांतून 'गोपिकातनया' व 'कु० द्वारकाबाई हिवरगांवकर' या नावांनीं प्रसिद्ध झाल्या आहेत. मिसेस इलिझाबेथ् ब्राउनिंगच्या धर्तीवर यांनीं एक सुंदर काव्य लिहिलें आहे; पण तें अद्यापि अप्रसिद्ध आहे. 'पिकास उद्देशून' ही त्यांची पहिली कविता असून ती त्यांनीं इ. स. १९१२ त लिहिली.

## १ चांदणी.

पद—( चाल—पर्जन्याचे दिवस० )

क्षितिजावरती चटक चांदणी ।
अव्यक्तस्वर फेकित भुवनीं ।
कवयित्रींची चमके राणी ।
कुणास ठाउक कशा रीतिनें तिलाच मोहुनि मी गेलों ॥ १ ॥

नव्हती सुंदर इंदुसारखी ।
रूपाचा मी नव्हेच शोकी ! ।
ठरवो वेडा मजला लोकीं ! ।
दिव्यत्वाची प्रतिभा मजला मोहवि, कळलें अतां पुरें ! ॥ २ ॥

जड जगताच्या मार्गावरुनी ।
धांवत जातों आशा धरुनी ।
फुलें तुडविलीं जाती चरणीं ।
समोर दृष्टी ! खालीं कसची ? विश्व गोल होईल नवा ! ॥ ३ ॥

गुलाबावरी असोत काटे ! ।
असोत पर्वत कराल मोठे ।
येउत मार्गीं सागर मोठे ।
नीरस जगिंची कशास परवा ? नको विचाराचे मुळिं यांचा ! ॥ ४ ॥

एक चांदणी पुरेच मजला ।
तत्तेजोरस नयनां दिसला ।
पुण्याखण्ड प्राणा आला ।
द्रुतगति जाउनि, वश करुनी मी करीन प्राशन मधुर रस ! ॥ ५ ॥

कुणा न दिसतो मी, तैशी ती ।
एकलकोंडा जन मज म्हणती ! ।
वेडे सारे ! तत्त्व न जाणति ।
विश्ववलय हें उज्ज्वल झालें तारातेजोरसेंच या ! ॥ ६ ॥

आनंदाच्या ऊर्मि खळाळुनि ।
हृदय विदारुनि, क्षितिजा भिडुनी ।
जाती, स्पर्शति मृदुल चांदणी; ।
तीही पुलकित होउनि, दृष्टी विस्फारुनि मज बघुं लागे ! ॥ ७ ॥

नेत्रमीलनें उत्साहांत ।
त्याच दृष्टिनें गाणीं गुंगत ।
होतों; निमिषें पूर्व स्थितिंत ।
आलों, तेव्हां हृदयांतच मम तारा येउनि ती बसली ! ॥ ८ ॥

बाजुलाच त्या रस्त्याच्या मी ।
जरा वेळ निजलों आरामीं ।
सोडुनि दिधलें या सृष्टीनें ।
मनांत रचिलें विश्व नवें, तें स्वप्न म्हणा तुह्मी हवें तर । ॥ ९ ॥

' सिंहासनिं त्या सुरेंद्रभवनीं ।
चारुहासिनी मजसि·चांदणी ! ।
नेउनि बसवी; दुजे न कोणी ! ।
सकल सुरांना लोटुनि दिधलें होतें खालीं पाताळीं ! ॥ १० ॥

' धरिला कर कुणि तेव्हां माझा '— ।
त्या स्पर्शानें झालों जागा ! ।
समजुनि आलें, ताराकर नच, परी भानुकर मज हलवी ! ॥ ११ ॥

उठुनि राहिलों उभा तसाची ।
नयन मिळाले त्या क्षितिजाशीं ।
उग्र सूर्यची पडे दृष्टिसी !
निराश झालों जडपद टाकित वाट चालतों कसातरी ! ॥ १२ ॥
भग्नाश तरी अंधुक आशा ।
मनीं बाळगुनि पंथ जगाचा ।
रखडत आहे पुष्पलतांचा ।
हृदयीं बघुनी, काव्यें वाहुनि भग्न मना रिझवितों असा ! ॥ १३ ॥

## २ सागरगोटा.

पादाकुलक वृत्त.

" दुरखाइ बने ! अजून ग ! " " हप्पी ! चुकलं तुझं गं ! । "
टाळ्या ऐकुनि जागी झालें ! । जिन्यावरूनी हळू पाहिलें ! ॥
सागरगोटे खेळत होती । यमी आमुची माडीवरती ॥
पाय न वाजवितां वर गेलें । पाठीमागें उभी राहिलें ! ॥
" दुररखाईचा...तिरखाईसी ! । " बोलत होती अशी कायशी ! ॥
डाव टाकिला वाकुनि खालीं; । ' बने ! खडा ' वर बघूं लागली ! ॥
बंधमुक्त खग उडे जसा । नभीं पळाला खडा तसा ॥
' गंमत करण्या छान वेळ ही । ऐसें माझ्या मनांत येई ! ॥
हळुंच झेलला सागरगोटा । " दे रे नाना !–लबाड मोठा ! ॥ "
मागें वळुनी रागें पाही । " हें ग काय ? अं—बघ ग आई ! ॥ "
' धुश्शा '—उठली सोंगे धरिलें ।–पाय उंच–छे ! वाया गेलें ! ॥
" बघ हं ताई तूं ! दे बरं कां ? ।–आइ मारते बघ तुज हाका ! "
" पुराणास कधिं गेली आई । जसें काय–हंः—माहित नाहीं ! ॥ "
" परत हवा कां सागरगोटा । ऐकशील कां पण–वाः—ताठा ! "
" हं तर म्हणुं या ? " मान हलविली; । खेळासाठीं अधीर झाली; ॥
" सांग सांग ग लवकर आतां । बनी थांबली माझ्याकरितां ॥ "
" कांहीं नाहीं; पापा गोड–" " अं-अं-ऊं ऊं-हं-हं-सोड ! "
बळेंच वरती तोंड करोनी । मुका घेतला चुंबचुंबुनी ! ॥
गालीं स्मित मधु बघुनि लाजरें । लज्जित झाले गुलाब सारे ! ॥

# पुरे पुरे ग हसणं !

[ एके दिवशीं हंसतां हंसतां मी एकदम थांबलें. त्यावेळीं मनांत विचारांची जी खळ-वळ उडाली ती खालील शब्दांत-चित्रित करण्याचा प्रयत्न केला आहे. ]

पद ( चाल:— आनंदीआनंद गडे० )

पुरे पुरे ग ! हें हसणें । किती हसावें मनुजानें ! ॥
सौख्यामागें ती छाया । दुःखाची शिणवी काया ! ।
स्थिती दोन प्रतिवस्तूला । असती, विदित न कां तुजला ! ॥
जलधर गर्जे हर्षानें । सौदामिनिच्या संगमनें ।
करांत घालुनि कर मोदें । नभभर हिंडे स्वच्छंदें ॥
प्रिया-वियोगें परि तोच । ढाळी पर्जन्याश्रूस ! ।
म्हणुनि पुरे ग हें हसणें । हवें तसें कां तुज रडणें ? ॥
वसंत येता लता हंसे । तनुकांती रुचिरा विलसे ।
ग्रीष्मागमनीं तीच परी । ढाळूं लागे फुलें धरीं ! ॥
येतां सविता उदया तो । विचार मनिं कां उद्भवतो ।
येणारें मग तम खास । गेल्यावर कांहीं तास ! ॥
वार्धक्य कुणा चुकलें कां ? । गर्व नसो युवती-युवका ! ।
पौर्णिमेस विधु गगनांत । गातो नाचत मोदांत ! ॥
अमावास्यें परि कुठें लपे ? । दुर्दैव न कोणा त्यजते !॥
घाल अळा ग ! हसण्याला ! । धरिं मनिं थोड्या सीमेला ! ॥
मर्यादेच्या पलीकडे । चाललीस तूं कोणिकडे ? ।

# अभिनवकाव्यमाला—भाग तिसरा.

# ३० कविसंमेलन.

## १ आम्ही कोण?

श्लोक. ( वृत्त–शार्दूलविक्रीडित. )

आह्मी कोण म्हणून काय पुससी?—आह्मी असूं लाडके- ।
देवाचे, दिधलें असे जग तयें आह्मांस खेळावया; ॥
विश्वीं या प्रतिभाबलें विचरतों चोहींकडे लीलया, ।
दिक्कालांतुनि आरपार अमुची दृष्टी पहाया शके! ॥ १ ॥
सारेही बडिवार येथिल पहा! आम्हांपुढें ते फिके; ।
पाणिस्पर्शच आमुचा शकतसे वस्तूंप्रती द्यावया–॥
सौन्दर्यातिशया, अशी वसतसे जादू करांमाजि या; ।
फोलें पाखडितां तुह्मी, निवडितों तें सत्व आह्मी निकें! ॥ २ ॥
शून्यामाजि वसाहती वसविल्या कोणीं सुरांच्या बरें? ।
स्वर्गाची समता धरेस झटती आणावया कोण ते? ॥
ते आह्मीच, सुधा कृतींमधुनियां ज्यांच्या सदा पाझरे; ।
ते आह्मीच शरण्य, मंगल तुम्हां ज्यांपासुनी लाभतें! ॥
आम्हांला वगळा—गतप्रभ झणीं होतील तारांगणें ।
आम्हांला वगळा—विकेल कवडीमोलावरी हें जिणें! ॥ ३ ॥

—केशवसुत.

## २ जोहार.

[ लढाईला जाण्यापूर्वी, पाठीमागें पाश न राहिला, तर युध्दास विशेष स्फुरण चढेल किंवा दुर्दैवानें प्राणांत आला, तर बायकामुलांची शत्रूंच्या हातीं पडुन विटंबना होईल म्हणून रजपूत त्यांचा प्रथम निकाल करून नंतर युध्दाला जात. तशा एका प्रसंगाचें हें शब्दचित्र आहे. जोहार म्हणजे शेवटचा निरोप. ]

पद—( चाल–प्रिये पहा० )

विलासिनी रमणीसह सुमनाच्या शय्येवर पहुडला. ॥ धु० ॥
हृदयाशीं हृदय मिळे। अधराशीं अधर जुळे ॥
करपाशीं कंठ दिले—भिन्नभाव लोपला. ॥ १ ॥
स्वप्नसुखीं चित्त दंग। स्वैर करी रंग रंग ॥
सर्वपरीं होय भंग—दुंदुभिरव ऐकिला. ॥ २ ॥
निद्रा निमिषीं उतरे। जागृति देहांत शिरे ॥
ललनेपासून त्वरें—दूर वीर जाहला. ॥ ३ ॥
घेउनि तलवार वळी। गेला शेजेजवळी ॥
प्रेमाची ती पुतळी—भंगाया सज्जला. ॥ ४ ॥
बघतां ती मूर्ति परी। धडकी भरली तदुरीं ॥
धैर्य गळे; कंपभरीं—खड्ग पडे भूतला. ॥ ५ ॥
एक चित्त जाय रणीं। एक न सोडी रमणी ॥
एका प्रिय कीर्ति जनीं—एका स्त्री प्रेमला. ॥ ६ ॥
एकच घेईन मुका। केला निर्धार निका ॥
दशशत घेऊन मुका—तो भुकाच राहिला. ॥ ७ ॥
आंवरून मोह धरी। घेई खड्गास करीं ॥
जागृत ललनेस करी—भाव तिला समजला. ॥ ८ ॥
धैर्यदेवता नवरी। उठे, मनीं भय न धरी ॥
पतिपुढें मान करी—सिद्ध उभी मृत्युला. ॥ ९ ॥
खड्गाचा हात फिरे। पडला मृदुदेह धरे ॥
पतिवधितस्त्रीरुधिरें—भूमिभाग रंगला. ॥ १० ॥
सौख्यशांति समाधान। विषयविलासस्थान ॥
होय तें क्षणीं स्मशान—अंधकार पसरला. ॥ ११ ॥

प्रेमाच्या हेतुविणें । शून्य दिशा-शून्य मनें ॥
भारभूत होय जिणें—मृत्यु प्रिय एकला. ॥ १२ ॥
मरणाला जो तयार । तोच अरी करिल ठार ॥
रणदेवी विजयहार—घाली त्याच्या गळां. ॥ १३ ॥
यास्तव रजपूतकुळीं । देती स्त्रीतनय बळी ॥
धन्य तेचि भूमितलीं—पाश जयीं तोडिला. ॥ १४ ॥

—विनायक.

---

## ३ कारंजें.

पद—( चाल—आनंदीआनंद गडे० )

हें अवलोकुनि कारंजें । गा हृदया! रसिका रंजें. ॥ ध्रु० ॥
रविप्रकाशा माझारीं । याचें तेजोमय वारी ॥
चमके, मुकेच गगनाचे । ध्याया थै थै जणुं नाचे. ॥ १ ॥
पडुनि चंद्रिका यास करी । धवल हिमाहुनि नवलपरी; ॥
विलसति किति ह्या जलधारा । शुद्ध रुप्याच्या जणु तारा! ॥ २ ॥
ह्या बिंदूंचे तों होती । गोल अमोल विमल मोतीं! ॥
हंसोत अथवा जवाहिरे । मी तों म्हणतों यांस हिरे! ॥ ३ ॥
होतां जल पवनाकुल तें । फूलचि जणु डुलतें झुकतें. ॥
न दिसो तमांत तारांनीं । उमगे मंजु तुषारांनीं; ॥ ४ ॥
सततोत्साहें आनंदें । उडतें, पडतें, निजछंदें; ॥
पडुनहि उंच उडायाला । याला श्रम न कधीं झाला. ॥ ५ ॥
सुदिनदुर्दिनीं उल्हासें । हांसे सम सुंदर भासे! ॥
खालीं वरती सतत गती । गती विराम तया मग ती. ॥ ६ ॥
शील करी जें तद् घटना । ना तें शक्यचि आकलना; ॥
शाश्वत अशाश्वती ज्याला । तीच शाश्वती मग त्याला! ॥ ७ ॥
स्पृहावंत जरि निरंतरीं । तरीहि निस्पृह निरंतरी! ॥
तमें तमोमय हें असतें । तेजें तेजोमय दिसतें. ॥ ८ ॥
अभिनव, सतत, जरी लहरी, । उन्नत! चिंताजाल हरी. ॥
गुणगुणुनी गुणगण हे तूं । तूंहि असें हो! हा हेतू. ॥ हें० ॥ ९ ॥

—चंद्रशेखर.

---

## ४ विश्वामित्रीच्या कांठीं–

[ स्थल–बडोदें येथील झुलता पुल. वेळ–पौर्णिमारजनी. ]

पद—( चाल–फुलें वेलींचीं० )

बघुनि मन धालें । साफल्य दृष्टिचें झालें ॥ ध्रु० ॥
पाउस बर्फाचा जणुं पडतो । रजताचा जणुं मेघ वितळतो ॥
किंवा चंद्रकांत पाझरतो । जणूं शीतांगी–मत्प्रिया मला आलिंगी !॥१॥
शीतल चंदनरसांत पडलों । अथवा अमृतडोहीं बुडलों ॥
किंवा सुस्वप्नीं सांपडलों । न कळे कांहीं-जिव वेडावुनि हा जाई !॥२॥
शांतिदेवता निराकारिणी । वसते जणुं या मंगल स्थानीं ॥
सांगे मजला या उद्यानीं । चंचल बाला–बघ इथें जगन्नाथाला ! ॥ ३ ॥
सृष्टिसुंदरी नटली थटली । सूक्ष्म धवल वल्कला नेसली ॥
खुलली जणुं सुमवेली फुलली। रम्य ही शोभा–हिजपुढें काय ती रंभा !
शांत तटिनि जणुं पथ स्फटिकाचा । जातिपुष्पपथ वनदेवीचा ॥
किंवा ओघ सजिव रजताचा। कीं रत्नाची–मेखलाच उद्यानाची ! ॥५॥
विश्वामित्रीजलिं या कालीं । तटवनभूमी बिंबित झाली ॥
वरती तैसें दिसतें खालीं । अद्भुत झालें–पाताळ आजिं पाहीलें ! ॥६॥
तारागणही स्पष्ट बिंबलें । स्नाना जणुं हे मुनि अवतरले ॥
तेजोनिधि कीं ऋषी बैसले । ध्यान धरोनी-जलसमाधिस्थ होवोनी ! ॥७॥
शशिरायाही आंत उतरला । कलहंसापरि पोहुं लागला ॥
तटिनीनें जणुं हृदयीं धरिला । प्रेमलकांत–पाहुनी येथ एकांत ! ॥ ८ ॥
जेथें असली श्रेष्ठ मंडळी । तिथेंच गरिबा जागा दिधली ॥
शंका सखये ! परि उद्भवली । खरी मम काया-उदकांमधिं वा भूवरि या!
वरती खालीं दिसतें गगन । मध्यें लंबित अपुलें भवन ॥
वातावरणीं आधाराविण । गोजिरवाणी–फेंकिला चेंडु हा कोणी ! ॥ १०॥
वरती खालीं ही शशिकांती । द्विगुणित शोभा द्विगुणित शांती ॥
द्विगुणित आनंदाची भरती । दृष्टि बावरली–वर पाहूं किंवा खालीं!॥११॥
स्मरणशक्तिके ! जागृत होईं । दर्शनदुर्लभ शोभा पाहीं ॥
विसरूं नको बघ यांतिल कांहीं । वारंवार–कोठुनी असें दिसणार‡? ॥१२॥

—दत्त.

‡ खरोखरीच कवि कै. दत्तात्रेय कोंडो घाट यांना अशी मौज पुन्हां पाहावयास मिळाली नाहीं; कारण हीच त्यांची शेवटची कविता असें म्हणतात !

## ५. " स्मशानांत प्रेतांना भोंती घेवुन बसलों असतां.

( साकीवृत्त, चतुदर्शक. )

या काळाच्या संतानांनो! आला आला घाला ।
सोडा रडणें, पदर पसरणें माना खालीं घाला ॥ १ ॥
नियामकांना नका भरवसूं हे तर फसवे चोर ।
उघडा डोळे, पहा नीट हें जळतें काय समोर ॥ २ ॥
जिवंत आम्ही जळतों हृदयीं, हीं मेलेलीं सरणीं ।
जगा मरा परि चुके न केव्हां यदृच्छेची करणी ॥ ३ ॥
तिकडे देतां डाग यांजला, बसती इकडे डाग ।
आग लावितां तिकडे यांना, लागे इकडे आग ॥ ४ ॥
आला, जुळला सवदा, गेला !—नफा कशाचा झाला? ।
राखेमध्यें राख मिळाली ! कोठें गेल्या ज्वाला ? ॥ ५ ॥
ज्वाला कसच्या ? स्वर्ग कशाचा ? हीं तर सारी राख ।
अमुचें जीवित; अमुच्या आशा होती येथें खाक ॥ ६ ॥
तों सूं सूं सूं शब्द निघाले, प्रेता आधण आलें, ।
वाफ उडाली, कृतज्ञतेनें मीं वर डोळे केले ॥ ७ ॥

—विठ्ठल दत्तात्रेय घाटे.

---

## ६ प्रेमोत्कर्ष.

श्लोक. ( वृत्त—शार्दूलविक्रीडित )

दृष्टी टाकितसूं अम्ही जिथजिथें पाणीच पाणी दिसे; ।
कांपे विश्व पहा भयें थरथरां, कल्पांत कीं पातला; ॥
एकीमेकिंस पाहती टकमकां दाहीदिशा व्याकुला; ।
चित्तीं धाक चराचरास पडला, कोणी न कोणा पुसे ! ॥ १ ॥
मातें सांगच, जाहलें तुज अजीं हें काय रेवे ! असें ।
कोणालाहि न मोजिसी, तुडविसी पायातळीं सृष्टिला, ॥
झालें कारण काय भागिनि ! असें बेहोष व्हाया तुला ? ।
आहे रोषच, यौवनप्रसरवा, किंवा जडे हें पिसें. ॥ २ ॥

प्रीतीला खुलवीतसे नवनव्या रंगांस देवोनियां।
वर्षाकाळ, वियोगदुःखित जनोत्कंठेस ये पालवी; ॥
नाहींनाहिंच जाहलें बहुदिसां प्राणप्रिया भेटणें,।
ऐसा भीषण पूर हा म्हणुनियां त्वत्प्रीतिचा लोटला. ॥
सारें मान्य मला-परी धरिं मनीं ही गोष्ट तूं नर्मदे ! ।
होई मारक तें दुजां कधिंकधीं जें आपणा सौख्य दे. ॥ ३ ॥

—गोविंद पांडुरंग देवधर, एम.ए. एल.एल. बी.

## ७ उषा.

पद—( चाल-प्रणय तरंगा० )

अरुणदीप्ति फांकली । रम्य उषा पातली ॥
गिरिपरी । तरुशिरीं । अंबरीं । हांसली ॥ ध्रु० ॥
संपतांच शर्वरी । फेंकिलि ही निर्जरीं ॥
स्वर्गींची महीवरी । सुमनराजि डोलली ॥ १ ॥
निघोनियां तमांतुनी । तमास दूर सारुनी ॥
जगास धीर देउनी । हंसवुनीहि हांसली ॥ २ ॥

—वामन विनायक सहस्रबुद्धे, बी. ए.

## ८ आलिंगन देशील तर—!

पद—( चाल-पंचतुंड नररुंड० )

जाइन नंदनविपिनीं, मिळविन विकसित कल्पलतासुमनें, ।
दिव्य परिमलें भरुनि दशदिशा करीन चंचल रसिकमनें ॥ १ ॥
मधुर रुचिर पीयूष वर्षुनी दीन जनांतें हंसवीन, ।
झटुनी अविरत गाढ निराशातिमिर स्वबळें पळवीन ! ॥ २ ॥
स्वर्गा आणिन खालीं, निश्चित खेंचिन वरती पाताळा, ।
सहज दृष्टि फेकुनी वांकडी करिन स्थिर चंचल काळा ! ॥ ३ ॥

पूर्ण चंद्रमा शीत दिवाकर निर्मुनि सकलां सुखवीन, ।
द्वेष नाशुनी शुद्धप्रेमीं सानां थोरां बुडवीन ! ॥ ४ ॥
हा हलका, हा श्रेष्ठ, असा हा भेद हानिकर मोडोनी, ।
वंद्य बंधुता—समता हितकर सकलां देइन पटवोनी ! ॥ ५ ॥
हाय ! नीच ते दीन अनाथां पोंचविती पशुकोटीला, ।
झटुनि अहर्निश सुरपदवीला नेइन निश्चित मी त्यांला ! ॥ ६ ॥
ऋभूंसारखें गायन करुनी चराचराला भुलवीन, ।
कोमल भेदक सूर काढुनी पाषाणाही उलवीन ! ॥ ७ ॥
उदात्त अंतर्वृत्ति करूनी उत्तेजित मंजुल गानें ।
प्रेमालापें भरुनी टाकिन शून्य वाटतीं जों रानें ! ॥ ८ ॥
करीन सारें, निर्मीन प्रतिसृष्टी, काय अशक्य असे ?
लावुनि सुरतरुवृंद तयांच्या फलभारें झाकीन रसे ! ॥ ९ ॥
उडुरत्नांचा हार घालुनी विहार करणें महीवर ।
कठीण नाहीं मला सुंदरी ! आलिंगन देशील तर ! ॥ १० ॥

—एकनाथ पांडुरंग रेंदाळकर.

---

## ९ भगवत्प्रेमनिर्झर.

श्लोक. ( वृत्त वियोगिनी. )

प्रभुजी मजला धरीं करीं । धरवे धीर मला न अंतरीं ॥
गिळितो मज काळ साप हा । करिती साह्य तया रिपू सहा ॥ १ ॥
छळ हा पळही न सोसवे । तरि तूं धावुनि ये विभो जवें ॥
करिसी अनुमान यावया । नलगे काळ मला मरावया ॥ २ ॥
धन, दार नको मला अतां । विटलों फार तयांस भोगतां ॥
मन जाय कसे विभो ! अगा । भुलुनि नश्वर खास या जगा ॥ ३ ॥
कथिं काय उपाय या करूं । तुज मी प्रार्थित दीन लेंकरूं ॥
स्वहितार्थ झटे विटे न मी । करितों यत्न अतीव नेहमीं ॥ ४ ॥
जरि ये नडुनी कुणी तरी । न करीं अल्प सहाय त्या करीं ॥
गरिबांस दिलें न दान मीं । न तसा सत्पुरुषां कदा नमीं ॥ ५ ॥
तव नाम नघे कधीं मुखें । पडलों घेत विलास मी सुखें ॥
भजनीं रतलों क्षणार्ध वा । नच भावें करुनी रमाधवा ॥ ६ ॥

मज संसृति फार जाचते । लवही सौख्य न हींत भासते ॥
सुकवी तरि या महाभवा । स्वमनीं आणुं नकोचि वानवा ॥ ७ ॥
ह्मणसी 'अतिपापि' तूं नरा । 'तुज ठाईं मग कां ? कृपा करा' ॥
तरि योग्य तुला न हें हरी । स्मर बा पूर्विल कीर्ति अंतरीं ॥ ८ ॥
स्मरतां तुजला अजामिळ । धरितां संशय ना मनीं तिळ ॥
त्यजुनी स्वरमाहि तूं रमा । करिशी धावुनि तेथ आगमा ॥ ९ ॥
क्षणही करितां न वेळ गा । अटिली तत्भवकल्मषाऽपगा ॥
प्रभु तूं करुनी दया तया । दिधलें मुक्तिपदा निरामया ॥ १० ॥
अणखी गणिकाहि पिंगळा । पडतां भक्तिबळें तुझ्या गळां ॥
हरिलेंस तिच्या अघा त्वरें । दिधली सद्गति तूंच बा हरे ! ॥ ११ ॥
ह्मणुनी न धरीं मनीं अढी । मजसाठीं क्षणिं धाल रे उडी ॥
जरि राखिशि वेळ येवढी । जगतीं होइल कीर्ति केवढी ! ॥ १२ ॥
असती तपवंत जेवढे । करिसी पावन मात्र तेवढे ॥
तरि ना तुजलागि थोरवी । परि ती उद्धरिल्या हा कवी ॥ १३ ॥
मन हें प्रभुछंदिं लागलें । नयन प्रेमभरें तुडुंबले ॥
वपु ही स्थिर होय ना हले । कसलें आन न भान राहिलें ॥ १४ ॥
बघतां स्थिति ही दयाघन । द्रवला कोमल फार तन्मन ॥
जवळी क्षणिं त्याच पातला । कविला दर्शनलाभ दे भला ॥ १५ ॥
धरुनी हृदयीं तदा ह्मणे । कळिकाळा न अतां तुवां भिणें ॥
उरलें भय ना जगीं तुला । मग चिंता करितोस कां ? मुला ॥ १६ ॥
असतां तुज मी अहा ! कवे । भवदैत्या मग कां न हाकवे ॥
धरिं मी तुझिया शिरावरीं । करुणा—छत्रचि आपुल्या करीं ॥ १७ ॥
असती अति पातकें जरी । अनुतापें लय पावती तरी ॥
परमार्थ तुला कळे अतां । सदसन्मार्ग अपाप शोधतां ॥ १८ ॥
मिळसी ममरूपिं शेवटीं । पडसी संसृतिच्या न संकटीं ॥
असतां तुझिया समीप मी । मग बाळा तुज काय रे ? कमी ॥ १९ ॥
श्रवणीं वच हें पडे यदा । भव-भीती क्षणिं लोपली तदा ॥
कविच्या हृदयीं उचंबळे । अमित प्रेमचि भक्तिच्या बळें ॥ २० ॥

—दीक्षित धुंडीराज गणेश बापट.

## १० तारे आणि कमलें.

[ एका जपानी कवितेच्या इंग्रजी भाषांतरावरून ]

श्लोक ( वृत्त—पृथ्वी. )

सुहास्यमुखचंद्रमा उगवला नभोमंडलीं, ।
तमःप्रकर नाशि तो स्वकर सोडुनी भूतलीं ॥
जणूं गगन चर्चिलें मलयजें, दिशा भूषिता- ।
सुशुभ्र सुमनीं, धरा दिसत दुग्धसंमार्जिता. ॥ १ ॥
सरोजगण हा हंसे सरसिं शीत मंदानिलें, ।
बघूनि उडुपंक्ति त्या पुसति " काय हो जाहलें? ॥
असाल जर दुःखमग्न अवनीवरी सर्वदा— ।
नभीं त्वरित या जिथें स्थिति मिळेल आनंददा. " ॥ २ ॥
पुसे उचलुनी मुखा कमल काय ताऱ्यांप्रतः— ।
" तुह्मी वदत कीं तिथें स्थिति मिळेल आनंदद ॥
असेलहि खरें, परी असति काय अश्रू तिथें? " ।
नभःस्थ वदले " कशास तरि नांव त्यांचें इथें! " ॥ ३ ॥
" न अश्रु जर तेथ, " पंकज वदे, " मुळीं प्रेम न ।
अशा स्थलिं कशास या क्षितितलाप्रती सोडुन ॥
असो जगातिं दुःख या जरि नभांत आनंद कीं ।
जिथें प्रणय नाल्प तें स्थल असार वा घातकी! ॥ ४ ॥

—आनंदीरमण.

---

## ११ तारकांचें गाणें.

पद—( चाल-आनंदीआनंद० )

कुणि नाहीं ग कुणि नाहीं । आम्हांला पाहत बाई ॥
शांति दाटली चौंहिकडे । या ग आतां पुढें पुढें ॥
लाजत लाजत । हळूंच हांसत ॥
खेळ गडे खेळूं कांहीं । कोणीही पाहत नाहीं ॥ १ ॥

सुंदर तें तें नटवून । कोमल तें तें खुलवून ॥
प्रेमाच्या वसतीकरितां । जग सगळें फुलवूं आतां ॥
दिव्यरवांनीं । गाणीं गाउनि ॥
विश्वाला निजवायाला । वाऱ्याचा बनवूं झोला ॥ २ ॥
फेंकुनि द्या इकडे तिकडे । थोडेसे दंवबिंदु गडे ॥
या निर्मल अवकाशांत । प्रेमाचें पेरूं शेत ॥
मंद यामिनी – । सर्व गुंगुनी ॥
झोंप लागली जगताला । या ग आतां खेळुं चला ॥ ३ ॥
सरितांच्या लहरींवरती । नाचूं या निर्भय चित्तीं ॥
अर्धोन्मीलित फुलवोनी । लपूं चला कलिकांत कुणी ॥
कविहृदयांत । गरके घेत ॥
जाउनिया खेळूं आतां । हीं गाणीं गातां गातां ॥ ४ ॥
एकादी तरुणी रमणी । रमणाला आलिंगोनी ॥
लज्जामूढा भीरुच ती । शंकित जर झाली चित्तीं ॥
तिच्याच नयनीं । कुणी बिंबुनी ॥
धीट तिला बनवा बाई । भुलवा ग रमणालाही ॥ ५ ॥
सुस्वप्नांतीं गुंगवुनी । पुण्यात्मे हसवा कोणी ॥
आशा ज्या ज्यांच्या चित्तीं । त्याच रचा स्वप्नांवरती ॥
दयितचिंतनीं । विरहभावनीं ॥
दिवसा ही झुरली बाला । भेटूं द्या स्वपती हिजला ॥ ६ ॥
अनेक असले खेळ करूं । प्रेमाशा विश्वांत भरूं ॥
सोडुनिया अपुले श्वास । जगीं नाचवूं उल्हास ॥
प्रभातकाळीं । नामनिराळीं ॥
होउनिया आपण राहूं । लोकांच्या मौजा पाहूं ॥ ७ ॥

—बालकवि ठोमरे.

---

## १२ नम्र असावें.

श्लोक ( वृत्त–शालिनी )

बागेमध्यें हानि हो वादळानें । ऐकोनी हें सेवकाच्या मुखानें ॥
पाहूं जाया तात तें जैं निघाला । संगें त्याच्या पुत्रही एक आला ॥ १ ॥

मार्गीं रम्या सृष्टिशोभा पहात । आले दोघे आपुल्या ते मळ्यांत ॥
पांहोनी हें कृत्य त्या वादळाचें । बोले बापा बाळ तो नम्रवाचें ॥ २ ॥

( वसंततिलका )

" बाबा ! असून बहु आम्रतरु प्रचंड । हा येथ होउनि पहा पडला दुखंड॥
येथें प्रचंड पवनें पडला न साचा । हा वेल सुंदर असा लघु मोगऱ्याचा ॥३॥

( वृत्त—शालिनी. )

जेथें मोठा आम्र हा नाश पावे । तेथें बाबा ! मोगऱ्यानें टिकावें ॥
झाला नाहीं न्याय हो ! योग्य यांत । केला कीं हा मारुतें पक्षपात" ॥ ४ ॥
केला ऐसा प्रश्न जेव्हां सुतानें । डोले त्याचा तात तेव्हां सुखानें ॥
बोले " केला प्रश्न हा योग्य खास । ऐके आतां लाडक्या ! उत्तरास ॥ ५ ॥
आहे बाळा ! हा जरी आम्र मोठा । याच्या अंगीं सर्वदा फार ताठा ॥
नम्रत्वाचा लेशही यास नाहीं । यायोगें या प्राप्त झाली दशा ही ॥ ६ ॥
येथें बाळा ! वेल हा केविं पाहें । वारा येतां नम्र होऊन राहे ॥
आहे जात्या हा जरी बा ! लहान । पीडा यातें मारुताची न जाण ॥ ७ ॥
उन्मत्तांचा नाश होतो सदाही । बाळा नम्रां भीतिचा लेश नाहीं ॥
नम्रत्वानें सौख्य लाधे जगांत । घेईं वत्सा ! बोध हा तूं मनांत" ॥ ८ ॥

—विष्णु बाबाजी कल्लोळकर.

---

## १३ प्रेमविषाचा प्याला.

पद—( चाल—काळोखाची रजनी० )

प्रेमविषाचा प्याला ग प्याला । नवल तरी हा अझुनि न मेला ॥
म्हणुनि भेटुनी पुनरपि याला । घोट पाजिसी कां शेवटला ? ॥ १ ॥
साधो हा तरि तव कार्याला । आत्मा सोडो मम देहाला ॥
आत्मा माझा कोठें जाइल । समाधिस्थ त्वत्प्रेमीं होइल ॥ २ ॥
मरो जगो मी तुझ्या संगमा । न मुके तुझिया अमोल प्रेमा ॥
आग लागली या चंद्राला । वारा त्याच्या सुटल्या ज्वाला ॥ ३ ॥
सृष्टी झाली भयाण सारी । लोक नेति हे हंसण्यावारी ॥
भलत्या वेळीं हंसतो रडतो । वेड लागलें ज न मज म्हणतो ॥ ४ ॥

शुभाशुभांची सुखदुःखांची । मरणें जगणें स्मृती ययांची ॥
तुझ्याच पायांवरी वाहिली । तचठायीं मति रंगुनि गेली ॥ ५ ॥
वनीं जनीं इह परत्र किंवा । नाचे गाउनि तुझ्याच नांवा ॥ ६ ॥
सखये ग जिवलगे ॥

—रे. ना. वा. टिळक.

## १४ रमानायका दुःख माझें निवारा.

श्लोक ( वृत्त—भुजंगप्रयात. )

जगीं येउनी स्वार्थ ना साधियेला। फजीती सदा, व्यर्थ हा जन्म गेला ॥
मदें मातलों पोसुनी या शरीरा । रमानायका दुःख माझें निवारा ॥१॥
रिपू नष्ट हे सोडिती ना तनूतें । स्मराया न देती मुळीं त्वत्पदातें ॥
गृहीं होतसे या मला कोंडमारा। रमानायका दुःख माझें निवारा ॥२॥
अरी काम हा पोळितो मन्मनासी । जरी शस्त्र वा अस्त्र ना त्याजपाशीं ॥
तुह्मांवीण नाहीं मला लोकिं थारा। रमानायका दुःख माझें निवारा ॥३॥
न राहे कधीं चित्त एकाग्र कामीं । भ्रमिष्टापरी हिंडतों हा पहा मी ॥
मनःकामना जाळिं जेवीं निखारा। रमानायका दुःख माझें निवारा ॥४॥
मिळे सौख्य ना शांति ना लाभ कांहीं । सुखें काल माझा न गेला कदाही ॥
सदा मस्तकीं वाहतो कष्टभारा। रमानायका दुःख माझें निवारा ॥५॥
अजामीळ, वाल्या जरी पापराशी । तुझें नाम घेतां मिळे मुक्ति त्यांसीं ॥
भ्रमें मोहिलों भूललों अंधकारा। रमानायका दुःख माझें निवारा ॥६॥
गजेंद्रा तुवां सत्वरीं मुक्त केलें। पशूपाक्षि ऐसे किती उद्धरीले ॥
तसा देईं याही जना दीन थारा। रमानायका दुःख माझें निवारा ॥७॥
न टाकीच माता जरी बाळ काळें। परी पूरवी त्याचिया सर्व आळे ॥
तसा आर्त हा भक्तिशाली उदारा। रमानायका दुःख माझें निवारा ॥८॥
जगीं गांजिलों त्रासलों फार रामा। न पावे कधीं चित्त माझें विरामा ॥
चळे नित्य हें व्यर्थ घाली पसारा। रमानायका दुःख माझें निवारा ॥९॥
पदाब्जां सदा संत साधू भुकेले। तुवां दर्शनें आर्त ते पूर्ण केले ॥
सुकीर्ती अशी ऐकिली म्यां उदारा। रमानाथका दुःख माझें निवारा ॥१०॥
मतीहीन मी दीन पापी असे कीं। कृपाळू तुह्मी श्रेष्ठ सर्वज्ञ लोकीं ॥
नका अंत पाहूं गळे देह सारा। रमानायका दुःख माझें निवारा ॥११॥

—श्रीपाद नारायण सातघरे, एम. ए., एल.एल. बी.

## १५ 'आतां गडि फू दादाशीं!'

पद ( चाल.—कंकण न सुटे रामाला० )

' तुझ्या गळां, माझ्या गळां। गुंफूं मोत्यांच्या माळा ' ॥
' ताई आणखी कोणाला ? '— । 'चल रे दादा चहाटळा!' ॥१॥
' तुज पगडी, मज चिरडी ' । ' आणखी शेला कोणाला ? ' ॥
' दादा सांगू आईला '— । ' सांग तिकडल्या स्वारीला ' ॥ २ ॥
' तुज कंठी, मज अंगठी ' । ' आणखी गोफ कोणाला ? ' ॥
' वेड लागलें दादाला '— । ' मला कुणाचें ?— ताईला '! ॥३॥
' खुसूं खुसूं, गालीं हंसूं । वरवर अपुले रुसूं रुसूं ' ॥
' चल, निघ येथें नको बसूं ' । — 'घर हें माझें तसू तसू, ॥४॥
' कशी कशी, आज अशी । गंमत ताईची खाशी ' ॥
' आतां गडि फू दादाशीं ' । — ' तर मग गट्टी कोणाशीं ?' ॥५॥

—भास्कर रामचंद्र तांबे.

---

## १६ रत्नमाला.

पद ( चाल.—शारदे दास. )

मालिके ! तुझीं मौक्तिकें, शशीसहि फिकें
करिति कांतीनें, करिति कांतीनें !
परि सांग कुठें, मम सखी, झुरे विरहानें ? ॥ ध्रु० ॥
मजमुळें, किती सुकविलें, शरिर आपुलें,
प्रियेनें सांग, प्रियेनें सांग ?
करि काजळकुंकू, अथवा त्यजि नवभोग ?
घळघळां, अश्रुच्या जळा, गाळितां तुला,
किती भिजवीलें, किती भिजवीलें !
मजसाठीं व्याकुळ, सखिचें मन किति झालें ?
मानिनी, परी विरहिणी, कशी त्या वनीं,
त्यजुनि आलीस, त्यजुनि आलीस ?
तुजवीण सखी मम, होइल कासावीस !

संस्मृतीं माझिया सती, ढाळुनी अती,
अश्रुरूपानें, अश्रुरूपानें
तुज धाडुनि देई, प्रिया काय प्रेमानें? ॥ १ ॥

पद--[ चाल-अर्धतनू वारुळीं० ]

सत्संगतिला विदुनि सखीच्या आलिस का मजकडे?
निर्जनीं टाकुनि तिजला गडे!
असे सहावा प्राणचि केवळ माझा ती गजगती,
मग का तिजवर तव उपरती?
असेल गेली झुरुनि मनामधिं, प्राणसखी मजविणें,
रिझवी कोण तिला तुजविणें?
सांग सांग तूं, मत्प्रियसखिच्या-कंठांतिल मालिके!
टाकिलें रत्न कुठें तें निकें?

—कै. श्रीयुत एकनाथ गणेश भांडारे.

---

## १७ रसालास–

पद—[ चाल-श्रीमंत पतीची. ]

तूं खरा साधु गमतोसी। या जगीं रसाला! मजला ॥
निजशिरीं सुखें धरितोसी। संतापद रवितापाला ॥
परि अर्पुनि सच्छायेसी। आश्रितां देसि सौख्याला ॥
त्रास तूं न लवही गणिसी। जन जरी छळिति बहु तुजला ॥
उलट त्यां फळें अति मधुर।
देउनी करिसि उपकार।
ही स्तुत्य रीति तव फार।
तूं जगताचा सुखहेतू। सेवितें सदा तें तुजला ॥ १ ॥

—कृष्णाजी बाबाजी कुलकर्णी.

---

## १८ कोकिलास निरोप.

श्लोक—( वृत्त-शार्दूल विक्रीडित. )

वेड्या! कोकिलगायका हठवशें कां दूर तूं राहसी?।
हे मित्रा! बघ एकदांच नयनीं उद्यान हें आमुचें,॥

आम्हांला जरि निंदिशी प्रतिपलीं ' वेडेच वेडे ' असें ।
तूंही होशिल आमुच्यासम परी वेडाच तद्दर्शनें ॥ १ ॥
वंचोनी तुज, लोचनींहि तुझिया अज्ञानधूलिप्रति ।
फेंकोनी तुजला खरें फसविलें या काकसंघें पहा ॥
वेड्या ! तूं असुनी खरा पिक, परी काकांमधें बैसुनी ।
त्यांच्या रूक्ष रुतास ताल वद कां देऊनि होसी श्रमी ॥ २ ॥
गाती कर्कश गायनास बलिभुक् जीर्णद्रुमीं बैसुनी ।
तूंही त्यांतुनि आपुला मधुरव व्योमांतरीं फेंकिसी ॥
तेव्हां जो असवर्णनाद मिळुनी त्याचा घडे संगम ।
त्या दुःखें मज वाटतें रडतिल व्योमीं नव्या तारका ॥ ३ ॥
पुष्पोद्दाम मरंदपूर्ण ललिता माकंदपुष्पावलि ।
देवानें तुजसाठिं ती घडविली हें कां न तूं जाणसी ? ॥
ये एथें अमुच्या नव्या उपवनीं सानंद बैसावया ।
काकांचा रसहीन संगम अतां मित्रा ! पुरे रे पुरे ॥ ४ ॥
गाणीं मोहक गाउनी घडिघडीं सृष्टीस गोंजारुनी ।
तीतें दिव्य नवीन वेष विहगा ! द्यावा तुवां नेहमीं ॥
तें सोडून खुळ्यापरी भटकसी काकांसवें तूं वृथा ।
आत्मप्रत्यय तो घडेल तुजला केव्हां न तें आकळे ॥ ५ ॥
मीही एक तुझ्या–समान गवई साधा असे सृष्टिचा ।
माझें गायन ऐकुनी मज गमे सृष्टी सुखें डोलते; ॥
हें ऐसेंहि असून धूर्तबलिभुक्संगें वृथा निंदिसी ।
मातें तूं; परि मी कशास तुजला बोलूं दुणीं उत्तरें ॥ ६ ॥
दिव्यप्रेम–लसत्प्रियामुखविधु प्रेक्षोनियां नेहमीं ।
माझें चित्त सुधारसें डवरलें तैं द्वेष तो कोठला ? ॥
आयूची परि मृत्तिका तव घडे बैसून काकांमधें ।
तेणें क्षुब्ध मदीय होत मन हें, मी बोलतों यास्तव. ॥ ७ ॥
ये ये कोकिलगायका ! झणिं तुझ्या भावी सुगीतांस्तव ।
आहे आतुर जाहली सकल ही सृष्टी, मला वाटतें; ॥
गाण्याची तुझिया लकेर चढुनी जावो नभीं एकच ।
हीं पुष्पें फुलतील, डोलतिलही वेली तदा निश्चयें ॥ ८ ॥
ही साधी मम सूचना परिसुनी संतापुनीयां मला, ।
तूं देशील पिका ! हजारहि शिव्या, नाहीं म्हणावें कुणीं ! ॥

ऐकाया परि त्यांस वेळ न मला, कीं मत्प्रियेची स्तुति।
सोडोनी इतरार्थचिंतन मला केव्हांहि तें नावडे. ॥ ९ ॥

—नागेश.

---

## १९ तान्हुला.

तान्हुला निजला असून झोंपेंत स्वप्न पाहत आहे; जवळच त्याची आई बसली असून प्रेमपूर्ण वात्सल्यनयनांनीं त्याला अवलोकन करीत आहे. तान्हुला झोंपेंत दचकतो, रडवें तोंड करतो, रागाचा आविर्भाव दाखवितो व शेवटीं गालांतल्या गालांत हंसतो त्यास उद्देशून आई:—

पद—( चाल–सुकुमार असुनि तूं० )

तान्हुल्या !, वाटतें तुला, काय तरि बाळा।
झोंपेंत दचकसी काय असा वेल्हाळा ॥ १ ॥
जग कसें, ठाउकें नसें, मुळीं तुज कांहीं।
तुज ‘ आज उद्यांचा ’ विचारही पण नाहीं. ॥ २ ॥
कठिणता, मूर्त ती स्वता, जगीं या भरली।
झुळुकही तिची परि नाहीं तूं अनुभविली. ॥ ३ ॥
बाधिती, षडरि गांजिती, अह्मांला बाळा !।
परि दूर पळति तव भिउनि शुद्ध आत्म्याला. ॥ ४ ॥
कां बरें, हृदयिं मग भरे, भयाची धडकी।
चिमुकल्या ! तुझ्या ही ? काळिज मम तुटतें कीं. ॥ ५ ॥
तुज असें, काय तरि दिसे, म्हणुनि मुख रडवें।
जाहलें तुझें हें ? नयनीं मज नच बघवे. ॥ ६ ॥
कल्पना, तुझ्या नच मना, मुळीं दुःखाची।
कां भीसि, काढिसी ओंठ, काय तुज बोंची ? ॥ ७ ॥
संसृती, दुःख—पूर्ण ती, मनुज रडण्याला।
जन्मला जगीं; परि बाळपणीं सुख त्याला. ॥ ८ ॥
तूं जाण, सुखाची खाण, पूर्ण ती असुनी।
झोंपेंत दुःख तुज दुःख देत कोठोनी ? ॥ ९ ॥
वळविल्या, मुठी चढविल्या, भृकुटि कां भाळीं।
हा राग कशाचा तुला तरी या काळीं ? ॥ १० ॥

कोंवळी, स्मिताची कळी, कोंवळया गालीं ।
विकसली; कपोलीं खळी गोड किति पडली ! ॥ ११ ॥
कुणिकडे, लपवुं या गडे, जगापासोनी ? ।
फाडुनी हृदय कां ठेवुं आंत नेवोनी ? ॥१२॥

—नरहर शंकर रहाळकर, बी. ए.

## २० रायगडावर काय आहे ?

श्लोक ( वृत्त—शार्दूल विक्रीडित. )

राष्ट्राचा इतिहास पूर्ण करणें कर्तव्य हें आपुलें ।
ज्याच्या निर्मल हृत्पटावर असे हें स्पष्ट रेखाटलें ॥
त्यांनीं रायगडीं प्रवास करुनी घालावयाला भर ।
त्यामध्यें निजबुद्धिला रमवुनी व्हावें सदा तत्पर ॥ १ ॥
तेथें काय असे गडावर असें आणा न चित्तीं कदा ।
तेथें काय नसे मनास अपुल्या ऐसें पुसावें सदा ॥
केलें राज्य शिवाजिनें बनवुनी जें वर्णनीय स्थल ।
तेथें काय कमी तयास पडतें सद्बुद्धिचें ज्या बल ! ॥ २ ॥
येतां तो इतिहासकार वरती लेखांप्रती जीववी ।
कोठें काय असे बघून नयनीं चित्तांत तें सांठवी ॥
भ्रांती दूर करी बघून अवघें, सत्यास घे शोधुनी ।
या यत्नें शिवरायवृत्त सगळें लोकांस दे सांगुनी ॥ ३ ॥
येई येथ चरित्रकार तरि तो संजीवनी मेळवी ।
सांगाड्यामधिं चेतना भरुनियां त्यालागिं तो खेळवी ॥
डोळ्यांनीं बघतां स्थळें मतिलता घे चारुता ती नवी ।
काळोखांतिल वस्तुंला नव जसें सौंदर्य देतो रवी ॥ ४ ॥
आला तो जरि चित्रकार वरती चित्रें जुनीं रंगवी ।
किंवा नूतन योजुनी निजमनीं काढूनियां दाखवी ॥
टोंकाच्या वरुनी निघे हिरकणी धैर्यें तळीं यावया ।
किंवा यत्न करी महार वरती जाण्यास, काढी तया ॥ ५ ॥

*    *    *

हर्म्यांचा अवशेष भाग लिहुनी दावील तो सज्जनां ।
किंवा जीर्ण समाधि चित्रिं लिहुनी बोधील त्यांच्या मना ॥

किंवा तो इतिहास रम्य जिववी जो जाहलासे जुना ।
लोकांचें रमवून चित्त सहजीं मोहील जिज्ञासुंना ॥ ६ ॥
कोणी कल्पक येथ ये तरि लिही कादंबऱ्या सुंदर ।
वाचाया झटतील लोक सगळे ठेवूनियां आदर ॥
दावी धीर उदात्त वृत्ति सगळ्या लोकां शिवाच्या जरी ।
कर्तव्यास करून धन्यपण तो घेईल लोकीं तरी ॥ ७ ॥
कोणी नाटककार येउनि वरी पाही समाधीप्रती ।
होतां दर्शन निर्मळीं शिवगुणीं रंगेल त्याची मती ॥
श्रृंगारादिक सज्जनप्रिय रसां त्याच्या चरित्रीं भरी ।
प्रेमें नूतन नाटकांस रचुनी तल्लीन लोकां करी ॥ ८ ॥
येथें ये कवि दर्शनार्थ तरि तो चित्तांत दुःखें भरे ।
भग्ना पाहुनियां समाधि जल तन्नेत्रांतुनी पाझरे ॥
स्फूर्तीचे फुटतील नूतन गमे वाणीस त्याच्या झरे ।
जैसा पाहुन चंद्रकांत विधुला प्रेमामुळें पाझरे ॥ ९ ॥
पूर्वींचा इतिहास रम्य सगळा चित्तांत त्याच्या स्फुरे ।
त्याची लीन मति क्षणीं शिवगुणीं रंगूनियां बावरे ॥
त्याची–चित्रचरित्र–गायनरसीं–वाणी शिवाच्या शिरे ।
चाखाया रस त्यांतला रसिक ते होतील कीं घाबरे ॥ १० ॥
जिज्ञासावश जाल होउन तरी ज्ञानार्थ जोडाल कीं ।
प्रेमानें जरि जाल तेथ भर ती घालाल मोठीं सुखीं ॥
कर्तव्यास मनीं धराल तरि दे उत्साह तुम्हांप्रती ।
टाका आळस जा वरी बघुन घ्या नेत्रीं शिवाच्या कृती ॥ ११ ॥

—मोरो गणेश लोंढे.

---

## २१ विजयिनीविजयाष्टक.

श्लोक. ( वृत्त—शार्दूलविक्रीडित )

प्रेमें पाळुनियां प्रजा विसरवी जी रामराज्यस्मृती, ।
धर्मन्याय युधिष्ठिरासम घरीं दारीं जिच्या राबती, ॥
केला लोक अशोक शोक हरुनी जीनें अशोकापरी, ।
ती राणी विजया निरंतर करो साम्राज्य पृथ्वीवरी. ॥ १ ॥

कष्टें आर्जवितां शिकंदर महाराजा न जी भाळली, ।
चाणक्यें दिधले निरर्थक जिला नंदां नरांचे बळी, ॥
बोनापार्ट जिला भुलोनि पडला कारागृहीं शेवटीं, ।
नाचे तीच तुझ्यापुढें विजयिनी आजी जयश्री नटी ! ॥ २ ॥

(शिखरिणी.)

अगे ! धुंडूं जातां तुजसम दुजी ह्या क्षितितळीं ।
दिसेना कोठेंही अखिल गुणसंपन्न पुतळी ! ॥
तुझ्या जों जों येई म्हणुनि सुखसिंधूस भरती, ।
महानंदें तों तों सकलजनचित्तेंहि भरती. ॥ ३ ॥

( शार्दूलविक्रीडित. )

कोणी भूषविला असेल महिलावृंद स्त्रियांनीं पुरा, ।
माये ! भूषविली परंतु सगळी ही त्वांच विश्वंभरा ! ॥
वर्षें साठ भरोनियां झरझरां जीं आज गेलीं तयां ।
आनंदें इतिहासकार सगळे गातील लोकांत या. ॥ ४ ॥

( पृथ्वी. )

तुझे गुण न गायिले, गुणवती ! कुणीं या जनीं ? ।
तुझा विजय ऐकुनी सुख न कोण पावे मनीं ? ॥
अशा तुजसमा महा सुभगशालिनीच्या कथा ।
कथोनि कवि लाविती जड जनांप्रती सत्पथा. ॥ ५ ॥

( स्रग्धरा. )

शस्त्रास्त्रांच्या बळानें अगणित नृपती देश जिंकोनि गेले; ।
रक्तांचे पूर त्यांनीं म्हणति जलनिधीसारखे वाहवीले; ॥
ऐशा ह्या राक्षसांच्या धुउनि सकलही दुष्कृती टाकणारी ।
सत्कृत्यें आपुल्या ह्या क्षितिवर असशी त्वत्समा तूंच नारी ! ॥ ६ ॥

( शार्दूलविक्रीडित. )

विद्या वास घरोघरीं करुनियां अज्ञान सारी दुरी; ।
नाना चित्रकला विलास करिती स्वच्छंद पृथ्वीवरी; ॥
दासांच्या तुटल्या बिड्या पसरलें स्वातंत्र्य चोहोंकडे; ।
भाग्यें सर्व तुझ्याच—लोक म्हणती–व्हिक्टोरिये हें घडे ! ॥ ७ ॥
देवी ! देव तुला चिरायु करुनी ठेवो सुखी सर्वदा ! ।
वाढो वैभव उत्तरोत्तर तुझें ऐसेंच माये सदा ! ॥

सत्ता ह्या भुवनीं तुझी पसरुनी निर्वेध चौंहींकडे ।
कीर्तीचेहि तुझ्या झडोत विजये भूमंडळीं चौघडे ! ॥ ८ ॥

—गंगाधर रामचंद्र मोगरे.

---

## २२ आईनें केलेलें मुलाचें कौतुक.

श्लोक. ( तोटकवृत्त. )

छबडें मम सर्व असे धन हें, हृदया मृदु नाजुक बंधन हें ।
जरि नाजुक बंध फुलासम हा, तरि दे हृदयास बलास महा ॥ १ ॥
जरि जीव लहान सखे ! गमतो, सदनाश्रय होय मनोरम तो ।
शिशुमूर्ति लघू, परि हीजवरी, झुलतोंचि अह्मी भ्रमरभ्रमरी ॥ २ ॥
चिमणा विखरी सुख हा भंवतें, मज भूकतहान न जाणवते ।
मम वृत्ति समस्त इथे रमती, विसरे दुसरें तइं भान मती ॥ ३ ॥
ऋजु नासिक, वर्तुळ तोंडवळा, नयनांतिल निस्तुळ दीप्तिकळा ।
मुख मुग्धमनोरमता मिरवी; तिकडीलचि हा वळणा गिरवी ॥ ४ ॥
कमलोपम लोचन, वर्ण भला, शुचि भाळ विशाळ, भुजा सरला ।
तिकडील शिशूपणचेंच गडे ! जणुं रूप नवें नजरेस पडे ॥ ५ ॥
किति देह मऊपण भासवता, जणुं रेशिमचेंडुच हा सवता ।
मृदु चंचल जावळ भुर्भुरतें, बघुनी स्वमनीं चमरी झुरते ॥ ६ ॥
शुचिगौरशिरश्चलनावसरीं, लघु पिंपळपान लखाक करी ।
भंवती कच कोमल चांचरती, जणुं त्याजसवें झगडा करिती ॥ ७ ॥
धरि भाळ, कपोलहि, कृष्ण टिळा; कनकाद्रिशिरीं जणुं नीळशिळा ।
रमतां चिमणा मृदुहासरसीं, विकसे नव पद्म सुधासरसीं ॥ ८ ॥
नयनीं चमके किति चापळ ! ते. जणुं मीन जळीं गमती पळते ।
मधुरास्फुट तन्मुख जें वदतें, मज होय अनंतसुखास्पद तें ॥ ९ ॥
दुडु रांगत हा भ्रमण्याचि कला, नुकतां चपलांग असे शिकला ।
सहसा निसटून, हंसून, पळे, मज घाबरवी बरवी, न वळे ॥ १० ॥
कधिं आणुनि डौल, करां चरणां, जणुं टाकित, मेजित तालगणा ।
वळवून मुखा परि पाठिवरी, वनकेसरिची परिपाठि वरी ॥ ११ ॥
गुडघे कर, मस्तक, केश, गळा, भरुनी निजदेह रजीं सगळा ।
मम अंकतळीं घुसुनी निकरीं, वसना मळवी, मन फुल्ल करीं ॥ १२ ॥

किति धूळ मुखावरतीं उधळी ! अमृतांशु लपे जळभृत्पटळीं ।
अथवा उदयीं रविमंडळ तें, कवळून धुकें स्वकरीं मळतें ॥ १३ ॥
बघतां बघतां नयना चकवी; ठकतो बघतां शिशुनांच कवी ।
दुडकीं जरि मी, गवसे न, मग, कटिकिंकिणिनाद करी उमग ॥ १४ ॥
उदयीं घुसळीं नवनीत, तरी, पुढतीं बसला रविदोर धरी ।
जणुं देवकिचा सुत अष्टम हा, हरि संहरितो मम कष्ट महा ॥ १५ ॥
जलपात्र बघून तयावरतीं, जडते बहु बालविनोदरती ।
जलताडनचालित अंबुकणें, नटवी तनुला जणुं मुक्तगणें ॥ १६ ॥
जलबिंदु जयाभंवतीं खुलती, मुख तें बघुनी नयनें भुलती ।
भरतें हृदयाब्धिस येत महा, दिसतां उडुवेष्टित चंद्रम हा ॥ १७ ॥
कधिं दीपशिखेवर झेंप करी, अलिसा नलिनीकलिकेउपरी ।
करितांच निवारण मी पळतो; दुखवी, सुखवी, मजला छळ तो ॥ १८ ॥
क्षण एक सुखीं स्वमुखीं स्तन घे, मग मद्वदना क्षण एक बघे ।
अरुणोष्ठ पुढें स्फुरतां, हंसतां, अरुणाब्ज दिसे जणुं उल्लसतां ॥ १९ ॥
रदनांकुर भूषविती वदना, गमतें मणिमांदुसतुल्य मना ।
बघतां न पुरे मनिंची उकळी, रुचि अद्भुत येइ पळानुपळीं ॥ २० ॥
इतुक्यांत कपोलतलावरतीं, स्तनजातपयःकण पाझरती ।
जणुं विष्णुपदीं जलबिंदु खरी, कदलीकनकाभदलीं विखरी ॥ २१ ॥
करितां स्तनपानहि एक करीं, कवळून गळ्यांतिल एकसरी ।
मृदुलांकुरसन्निभ अंगुलि त्या, मज हांसविती गुदुल्या करित्या ॥ २२ ॥
हंसतां, करितां चिमणा सलगी, पडते सुकपोलतलीं खळगी ।
जणुं चंद्रम पूर्णकला वरतो, हरिणांक विराजतसे वर तो ॥ २३ ॥
असतां सदनीं तिकडे, सखये ! छबड्यास महोत्सव सन्मुख ये ।
लडिवाळपणें उसळे, खिदळे, करि अंगलटीस गुलाम बळें ॥ २४ ॥
तिकडे बिलगे, मग हा मजला, बिलगे, पळण्यास पुन्हा सजला ।
कलहंससुदंपतिमध्यग हें, जणुं हेलवतें दलदब्ज महें ॥ २५ ॥
प्रतिवारहि दृष्टिस काढितसें, तरि चित्त सये ! भय पावतसे ।
प्रभु यास सुखांत सदा वसवो, शुचि उन्नत हा कृतिला प्रसवो ॥ २६ ॥

—बाळकृष्ण अनंत भिडे, बी. ए.

## २३ सुखदुःखांचा अनुभव.

श्लोक—[ वृत्त–रथोद्धता. ]

मेघडंबरविमुक्त अंबर। नीलवर्ण दिसतें मनोहर॥
त्यांत गान खगकण्ठनिःसृत–। चालतां कुतुक होइ विस्तृत ॥ १ ॥
वायुही सुरभि, मंद, शीतल–। वाहतां सुखद होइ भूतल॥
तेथ दृष्टिपथिं वृक्ष भोंवतां। आणितात अधिकांश रम्यता॥ २॥
धन्य तो अनुभवील जो नर–। स्थान हें, समय हा निरंतर॥
किंतु त्यांस सुखवी परिस्थिती। जे शुचित्व शमहेतु पाळिती॥ ३॥
ही परिस्थिति फुकी तया नरा। ठाउकी न शुचिता यदंतरा॥
कार्यकारण जुळून या परी। आणितात सुखदुःख भूवरी॥ ४॥
शुद्धिची सुखद ही महार्घता। वैभवास बहुधा न संगता॥
शुद्धिमार्ग. तुमचें धरो मन। हें न हो मम अरण्यरोदन!॥ ५॥

—विद्याधर वामन भिडे, बी. ए.

---

## २४ प्रियेस–

श्लोक. ( वृत्त–शार्दूलविक्रीडित. )

आहे जोंवरि शक्य, वेंचित गुलाबाचीं फुलें तूं रहा!।
नित्यानन्त सुमंद काल सखये! जातो कसा हा पहा॥
जीं जीं कोमल फुल्ल आज दिसती होऊनि पुष्पें तुला।
तीं तीं म्लान उद्यां बनून पडतीं, या जाणिजे हेतुला॥ १॥
तेजस्वी गगनीं रवी उगवतां–आकाशिचा दीप तो—।
जों जों येउनियां नभःपथिं वरी भूमंडला दीपतो॥
आकाशांगण-अन्त येइ जवळी तों तों तयाचा क्षणीं।
ठाके सन्निध अस्तकालहि उभा, हें आण तूं गे मनीं॥ २॥
जातां बाल्य सरून यौवनदशा येते क्रमें मागुती।
त्यावेळीं करण्यास शक्त असती जें ज स्वयें वांछिती॥

तीही व्यर्थ निरुद्यमीं दवडितां अंतीं घडे वांकडें।
' गेला काळ पुन्हां कदापि नच ये ' हें तत्त्व मानीं गडे॥
तेव्हां जाण अमूल्य यौवनकला आतां त्वदंगीं स्फुरे।
योजीं साधुनि ही सुसंधि करण्या तूं कृत्य गे! साजरें ॥ ३ ॥

—नारायण महादेव भिडे, बी. ए.

---

## २५ देव आणि भक्त.

" तस्मिंस्तज्जने भेदाभावात् "

—महर्षि नारद.

श्लोक ( वृत्त—तोमर. )

' मुनिमानसपंकज भृंगहरी '। हरि सागर त्यांतिल या लहरी॥
भृगुची तुज लाथहि भूषणशी। तव पाय तयासहि छान वशी ॥ १ ॥
हरिमीन रमे निजभक्तजळीं। नच भक्त जिथें, धरणी सगळी॥
प्रभुवीण जशी मुरली सहसा। पडते शवतुल्यचि, भक्त तसा ॥ २ ॥
तव होय कृपा तंइ भक्त कळे। जंइ भक्त मिळे तंइ कार्य फळे॥
तरि कार्य तुझा सहवास, दुजें। नच कार्य जगीं करणें समजे ॥ ३ ॥
तुज देवपणा तुज भक्तपणा। गमतो सम त्यांतहि ' भक्तपणा॥
सविशेष रुचे मज ' तूं वदसी। भजकास्तव प्राकृतसा रडसी ॥ ४ ॥
निखिला जगतास्तव जन्म दहा। परि अंबरिषाकरितांचि दहा ॥
चिखलीं निजपुत्र सुखें तुडवी। परि भक्तिरसांत तुला बुडवी ॥ ५ ॥
अवतारहि मानुष तूं धरिसी। जडदेह इथें इथला त्यजिसी ॥
तुकया सशरीर तुझ्या भुवनीं। करितोचि कसा वद आगमना ॥ ६ ॥
नरकेसरि मत्स्य अपत्रप हा। भजकास्तव होय महार पहा॥
तव भक्त भुके बघुनि द्रवली। कबिरप्रमदा गणिका बनली ॥ ७ ॥
जरि सांबमिषें फिरसी विजनीं। तरि लोभ तुझा बहु गोपजनीं ॥
जरि हेमगिरी तृणसा म्हणतो। तुलसीदललुब्ध सुविप्रचि तो ॥ ८ ॥
अतिनिष्ठुरसा प्रळया करिसी। अभिमन्यु मरे शिशुसा रडसी ॥
अणुरेणुमधें विठु हा भरला। तरि पंढरिच्याकरितां झुरला ॥ ९ ॥
धरि पर्वत अंगुलिं तोलुनि तो। स्वशिरीं शिववास सुखें धरितो ॥
भजकासम देव मला गमतो। प्रभुतुल्यचि दास मला दिसतो ॥१०॥

अघपर्वत घोर अजामिळही । तुज उद्धरितां क्षिति ना तिळही ॥
कवि सांगतसे कपटा बळिला । तरि सोडिं तुझे कारें दान जला ॥११॥
करि वानर सैन्यबळें प्रभु हा । बहु जर्जर रावणवीर महा ॥
लघु अभ्मगुणें तुळितो नर हा । किति शेरहि मांस कसाइ पहा ॥१२॥
द्रुपदात्मभवा तुजला विनवी । पुरवूनि चिरें तिजला निववी ॥
शिवरायकथेंत तुका ह्मणुनी । फसवी शिवराय नवे करुनी ॥ १३ ॥
तव केश तुळोनि सुवर्ण जरी । नसलें धनदापाशिं काय तरी ॥
तुलसीदल घालुनि एकिकडे । तुळिलें तुजला भजकें उघडें ॥ १४ ॥
तवनामचि घेउनि धीवर तो । शतकोटि कथा सुरसा रचितो ॥
गुरुच्या वचानसरिसा करितो । परिपूर्ण कथा कुलकर्णिहि तो ॥ १५ ॥
शितिकंठ पितो विष दाहकर । बहु विठ्ठल होतचि देववर ॥
गरला जनकार्पित पीत सुखें । हसतोचि मिरा स्तवितेचि मुखें ॥ १६ ॥
भयरूप धरी भजकां भिववी । मुरलीधर तत्व महा शिकवी ॥
तनु दास धरूनि वितंड पहा । कारि, अद्वयतत्त्व विशारद हा ॥ १७ ॥
अवगाहन शीतजलीं करितां । शिणला मुनि ऊन झरा निरुता ॥
दिधला शर केवल फेंकुनिया । भजकास्तव काय मनांत दया ! ॥१८॥
शिवराय गिरीवरि जैं दमला । 'कारि तहा बहूत तहान मला' ॥
वदला गुरुला, कुबडीकरवीं । दगडांत झरा करुनी शमवी ॥ १९ ॥
मुनिशापभयें सतिनें स्मरलें । तिजला अमितान्नाहि पूरविलें ॥
कृति ही अतुला तुमची बरवी । परि भक्तकथा कथितोचि कवी ॥२०॥
नृपतीस म्हणे कटकासह या । हयहस्तिहि निर्भय घेउनिया ॥
अमिता अशना रुचिरा दिधलें । जगिं श्रेष्ठपदा बहु शोभविलें ॥२१॥
नत माधव बोलत हे जन हो । प्रभुभक्त अभिन्नचि शाश्वत हो ॥
भजकां भजतां प्रभुला रुचते । प्रभुला स्तवितां मज पथ्यचि तें॥२२॥

—माधव गोविंद भिडे.

[library stamp]

## २६ स्मशानगीत.

[ स्मशानांत रात्रीं आठ वाजण्याच्या सुमारास कवि एका लहान मृत बालकास आपल्या हातांतून, खणलेल्या खांचेंत ठेवून, माती-आड करण्याच्या बेतांत आहे अशा वेळेस त्याच्या मनांत आलेले विचार. ]

पद—( चाल—नृपममता रामा० )

या क्रूर माझिया हातीं। लोटितों तुझ्यावर माती॥
दगडाची करुनी छाती—शिशुवरा॥ १॥
ये चंद्र नभीं उदयातें। स्पर्शितसे तुझिया तनुतें॥
परि शक्त न उठवूं तूतें—प्रियकरा!॥ २॥
हा रम्य वाहतो वारा। बहु हलवी तव कचभारा।
परि उठवी तव न शरीरा—प्रियकरा!॥ ३॥
मी येथ गातसे गाना। काढुनिया मेसुर ताना॥
परि न शकें घालूं प्राणा—प्रियकरा!॥ ४॥
लय होतां चैतन्याचा। या चंद्रमरुद्गानांचा॥
उपयोग न होई साचा—प्रियकरा!॥ ५॥
हे अश्रु टपाटप खालीं। गळतात शुष्क तव गालीं॥
थांहीं तुज न्हाऊं घालीं—शिशुवरा!॥ ६॥
कर जो जो बा अंगाई। चिरकालिक निद्रा घेई॥
भय तुजला उरलें नाहीं—प्रियकरा!॥ ७॥
जातों मी अपुल्या ठाया। यम येइल तेव्हां न्याया॥
येईन तुला भेटाया—प्रियकरा!॥ ८॥

—माधवानुज.

---

## २७ वल्लभवांच्छित.

Bright Star! would I were steadfast as thou art,

—KEATS.

श्लोक ( वृत्त— मंदाक्रांता. )

तेजस्वी हे! उडुगणवरा! स्थैर्य तूझें उदात्त।
माझ्याठायों वसत जरि, तें इष्ट होतें नितांत—॥

होओनियां निशिंनिशि नभोमंडलीं लंबमान ।
एकाकी तूं विलसशि सदा स्वीयकांता–विहीन ! ॥ १ ॥
आलक्षीसी तिथुनि नयनीं नित्य उन्मीलितांहीं– ।
शांतोन्निद्र ग्रहवर जसा धूसरेन्दू तपस्वी– ॥
अंभोधीसी, द्विजसम महीलागिं जैं तो मनस्वी ।
देई अर्घ्यां विमल सतरंगांहिं पुण्योदकांहीं ॥ २ ॥
आलोकीसी मृदु हिममया नूतनाच्छादनासी ।
प्रच्छादूनी धवलित करी भूधरां काननां जें ॥
उर्वी सर्वा निविडतिमिराक्रांत कृष्णा पहासी ।
तैसी शुभ्रांशुकपरिवृता इन्दु जैं व्योमिं राजे. ॥
एकांतीं बा ! तुजसम असा काल कंठावयासी ।
प्रेक्षाया हें विविध जग ना वांच्छि मी स्थैर्य तूझें ! ॥ ३ ॥

* * *

नाहीं नाहीं तव अचलता त्यापरी इष्ट मातें– ।
इच्छी किंतु स्थिरतर तुझ्याहूनही व्हावयासी, ॥
मत्कांता जैं रहसि मज दे गाढ आलिंगनासी ।
दिव्या सौख्या अचल हृदयें तेधवां सेवण्यातें. ॥ ४ ॥
पीनोत्तुंगा प्रचयमधुरां मत्प्रियेच्या कुचांतें ।
क्रीडाकालीं सुखद करुनी मामकीनोपधान ॥
पातोत्पातां तदिय मृदुलामंद, तैं सुखिहीन ।
निर्वर्णाया सतत सखया ! वांच्छि मी शांत चित्तें. ॥ ५ ॥
मंदोच्छ्वासां मधुपरिमलोद्गारि तीच्या, विलोकीं, ।
मत्ताभृंगासम अनुभवायासि कीं त्या मुहूर्ती, ॥
आलक्षाया तशि अनिमिषाक्षांहि या मर्त्य लोकीं ।
प्रेमोत्फुल्ला विमल मधुरा ती तिची दिव्य मूर्ति— ॥
आयुष्या यापरि भुवि सदा, ना तरी वास नाकीं ।
वांच्छीं मी रे ! म्हणुनि मजसी दे तुझी स्थैर्यभूती. ॥ ६ ॥

—इन्दुकान्त.

## २८ कोमेजलेलीं फुलें.

श्लोक—( शार्दूल विक्रीडित. )

झाले चार पुरे न तास अजुनी, आली तुझ्मां म्लानता ।
झालां नीरस, गंध सुंदर तसा पावे कसा नष्टता ॥
तो तेजस्विपणा कुठें हरपला ? सौंदर्य गेलें कसें ? ।
पुष्पांनों ! तुमच्याकडेस कुणिही कां लक्ष्य ना देतसे ? ॥ १ ॥
जे कोणी स्वकरांत घेउनि तुम्हां हुंगावया आतुर ।
ते नाकें मुरडोनि सारिति दुरी आतां किती सत्वर ! ॥
" आहा ! काय तरी सुगंध ! इकडे द्याहो जरा तीं फुलें ! " ।
ऐसें बोलुनि घ्यावया झगडती आतां मुके जाहले ! ॥ २ ॥
देई कीं स्वकरीं तुम्हां सरसता झाडांवरी जो रवी ।
आतां त्याच करीं रसा हरुनियां कैसा तुम्हां वाळवी ! ॥
तैशा त्या मधुमक्षिकाहि घिरट्या घालीत होत्या किती, ।
आतां एकहि ती कुठें न दिसते, झाली कशी हे स्थिती ! ॥ ३ ॥
रात्रीं पाहुनि माझिया करिं तुम्हां अत्यंत आनंदली ।
'द्या!' 'द्या!' 'द्या!' विनवी परी रुसविण्या मीं ना विनोदें दिलीं; ॥
तैं हातांतुनिही बळें हिसकुनी खोप्यांत घालावया ।
झाली उत्सुक तीच सुंदरि अतां हो सिद्ध फेंकावया ! ॥ ४ ॥

—हरि नारायण आपटे.

---

## २९ माझें गाणें.

श्लोक—( शार्दूल विक्रीडित. )

सौंदर्यैकनिधान इंदु तळपे तेजें पहा अंबरीं, ।
हा अल्पद्युति तारकागण तरी आहे तिथें हांसत; ॥
आकाशांत विहंगनायक पहा घेई भरारी जवें, ।
उद्यानीं फुलपाखरूंहि उडतें आहे फुलांचे वरी; ॥ १ ॥
तारुण्योद्धत कामिनीसम नदी रत्नाकरा चालली, ।
तेथें निर्झर निर्मलांबु हिरव्या शेतांत खेळे मुदें; ॥

झाली ही वनभूमि नादित मनोहारी पिकांच्या रवें, ।
गुं गुं गायन गातसे भ्रमरही साध्या कळीभोंवतीं; ॥ २ ॥
काव्यें थोर कवी अजी जनमना आकर्षिताती जरी, ।
मी माझ्या प्रिय देवतेस अगदीं गाणेंच गाऊं नये ? ॥
रत्नालंकृत आपुली प्रियतमा श्रीमान कोणी करी, ।
पुष्पांहीं सजवून मींहि तिजला आनंद मानूं नये ? ॥ ३ ॥
त्यांच्या चंडरवों विलीन सगळें होऊन डोलो जग, ।
मातें क्षुद्र गणून गान मम हें केव्हां न मी त्यागिन ! ॥
विश्वाशीं तुलना करून बघतां ते थोर मी सान हा ।
आहे भेद कुठें ? अखेर सगळें जाईल शून्यीं लया ! ॥ ४ ॥

—वामन जनार्दन कुंटे.

---

## ३० फुटकी तपेली.

[ आत्मज्ञान मायेंतून गळूं लागलें, म्हणजे आत्मा अगतिक होतोच. ]

नको तपेली फुटकी असली ॥
जिव बोलतो पाणी पाणी , । चिरकालाची तहान लागुनि; ॥
अशी तपेली मजला देउनि, । थट्टा करितां तेथें कसली ! ॥ १ ॥
प्रवास करणें फार दूरवर; ॥
अद्याच्या पर्यंतापासुनि, । अंताच्या आरंभामधुनी; ॥
एक अनंतें माप घेउनी , । कैक अनंतें जाणें भरभर ॥ २ ॥
विश्व कशाचें घेउनि बसलां ?— ॥
विश्व मला जें दिसतें त्यांतिल, । विश्वें तुमचीं अणुसम होतिल; ॥
निजक्षणीं तें तुमच्या जिरविल, । काळांचा बाजारच सगळा ! ॥ ३ ॥
प्रवास माझा असा भयंकर ! ॥
या विश्वाच्या मागुनि जाणें, । मागुनि सुटुनी पुढें धावणें; ॥
अथवा सर्वांठायिं पसरणें, । आद्यंतांचें कापुनि अंतर ! ॥ ४ ॥
कडक कायदा धांवायाचा ! ॥
पाउल एकादें जरि चुकणें, । पहिल्यापासुनि पुनः धावणें ! ॥
आपुल्याच बा भंवतीं फिरणें, । मार्ग कुठुनि मग सरावयाचा ? ॥ ५ ॥

आधीं असतें पुष्कळ सोबत; ॥
कितीक ' मीं, मी ' मजला दिसती, । पुढें चालतां भरभर मरती; ॥
मरुनी माझ्याठायीं जगती, । माझीच मला उरते संगत? ॥ ६ ॥
माझें मीपण फारच मोठें ! ॥
दुज्या रहाया जागा नाहीं, । एकलकोंडा ह्मणुनी राही, ॥
खोटे ' मी 'ही अंगिंच पाहीं, । राहिल सोबत मग ती कोठें ? ॥ ७ ॥
मज जाणाया मीच विचक्षण ! ॥
नसते परके आधिं जाणतों, । असल्या मलाच न परी बघतो; ॥
मज ओळखतां इतर विसरतों, । माझें सर्वच फार विलक्षण ! ॥ ८ ॥
तऱ्हाच माझी विचित्र असली !
असला मी, तो प्रवास तसला, । कडक कायदा त्याचा असला, ॥
तशा प्रवासीं असल्या मजला, । अशी तपेली देतां कसली? ॥ ९ ॥
अनंततेची तहान माझी, ॥
मिळतां पाणी वाढे उलटी, । अधिकचि पाणी अधिकचि मोठी. ॥
जलब्रह्म द्या परि तिजसाठीं, ॥ तरीच होइल मग ती राजी ! ॥ १० ॥
भांडीं असलीं कां मज देतां ? ॥
भरतांना जीं होति रिकामीं, । भरुनि ठेविलीं तरि कुचकामी, ॥
पडतिल कोणाच्या तीं कामीं, । कधीं परत बोला हीं घेतां ! ॥ ११ ॥
वागविण्याचें उगाच ओझें ! ॥
करी प्रवासामाजीं खोटी, फुटकि तपेली तुमची खोटी, ॥
मृगजळ नसतें दावी खोटी, । कधीं तिच्यांतुनि नच गळलें जें ! १२ ॥
मायेची ही खरी तपेली; ॥
मृगजळ प्याया आंत उतरतों, ॥ अफाट तरि मी त्यांतच बुडतों, ॥
नसल्यामाजीं असतां जिरतों, । नको मलाही असली मेली ॥ १३ ॥
ब्रह्मांडाची करा तपेली ' ॥
माझी ओळख पाणि तिच्यांतिल, । कैक अनंतें तयांत जिरतिल, ॥
माझ्यावांचुनि सारे विरतिल, शिरे तपेलीं ही अशा जलीं ! ॥ १४ ॥
ब्रह्मांडाची खरी तपेली; ॥
करा रिकामी तरिही भरली, । भरुनी भरणें भरवुनि उरली, ॥
जिरतिल विश्वें कितीक असलीं, । कांठवरी जरि आधीं भरली ॥ १५
माझी ओळख विचित्र पाणी; ॥
जुनि ओळख मग नवीस आणी, । पाण्या वी अव्याहत पाणी ॥

पाण्यांतहि मग खेळे पाणी, । हाय! कसें हें कोणि न जाणी ॥ १६ ॥
ब्रह्मांडाची करा तपेली; ॥
तृषा नाहिंशी तिनें करीन, । तपेलीसही जळिं भरवीन, ॥
प्रवासासही जळिं जिरवीन, । नको मला ही असली मेली ॥ १७ ॥
प्रकार घ्या हा मनिं एकंदर; ॥
सर्वस्वाची करा तपेली, । माझ्या पाण्यानें भरलेली, ॥
पाहुनि तिजला तीन्ही काळीं । खुबी ओळखा क्या है अंदर ! ॥ १८ ॥

—गोविंदाग्रज.

## ३१ माझी विनंति.

पद ( सारंग )—चाल—" नानानीं बेलबाग बांधुनी स्थापियले लक्ष्मीकांत "

व्याकुळ झाला, लागुनि राही प्रेमाची मजसि तहान ।
रात्रंदिन तळमळतो, माझा जीव, जलाविण तो मीन ॥ ध्रु० ॥
शोध करित तव भटकत फिरतों, दूर दूर कां तूं पळसी ।
रानिवनीं गिरिकंदरांतुनीं कां तापससम रे तूं लपसी ! ॥ १ ॥
वृंदावनिंच्या कुंजवनामधिं राधेपासुनि तूं जैसा ।
इकडे तिकडे लपुनि राहसी प्रेमपरीक्षेस्तव तैसा ॥ २ ॥
तिमिरपटांतुनि दाट धुक्यांतुनि पुसट तुझ्या छाया दिसती ।
कारण असुनी कार्यहि होसी तुज जगदात्मा बुध म्हणती ॥ ३ ॥
होउनि राहसि तूंच चराचर कां न दिसे मज तव मूर्ति ? ।
भक्तांच्या हृदयांत अखंडित वास तुझा लोकीं कीर्ति ॥ ४ ॥
तो ज्ञानेश्वर तुकाराम तो एकनाथ तो शांत असा ।
प्रेमळ तुलसी कबीर सुंदर या भक्तांना दिससि कसा ? ॥ ५ ॥
आलें माझें जीवित संपत दिसत यमाचा ध्वज आतां ।
अंत पहासी कितितरि आतां धन्य न तुजवांचुनि त्राता ॥ ६ ॥
उदास वारंवार होय मन, दुःखाच्या शिखरीं बसलों ।
खरंच नाहीं संसारीं सुख, खऱ्या सुखा कीं मी मुकलों ॥ ७ ॥
होवो दर्शन तव मज दुसरी उत्कंठा राहिलि नाहीं ।
पूर्ण दयाघन असुनि तुला कां अजुनि न येइ दया कांहीं ? ॥ ८ ॥
अससि विभो ! तूं जेथें कोठें तेथें पावो मत्प्रणति ।
वासुदेव-सुत गोविंदाची मान्य करी इतुकी विनति ॥ ९ ॥

—गो. वा. कानिटकर. बी. ए. एल्. एल्. बी.

# ३२ प्रभात.

पद—( चाल-घनश्याम सुंदरा० )

उठा सुजनहो प्रभात झाली, नवयुग आलें उठा ।
सुज्ञें केलें ज्ञानसत्र हें खुलें, ज्ञानमधु लुटा ॥ ध्रु० ॥
अज्ञानाचा तिमिर लोपला ज्ञानसूर्य ये नभीं ।
आश्वासुनिया, कथीं जगातें " आतां तूं लव न भीं ॥
नूतन सृष्टी नूतन दृष्टी नूतन घ्या अनुभवा ।
नूतन लेखक नूतन कविगण विद्वज्जनही नवा ॥
सुशास्त्रवेत्ते अनेक नूतन प्रभातकालीं स्वयें ।
तत्पर फेंकित मधुर लकेऱ्या; नाद वर्णितां न ये ॥
दुमदुमलें हें विश्व;" टाकुनी निद्रा वेगें उठा । सुज्ञें० ॥ १ ॥
चैतन्याचा पूर लोटला, स्नान करुनि या क्षणीं ।
आलस्यावरि सोडा पाणी; विलंब न करा कुणी ॥
ऐक्य टिळा ल्या, स्वधर्म पाळा संध्या सारा सुखें ।
विश्वबंधुता मंत्र जपा हा हृदीं, न केवळ मुखें ॥
दया दुग्ध प्या, क्षमा वस्त्र घ्या, कर्तव्यातें उठा । सुज्ञें० ॥
गुणज्ञ येथिल रसिकशिरोमणि जाणति काका पिका ।
कांचमण्यांच्या परीक्षणीं ते करितिल न कधीं चुका ॥
प्रणयकथांनां इथें न अवसर, निंदाद्वेषहि नुरे ।
अहंपणातें स्थान न येथें; बोल येथले खरे ॥
शुक्ति फेंकुनी मुक्ता वेंचा, वेंचा स्वल्पा धना ।
कंटक वगळुनि पुष्पें घेण्या, परिश्रमा नच गणा ॥
प्रभात आली, तिला आदरा, दाविल प्रगतीपथा । सुज्ञें० ॥ ३ ॥
प्रभात झाली, कुसुमें खुललीं, परिमल पसरे जनीं ।
मधुप गुंगले सेवनांत, तों सृष्टी हांसे मनीं ॥
हास्यनिनादें, नभ हें कोंदे विहंग गाउनि सुरा ।
त्यांत मिळविती, या या म्हणती अत्युल्हासें धरा ॥
सुखस्वप्न जें निशीं पाहिलें, त्याचा प्रत्यय जगा ।
येइल वाटे प्रभात पाहुनि, शब्द न हो मम उगा ! ॥
उठा सुजनहो निज कर्तव्या करा, प्रमोदें उठा । सुज्ञें० ॥ ४ ॥

—नीलकंठ.

## ३२ कवितेचा कैवारी.

( चाल—अंबरगत परि पयोधरांतें० )

रुधिरमुखा मम मत्कुणमित्रा जागविसी कां मला ? ।
असा कां छळ माझा मांडिला ? ॥ ध्रु० ॥
निद्रारमणी उत्सुक होउनि शयनीं मज पालवी; ।
यामिनी सूर्यदीप मालवी ॥
वायु-लहरिचा सुखद विंझणा वृक्षराजि हालवी; ।
चंद्रिका शीतवृष्टि चालवी ॥
मग जाउनि मंचकिं पडे देह भागला; ।
क्षण जीव विश्रमे दिनभर वैतागला ! ।
त्या सुखद अवसरीं डोळा जंव लागला; ।
इतुक्यामध्यें मज उठवाया प्रसंग त्वां साधिला ! ।
कोणता विजय तुला लाधला ? ॥ १ ॥
दिवसां निद्रा रात्रिं अलोचन जाग्रण ऐशी स्थिति ।
यदुवरें वर्णिलि पार्थाप्रति ॥
परी गड्या ती योगिजनांची असे उग्र पद्धति ।
पाड तो मज गरिबाचा किती ? ॥
तुज भगवद्गीता सांग कुणीं शिकविली ? ।
तूं तत्त्व नेणतां मान कशी तुकविली ? ।
तव गुरुनें, हरहर ! बुद्धि तुझी चकविली ! ॥
विषसम होते विद्या त्याची अर्थ न ज्या उमगला, ।
वदे जरि ' पंडित मी चांगला ' ॥ २ ॥
कीं स्वस्त्रीची प्रेमसफलता करावया कामुका ।
पढसि हें दंतव्रणशास्त्र का ? ॥
मजवरती परि कां करिसी हा प्रयोग त्याचा फुका ? ।
आंधळ्या कितितरि करिसी चुका ? ।
तव दाह जाहला मदनसायकव्रणें, ।
मी पहा पोळलों तव दन्तव्रणगुणें ! ।
मग कोण जाणता विदग्ध तुजला म्हणे ? ।
स्वदुःख शमवावया पाहिजे मार्ग असा योजिला, ।
ज्यांत कीं परतापहि मोजिला ॥ ३ ॥

दिनभरि असतों स्वव्यवसायों निमग्न, न सुचे दुजें; ।
सुभाषित मनांतलें मनिं थिजे ॥
जरि रात्रींही काव्यदेविला मी न आळसें भजें ।
स्फूर्तिचें बीज कसें मग रुजे ॥
ही काय वाटली चिंता तुज अंतरीं ! ।
जणुं काव्यवृद्धिचा भार असे तव शिरीं ! ।
तूं जगतीं नसतां पळेल कविता दुरी ! ।
क्षमा करीं मज, मत्कुणराया, व्यर्थ दोष तुज दिला ॥
ह्मणुनि हें काव्य अर्पितों तुला ॥ ४ ॥

अ. ब. कोल्हटकर, बी. ए. एल्. एल्. बी.

---

## ३४ साहित्यसंमेलनास संदेश.

आर्या.

आचार्यकालिं सत्रें भारतवर्षांत भरविलीं ऋषिंनीं ।
म्हणुनी हे संमेलन–रीती उसनी नव्हे, परंतु जुनी ॥ १ ॥
सांप्रतच्या सत्राचा पुराण–पुरुष❀स्वयेंचि यजमान ।
तो वासुदेव* होता, आर्त्विज्याचा हरीस† बहुमान ॥ २ ॥
व्यापकता विष्णूचें रूप, तिघे वाङ्मयाब्धिपारीण ।
साहित्यरसिक सारे सदस्य. सिद्धी नसे पराधीन ॥ ३ ॥
साहित्याची प्रगती कवण उपायें घडे समीचीन ।
हें सांगाया परका नलगे, म्हणुनी न तें विवेचीन ॥ ४ ॥
परि पूर्व–पक्ष नसल्या उत्तरपक्षा मिळे न अवकाश ।
दिग्दर्शनार्थ यास्तव करितों वादार्ह विषयनिर्देश ॥ ५ ॥
अध्यात्मविषयचर्चा ज्या राष्ट्राचा असे निदिध्यास ।
तें राजकीयदृष्ट्या बहुधा दुर्बल असाच इतिहास ॥ ६ ॥
प्राचीन वैभवातें आठवितां देशभक्ति जी धाली ।
ती नलगे, परि व्हावी ती जी दावील सुस्थिती पुढली ॥ ७ ॥
राष्ट्रीय वाङ्मयाचा उद्गम राष्ट्रीयजीवितांत घडे ।
राष्ट्रीयजीविताच्या आकाङ्क्षेचंच आज गूढ पुढें ॥ ८ ॥
कवि आणि तत्त्ववेत्ते यांची जितुकी ऋणी असे जनता ।

---

❀ रा. ब. वि. मो. महाजनी. * रा. रा. वा. गो. आपटे. † रा. रा. ह. ना. आपटे.

तितुके ते न तियेचे, कोठें कधिंही न उक्ति हे वितथा ॥ ९ ॥
सामान्यहि वस्तु निज-प्रतिभातेजें सुरम्यशी दावी ।
अध्यात्मबलें अन्तर्ज्ञानें संपन्न सुप्रभाव कवी ॥ १० ॥
कोणी ह्मणति कवीच्या चित्ता स्पर्शिति विशिष्ट संस्कार ।
तो विद्यमान ऐशा द्रव्या'देतो नवीन आकार ॥ ११ ॥
काव्य न संसाराची टीका, परि चित्र चित्तवृत्तींचें ।
गीतालेख्यकलांसम साधन आनन्त्यसाहचर्यांचें ॥ १२ ॥
संवेदनक्षमत्वचि, न च तर्कपटुत्व बीज काव्याचें ।
नीत्युपदेशकथानक-रचना हें काव्यलक्ष्य न च साचें ॥ १३ ॥
सौन्दर्य निसर्गाच, निरुपाधिक मानवी मनोवृत्ती ।
काव्या विषय, नच परी व्यवहारीं संप्रदाय जे दिसती ॥ १४ ॥
काव्य अतीन्द्रियवस्तु व्यवहारस्पर्शहो न तें साहे ।
जडयंत्रोदयकालीं विषय न काव्यास या युगीं लाहे ॥ १५ ॥
सौन्दर्य—वीर्य—सात्त्विकनिष्ठादि गुणां कधीं नहो विकृती ।
मेघच्छन्न रविकरांसम अन्धुक जनचरित्रिं जरि दिसती ॥ १६ ॥
नसल्या प्रज्ञोन्मेष, क्षोभहि नसल्यास चित्तवृत्तींत ।
काव्यानुभाव राहे केवळ रमणीय शब्दजालांत ॥ १७ ॥
अपरिच्छिन्न, अतीन्द्रिय, काव्यात्मा इन्द्रजालसम राहे ।
ध्वनिमात्र तया साहे, योग्य तया स्पष्ट व्यञ्जना नोहे ॥ १८ ॥
नसल्यास सर्व लोकीं साधारण तीव्र भावना कांहीं ।
राष्ट्रीय काव्य नुपजे, कूपीं नसतां घटीं न जल येई ॥ १९ ॥
दृश्य न कवणास अशा शशिबिम्बें चिदुदधी उचंबळतो ।
त्याचा तुषारलेश प्रज्ञोन्मेषस्वरूप मनिं धरितो ॥ २० ॥
निज राष्ट्रीयविशेषा निज जीवितसें सदैव पाळावें ।
राष्ट्रीयमहाकाव्योदयसुदिना कौतुकें मग पहावें ॥ २१ ॥
राष्ट्रीय वाङ्मयानें निज राष्ट्रात्मस्वरूप उजळावें ।
कीं जेणें राष्ट्रहृदयीं निजराष्ट्राचें स्वरूप बिम्बावें ॥ २२ ॥
वादावभृथस्नानें सदस्य होऊनि सर्वही पूत ।
स्वस्वस्थाना परतुनि देउत इतरांस वाक्सुधातीर्थ ॥ २३ ॥
पुण्यग्रामिं जरी मी, लागे माझें तुह्मांकडेस मन ।
रविपुष्प केंवि न करी जिकडे रवि त्या दिशेकडे वदन ? ॥ २४ ॥

ग. ज. आगाशे, बी. ए.

---

## ३५ विरहदुःख.

श्लोक—( वृत्त—द्रुतविलंबित. )

कृशतनूमुख कां दिसशी हरे ! । दशरथात्मज ! कारण नाकळे ॥
मम पुलस्तिसुतें हरिली सती; । विरहवन्हिशिखा मज भाजती ॥ १ ॥
सकल विश्व दिसें बहु हर्षलें. । दिसति तृप्त चकोरहि तर्षले. ॥
रटति चक्रवधू मग कां बरें ? । मिहिर अस्तगिरींवरि जाय रे ॥ २ ॥
कांरोशि गुंजि न कां श्रुति-मंजुला ? । अलिनि ! शालिनि सांग बरें मला ॥
कमलगर्भि असे अलि गुंतला । ह्मणुनि फार असे विरहाकुला ॥ ३ ॥
विविध रम्य लता फुलल्या वनों । विकच जाहलि ना परि पद्मिनी ।
मज न हेतु कळे मुळिं यातला । दिवसनाथ दिगंतरिं चालला, ॥ ४ ॥
विकल होउनि कां वनिं हिंडशी । करिणि ! मत्त कुणाप्रति धुंडिशी ॥
मज निदान कळें नच यांतलें । कुलपती घनकर्दमिं रूतले. ॥ ५ ॥
गलितपर्ण विवर्णहि मल्लिका । उपवनीं दिसते मज वाळ्लि कां ? ॥
ऋतुपती अजुनी दुरिं राहिलें, । विवरितां क्षणिं कारण जाणलें ॥ ६ ॥
रविसुता-तटिं शोभनचंद्रिका । रुचिरिं साश्रुमुखी दिसताति कां– ॥
प्रमदकालिंहि दुःखित गोपिका । हरिवियोग घडला ह्मणुनी निका ॥७॥
कनकगौरतनू मृगलोचना । स्वतनु संस्कृतिहीन कृशानना ॥
दिसत दुःखित कां नवसुंदरी ? । पति हिचा गढला विषयांतरीं. ॥ ८ ॥

—धूर्जटि.

---

## ३६ नदी.

O, tell me, pretty river.

—GOODRICH.

साक्या.

" मला सांग गे सुंदर सरिते ! वाहत कोठुनि येसी ।
गभीरतेनें संथपणानें कोठें भटकत जासी " ॥ १ ॥
" जन्तुस्थान मम शैलशिखर तें धात्री वर्षावृष्टी ।
निर्झर माझा असे पाळणा वरुनि फुलांची वृष्टी ॥ २ ॥

एके दिवशीं प्रभातसमयीं हळूंच जन्मा आलें ।
गिरिकंदरीं नानापरिच्या क्रीडा करिती झालें ॥ ३ ॥
शैलावरुनी धडाधडा मी धांवत मैदानांत—।
आलें खालीं, भयभीता जणुं हरिणी ती रानांत ॥ ४ ॥
रम्य उतरत्या तीरावरल्या सुंदरशा पुष्पांनीं ।
आकर्षियलें मन्मन अपुल्या मोहकशा ओष्ठांनीं ॥ ५ ॥
तरुण युवतिसम पाहुनि मजला अपुल्या कुंजवनांत ।
घेउनि जाया कशीं करिति मज संगें तीं एकांत ॥ ६ ॥
तेहि सुखाचे दिन परि गेले निघूनि काळें कांहीं ।
आतां आले मला भोगणें दुर्दिन ऐसे पाहीं ॥ ७ ॥
अगाध ऐशी महोदधीची येइ गर्जना कानीं ।
मनांत धडकी भरे मृत्युची येइ कल्पना ध्यानीं " ॥ ८ ॥

—विद्यावनविहारी.

---

## ३७ तारांगण.

( चाल—चंद्रकांत राजाची० )

निळा सावळा वाटोळा हा पाट कुणी वरती ।
कसा कशावर असा ठेविला धरिला कुणिं हातीं ? ॥
टेकियला हा कसा कुणी गे पडत कसा नाहीं ।
कोणीं दिधला टेंकु अशाला ? मोठा किति आई ! ॥
रांगोळीचे ठिपके ऐसे कोणीं काढियले ।
लीलेपरि कां वरती असती लहानशीं बाळें ! ॥
लहान मोठे चोंहिकडे हे ठिपके ठेवियले ।
ओळीमध्यें नसती कां गे ? कोणीं जुळवियले ? ॥
तारा तुटला रेघ दिसे ही ! जुळवी कुणि खास ।
वेडिवांकडी रेघ बघोनी वीज म्हणसि तीस ! ॥
रोज कसे हे ठिपके दिसती पुसत कसे नाहीं ? ।
आकाशांतुनि वारा आई वहात कां नाहीं ? ॥
केव्हां जुळतिल ओळीमध्यें सर्वहि ठिपके गे ? ।
पाटावर या चित्र कुणाचें होइल मग सांगें. ॥

—वनमाली.

---

## ३८ जगतापासून दूर पळूं पहाणाऱ्या मानवा !

पद ( चाल–मजगमे ऐसा. )

खचित हें सारें जग तुझें । तूं जगाचा ॥ ध्रु० ॥
तूंचि निर्मिलें तूं वाढविलें । तूंचि तयाला रूपहि दिधलें ॥
अनंत नामीं भूषित केलें । होणारहि तें लीन तुजमधें ॥ सारें० ॥
तुझिया हर्षे प्रसन्न होतें । दुःखानें तव सुकुनी जातें ॥
प्रेम करिसि तरि प्रेमळ होतें । जसें करिसि त्या तसें बनतसें ॥ सारें० ॥
बैस वायुच्या दोल्यावरती । स्वर्गंगा धारें दोरी हातीं ॥
झोके घेईं गगनप्रांतीं । शंका कसली चल खेळ सुखें ॥ सारें० ॥
वसुंधरेला करी गुदगुल्या । सूर्यालागीं दावि वाकुल्या ॥
बांध विजेच्या पायिं साखळ्या । खेळविं सकलां अपुल्या संगें ॥ सारें० ॥
सिंधूचें मैदान येवढें । तत्पर सारें तुझिया क्रीडे ॥
खुशाल त्यावरि उडे बागडे । संकोचितपण टाक मनाचें ॥ सारें० ॥
जाशिल कोठें जगता त्यजुनी । ओढिल तुजला हें तेथोनी ॥
खेळावें तूं त्यासह म्हणुनी । तें तव-प्रेमाचेंच भुकेलें ॥ सारें० ॥
अनंत ब्रम्हांडांचा स्वामी । वसतो तुझिया अंतर्यामीं ॥
कसली चिंता भीति रिकामी । ओळख तूं निजरूप आपुलें ॥ सारें० ॥
यावरि आतां या जगतानें । सुखशिखरावरि सदैव रमणें ॥
दुःखकुहरिं वा लोळत पडणें । सर्वथैव हें असें तुजकडे ॥ सारें०

—जयकृष्ण केशव उपाध्ये.

---

## ३९ सायंतारा.

पद ( चाल–थांब थांब० )

भीषण दिसली रजनी काळी ।
पांघरली ती शाल काजळी ॥
विणीतसे मेघांची जाळी ।
त्या अवकाळीं एक चमकली तारा रम्य नभांत ॥ १ ॥
निशादेविच्या वेणीमधलें ।
जणों हिऱ्याचें फूल चिमुकलें ॥

कृष्णकुंतलीं हांसत बसलें ।
हास्य तयाचें गगनीं नाचे ठसलें कविहृदयांत ॥ २ ॥
सुरलोकींच्या कीं उद्यानीं ।
शोभतसे ही कलिका चिमणी ॥
सौंदर्याची मूर्त शिराणी ।
हळुं हळुं उमले वास दरवळे भरला उद्यानांत ॥ ३ ॥
काव्यदेविची विमला बाला ।
गोड तियेच्या नवनव लीला ॥
वेड लाविती रसिकजनांला ।
मृदुल करांनीं ताल धरोनी नृत्य करी गगनांत ॥ ४ ॥
भरती आली शोकसागरा ।
नैराश्याचा सुटला वारा ॥
अज्ञानाचा होय पसारा ।
हृन्नौका ती खालीं वरती करिते बघ थैमान ॥ ५ ॥
संकटलाटा गर्दी करिती ।
अंधाराचीं भुतें भोंवतीं ॥
नाचत सुटती वेड लाविती ।
तों आशेचा दीपच साचा प्रकटे क्षितिजावरती. ॥ ६ ॥
कोमल किरणीं हृदय खुलविलें ।
संसारीं या सार आढळे ॥
धरणी स्वर्ग न दोन राहिले ।
सुस्थिर झालें मन हें रमलें आशाभरणीं सजलें ॥ ७ ॥
बहर नवा ये आशातरुला ।
हृदयोद्यानीं सडा पसरला ॥
गुंफुनि पुष्पें रचिली माला ।
ठेवुनि हृदयीं तिला प्रीतिमयिं गाणीं तिजवर गातें ॥ ८ ॥

—कुमारी वेणुबाई केळकर.

## ४० वेड्याचें कोडें.

पद ( चाल—आनंदीआनंद गडे. )

म्हणा हवें तर खुळा मला । मुळीं न त्याची क्षिति मला ॥ ध्रु० ॥
प्रश्न विचारिन मी त्याला । उत्तर देइल जो मजला ॥

हसतां रडतां । किंवा रुसतां । नभीं विचरतां ।
गाणीं गाइन जीं भलतीं । सुरेख किंवा बेसुर तीं ? ॥ १ ॥
या हो रूढीचे वाली । मजशीं बोला या कालीं ॥
कालचि गेला । सागरिं बुडला । पुन्हा उगवला ।
पारोसा तो कीं न्हाला । सूर्य असे सांगा मजला ? ॥ २ ॥
नदीनिर्झरीं जें वाहे । मेघांतुनि जें स्रवताहे ॥
क्षितीस पिकवित ॥ पिकांस डुलवित ॥ फुलांस हंसवित ॥
वाहे जीवन अक्षय जें । शिळें असे तें कीं ताजें ? ॥ ३ ॥
भक्ष्य खातसे जो भलतें । इच्छेला येइल तेथें ॥
काष्ठीं दडतो । यज्ञीं रमतो । मसणीं हंसतो ।
अग्नी मांगावरिं थाटे । पवित्र किंवा तो वाटे ? ॥ ४ ॥
अनादि काळापासुनि जें । चराचरांतुनि बहु गाजे ॥
हृदयीं दाटलें । जगांत फुटलें । गानीं नटलें ।
प्रेम, तयाचा रंग भला । विटला किंवा तो खुलला ॥ ५ ॥

—द. रा. गदगकर, बी. ए. एल्. एल्. एम्.

---

## ४१ मोत्यें.

श्लोक ( वृत्त वसंततिलका. )

मुक्तामणी यश तुझें तुझिया गुणीं तें । ओवून हार करण्या वदलों स्त्रियांतें ॥
मोत्यां न छिद्र, परि शेवटही गुणां न । हा हार बाइ न घडे, वदल्या हंसून ॥१॥

—लक्ष्मण पांडुरंग भोसेकर.

---

**तिसरा भाग समाप्त.**

# नाटकें, कादंबऱ्या वगैरे.

## रा. रा. कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर यांचीं नाटकें.

कांचनगडची मोहना. किं. ८१२.
संगीत मानापमान. किं. ८१२.
भाऊबंदकी. किं. ८१२.
सवाई माधवराव यांचा मृत्यु. किं. ८१२.
नायकांचें बंड. किं. ८१२.
प्रेमध्वज. किं. ८१२.
संगीत विद्याहरण. किं. ८१२.
सत्त्वपरीक्षा. किं. ८१२.

## यशवंत नारायण टिपणीसकृत नाटकें.

कमला. किं. ८१२.
मत्स्यगंधा. किं. ८१२.
राधामाधव. किं. ८१२.
वासंतिका. किं. ८१२.

## रा. नरसिंह चिंतामण केळकर कृत नाटकें.

चंद्रगुप्त नाटक. किं. ८१२.
कृष्णार्जुन युद्ध. (सचित्र) नाटक किं. ८१२
भ्रमविलास रा. ब. ह. पंडीतकृत किं. ८१२.
वेणीसंहार किं. ८१२.
मोरोपंतांचा प्रभुद्रोह. किं. ८२.

## कादंबऱ्या वगैरे.

दुर्दैवी रंगू अथवा पानपतचा शेवटचा संग्राम. किं. १८८, ट. ह. ८२.
न्याय कीं अन्याय? ले. रा. सीताराम केशव दामले. किं. १ रु.
नारायणराव आणि गोदावरी. १ रु.
अनेकविद्यामूलतत्त्वसंग्रह. किं. १॥ रु. ट. ह. निराळें.
हिंदुधर्म आणि सुधारणा. किं. १॥ रु. ट. ह. निराळें.
केळकरकृत लेखसंग्रह, केसरी व मराठा पत्राचे संपादक रा. रा. नरसिंह चिंतामण केळकर यांनीं निरनिराळ्या विषयांवर लिहिलेले लेख व निबंध चार भागांत छापून प्रसिद्ध. किं. २ रु.
करमणूक. किं. ८७
रुमेला-जुमेला-एक दुःखपर्यवसायी ऐतिहासिक गोष्ट. किं. ८८.
अरेबिअन नाइटस. किं २ रु.
सुभाषित चिपळूणकरकृत किं. ८१२
चित्रमय जपान. किं. १ रु.
चित्रमय बर्मा. किं. ८८.
विनोद व महदाख्यायिका किं. ८९
कै० राजा रविवर्मा यांचीं नामांकित चित्रें इंग्रजी, मराठी हिंदी किं. १ रु.

**पुस्तकें मिळण्याचें ठिकाणः—म्यानेजर-चित्रशाळा प्रेस, पुणें.**

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ११८

REFBK-0001189

REFBK-0001189